# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.११/ २०१६** **दिनांक १६.०८.२०१६**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १६.०८.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २२८२/ २०१६, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक १६.०८.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य
०४. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०५. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०६. मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग,सदस्य
०७. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०८. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०९. मा.सौ. अनिताताई विजयराव जगताप, सदस्य

मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली. त्यानंतर मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा.अध्यक्ष महोदय व सर्व उपस्थित व्यवस्थापन समिती सदस्यांचा परिचय करुन दिला व सभेस संस्थानचे कामकाजाबाबत थोडक्यात माहिती दिली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे, सदस्या व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य यांनी दूरध्वनीवरुनतसेच मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले होते. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दि.२४/०५/२०१६ रोजी संस्थानचे दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकीय संचालक व इतर २८ पदांसाठी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकीट उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि१३/०८/२०१३ व दि.१७/०४/२०१५ रोजीचे आदेशान्वये संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकीय संचालक व इतर २८ पदे भरणेसाठी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत आली होती. प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार विविध पदांसाठी अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्ज मा.डीन, बीजेएमसी, पुणे यांचेकडून पडताळणी करुन पात्र उमेदवारांना दि.२४/०५/२०१६ रोजी मुलाखतीसाठी साईनिवास गेस्ट हाऊस, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे बोलविण्यात आले होते. तसेच सदर उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी मा. न्यायालयाचे आदेशानुसार डीन, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, संबंधीत विषयातील तज्ञ तसेच सिव्हील सर्जन, अहमदनगर यांना आमंत्रित करणेत आले होते.

मा.न्यायालयाचे आदेशानुसार निवड समितीसमोर दि. २४/०५/२०१६ रोजी श्री साईनिवास गेस्ट हाऊस, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेणेत आल्या. सदर मुलाखतीचे व्हिडीओ चित्रीकरण करणेत आलेले आहे. मुलाखती संपुष्टात आल्यानंतर डीन, बीजेएमसी, पुणे व सिव्हील सर्जन, अहमदनगर यांनी घेतलेल्या मुलाखतीचा निकाल व्हिडीओ चित्रीकरणासमोर पाकीटात सिल केला आहे.

तरी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकीट उघडून निवड झालेल्याअर्जदारांना नेमणूक आदेश देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५१०** **दि.२४/०५/२०१६ रोजी संस्थानचे दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकीय संचालक व इतर २८ पदांसाठी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकीट आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील उमेदवारांना मिळालेले गुण, त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव व रिक्त पदे या सर्व गोष्टींचे समितीने अवलोकन केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, निवड समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेले उमेदवार व राज्य शासनाचे आरक्षण विषयक तसेच भरती संदर्भातील विविध शासन निर्णय/ परिपत्रक यासह सदरहू प्रस्ताव अंतीम निर्णयार्थ रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०२ श्रीसत्यनारायण पुजेच्या बॅच व्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

प्रस्तावना- संस्थानमार्फत पुर्वीपासुन श्रीसाईभक्तांना श्रीसाईसत्यव्रत पूजा करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. श्रीसाईभक्तांना संस्थानचे देणगी काऊंटरवर एक दिवस अगोदर रु१००/- भरुन श्रीसाईसत्यव्रत पूजेचे तिकीट देण्यात येते. त्यानंतर संस्थानचेसुविधेनुसार७ ते ८ पहिली बॅच, ९ ते १० दुसरी बॅच, ११ ते १२ तिसरी बॅचचे तिकीट देण्यात येते. त्यानंतर वेळप्रसंगी पौर्णिमा अथवा गर्दीचे दिवशी १३ ते १४ अशी चौथी बॅचचे तिकीट देण्यात येते. प्रत्येक बॅचमध्ये १०० व्यक्ती (सपत्नीक) एकाच वेळी पूजेला बसतील अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. मंदिर विभागामार्फत श्रीसाईसत्यव्रत (श्रीसत्यनारायण) पूजेची पुर्व तयारी, सफाई, बैठक व्यवस्था, पुजारी व्यवस्था, प्रसाद व्यवस्था करण्यात येते. तसेच पूजेनंतर साईभक्तांना अंदाजे४७०ग्रॅम शिरा प्रसाद व एक श्रीफळ देण्यात येते. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०३.२०१०चे सभेतील विषय नं.२६, निर्णय क्र.२९९ नुसार दि.०१/०४/२०१०पासून श्रीसत्यनारायण पूजेच्या दर रु.५०/- ऐवजी रु.१००/- आकारणेत येत आहेत.

प्रस्ताव- मा.न्या.श्री. श्रीकांत कुलकर्णी, अध्यक्ष, मा.त्रिसदस्यीय समिती, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर व संस्थान व्यवस्थापनाचे वरिष्ठ अधिकारी यांनी रविवार, दि.१३/०३/२०१६ रोजी संस्थानच्या संपूर्ण मालमत्तेची तसेच आस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या सर्व विभागांची समक्ष स्थळपाहणी केलेली आहे. त्यावेळी सत्यनारायण हॉलचे संदर्भात मा.अध्यक्ष साहेब यांनी श्रीसत्यनारायण हॉलमध्ये पूजेसाठी चौरंग-पाटाची मांडणी करतांना, दोन रांगेतील अंतर पुरेशा प्रमाणात सोडण्यात यावे जेणेकरुन भक्तांना या रांगेतून जाणे-येणे सोईचे होईल अशी सुचना केली आहे

विभागाचे मत/ अभिप्राय- मा.अध्यक्ष साहेब यांचे सुचनेनुसार श्रीसत्यनारायण हॉलमध्ये पूजेसाठी चौरंग पाटाची मांडणी करतांना, दोन रांगेतील अंतर पुरेशा प्रमाणात सोडण्याकरीता श्रीसत्यनारायण हॉलची जागा अतिशय सिमीत आहे. त्याकरीता सध्याच्या बॅचेसमध्ये १० साईभक्तांच्या १० रांगांची अशी १०० पूजेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या रांगाच्या पुढे अथवा मागे जागा शिल्लक नसल्याने या रांगांचे प्रमाण कमी करणे हा एक पर्याय आहे. त्याकरीता सध्या असलेल्या १०० पूजेच्या ऐवजी ७२ पुजा ठेवल्यास सर्व साईभक्तांना पुरेशी जागा उपलब्ध होईल, असे नम्र मत आहे. सदरचा प्रस्ताव मान्य झालेनंतर त्याबाबतची प्रसिद्धी विभागामार्फत प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे सॉफ्टवेअरमध्ये दुरुस्ती करुन लेखाशाखेमार्फत देणगी कार्यालयातून पूजेच्या तिकीटांची विक्री करण्यात येईल.

तरी सध्या असलेल्या श्रीसाईसत्यव्रत पूजेमध्ये १०० ऐवजी ७२ पूजेची व्यवस्था करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळावी, ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५११ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, श्रीसत्यनारायण हॉलमध्ये पूजेच्या चौरंग-पाटांची मांडणी करतांना, दोन रांगेत पुरेशा प्रमाणात अंतर सोडणेसाठी श्रीसाईसत्यव्रत पूजेचे बैठक व्यवस्थेमध्ये १०० ऐवजी ७२ पूजेची मांडणी करणेत यावी, जेणेकरुन भक्तांना या रांगेतून जाणे-येणेसाठी सोईचे होईल. तसेच आवश्यकतेनुसार या पुजेच्याबॅचमध्ये वाढ करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभाग प्रमुख/ मुख्यलेखाधिकारी/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल CISF (Central Industial Security force) यांनी संस्थान परिसरात पाहणी करुन सादर केलेल्या अहवालाबाबत व खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** मा व्यवस्थापन समिती दि.09.10.2014 चे सभेतील केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल यांचे मार्फत कन्सल्टंसी सेवा घेणेकामी विषय नं.17 वर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.902 नुसार श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षितता ही बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे सुरक्षा यंत्रणा, फायर सेफ्टी, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा वगैरे सुरक्षा विषयक मार्गदर्शनासाठी केंद्र शासनाच्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यासारख्या चांगल्या संस्थेचे मार्गदर्शन घेण्याची संस्थानला आवश्यकता आहे. मार्गदर्शन घेणेसाठी सदर संस्थेची विनामुल्य अथवा मानधन तत्वावर कन्सलटंट म्हणुन नेमणुक करणेबाबत त्यांचेकडे विचारणा करण्यात यावी. तसेच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल संस्थेकडून श्रींचे मंदिर व मंदिर परीसराच्या सुरक्षेसाठी सुरक्षा कर्मचारी घ्यावयाचे झाल्यास त्यांचे वेतन व मानधन यावर किती खर्च येईल याबाबत सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले होते. त्यानुसार केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांचेकडे पत्रव्यवहार करुन सुरक्षा व फायर कन्सलटंन्सी फी बाबत चौकशी केली असता त्यांनी 2,50,000 + 75,000 असे एकुण रु.3,25,000/- खर्च कळविला होता. दि.27/07/2015 रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे त्याबाबत विषय क्र.14 निर्णय क्र.225 अन्वये सादर केला असता त्यावर सविस्तर चर्चा होऊन रु.3,25,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार सुरक्षा व फायर कन्सलटंन्सी फी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांना आदा करणेत आलेली आहे.

त्यानंतर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे (CISF) अधिकारी यांनी दि.14.01.2016 ते दि.18.01.2016 या कालावधीत मंदिर, मंदिर परिसर तसेच संस्थान संलग्न सर्व परिसराची पहाणी करुन आढळुन आलेल्या त्रुटी, उणीवाबाबत सुरक्षितेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना व खरेदी करणे आवश्यक असलेले सुरक्षा साहित्य इत्यादी बाबतचा सविस्तर सुरक्षा अहवाल (कन्सलटंन्सी रिपोर्ट) सुमंत सिंग, असिस्टंट इन्सपेक्टर जनरल यांनी जा.नं.42014(4)/ 31/2014 कन्सलटंन्सी/619 दि.21/03/2016 चे पत्रासमवेत अहवाल इकडील कार्यालयास सादर केला आहे.

सदर अहवालातील काही ठरावीक ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहे:-

1) श्री साईबाबा मंदिरामध्ये दर्शनाकरीता साईभक्तांची मोठया प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता, श्री साईबाबा संस्थान हे वेगवेगळया आतंकवादी संघटनांच्या हिट लिस्टवर असल्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रचंड प्रमाणात होणा-या साईभक्तांच्या गर्दीमुळे आतंकवादी हल्ला, दंगल, पाकीटमारी इत्यादी गुन्हे होवू शकतात. त्याकरीता या संभाव्य धोक्यापासून सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून CISF यांचेकडे सध्या अस्तित्वात असलेल्या सुरक्षाबाबतच्या यंत्रणेसंदर्भातसल्ला घेण्याची आवश्यकता आहे.

2) बऱ्याच वर्षापासुन इराकनंतर भारत आतंकवादांच्या हिटलिस्टवर एक प्रमुख केंद्र बनलेले आहे. मागील काळात सुध्दा भारतात काही प्रमुख धार्मिक स्थळे ( उदा.बोध,गया,अक्षरधाम,अहमदाबाद इ.) आतंकवादाचे प्रमुख लक्ष आहे. शिर्डीतील साईभक्तांची मोठया प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता साईबाबा संस्थानवर हल्ला झाल्यास साईभक्तांच्या विश्वासाला तडा जाण्याची शक्यता आहे. साईबाबा मंदिर परीसरालगत असणारे हॉटेल्स / लॉजेसची बांधकामे, दुकाने भिकारी व इतर किरकोळ विक्रेते यांचे वाढते प्रमाण तसेच गेट नं. 1 व 5 हे नगर-मनमाड रोड लगत असुन तेथील रहदारीमुळे संभाव्य धोका निर्माण होवू शकतो. त्यावर योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.

3) श्री साईबाबा मंदिर व परीसर येथील सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून करावयाच्या आपतकालीन सुरक्षा व्यवस्थापनाचा आराखडा तयार करणे. करीता यावर नियंत्रण करण्याकरीता दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची कडक तपासणी होणे गरजेचे आहे.

4) मंदिर परीसर, प्रसादालय, एल.पी.जी.स्टोअर, निवासस्थाने व जलसाठे इत्यादी ठिकाणची असणारे गेटस् हे आधुनिक पध्दतीची म्हणजे विजेवर चालणारे स्लायडिंग गेटस् तसेच उघडझाप करणारे बॅरीयर बसविण्यात यावेत. गेट नं.4 येथे वाहनांकरीता इलेक्ट्रिक बुम बॅरीयर (Electrically Boom barrier) बसविण्यात यावेत. महिलांच्या तपासणीसाठी सुलभरीत्या सुविधायुक्त वेगळे बुथ तयार करणे. दर्शन रांग नं. 1 व 2 येथे भक्तांसाठी बॉडी स्कॅनर (Body Scaner) बसविण्यात यावे.

5) मंदिर परीसराचे सर्व प्रवेशव्दार, प्रसादालय, निवासस्थाने व जलसाठ्यांवर तसेच प्रवेशव्दारांवर भक्तांचे व कर्मचाऱ्यांचे DFMD व्दारे त्यांचे तपासणीकरीता सामान तपासणी यंत्र (X-BIS) लावणे आवश्यक आहे. तसेच मंदिर परीसरात फिरता बुलेटप्रुफमोर्चा (Mobile bullet proof morcha) ठेवण्यात यावा.

6) हत्यारबंद सुरक्षा रक्षकांव्दारे वॉच टॉवर वरुन चोवीस तास सुरक्षा करणे. तसेच गेट नं.3 च्या दक्षिण –पुर्व च्या बाजुने कम्पाउंड वॉल नजिक बरेच दुकाने/ किरकोळ विक्रेते यांनी अतिक्रमण केले असून तेथे एक नविन वॉच टॉवर (Watch tower) बसविणे आवश्यक आहे. गेट नं.01 च्या वॉलवर धारदार ब्लेडचे प्रोटेक्शन करावे. साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी मंदिरालगतची असलेली अतिक्रमणे काढणे आवश्यक आहे.

7) मंदिर व मंदिर परीसरातील हालचालीवर लक्ष ठेवण्याकरीताचे सी.सी.टि.व्ही. कॅमे-याचे रेकॉर्डीगवर 24 तास लक्ष केंद्रीत ठेवणे आवश्यक आहे. श्री साईबाबा संस्थानमध्ये सी.सी.टि.व्ही. कंट्रोल रुम फक्त एकच आहे. समाधी स्थळापर्यंत येणाऱ्या व्ही.आय.पी. व स्थानिक साईभक्तांचे जाण्या-येण्याच्या रस्त्यांची पाहणी करणे. साईभक्तांना येण्याजाण्यासाठी असणाऱ्या सर्व गेटवर योग्य त्या सुविधा उपलब्ध करणे. संस्थानमधील सर्व

कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणे. संस्थानच्या सर्व गेटवर बसविण्यात येणाऱ्या घातपात विरोधी यंत्रणांची नियमित तपासणी करणे. संस्थानच्या नियोजीत वाहनतळांना चेन लिंक फेन्स करुन सुरक्षा व्यवस्था कडक करणे.

उपरोक्तप्रमाणे दर्शविलेल्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून बसविण्यात येणाऱ्या यंत्रणा (मशिनरी) मंदिर परीसरात कोणकोणत्या ठिकाणी बसविण्यात यावे, याकरीता लागणाऱ्या सुरक्षा साहित्यांचा अंदाजित खर्चासह त्यांनी खालीलप्रमाणे तपशिल दिलेला आहे.

**A SECURITY CONSULTANCY REPORT BY CISF IN RESPECT OF SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI DTD.21/03/2016.**

**APPENDIX – "B"**

**ACCESS CONTROL SYSTEM FOR SHRI SAIBABA SANSTHAN TRUST**

| Sr. No. | Item Description | Location | Qty | Rate in Rs. | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Biometric Smart Card reader | 1. Gate No.02(02 Nos)<br>2. Gate No.03(02 Nos)<br>3. Gate No.04(02 Nos)<br>4. Central Control room (01 Nos)<br>5. Cash Room (01 Nos)<br>6. Gaonkari Gate (01 Nos)<br>7. Prasadalaya (Approach way to kitchen ladoo Prasad) (02 Nos)<br>8. All Accomodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati (06 Nos)<br>9. Water reservoir (Gate no.02) (01 Nos) | 18 | 15,000 | 2,70,000 |
| 02 | 2 Biometric smart card / finger print readers controller with a buffer of 5000 transaction on the controller complete with power supply unit and मnclosure | 1. Gate No.02(01 Nos)<br>2. Gate No.03(01 Nos)<br>3. Gate No.04(01 Nos)<br>4. Central Control room (01 Nos)<br>5. Cash Room (01 Nos)<br>6. Gaonkari Gate (01 Nos)<br>7. Prasadalaya (Appoach way to kitchen, laddo Prasad) (01 Nos)<br>8. All Accomodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati (06 Nos)<br>9. Water reservoir (Gate no.02) (01 Nos) | 14 | 35,000 | 4,90,000 |
| 03 | Access control software | Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 01 | 1,00,000 | 1,00,000 |
| 04 | Electronic Magnetic lock | Emergency Gates i.e.<br>1. Darshan Queue 1 & 2 (Outer side mandir)- Total 02 Nos<br>2. Darshan Queue Bhakti niwas (Ground Floor-02 Nos, First floor-01, Second Floor-01) Total-04<br>3. Darshan Queue shanti niwas- (Ground floor-02 Nos, First floor-01, Second floor-01, Third floor-01) Total-05<br>4. Strong Room<br>5. Cash counters in all accommodation facilities (Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati, Saibaba Hospitals) Total-05 | 17 | 6,500 | 1,10,500 |
| 05. | UVSS | Vehicle Gate No.04 | 01 | 15,00,000 | 15,00,000 |
| 06. | Bollards | Vehicle Gate No.04 (06 Nos) | 06 | 1,00,000 | 6,00,000 |
| 07. | Electrically operated sliding gates | 1. Gate No.02<br>2. Gate No.03<br>3. Gate No.04<br>4. Vehicle Gate No.04<br>5. Gate No.05<br>6. Prasadalaya (Approch way to kitchen, ladoo Prasad) | 08 | 2,50,000 (Shall vary as per the length of the gate) | 20,00,000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 7. All accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala-02 Nos | | | |
| 08. | Flap barrier | 1. Gate No.02 - (02 Nos)<br>2. Gate No.03 - (02 Nos)<br>3. Gate No.04 - (02 Nos)<br>4. Gavkari Gate - (02 Nos)<br>5. Prasadalaya In Gate - (02 Nos)<br>6. All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati - 06 Nos | 12 | 1,00,000 | 12,00,000 |
| 09. | Electrically operated Boom Barrier | 1. Vehicle Gate No.04 Prasadalaya (In Gate)<br>2. Prasadalaya (Approch way to kitchen, ladoo Prasad)<br>3. All accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-03 Nos<br>4. Water reservoir (gate no.3) | 06 | 50,000 | 3,00,000 |
| 10. | Full Height Turn style | 1. Prasadlaya ((Approch way to kitchen, ladoo Prasad)- 02 Nos<br>2. Water reservoir (gate no.02) -01 Nos. | 03 | 90,000 | 2,70,000 |
| | | | | Total | 68,40,500 |
| 11. | Cable 8 X 1 sq mm armoured | | Lot | | |

**APPENDIX – "C"**
**FINANCIAL IMPLICATIONS FOR GADGETS INSTALLATION AT SHRI SAIBABA SANSTHAN TRUST**

| Sr.No. | Item Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Access Control System for SSST | As per Appendix-B | | 68,40,500 |
| 02. | Control Panel<br>i) Mandir Complex<br>ii) Prasadalaya<br>iii) Accomodation Facilities (03 Nos)<br>iv) Water Reservoir | 06 | 25,000 | 1,50,000 |
| 03. | X-Ray baggage inspection systems<br>Gate-02 01 Nos.<br>Gate-03 01 Nos.<br>Gate-04 01 Nos.<br>Gate-05 01 Nos.<br>Prasadalaya (IN Gate)-01<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-03 Nos | 08 | 15,00,000 | 1,20,00,000 |
| 04 | DFMD<br>Gate-02 02 Nos.<br>Gate-03 03 Nos.<br>Gate-04 03 Nos.<br>Darshan Queue (1&2)-08 Nos<br>Prasadalaya (IN Gate)-02 Nos<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-06 Nos | 24 | 1,00,000 | 24,00,000 |
| 05. | Body Scanner | 02 | 70,00,000 | 1,40,00,000 |
| 06 | VHF Static base sets with antenna, battery and accessories | 12 | 34,500 | 4,14,000 |
| 07 | VHF hand set with accessories | 75 | 16,000 | 12,00,000 |
| | | | Total | 3,70,04,500 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| * | Add 10% as installation / testing charges cable supply, Laying etc. Shall be extra | | + | 37,00,450 |
| | | Total (appro.) | | 4,07,04,950 |
| All specifications are indicative for illustrating the concept. The prices are approximate and tend to vary subsrantially with brand, specifications and features. | | | | |

तरी उपरोक्तप्रमाणे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (C.I.S.F) यांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मंदीर, परीसर व संस्थान परीसरात पाहणी करुन दिलेल्या कन्सल्टंन्सी रिपोर्ट मध्ये आढळुन आलेल्या त्रुटी, करावयाच्या उपाययोजना व सुरक्षा साहित्य यंत्रणा खरेदीकामी रु.3,70,04,500/- + 37,00,450/- (extra 10%) = 4,07,04,950/- (अक्षरी रुपये चार कोटी सात लाख चार हजार नऊशे पन्नास मात्र) खर्च अपेक्षित आहे. करीता CISF (Central Industrial Security Force) यांनी सुचविलेप्रमाणे उपरोक्त खर्चास मान्यता मिळणेस निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (C.I.S.F) यांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मंदीर, परीसर व संस्थान परीसरात पाहणी केलेल्या अहवालाबाबतचा उपरोक्त विषय स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा व उपसमितीने त्यावर अभ्यासपुर्वक निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **मंदिर, मंदिर परिसर व संस्थानचे इतर विभागाकडील सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी क्रमांक जिविशा/शिर्डी सुरक्षा/८३०/१३ दि.३१/०१/२०१३ चे पत्रान्वये श्री साईबाबा मंदिर घातपाती व्यक्तींच्या दृष्टीक्षेपात आहे व सद्यस्थितीला होत असलेल्या घातपाती घटना विचारात घेता मंदिर व परिसराची सुरक्षा जोखमीची झाली असुन जास्तीत जास्त खबरदारी घेणे गरजेचे झाले आहे. सुरक्षिततेच्या बाबतीत विविध अतिरेकी संघटनांचा असलेला धोका विचारात घेता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे सुरक्षा रक्षकांची नेमणुक करणेबाबत शिघ्रगतीने कारवाई व्हावी, असे कळविले होते. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकामी दि.१२/०६/२०१४ चे सभेमध्ये सदर विषय मान्यतेसाठी सादर केला असता निर्णय क्र.३५ असा झाला आहे की, सदरहु प्रस्ताव जास्त खर्चाचा असल्यामुळे स्थगित गीत ठेवणेत यावा, असे ठरले.

यानंतर सी.आय.एस.एफ. मार्फत सुरक्षा घेणेकामी पत्रव्यवहार केल्यानंतर सी.आय.एस.एफ. द्वारे, श्री साईबाबा मंदिर परिसर शिर्डी येथे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाची कायमस्वरुपी नियुक्ती करणे योग्य नाही. परंतु जेंव्हा गरज पडेल तेंव्हा एका छोटया वेळेसाठी कायदा आणि सुरक्षा कायम ठेवण्यासाठी बोलावू शकतात, असे कळविले आहे.

दि.०८/१२/२०१५ रोजी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे डेप्युटी जनरल मॅनेजर श्री एम.एच. पाटील यांनी शिर्डी येथे भेट दिली असता भेटीदरम्यान श्री साई मंदिर सुरक्षेकरीता सुरक्षा कर्मचारी पुरविणेस तयार असलेची तयारी दर्शविली. त्यानुसार त्यांना संदर्भ क्र.०३ चे पत्राने सुरक्षा अधिकारी-०१, सुरक्षा सुपरवायझर-०४, पुरुष सुरक्षा रक्षक-५८, महिला सुरक्षा रक्षक-५३, बंदुकधारीसुरक्षा रक्षक-५७ दररोज पुरविणेकामी दरमहा किती खर्च येईल, त्यांचे रजा/ सुटया सोडविणेकामी आवश्यक असलेले कर्मचारी व इतर अटी/शर्ती चीसविस्तर माहिती मिळणेबाबत विचारणा करणेत आली.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांनी दि.१६/०१/२०१६ चे पत्राने कळविले आहे की, म.रा.सु.म. ची सुरक्षा व्यवस्था नेमणुकीत घेण्याकरीता प्रथमत: श्री साई मंदीराचा सुरक्षा आढावा होणे आवश्यक आहे. सुरक्षा आढाव्यानुसार सुरक्षाकर्मी यांचे संख्याबळ, त्यांचे कर्तव्य स्थान व त्याठिकाणचे कर्तव्य निश्चीत करण्यात येईल. त्याकरीता Induction Process मध्ये नमुद केल्याप्रमाणे नोंदणी शुल्क आणि सुरक्षा आढावा शुल्काचा भरणा मरासुमला करण्यात यावा आणि सुरक्षा आढाव्यानुसार प्रस्तावीत मनुष्यबळ व त्याबाबतचा आर्थीक प्रस्ताव, मरासुमतर्फे आपल्या कार्यालयास महामंडळातर्फे सादर करण्यात येईल असे कळविले आहे.

त्याकामी पत्रासोबतचे परिशिष्टाप्रमाणे नोंदी शुल्क रु.५,०००/- (+सर्व्हीस टॅक्स) व सिक्युरिटी ऑडीट फी खालीलप्रमाणे कळविली आहे.

१) रु.३०,०००/- (+ सर्व्हीस टॅक्स) ५०० पेक्षा कमी मनुष्यबळ हवे असल्यास
२) रु.४०,०००/- (+ सर्व्हीस टॅक्स) ५०० ते ९९९ पर्यंत मनुष्यबळ हवे असल्यास
३) रु.५०,०००/- (+ सर्व्हीस टॅक्स) १००० ते १०,००० पर्यंत किंवा त्यापेक्षा अधिक मनुष्यबळ हवे असल्यास

श्रींचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांचे गर्दीत दिवसेंदिवस होणारी वाढ व अतिरेकी संघटनाकडुन प्राप्त होणाऱ्या धमक्या यांचा विचार करता, १) मंदिर सुरक्षा हा अतिमहत्वाचा विषय आहे. २) संस्थानचे सुरक्षा कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांची सध्याची कार्यपध्दती व अधिकार पहाता सध्याची व्यवस्था अपुरी आहे. ३) श्री साईबाबा संस्थान हे जागतिक स्तरावर नावाजलेले सर्वधर्मी यांचेश्रध्दास्थान आहे. ४) कायदा व सुव्यवस्था तसेच अनुषंगीकबाबींचा विचार करता सध्याची व्यवस्था पुरेशी नाही. ५) CISF कायम स्वरुपी सुरक्षा व्यवस्था पुरविणेस तयार नाही. ६) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे राज्य सरकारचे महामंडळ आहे. ७) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे कर्मचाऱ्यांना हत्यारे

उपलब्ध असुन ते योग्यरित्या प्रशिक्षीत आहेत. त्यामुळे संस्थानचे खाजगी सुरक्षेला पर्यायी व्यवस्था म्हणुन महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांची सुरक्षा घेणे क्रमप्राप्त होत आहे.

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांचेमार्फत सुरक्षा घेणेपुर्वी त्यांचेमार्फत मंदिर, मंदिर परिसर, प्रसादालय, संस्थानचे सर्व निवासस्थान, शैक्षणिक संकुल, हॉस्पीटल, कनकुरी तळे इ. ठिकाणी सध्या पुरविणेत येत असलेले मनुष्यबळ याचा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांचेमार्फत आढावा घेवुन कामाचे ठिकाणानुसार आवश्यक मनुष्यबळ याची संख्या निश्चीती करुन त्यानंतर मंदिर, मंदिर परिसर, प्रसादालय, संस्थानचे सर्व निवासस्थान, शैक्षणीक संकुल, रुग्णालय इ. ठिकाणी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांचेमार्फत सुरक्षा घेणेकामी निर्णय घेता येईल.

सध्याचे सुरक्षा व्यवस्थेकामी कायम १४१ व कंत्राटी ७८५ असे सुमारे ९२६ सुरक्षा कर्मचारी कामास घेण्यात येतात त्यांचा महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेमार्फत आढावा घेऊन मनुष्यबळ निश्चीती करता येईल. त्याकामी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांना खालील प्रमाणे रक्कम आदा करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम | सर्व्हीस टॅक्स (१५%) | आदा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | रजिस्ट्रेशन फी | ५,०००/- | ७५०/- | ५,७५०/- |
| ०२. | सिक्युरिटी ऑडीट फी | ४०,०००/- | ६,०००/- | ४६,०००/- |
| | | | एकुण रु.= | ५१,७५०/- |

तरी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेमार्फत मंदिर, मंदिर परिसर व संस्थान संलग्न परिसराकरीता सुरक्षा कर्मचारी घेणेस व त्यापुर्वी सिक्युरिटी ऑडीट करुन घेणेकामी रजिस्ट्रेशन फी रु. ५७५०/- (सर्व्हीस टॅक्ससह) + सिक्युरिटी ऑडीट फी रु.४६,०००/- (सर्व्हीस टॅक्ससह) = रु.५१,७५०/- आदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर, मंदिर परिसर व संस्थान संलग्न परिसराकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेमार्फत सुरक्षा कर्मचारी घेणेसाठी त्यांचेकडून सिक्युरिटी ऑडीट करणेकामी येणाऱ्या रजिस्ट्रेशन फी रु.५७५०/- (सर्व्हीस टॅक्ससह) + सिक्युरिटी ऑडीट फी रु.४६,०००/- (सर्व्हीस टॅक्ससह) = रु.५१,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **गावकरी गेटवर आधारकार्ड ऐवजी इतर ओळखपत्र (मतदान कार्ड, वाहन परवाना, रेशनकार्ड) दाखविणे सक्तीचे करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जा.नं.एसएसएस/वशी-काअ/२३०३/२०१४ दि.२७/०८/२०१४ चे आदेशान्वये गांवकरी दर्शनाला सोडतांना फक्त शिर्डी गावातीलच स्थानीक नागरीकांना Election Card पाहुन दर्शनाला सोडावे. गांवकऱ्यांसमवेत असणारे पाहुण्यांना पास शिवाय दर्शनाला सोडु नये तसेच Exit Gate मधुन (गुरुस्थान गेट) कुणासही दर्शनास सोडु नये. तसेच गांवकरी गेट, नंदी गेट व शनिगेट ने सोडले जाणारे गांवकरी, पासधारक, Online पासधारक या भक्तांच्या दररोज रजिस्टरला व्यवस्थीत नोंदी घेण्यात याव्यात. याव्यतिरीक्त संरक्षण अगर मंदिर विभागामार्फत व्ही.आय.पी. भक्त दर्शनासाठी परस्पर सोडू नये. व्ही.आय.पी. ची व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामार्फत करण्याची पध्दत अवलंबावी, असा आदेश झालेला आहे.

त्यानुसार गांवकरी गेटने गावातील स्थानीक नागरीकांना Election Card पाहुन दर्शनासाठी सोडणेबाबत कार्यवाही सुरु केली असता १८ वर्षाच्या खालील मुला मुलींचे Election Card नसल्याने गांवकरी यांच्या तक्रारी येत असल्याने आधारकार्ड पाहुण गांवकरी यांना दर्शनासाठी सोडण्याची पध्दत सुरु करण्यात आली होती. परंतु शिर्डी पंचक्रोषीतील व काही गांवकरी जे शिर्डीचे नागरीक नाहीत त्यांनी आधारकार्डाच्या डयुप्लीकेट कलर झेरॉक्स प्रती बनवुन त्यांना लॅमीनेशन करुन गांवकरी गेटने प्रवेश देणेबाबत आग्रह धरणे, वाद घालणे इत्यादी प्रकार नेहमी घडुन येत असल्याने आधारकार्ड पाहुन गांवकरी यांना दर्शनासाठी सोडण्याची पध्दत बंद करुन त्या ऐवजी गांवकरी यांचे मतदान कार्ड, वाहन परवाना, रेशनकार्ड या पैकी एक पुरावा दर्शनासाठी सोडण्याची पध्दत सुरु करणे गरजेचे आहे. याकरीता गांवकरी गेटवर गांवकरी यांनी दर्शनासाठी येतांना मतदान कार्ड, वाहन परवाना, रेशनकार्ड या पैकी एक पुरावा घेऊन दर्शनासाठी येणेबाबत बोर्ड लावता येईल.

तरी गांवकरी गेट येथे आधारकार्ड ऐवजी मतदान कार्ड, वाहन परवाना, रेशनकार्ड या पैकी एक पुरावा म्हणुन पाहुन गांवकरी यांना गांवकरी गेटने प्रवेश देणेबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, गांवकरी गेटने प्रवेश देणेकामी गावकऱ्यांचे आधारकार्ड नाकारता येणार नाही, याकरिता गावकरी गेट येथून दर्शनासाठी जातेवेळेस स्थानिक ग्रामस्थांचे आधारकार्ड खरे की खोटे हे तपासणेसाठी अद्ययावत स्कॅनर मशिन वापरणेत यावे.**

**तसेच यावेळी अशीही चर्चा करणेत आली की, त्रिलोक सिस्टीम हे दर्शनरांगेतील साईभक्तांना दर्शनाची वेळ समजावी, याकरिता टोकन सिस्टीम तयार करणार असून याबाबत त्यांचाही अभिप्राय घेण्यात यावा.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इ.12 वी विज्ञान शाखेची नवीन चौथी तुकडी नैसर्गिक वाढीने सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संदर्भः- मा.व्यवस्थापन समिती दि.०४/०७/२०१५ चे सभेतील निर्णय क्र.१९८.

अधिनियम २००४ मधील तरतुद- क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहायय करील.तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.- मा.व्यवस्थापन समिती दि. ०४/०७/२०१५ चे सभेतील निर्णय क्र. १९८.

प्रस्ताविक- सन २०१५-१६ मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इ. ११ वी विज्ञान शाखेची चौथी तुकडी मा.व्यवस्थापन समिती दि. ०४/०७/२०१५ चे सभेतील निर्णय क्र. १९८ नुसार सुरु करण्यात आलेली आहे. सन २०१६-१७ मध्ये नैसर्गिक वाढीने इ. १२ वी विज्ञान शाखेची चौथी तुकडी सुरु करण्यात आली आहे. सदर तुकडीची प्रवेश क्षमता ८० विद्यार्थी असून, त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेले आहेत.

नवीन नैसर्गिक वाढीने तुकडीसाठी आवश्यक बाबी :-

१) तुकडी मान्यता:- मा.शिक्षण उपसंचालक कार्यालय,पुणे यांचेकडे नवीन तुकडी मान्यतेबाबतचा प्रस्ताव सादर करावा लागेल.

२) विद्यार्थी:- सन २०१६-१७ मध्ये इं. ११ वी विज्ञान शाखेकरीता प्रवेश घेतलेले विद्यार्थ्यांमधून नैसर्गिक वाढीने इ. १२ वी विज्ञान शाखेची चौथी तुकडीसाठी विद्यार्थी उपलब्ध आहेत.

३) इमारत व फर्निचर:- सध्याच्याच इमारतीत वर्ग तुकडी सुरु करता येईल त्यासाठी नवीन बेंचेस खरेदी चा प्रस्ताव खरेदी विभागाकडे सादर करणेत आलेला आहे. त्याप्रमाणे त्यांचेकडून कार्यवाही चालू आहे.

४) शिक्षक:- नवीन शिक्षकांची आवश्यकता आहे. तथापी तात्पुरती नवीन शिक्षक कंत्राटी पध्दतीने घेता येतील.

५) शैक्षणिक शुल्क:- विज्ञान शाखेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्याकडून सध्याचे शैक्षणिक शुल्क रु. ३३०/- अधिक ओळखपत्र रु. २०/- प्रमाणे रु. ३५०/- मात्र आकारता येईल. विद्यार्थी नीना शुल्क पूर्णपणे माफ आहे.

मागणी- सन २०१६-१७ मध्ये कनिष्ठ महाविदयालयात वरील अ.नं. १ ते ५ प्रमाणे कार्यवाही करणेस व कनिष्ठ महाविदयालयात इ. १२ वी विज्ञान शाखेची नवीन चौथी तुकडी नैसर्गिक वाढीने सुरुकरणेस तसेच नवीन चौथी तुकडी नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान- नैसर्गिक वाढीने इ.१२ वी विज्ञान शाखेची चौथी तुकडी वाढ करणेचा विषय आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- सन २०१६-१७ मध्ये कनिष्ठ महाविदयालयात वरील अ.नं. १ ते ५ प्रमाणे कार्यवाही करणेस व कनिष्ठ महाविदयालयात इ. १२ वी विज्ञान शाखेची नवीन चौथी तुकडी नैसर्गिक वाढीने सुरु करणेस तसेच नवीन चौथी तुकडी नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नैसर्गिक वाढीने इ. १२ वी विज्ञान शाखेची नवीन चौथी तुकडी सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या अनं.१ ते ५ प्रमाणे कार्यवाही करणेस व नवीन तुकडी वाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.०७** **शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपालांच्या वेतनश्रेणीबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** विषयाची पुर्वपीठीका:- श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरिता आकृतीबंधामध्ये प्रत्येकी ०१ ग्रंथपालाचे पद मंजुर करण्यात आलेले आहे. मंजुर आकृतीबंधामध्ये सदर पदांसाठी ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० अशी वेतनश्रेणी नमुद करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकरित ०१ ग्रंथपाल नेमणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्र.३७९ व ३८० नुसार दि.१४.०६.२०१० रोजीचे विविध वर्तमानपत्रात खालीलप्रमाणे अर्हता नमुद करुन, इतर शिक्षक पदांबरोबरच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील ग्रंथपाल पदासाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात आले होते.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| ०४ | ग्रंथपाल | ०१ | कोणत्याही शाखेचा पदवीधर व बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स किमान द्वितीय श्रेणी, MS-CIT, टायपिंग – इंग्रजी ४० व मराठी ३० श.प्र.मि, अनुभव ०५ वर्ष |

उपरोक्त जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन दि.२२.०७.२०१० रोजी उमदेवारांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आल्या. लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत पात्र उमेदवारांच्या दि.२०.०८.२०१० रोजी निवड समितीद्वारे मुलाखती घेण्यात आल्या. त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.०९.२०१० चे सभेतील निर्णय क्र.६३३ (३) नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९.११.२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ (१२) अन्वये निवड केलेल्या उमेदवारांना (श्री.शिंदे भाऊसाहेब बाबुराव - ग्रंथपाल) यांना रु.२,५००/- मात्र मानधनावर नेमणूक आदेश देण्यात यावेत तसेच संस्थानचे ज्युनिअर कॉलेजकडे ग्रंथपाल हे पद रिक्त असल्याने या पदावर प्रतिक्षा यादीवर असलेले श्री.शेजवळ सुनिल उत्तमराव यांची प्रतिमहा रु.२,५००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार दोन्ही ग्रंथपाल यांना तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता प्रतिमहा रु.२,५००/- एकत्रित मानधनावर पुढीलप्रमाणे नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | ग्रंथपालाचे नांव | नेमणूक आदेश | विभाग | शैक्षणिक अर्हता | नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.भाऊसाहेब बाबुराव शिंदे | जा.नं.एसएसएस/ कनिष्ठ/५४७९/ २०१२ दि.०१ फेब्रुवारी, २०१२ | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय | बी.एस्सी., एम.लिब., आय.सी. | दि.०१/०२/२०१२ |
| ०२. | श्री.सुनिल उत्तमराव शेजवळ | जा.नं.एसएसएस/ कविम/५४८२/ २०१२ दि.०१ फेब्रुवारी, २०१२ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर | बी.ए., एम.लिब., आय.सी. | दि.०१/०२/२०१२ |

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०१.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.१६९ नुसार ग्रंथपालांचे मानधन रु.२,५००/- मध्ये वाढ करण्यात येऊन प्रतिमाह रु.५,०००/- करण्यात येऊन दि.०१ फेब्रुवारी, २०१२ पासून फरकासह वेतन आदा करण्यात आलेले आहे.

शासन निर्णय क्र.एसएसएन/१००८/(२००/०८)/माशि-२, दि.२३ ऑक्टोबर, २०१३ अन्वये ग्रंथपाल पदासाठी सुधारीत आकृतीबंध लागू करण्यात आलेला असून, त्यामध्ये माध्यमिक शाळा संहितेतील शिक्षकेतर कर्मचा-यांचे निकष, चिपळूणकर समिती व शासन निर्णय दि.२५ नोव्हेंबर, २००५ प्रमाणे निश्चित करण्यात आलेले व आतापर्यंत वापरात असलेले निकष अधिक्रमित करण्यात येत असून, ते येथूनपुढे कोणत्याही परिस्थितीत लागू राहणार नाहीत, असे नमुद केलेले आहे त्यामुळे सदर निर्णयानुसार ग्रंथपाल पदासाठी०२ वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.

**(ब)** त्यामुळे उपरोक्त दोन्ही ग्रंथपालांचा ०२ वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी दि.०१.०२.२०१४ रोजी संपत होता. मात्र कन्या विद्या मंदिर विभागामार्फत श्री.सुनिल उत्तमराव शेजवळ, ग्रंथपाल यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाल्यामुळे त्यांना मा.उच्च न्यायालय रिट याचिका क्र.१७७/२०११ मधील दि.२८.०४.२०११ व मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली याचिका क्र.९७३२/२०१२ मधील दि.२४.०१.२०१४ च्या निर्णयानुसार ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४३०० मात्र पुर्वलक्षी प्रभावाने देऊन, संस्थान सेवेत कायम करणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१७ नुसार “परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाल्याने कायम करणे व विहित पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत शैक्षणिक संकुलाकडील इतरही पदांचा एकत्रित सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा,” असे ठरले.

**(क)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.५१७ नुसार शैक्षणिक संकुलाकडील सहा.शिक्षक व ग्रंथपाल यांना विहित वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबत एकत्रित प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यातील (ब) मध्ये शैक्षणिक संकुलाकडील श्री.सुनिल शेजवळ व श्री.भाऊसाहेब शिंदे ग्रंथपालांना विहित वेतनश्रेणीत ग्रंथपाल पदावर कायम करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१००४ (ब) नुसार “संबंधीत विभागांचा अभिप्राय विचारात घेता श्री साईबाबा कन्याविद्या मंदिराकडील श्री.सुनिल उत्तमराव शेजवळ व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील श्री.भाऊसाहेब बाबुराव शिंदे यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आलेला असल्याने त्यांना त्यांचे नावांसमोर दर्शविलेला, परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेल्या तारखेपासून सुधारीत वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु.४३००/- मात्र देण्यात येऊन, ग्रंथपाल या पदावर संस्थान सेवेत कायम करणेत यावे,” असे ठरले.

**(ड)** मात्र दोन्ही ग्रंथपालांनी माउच्च न्यायालय रिट याचिका क्र.१७७/२०११ मधील दि.२८.०४.२०११ व मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली याचिका क्र.९७३२/२०१२ मधील दि.२४.०१.२०१४ च्या निर्णयानुसार नेमणूक दिनांकापासून दि०१.०२.२०१२ पासून पदवीधर ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड पे ४३०० मिळणेबाबत विनंती केलेली होती. त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१००४ (ब) ची कार्यवाही झालेली नाही. करिता शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपालांना पदावर कायम करुन पदाची विहित वेतनश्रेणी देणेबाबतच्या मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२०.११.२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१००४ (ब) मध्ये दुरुस्तीकरणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०१.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१ नुसार प्रस्तावित ग्रंथपालांना वेतनश्रेणी देणेबाबत सन २००६ चे शासन निर्णयानंतर काही शासन निर्णय प्रकाशित झाले आहेत काय? या विषयी पडताळणी करुन अभ्यासपुर्वक प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

**(इ)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०१.२०१५ चे सभेतील निर्णय क्र.२१ नुसार शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपालांना नेमणूक दिनांकापासून सुधारीत वेतनश्रेणी देणेबाबतचा सविस्तरप्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१७ नुसार "शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपालांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणेसाठी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक असल्यास मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा" असे ठरले.

**(ई)** मा.व्यवस्थपान समितीचे दि.२७.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१७ नुसार ग्रंथपालांना सुधारीत वेतनश्रेणी देणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना इकडील जा.क्र.एसएसएस/ वशी-आस्था/ ५५५७/२०१५ दि.०८ जानेवारी, २०१६ अन्वये पत्र देऊन, संस्थानचे मंजुर आकृतीबंधातील ग्रंथपाल या पदाचे वेतनश्रेणी ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० ऐवजी ९३००-३४८०० + ग्रेड पे ४३०० अशी सुधारणा करणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

तसेच सदरबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडून संदर्भ क्र११ व १३ अन्वये विविध मुद्यांबाबत पत्रव्यवहार चालु असून त्यांचे मागणीप्रमाणे त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यात येत आहे.

**(उ)** आता महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन परिपत्रक क्र.न्यायप्र-२८१५/ प्र.क्र.३५९/ १५/ टिएनटी-३, दि.१४ जुन, २०१६ अन्वये "संदर्भाधीन शासन आदेशांनुसार भोळे आयोग, चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगाने विविध संवर्गांना शिफारस केलेल्यावेतनश्रेणी अनुज्ञेय ठरविण्यात आल्या आहेत. यामध्ये ग्रंथशास्त्रातील पदवीप्राप्त असणा-या पदवीधर अर्हताधारक उमेदवारांना द्यावयाच्या वेतनश्रेणी संदर्भात मतभिन्नता होत असल्याने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशात स्पष्ट केल्याप्रमाणे ग्रंथपालांची अर्हता व देय वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| **अर्हता** | **वेतन आयोग** | **वेतनश्रेणी (रुपये)** |
|---|---|---|
| १. पदवीधर व ग्रंथशास्त्रातील पदवी | भोळे आयोग | ३६५-७६० |
| | चौथा वेतन आयोग | १४००-२३०० |
| | पाचवा वेतन आयोग | ४५००-७००० |
| | सहावा वेतन आयोग | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० |

मुख्यत्वे करु ग्रंथशास्त्रातील पदवी प्राप्त असणा-या ग्रंथपालांना वरील वेतनश्रेण्या लागू करण्यासाठी सन १९७९ पुर्वीची नियुक्ती आवश्यक नाही, ही न्यायालयीन निकालातील स्पष्टता सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणण्यात येत असून, त्यानुसार संबंधीतांचे वेतन निश्चिती करण्यात आले आहे याची खात्री करावी व केली नसल्यास वेतननिश्चिती संदर्भातील पुढील अनुषंगिक कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी" असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

उपरोक्त परिच्छेद "अ" ते "ई" चे अवलोकन करता शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपाल यांना प्रथम शाळा संहितेप्रमाणे परिविक्षाधीन कालावधीसाठी एकत्रित मानधनावर नेमणूका देण्यात आलेल्या होत्या, त्यानंतर शासन निर्णयानुसार त्यांचा परिविक्षाधीन कालावधी हा दोन वर्षांनी संपल्यानंतर त्यांना मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे ९३००-३४८०० + ग्रेड पे ४३०० अशी वेतनश्रेणी देणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले होते. संस्थानचे मंजुर आकृतीबंधामध्ये सदर पदासाठी ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० अशी वेतनश्रेणी मंजुर असल्याने त्यांना सुधारीत वेतनश्रेणी देणेबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय यांचेशी पत्रव्यवहार चालु होता. मात्र आता परिच्छेद "उ" मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन पदवीधर ग्रंथपलांना देय असलेल्या वेतनश्रेणीबाबत (५२००-२०२०० + ग्रेड पे २८००) स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.

सबब शैक्षणिक संकुलाकडील संबंधीत ग्रंथपालांचा नियमानुसार दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी दि.३१/०१/२०१४ रोजी संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे त्यांना दि.०१ फेब्रुवारी, २०१४ पासून संस्थान सेवेत कायम करता येईल. तसेच तसेच आता शैक्षणिक संकुलाकडील नमुद ग्रंथपाल यांना महाराष्ट्रशासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन परिपत्रक क्र.न्यायप्र-२८१५/प्र.क्र.३५९/१५/टिएनटी-३, दि.१४ जुन, २०१६ अन्वये नेमणूक दिनांकापासून म्हणजेच दि.०१.०२.२०१२ पासून पदवीधर ग्रंथपालाची वेतनश्रेणी ५२००-२०२००+ ग्रेड पे २८०० देता येईल. तसेच यापुर्वी सबंधीत ग्रंथपालांबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१००४ (ब) व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१७ निरस्त करता येतील व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना सदरबाबत वस्तुस्थिती कळविता येईल. याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपालांच्या वेतनश्रेणीबाबत प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या क्र.न्यायप्र-२८१५/ प्र.क्र.३५९/१५/ टिएनटी-३, दि.१४ जुन, २०१६ रोजीच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०८** **संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** कै.श्रीनिवास दत्तोपंत नाईक, लिपीक-टंकलेखक, श्री साईनाथ हॉस्पीटल यांचे संस्थान सेवेत असतांना दि.१९/०७/२०१० रोजी निधन झालेले होते. त्यांचे निधनानंतर अनुकंपा कारणास्तव नेमणूक मिळणेकामी त्यांच्या पत्नी श्रीमती रेणुका श्रीनिवास नाईक यांनी विहीत अर्ज सादर केलेला होता

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३ (३७०९) का.सोळा दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली असून, मंजूर आकृतीबंधातील रिक्तअसणा-या लिपिक-टंकलेखक पदावर मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेल्या सी.ए.क्र.५०६६ वरील निर्णयास अनुसरुन अनुकंपा कारणास्तव श्रीमती नाईक यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२५५/२०१५ दि.०१/०६/२०१५ चे आदेशाने वेतनबॅण्ड रु.५२००-२०२०० मध्ये मुळवेतन ५८३० अधिक ग्रेड वेतन रु.१९०० या वेतनबॅंडमध्ये १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीचे अटीवर नेमणूक करणेत आलेली आहे श्रीमती नाईक दि.०१ जून,२०१६ रोजी कामावर हजर झालेल्या असून त्यांचा परिविक्षाधिन कालावधी दि.३१/०५/२०१६ रोजी संपुष्टात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. नं | कर्मचा-याचे नांव | शिक्षण | नेमणूक तारीख | परिविक्षाधिन कालावधी संपल्याची तारीख | वैद्यकिय पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती रेणूका श्रीनिवास नाईक | बी.ए. (औरंगाबाद विद्यापीठ) इंग्रजी टंकलेखक४० श.प्र.मि. मराठी टंकलेखक ३० श.प्र.मि. एम.एस.सी.आय.टी. | ०१/०६/२०१५ | ३१/०५/२०१६ | वैद्यकिय संचालक यांचेकडील दि.०५/०६/२०१५ रोजीचे वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार **पात्र** |

सदर एक वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधी मध्ये श्रीमती नाईक यांचे काम व वर्तणुक कशी आहे? ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात किंवा कसे ? त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत आहेत काय? त्यांना लिपीक-टंकलेखक या पदावर त्यांची सेवा पुढे चालू ठेवावी किंवा कसे? याबाबत प्र.मनुष्यबळ व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेकडून निःसंदीग्धअहवाल मागविण्यात आलेला होता.

त्यासअनुसरुन, प्र.मुनष्यबळ व्यवस्थापक यांनी प्रशासकीय अधिकारी, रुग्णालये यांचेमार्फत "सदर कर्मचारी यांची वर्तणूक चांगली आहे ते योग्य रितीने समाधानकारक काम करतात. सदर कर्मचारी यांचेबाबत कोणतेही प्रकरण चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच डॉ.मनोहर शिंदे,कार्डीओलॉजिस्ट यांनी 01. She is excellent worker. 02. Helping as clerk and performing TMT. 03. Following all the orders." असा अहवाल सादर केलेला आहे.

प्र.मुनष्यबळ व्यवस्थापक यांचे उपरोक्त अभिप्रायास अनुसरुन श्रीमती रेणूका श्रीनिवास नाईक यांची लिपीक-टंकलेखक पदावर रु.५२००-२०२०० मध्ये मुळवेतन५८३० अधिक ग्रेड वेतन रु.१९०० या वेतनबॅंडमध्ये दि.०१/०६/२०१६ पासून संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.मुनष्यबळ व्यवस्थापक यांचे अभिप्रायास अनुसरुन श्रीमती रेणूका श्रीनिवास नाईक यांना लिपीक-टंकलेखक पदावर रु.५२००-२०२०० मध्ये मुळवेतन ५८३० अधिक ग्रेड वेतन रु.१९०० या वेतनबॅंडमध्येदि.०१/०६/२०१६ पासून संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०९** **कंत्राटी कर्मचा-यांचे माहे फेब्रुवारी पगारातुन दंडाचे पैसे कपात केलेबाबत.**

**प्रस्ताव-** A] प्रस्तावणा- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी व सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत माव्यवस्थापन समितीचे दि.१२-०६-२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५६ अन्वये निविदा मंजूर होऊन, मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१०४२७/२०१४ इन पी. आय.एल.क्र. १८/२०११ संदर्भातील दि.२२-१२-२०१४ रोजीचे आदेशान्वये मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०-०१-२०१५ रोजचे सभेतील निर्णय क्र.२७ नुसार दि.०१-०३-२०१५ ते दि.२८-०२-२०१८ अखेर तीन वर्षे या कालावधीत मे. जय भवानी एन्टरप्रायजेस, पुणे यांना कंत्राट दिलेले असुन त्यांना मंदिर परिसर व शैक्षणिक संकुल, वाहन विभाग, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साईधर्मशाळा, साईआश्रम-०१-०२ इ.ठिकाणी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा गार्ड पुरविणेबाबत कार्यादेश देणेत आलेले आहेत

B] मे.जय भवानी यांनी दिलेले पत्र-मे.जय भवानी एन्टरप्रायजेस, पुणे कॅम्प-शिर्डी यांचे दि.१७-०३-२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असुन, त्यात त्यांनी, " आम्ही कराराचा भंग केलेला आहे हे आपल्या म्हणण्याशी आम्ही अजिबात सहमत नाही हे प्रथमतःच आपले निदर्शनास आणुन देत आहे नेहमीच्याच वेतन पत्रक तयार करण्याच्या पध्दतीप्रमाणे म्हणजे सुरक्षा रक्षकाचे कामावरील उपस्थितीप्रमाणे त्यांना देय्य ठरणारे वेतन नमुद करूनच माहे जानेवारी-२०१६ चे बील रूपये ३५,७९,२५६/- हे होते, त्यातुनच कपात रूपये १,३१,१००/- (अक्षरी रूपये एक लाख एकतीस हजार शंभर फक्त) ही दंडाची कपात केली. तसेच फेब्रुवारी-२०१६ चे बिल रूपये ३६,०९,४९६/- हे होते. त्यातुनच दंडापोटी रूपये ९१,०००/- (अक्षरी रूपये एक्याण्णव हजार फक्त) कपात केले. आता पर्यंत दोन महिन्याचे रूपये २,२२,१००/- आपण आमच्या बिलातून कपात केले आहेत. याबाबत आपणाकडे चौकशी केली असता, आपल्या कार्यालयाकडुन सांगण्यात आले की, प्रत्येक गैरहजर पॉईंटसाठी दैनिक रूपये १००/- याप्रमाणे बीलातून दंडवसुल केलेला आहे. रूपये ९१,०००/- इतकी रक्कम आमचे बीलातून आपण वसुल केलेली आहे. साहजीकच कंपनीला दोन महिन्याचे रक्कम रूपये २,२२,१००/- रूपयाचे नुकसान झालेले आहे. सदरचे नुकसानीची भरपाई संबंधीत गैरहजर सुरक्षा रक्षकांकडुन वसुल करण्याचा त्यांचा मालक म्हणुन आम्हांस कायदेशीर अधिकार आहे. यासाठी कृपया आपण कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० व वेतन प्रधान अधिनियम (Payment of Wages Act & Contractor Labour Act 1970) यांचे तरतुदीचे अवलोकन करावे ही विनंती.

सुरक्षा रक्षकांनी कामावर गैरहजर न राहता वेळेवर कामावर हजर होतराहावे म्हणुन वेळोवेळी नोटीस काढुन त्यांना सुचित करण्यात आलेले आहे. इतकेच नव्हेतर ज्या सुरक्षा रक्षकांचे गैरहजेरीचे प्रमाण खुपच जास्तआहे. त्यांना प्रत्यक्ष भेटुनही सुचित केले आहे ही बाब देखील आपणास वेळोवेळी अवगत केलेली आहे. सातत्याने गैरहजर राहणारे सुरक्षा रक्षकांची नांवे आपले सुचनेनुसार आपणास देखील वेळोवेळी सादर केलेले आहेत,तरी सुध्दा या सुरक्षा रक्षकांचे वर्तनात सकारात्मक बदल होत नाही. हे आपणासही माहित आहेच. कंत्राटदारांचे कायदेशीर सुचनांचे पालन आपले येथील सुरक्षा रक्षकांकडून न होण्याची कारणे प्रामुख्याने खालीलप्रमाणे आहेत असे आमचे स्पष्ट मत आहे.

१) सुरक्षा रक्षकांची नेमणुक करण्याचे तसेच त्यांना सेवेतून काढून टाकण्याचे कोणतेही अधिकार कंत्राटदारास आपल्या संस्थेने प्रत्यक्षात ठेवलेले नाही. नविन कंत्राटदारांने जुन्याच कंत्राटदाराकडील कामगार कामावर घेण्याचे अलिखित बंधन व प्रथा आपले संस्थेत आहे. त्यामुळे सहाजिकच नविन कंत्राटदाराकडे त्याची कोणतीही माणसिक बांधलकी राहत नाही.

२) कंत्राटदार दर २/३ वर्षांनी बदलत असतो, परंतू येथील काम करणारे सुरक्षा रक्षक वर्षानुवर्षे येथेच काम करीत आहेत. त्यामुळे त्यांना कंत्राटदाराची कोणतीही भिती नाही. हे सर्वश्रृत व जगजाहिर आहे.

३) वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कंत्राटी पध्दतीने काम करूनही आठवडा सुट्टी व्यतिरिक्त इतर कोणत्याही कायदेशीर सुट्टया व इतर कल्याणकारी फायदे मिळत नाही. त्यामुळे त्यांना त्यांचे महत्वाचे कामामुळे कामावर हजर होता आले नाही तर त्यांची बिनपगारी गैरहजेरी नोंदविली जाते परिणामी पॉईंट खाली जाणेचे प्रमाण अधिक दिसून येते. (उदा.घरातील आजारपण, मयत, लग्न, बारसे, सामाजिक बांधलकीची कामे).

४) सुरक्षा रक्षकां विरूध्द कारवाई करताना सातत्याने संस्थानकडून व स्थानिक नागरीकांकडून हस्तक्षेप होत असतो. त्यामुळे कंत्राटदार देखील हतबल होत. याची कल्पना आपणास नेहमीच देत आलो आहे.

५) वर्षानुवर्षे कंत्राटीपध्दतीने काम करूनही कायम कामगारांचे तुलनेत कंत्राटी कामगारांचे वेतन दर खुपच कमी असल्याची भावना कंत्राटी कामगारांमध्ये आहे. त्यामुळे काम करण्याचे माणसिकतेमध्ये मोठा परिणाम दिसून येत आहे.

६) आम्ही ०१ मार्च २०१५ पासून काम सुरू केले आहे गेली १० महिने दंडाबाबत काहीही चर्चा झाली नाही.मग जानेवारी-२०१६ पासूनच दंड कपात प्रकरण सुरू झाले आहे यांचा आपण गांभीर्याने विचार करावा. यामागे आपल्या अधिका-यांची जुन्या कंत्राटीदाराबरोबर (बी.व्ही.जी. व रक्षक सिक्युरिटी) अधिका-यांचे हितसंबंध जुळलेले आहेत त्यामुळे हे अधिकारी आम्हांस विनाकारण त्रास देत आहेत, हे आम्ही आपल्या निदर्शनास आणून देत आहोत.

७) दिनांक २० फेब्रुवारी २०१६ रोजी मा.गमे साहेब, प्रशासकीय अधिकारी यांचे कक्षेत जानेवारी-२०१६ ची पैसे कापलेबाबत मिटींग बोलविली असता, त्यावेळेस श्री.विलास कोते (सुरक्षा अधिकारी), तसेच श्री.गंगावणे साहेब (सुरक्षा अधिकारी), श्री.नवले साहेब (कामगार अधिकारी), श्री.शेजवळ (सुरक्षा अधिकारी) तसेच श्री.चोळके साहेब (माजी कामगार आयुक्त) मी स्वतः गोडगे पाटील हजर होतो. त्यावेळेस चर्चेअंती उपाया योजना करूनही सुरक्षा रक्षकांचे गैरहजेरीचे प्रमाणामध्येकाहीही बदल होत नाही. त्यामुळे तुम्ही दंडाची रक्कम संबंधीत सुरक्षा रक्षकाकडून वसुल करू शकता असे मा.गमे साहेबांनी सर्वांसमक्ष कामगारांचे पैसे कापुन घ्या, त्याशिवाय, कामगारांची गैरहजेरी कमी होणार नाही. अशा सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने आम्ही दंडाची रक्कम वसुल केली आहे. पाहिजे असल्यास आपण बैठकीस उपस्थित असलेल्या अधिका-यांकडे खातरजमा करू शकता ही नम्र विनंती.

सदरचे कंत्राटी काम हे केवळ बाबांची चांगली सेवा करण्याचे उद्देशाने घेतले आहे. आपले संस्थेला किंवा कामगारांना त्रास व्हावा अशी आमची कोणतीही भावना/हेतू नाही. त्यामुळे आम्ही अत्यंत प्रामाणिकपणे काम करत आहोत. याकामात आमचे संस्थेला कोणताही आर्थिक फायदा होत नाही., उलट

दरमहा ४० ते ५० हजार रूपये संस्था या कामासाठी खर्च करत आहे. शिवाय सुरक्षा रक्षकांचे गणवेश व इतर सुविधांवर आम्हीआतापर्यंत रूपये २५ लाख खर्च केलेले आहेत. आपले संस्थेने यासाठी एक पैसाही दिलेला नाही याची कल्पना आपणास आहे.

वरील विवेचनावरून आपले निदर्शनास येईल की, आम्ही करारातील तरतुदींचा कोणताही भंग केलेला नाही. आम्हांस प्राप्त प्रचीत कायदेशीर अधिकारानुसार संस्थेस झालेली आर्थिक नुकसान, संबंधीत नुकसानीस जबाबदार असणारे सुरक्षा रक्षकांकडुनत्यांच्या जबाबदारीचे प्रमाणात त्यांचे वेतनातून कपात केलेले आहे. संस्थानने जर दंड रक्कमेबाबत फेर विचार केल्यास आम्हाला ही तसा निर्णय घेणे शक्य होईल व यापुढे अशा घटनांची पुनरावृत्ती टाळावयाची असल्यास एक ठोस संयुक्तीक धोरणात्मक निर्णय करणेसाठी आम्हांस चर्चेसाठी वेळ देवुन बोलवावे ही विनंती

तरी मेहरबान साहेबांस नम्र विनंती ही की, आम्हांस खालीलप्रमाणे मदत करावी.

१) काही ठराविक कामगारांचे खाते बदल करण्यास परवानगी दयावी.

२) सुरक्षा रक्षक गैरहजर राहील्यास त्याची डयुटी करण्यांस दुसऱ्या गार्डला परवानगी द्यावी.(Over time)

३) सुरक्षा रक्षकांचे सुपरवायझर(माजी सैनिक) यांच्या बदली करण्यांस परवानगी द्यावी.आम्हाला सुरक्षा रक्षकांमधुनच चांगले व चुणचुणीत सुपरवायझर घेण्यास परवानगी द्यावी. त्यामुळे आपले काम सुरळीत व चांगले सुरू होईल

४) तसेच आमच्या बिलातून कपात केलेली रक्कम रूपये २,२५,१००/- आम्हांस परत करावी ही नम्र विनंती. जेणेकरून आम्ही कामगारांचे दंडाचे कापलेले पैसे त्वरीत परत करू याची आपणांस खात्री देतो." असे म्हटलेले आहे.

५) आम्हांस सुरक्षा रक्षकांचे गैरहजेरीचे प्रमाण कमी करण्यासाठी तातडीने नविन सुरक्षा रक्षक भरण्याची परवानगी दयावी (वरील सुरक्षा रक्षक आम्ही आपण सांगाल त्यावेळेस काढून घेण्याची जबाबदारी आमची राहील., त्याची जबाबदारी संस्थान वर येवू देणार नाही, याची हमी देतो.)

**C]** अहवाल-तरी मे.जय भवानी एंटरप्रायजेस यांनी त्यांचे वरील पत्रात नमूद केलेल्या मुदयांबाबत कामगार विभागामार्फत खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

(०१) मुद्दा क्र.०१ मधिल नमूद केलेले म्हणने खरे नाही. करारनाम्यातील व वर्कऑर्डरमधील अट व शर्त क्र.१४ नुसार कंत्राटी अकुशल,कुशल व सुरक्षा कामगारांची नेमणूक करणे, त्यांची सेवा समाप्त करणे, कंत्राटी कामगारांवर नियंत्रण ठेवणे व देखरेख (पर्यवेक्षण) करण्याची जबाबदारी आपणावर राहील. तुमचे मार्फत पुरविलेले कंत्राटी कर्मचारी व संस्थान यांचेमध्ये मालक व नोकर असा कोणताही संबंध राहणार नाही अथवा प्रस्थापित होणार नाही. असे नमूद असून, पुर्वीचे कंत्राटदाराकडे काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांनाच नविन कंत्राटदाराने कामावर ठेवणे अशी सन १९९१ पासुन संस्थानमध्ये प्रचलीत पध्दत असल्याने, नविन कंत्राटी कामगार लावणे ऐवजी प्रथम जुने कंत्राटी कर्मचा-यांना कामावर घेतांना प्राधान्यदेणेत येते.

(०२) मुद्दा क्र.०२ मध्ये नमूद केले प्रमाणे कंत्राटदार २ ते ३ वर्षाने बदलत असतो. पूर्वीचे कंत्राटदाराकडील कर्मचारीच नविन कंत्राटदाराकडे वर्ग करण्यात येतात. वर्कऑर्डर नुसार नेमलेल्या कंत्राटी कामगारांवर सुपरविझन,नियंत्रण ठेवणेकामी संबंधितकंत्राटदारास सुरक्षा अधिकारी, सुरक्षा निरीक्षक नेमणेची रितसर मंजूरी दिलेली आहे. संबंधित एजन्सीचे त्यांचे कंत्राटी कर्मचा-यांवर नियंत्रण व वचक नसल्याने त्यांचे कर्मचारी त्यांना जुमानत नाही हा संबंधीत एजन्सीचा प्रश्न (Problems) आहे असे दिसून येते. त्यात संस्थानचा कोणताही संबंध येत नाही. दोषी कंत्राटी कर्मचा-यांवर कारवाई करू नये असे संस्थान प्रशासनाने कंत्राटदारास कधीही सुचना दिलेल्या नाहीत. त्यामुळे कंत्राटदार स्वतःची जबाबदारी संस्थान प्रशासनावर ढकलणेचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.

(०३) मुद्दा क्र.०३ मध्ये नमूद केलेले कथन खरे नाही- कारण कंत्राट दारास कंत्राटी कर्मचारी मंजूरी देताना ६ कर्मचा-यांमागे ०१ कंत्राटी कर्मचारी हा रजा/सुटया सोडविणेकामी देणेस परवानगी देण्यात आलेली असल्याने, जादा कंत्राटी कर्मचारी घेणेस परवानगी देणेचा प्रश्नच उद्भवत नाही. दररोज किती कंत्राटी कर्मचा-यांना रजा सुटया दयावयाच्या हे संबंधित ठेकेदाराचे काम असते व ती जबाबदारी ठेकेदाराची आहे दि.१९-०३-२०१५ रोजी तपशिलवार वर्क ऑर्डरमधील कलम क्र.०९ व दि.२८-०३-२०१५रोजीचे करारनाम्यातील कलम क्र.०३ प्रमाणे आठवडा सुट्टी व्यतिरिक्त इतर पगारी रजा, सुट्टया व इतर कल्याणकारी फायदेबाबतची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व त्याची तोषीस, झळ संस्थानला लागणार नाही हे कंत्राटदारावर बंधनकारक राहील असे स्पष्ट नमुद केलेले आहे.

(०४) मुद्दा क्र.०४ मधिल म्हणने चूकीचे आहे- एखादे सुरक्षारक्षकाने अथवा कंत्राटी कामगाराने जर गैरवर्तन केले तर त्यास नियमाप्रमाणे शिक्षा अथवा दंड करणेबाबतची जबाबदारी ही कंत्राटदाराची आहे तसे कंत्राटदारास संस्थानकडुन वेळोवेळी लेखी व तोंडी कळविणेत येते. संस्थान कोणत्याही कंत्राटी कर्मचा-यास पाठीशी घालत नाही. स्थानिक नागरीकाकडून हस्तक्षेप होत असल्यास त्याबाबतची जबाबदारी संस्थानची नसुन ती कंत्राटदाराची आहे सदर प्रश्न हा संबंधित ठेकेदाराचा आहेकंत्राटदार स्वतःचे अपयश लपविण्यासाठी संस्थान प्रशासनावर चुकीचे आरोप करीत आहे.

(०५) मुद्दा क्र.०५ हा कंत्राटी कामगाराचे वेतनाबाबत असून, सदरचे अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाचे उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि२८ सप्टेंबर-२०१० रोजीचे मुळ

किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप अॅन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अधिसुचनेत नमुद केलेप्रमाणे किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडील वेळोवेळीचे नोटीफिकेशननुसार स्पेशल अलौन्सदराप्रमाणे सध्या संस्थानला लागु असलेल्या किमान वेतनदरानुसार व मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे अकुशल, कुशल कंत्राटी कामगार व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना वेतन देण्यात येत आहे. व वेळोवेळी स्पेशल अलौन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवून कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतनदराप्रमाणे वेतन देणेकामी संस्थानकडून सदर रक्कम देणेत येत आहे. वर्क ऑर्डर्समधील कलम ०३ (अ) व (ब) तसेच करारनाम्यातील कलम क्र.०६ मध्ये नमुद केलेप्रमाणे कंत्राटी कर्मचा-यांना दयावयची पेमेंटची वेतनाची रक्कम संबंधीत कंत्राटदारास संस्थानकडून देणेत येते.

(०६) मुद्दा क्र.०६ मधील म्हणने चूकिचे खोटे असुन वरिष्ठ अधिका-यांची दिशाभूल करणारे आहे. सदर एजन्सीने १ मार्च २०१५ पासून काम सुरु केले आहे प्रत्येक महिन्यात विभागांचे मागणीप्रमाणे पुरेशे कंत्राटी कर्मचारी पुरविणेत यावे याबाबत दिलेल्या वर्कऑर्डरमधील अट व शर्त क्र. ०२(अ) नुसार संस्थानचे मागणीनुसार व आवश्यकतेनुसार पुरेसे संख्येने कंत्राटी कर्मचारी ठेकेदाराने न पुरविल्यास आपले मासिक बिलातून प्रतिदिनी ,प्रति कर्मचारी रु.१००/- मात्र या प्रमाणे जेवढया संख्येने कर्मचारी कमी पुरविले जातील त्या प्रमाणात रक्कम लेखाशाखेमार्फत दंड म्हणून वसूल/कपात करणेत येईल असे नमुद करणेत आलेले असल्याने,संबंधित एजन्सीने त्याप्रमाणे कंत्राटी कर्मचारी पुरेशे संख्येने न पुरविल्याने, करारनाम्यातील व वर्क ऑर्डरमधील अटी शर्ती चा भंग केल्याने, संरक्षण विभागामार्फत जानेवारी-२०१६ पासून कंत्राटदाराचे बिलातून दंड वसूल करणे सुरु केलेले आहे.यात संस्थान अधिका-यांचे मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. व मे.रक्षक सिक्युरिटी या जुन्या कंत्राटदारांबरोबर हितसंबंध जुळलेले असल्याचा कंत्राटदाराचा आरोप हा बिनबुडाचा व तथ्यहिन आहे. संबंधित एजन्सीचे मालक व प्रतिनिधी यांचे त्यांचेकडील कंत्राटी कर्मचा-यांवर व्यवस्थीत नियंत्रण व सुपरविझन नसल्याने त्यांचे कंत्राटी कर्मचारी हे नेहमी गैरशिस्त वर्तन करत असतात व सतत गैरहजर राहत असतात.त्यास संबंधीत एजन्सीच जबाबदार असल्याचे दिसून येते त्याबाबत त्यांना अनेकवेळा नोटीसा दिलेल्या आहे. स्वतःचे अपयश व गैरकृत्ये लपविण्यासाठी कंत्राटदाराने संस्थानचे अधिका-यांवर चुकीचे, खोटे, पुरावा नसलेले बेताल आरोप केलेले असल्याचे दिसून येते. संस्थान अधिकारी कंत्राटदारास विनाकारण त्रास देण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

(०७) मुद्दा क्र.०७ हा निराधार बेताल, खोटा व चुकीचा आहे. मे.जयभवानी एंटरप्रायजेस यांनी त्यांचे कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनातून रक्कम कपात केलेने इकडील कार्यालयात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने प्रशासकीय अधिकारी यांचे कार्यालयात सर्व संबंधित यांचे समवेत मिटींग घेण्यात आली. सदर मिटींग मध्ये प्र.अ.श्री गमे साहेब यांनी दंडाची रक्कम कपात करण्यात यावी अशा कोणत्याही सूचना कंत्राटदारास केलेल्या नाही.कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनातून कपातकरू नये याबाबत मा.कार्यकारी अधिकारी सो.यांनी देखील सुचना दिलेल्याहोत्या.

तसेच मे. जयभवानी एंटरप्रायजेस, पुणे यांचे माहे –जूलै-2015 ते डिसेंबर-2015 अखेर खालील नमूद प्रमाणे खाली गेलेले पॉईंटचे अवलोकन करता

| मे.जय भवानी एन्टरप्रायजेस यांचे खाली गेलेले पॉईंट तपशिल | | | |
|---|---|---|---|
| कालावधी | मंजूर पॉईंट | पुरविलेलेपॉईंट | खाली गेलेलेपॉईंट |
| जूलै-२०१५ | ११३४६ | १०२०६ | ११४० |
| ऑगष्ट-१५ | ११४३९ | १०३७१ | १०६८ |
| सप्टेंबर-१५ | ११०७० | १०१२५ | ९४५ |
| ऑक्टोबर-१५ | ११४३९ | ९८७७ | १५६२ |
| नोव्हेंबर-१५ | ११०१० | ९५४२ | १३६८ |
| डिसेंबर-१५ | ११३७० | १०२४७ | ११३० |

करारनाम्यातील अट व शर्त क्र. ०२(अ) नुसार संस्थानचे मागणीनुसार व आवश्यकतेनुसार पुरेसे संख्येने कंत्राटी कर्मचारी न पुरविल्यास आपले मासिक बिलातून प्रतिदिनी, प्रति कर्मचारी रु.१००/- मात्र या प्रमाणे जेवढया संख्येने कर्मचारी कमी पुरविले जातील त्या प्रमाणात रक्कम लेखाशाखेमार्फत दंड म्हणून वसूल/ कपात करणेत येईल असे नमुद करणेत आलेले असल्याने त्याप्रमाणे संरक्षण विभागाने दंड कपात केलेला आहे यामागे सदर एजन्सीला त्रास देण्याचा कोणताही हेतु नाही. कंत्राटदाराने त्यांचे अपयश झाकण्यासाठी सदर आरोप केलेले आहे.

तसेच संबंधित एजन्सीने त्यांचे अर्जात कंत्राटी कामगारांचे गणवेषावर रु.२५ लाख खर्च केल्याचे नमूद केले आहे. परंतु करारनाम्यातील व वर्कऑर्डर मधिल अट व शर्त क्र.११ नुसार कंत्राटी कामगारांना विनामुल्यओळखपत्र व गणवेष देणे तुमचेवर बंधनकारक राहील त्याबाबत संस्थानकडे कंत्राटी कामगारांची कोणत्याहि प्रकारची तक्रार येणार नाही असे नमुद करणेत आलेले आहे परंतु सदर एजन्सीने त्यांचे सर्वच कर्मचा-यांना गणवेष वाटप केलेले नसून श्री साईबाबा हॉस्पिटल मधिल त्यांचे कंत्राटी कर्मचा-याना अदयाप पर्यंत गणवेष वाटप केलेले नाही. याबाबत त्यांना वेळोवेळी मिटींग घेवून व दि.३०-०९-२०१५ व दि.०९-११-२०१५ अन्वये लेखी पत्राव्दारे कळविलेले आहे.

तसेच करारनामा व वर्कऑर्डर मधिल अट व शर्त क्र.२७ नुसार तुम्ही कंत्राटी पध्दतीने कामास घेतलेल्या कंत्राटी कामगारांना प्रत्येक महिन्याचे ०१ तारखेस नविन डयुटी कार्ड (यलो कार्ड) देणे तुमचेवर बंधनकारक राहील व महिना भरल्यानंतर सदरचे डयुटी कार्ड पुढील कार्यवाहीसाठी कामगार विभागाकडे पाठविणे बाबत नमूद आहे परंतु

संबंधित एजन्सीला याबाबत वेळोवेळी मिटींग घेवून ,लेखी कळवूनही अदयाप पर्यंत ०१ वर्षात एकदाही कंत्राटी कर्मचारी येलो कार्ड सदर एजन्सीने कामगार विभागास जमा केलेले नाही.

तसेच अटी व शर्तीतील क्र. २३ च्या अटीनुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम नं.२५(१) नुसार लेबर लायसेन्स घेवून त्याची एक प्रत इकडील कार्यालयास १५ दिवसांचे आत सादर करावी लागेल. तुम्हांस प्रायव्हेट सिक्युरीटी एजन्सीस (रेग्युलेशन) ॲक्ट २००५ व महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरीटी एजन्सी (रेग्युलेशन) रुल्स, २००७ चे तरतुदीस अनुसरुन पोलीस कमिशनर ऑफीस/कंट्रोलींग ॲथॉरिटी यांचेकडून फॉर्म नं.VI मधील प्रायव्हेट सिक्युरीटी एजन्सी लायसेन्स प्रत १५ दिवसांचे आत सादर करावी लागेल. तुम्ही लेबर लायसेन्स, प्रायव्हेट सिक्युरीटी लायसेन्स विहीत मुदतीत घेणे व त्याचे नुतनीकरण विहीत मुदतीत करणे हे तुमचेवर बंधनकारक राहील. लेबर लायसेन्स/ प्रायव्हेट सिक्युरीटी लायसेन्स घेणेस व नुतरीकरणे करणेस उशीर झाल्यास, प्रत्येक विलंबाचे दिवसास रु.५०/- मात्र प्रतिदिनी याप्रमाणे दंडाची रक्कम लेबर/ प्रायव्हेट लायसेन्स घेणेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत व नुतनीकरण करणेबाबत पुर्तता होईपर्यंत तुमचे मासिक बिलातून लेखाशाखेमार्फत वसुल/कपात करणेत येईल.असे नमूद आहे. याप्रमाणे सदर एजन्सीने प्रायव्हेट सिक्युरिटी लायसेन्स वर्कऑर्डर मिळालेपासून १५ दिवसात सादर करणे आवश्यक होते. परंतु सदर एजन्सीने सदर प्रायव्हेट सिक्युरीटी लायसेन्स तब्बल ०१ वर्ष ऊशिराने म्हणजे मार्च-२०१६ मध्ये सादर केलेले आहे. सदर विलंबाबाबत संबंधित एजन्सीचे प्रत्येक महिन्याचे बिलातून दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे मे.जय भवानी एन्टरप्रायजेस या ठेकेदाराने वर्क ऑर्डरमधील व करारनाम्यातील अटी व शर्तीचा वेळोवेळी भंग/ उल्लंघन केलेले आहे.

तसेच संबंधित ठेकेदाराने मदत करावी बाबत केलेली मागणी बाबत खालीलप्रमाणे निर्णय घेता येईल-

०१. इतर विभागातुन सुरक्षा रक्षकाची पात्रता असलेले कर्मचारी संरक्षण विभागात बदली करता येईल, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित एजन्सीची राहील.

०२. सुरक्षा रक्षक गैरहजर राहिल्यास त्याची डयुटी करण्यास दुसऱ्या सुरक्षा गार्डला कायम स्वरूपी परवानगी (ओव्हरटाईम) नियमानुसार देता येणार नाही. व्यवस्थापनाचे दृष्टीने गर्दीचे व उत्सव कालावधीत जोडून डयुटी देता येईल.

०३. सुरक्षा रक्षकांचे सुपरवायझर (माजी सैनिक) यांचे बदली करण्यास/ पॉईंट बदली करण्याचे अधिकार संबंधित एजन्सीला आहे. चांगले व चुणचुणीत सुपरवायझर (माजी सैनिक) देण्यात आलेल्या मंजूरी मध्ये नेमण्याची परवानगी त्यांना देण्यात आलेली आहे.

०४. तसेच जयभवानी एंटरप्रायजेस व मॉडर्न सिक्युरीटी फोर्स यांचे बिलातून कपात केलेली रक्कम त्यांना परत देणे बाबतचा निर्णय हा मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर घ्यावा लागेल.

०५. गैरहजेरीचे प्रमाण कमी करण्यासाठी नविन अतिरिक्त (जादा) सुरक्षा रक्षक भरण्याची परवानगी त्यांना देता येणार नाही. कारण त्यांना देण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांचे मंजूरी नुसार रिलीव्हर धरून, सध्या त्याचेकडे खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत व सदर संख्यापुरेशी आहे.

| अ.नं | एजन्सीचे नांव | देण्यात आलेली मंजूरी | रजा/सुटया बदली देणेत आलेली कर्मचारी पटसंख्या | एकूण कंत्राटी कर्मचारी पटसंख्या | एजन्सीकडे पटसंख्येप्रमाणे अतिरिक्त जादा असलेली कंत्राटी कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे | ३४८ | ५८ | ४२२ | १६ |
| | एकूण | ४०६ | | ४२२ | १६ |

संस्थानने कंत्राटदारास दिलेल्या मंजूरी व्यतिरीक्त जास्त कंत्राटी कर्मचारी नेमल्यास/भरतीकेल्यास भविष्यात सदर अतिरिक्त/ जादा कंत्राटी कर्मचाऱ्यांची कायदेशीर जबाबदारी प्रिन्सीपल एम्प्लॉयर म्हणुन संस्थानवर येईल. व त्या अनुषंगे इतर खर्च व आर्थिक भार संस्थानला सोसावा लागेल असे मत आहे.

तथापि सदर एजन्सीने दि.१७-०३-२०१६ रोजीचे अर्जात उपस्थित केलेले मुद्दे तथ्यहिन चुकीचे व खोटे आहे. कारण मे. जय भवानी एंटरप्रायजेस यांनी दि१३-०२-२०१४ रोजीची भरलेली निविदा, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२-०६-२०१४ रोजीचे सभेत केलेल्या चर्चा व वाटा घाटी नुसार ०.०००१ % इतक्या कमीदराचे कंत्राट दि.०१-०३-२०१५ ते दि.२८-०२-२०१८ अखेर या ०३ (तीन) वर्षे कालावधीमध्ये स्विकारलेले आहे. तसेच निविदेतील व वर्कऑर्डर मधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत दि.२८-०३-२०१५ रोजी तसा करारनामाही करुन दिलेला आहे. त्यानंतर त्यांनी आता वरीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केलेले आहे. सदरचे मुद्दे हे मोघम स्वरूपाचे आहे. त्याअर्थी ते सदरचे कंत्राट चालविण्यास असमर्थ आहे असे दिसून येते.

तरी मे.जय भवानी एंटरप्रायजेस यांचे दि१७-०३-२०१६ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे व मॉडर्न व्ही.आर. सिक्युरीटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., पुणे यांचेवरील वाढत्या तक्रारी तसेच प्रस्तावामधील विभागाचा अभिप्राय विचारात घेता, सदरहू ठेकेदार हे वेळोवेळी करानाम्यातील अटी/ शर्तीचा भंग करत करतात व ते सदरहू कंत्राट चालविण्यास असमर्थ असल्याचे दिसून येत आहेत. याकरिता मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे व मॉडर्न व्ही.आर. सिक्युरीटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., पुणे यांना करानाम्यातील अटी/ शर्तीचा भंग केल्यामुळे कायदेशीर नाटीस देण्यात येऊन, दोन्हीही ठेकेदारांना टर्मिनेट करणेत यावे व संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकरीता नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.**

**तसेच यापुढे संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेचे कॉन्ट्रॅक्ट एक वर्षापेक्षा जास्त काळ देण्यात येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही-प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१० खाते चौकशी अधिकारी श्री.जे.एल.देशपांडे, पुणे यांचे मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. जे एल. देशपांडे सो. निवृत्त जिल्हा न्यायाधिश, पुणे यांनी संदर्भीय अर्ज इकडील कार्यालयास सादर केलेला आहे त्यात त्यांनी "डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांना दिलेल्या यांना दिलेल्या आरोपपत्रांची चौकशी अधिकारी म्हणून माझी नेमणूक संस्थानने संदर्भीय ठरावाव्दारे केली आहे. त्याच ठरावाव्दारे रु. ७,५००/- व प्रवास भत्ता व इतर खर्च रु.५,०००/- असे दर ठरविणेत आले आहेत. तथापी चौकशी अधिकारी हयांना मानधनापोटी जास्तीत जास्त २० ताराखांचे प्रत्येकी रु .७,५००/- प्रमाणे एकंदर रु. १,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही असा ठरावात उल्लेख आहे. त्याचप्रमाणे २० तारखेपेक्षा जास्त तारखा चौकशी कामी पडल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तारखेस प्रवासभत्ता, आहारभत्ता व इतर खर्चापोटी रु.५,०००/- मात्र देण्यात यावे, असाही ठरावात उल्लेख आहे. त्यानंतर आमचे पत्र दि.०५.०६.२०१५ चे संस्थानकडून दि.३०.०७.२०१५ रोजीचे उत्तरात असे कळविणेत आले की, मानधन मर्यादा २ लक्ष ठरविणेत आली आहे.

या संदर्भात निवेदन की, वरील दोनही वैद्यकीय अधिका-यांची चौकशी शिर्डी येथे चालू असून पुढील तारीख सुनावणीकामी दि.१८.०६.२०१६ पुरावा नोंदणेकामी आली आहे दरम्यान २४ तारखा उलटल्या आहेत. व पुरावा नोंदणी दिनांक ०४.०५.२०१६ पासुन सुरु आहे साहजीकच २० तारखेचे मर्यादेत चौकशी पूर्ण करणे शक्य होणार नाही. दि.१२.०६.२०१६ रोजी पर्यंत केवळ २ साक्षीदारांचा जबाब होऊ शकला.

हया संदर्भात पुढे निवेदन की, चौकशीचे कामकाज सुरु झालेनंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटीसा बजावणे, त्यांच्याकडून निलंबन भत्त्याचे मागणीवर कार्यकारी मंडळाने निर्णय घेणे, वैद्यकीय अधिका-यांनी बचावकरीता वकील नेमणूक करणेची परवानगी अर्जावर कार्यकारी मंडळाने निर्णय घेणे, संस्थानकरीता वकील नेमणे तसेच वैद्यकीय अधिका-यांनी मागीतलेल्या कागदपत्रांचे अर्जाची पूर्तता व चौकशीकामी संस्थानचे कागदपत्र दाखल करणे हयाकामी ब-याच तारखा पडल्या व त्यातही संस्थानचे प्रतिनिधीचे विनंतीवरुन बरेच तारखांना मुदत देण्यास आली हयाप्रमाणे प्राथमिक बाबतीत ब-याच तारखा खर्च झाल्या.

चौकशी अधिकारी पुणे येथे स्थायिक आहेत व पुणे–शिरडी ०४ तासाचा, परतीचा ०४ तास प्रवास चौकशी कामी दयावा लागणारा वेळ हयाप्रमाणे चौकशीचे दिवशी १२ तासांपेक्षा जास्त वेळ हया कामी खर्च करावा लागतो. तरी देखील मानधनाचे दराबद्दल आमची काही तक्रार नाही. चौकशी शिघ्रगतीने पूर्ण करण्याचे प्रयत्न करणेत येत आहेत.

वरिल दोनही वैद्यकीय अधिकारी हया चौकशी एकत्रीत (club) होईल अशी सुरुवातीला अपेक्षा होती. परंतू त्याप्रकारचा आदेश कार्यकारी मंडळाकडून झालेला नसलेने दोनही चौकशी सुनावणी वेगवेगळी परंतू एकाच तारखेस घेण्यात येत आहे. हयाप्रमाणे देखील चौकशी पूर्ण होण्यास थोडा अधिक कालावधी लागणेची शक्यता आहे.

तथापी, चौकशी प्रकरणाचा एकंदर आवाका, दाखल झालेली व भविष्यात दाखल होणारी कागदपत्रे व साक्षीपुरावा दोनही बाजूंनी दाखल करणे हयाकामी बराचा वेळ/ कालावधी लागणेची शक्यता आहे.

तरी विनंती की, मानधनाचे संदर्भात २० तारखा अथवा जास्तीत जास्त रु.२,००,०००/- (दोन लक्ष) ही मर्यादा रद्द करणेत यावी अथवा ती दुप्पट करणेत यावी. ही विनंती." असे नमूद केले आहे

डॉ.हरिष हुकूमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये हृदयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलून व इतर साहित्याचा वापर करणेकरीता बेकायदेशिररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रुग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. अशा व इतर अनेक तक्रारी आलेल्या असल्याने याबाबत खाते चौकशी करणेकामी खाते चौकशी अधिकारी नेमणेबाबत दि. ०५.०५.२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर विषय सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र-१४८ खालील प्रमाणे झाला आहे. "चौकशी अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीच्या प्रत्येक तारखेस रक्कम रु.५,०००/- मात्र प्रवास भत्ता व आहार भत्ता तसेच इतर खर्च म्हणून देण्यात यावेत, चौकशी अधिकारी यांना सदरहु चौकशी लवकारात लवकर पूर्ण करावी अशी विनंती करण्यात यावी व मानधनापोटी प्रत्येक तारखेस रक्कम रु ७,५००/- मात्र देण्यात यावेत. परंतू पुढे असे ठरले की त्याना मानधनापोटी जास्तीत जास्त २० तारखांचे प्रत्येकी रु ७,५००/- प्रमाणे एकंदर रु १,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही. २० ताराखांपेक्षा जास्त तारखा चौकशी कामी पडल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तारखेस त्यांना फक्त प्रवास भत्ता व आहार भत्ता व इतर खर्चापोटी रु.५,०००/- मात्र देण्यात येतील. मा. त्रीसदस्यीय समितीने पुढे असेही ठरविले की, चौकशी अधिकारी म्हणून निवृत्तसरकारी अधिकारी किंवा निवृत्त जिल्हा न्यायाधीशांची नेमणूक करावी व त्यांचेकडे प्रथम उपरोक्त मानधन व खर्च देण्यास संस्थान तयार आहे, असे सांगून ते चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहेत काय, अशी विचारणा करावी व इच्छुक असल्यास संबधिताकडून तसे लेखी पत्र घेण्यात यावे.

त्याचप्रमाणे सहाय्यक तज्ञ म्हणून डॉ. अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ, नाशिक यांची नेमणूक करण्यात यावी, असे दि २६.०४.२०१५ चे सभेमध्ये निर्णय क्र.१४० अन्वये ठरवण्यात आलेले आहे. चौकशी अधिकारी यांनी सहायकांची जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हाच त्यांना पाचारण करावे व त्यांनी भाग घेतलेल्या

चौकशीच्या प्रत्येक तारखेस तज्ञ सहाय्यकास वरील प्रमाणे प्रत्येक तारखेस रु ५,०००/- मात्र प्रवास खर्च, आहार भत्ता व इतर खर्चापोटी आणि मानधन म्हणून रु ७,५००/- मात्र देण्यात यावे. डॉ धर्माधिकारी, नासिक यांना तसे कळवावे व त्यांनी सहमती दर्शविल्यास त्याचे लेखी संमती पत्र घ्यावे. जर ते अनुच्छुक असतील तर दुसऱ्या तज्ञ सहाय्याची नेमणूक करण्यात यावी, असे एकमताने ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी ७ए/१२०२/२०१५ दि.३०.०५.२०१५ अन्वये मा.श्री. जे.एल. देशपांडे सो, सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश, पुणे यांना पत्र पाठवून कळविणेत आले होते त्यावर मा.श्री जे.एल.देशपांडे सो, पुणे यांनी दि०५.०६.२०१५ रोजीचे पत्राने असे कळविले आहे की, मानधन प्रतिदिन ७,५००/- व प्रवासखर्च व इतर खर्च रु. ५,०००/- देणेचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. परंतु त्याची एकुण मर्यादा १,५०,०००/- ठरविली आहे. दैनंदिन मानधन व प्रवासखर्च व इतर सर्व खर्च तरतूद योग्य आहे. परंतू चौकशीचे सत्रांची संख्या वाढल्याने किंवा खाते चौकशीचा अपेक्षेपेक्षा अधिक विस्तार झालेस, १,५०,०००/- रु. ची कमाल मर्यादा २,००,०००/- ठरविणे योग्य राहील. अशी अपेक्षा आहे. किंवा व्यवस्थापन समितीने भविष्यात त्याबद्दल योग्य तो विचार करावा. तसेच चौकशीकामी आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक / स्टेशनरी संस्थानकडून पुरविणेत यावी. वरील दोनही विनंतीस अधिन राहुन चौकशीकामी चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास संमती देत आहे

त्याचप्रमाणे मा. जे.एल. देशपांडे सो. यांनी संमती दिल्याप्रमाणे त्यांचे नेमणूकीस तसेच त्यांनी केलेल्या वाढीव रक्कम रु.५०,०००/- मानधनाबाबत व त्यांनी मागणी केलेल्या आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक / स्टेशनरी याबाबी त्यांना पुरविता येतील. बाबत दि. १६.०६.२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर आयत्या वेळचा विषय क्र. ०५ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. १९२ असा पारित झाला की, उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा. श्री. जे. एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधिश, पुणे यांनी केलेली विनंती मान्य करण्यात येवून, सदरहूकामी त्यांना तात्काळ नेमणूक आदेश देण्यात यावा. तसेच त्यांनी मागणी केलेला आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक स्टेशनरी, याबाबी पुरविणेस व सदरहु चौकशीकामी येणाऱ्या रु.५०,०००/- मात्र वाढीस खर्चास मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे इकडील जा.नं. एसएसएस /वशी ७बी/८७०/२०१५ दि.२३.६.२०१५ अन्वये पत्र देवून मा.जे.एल. देशपांडे सो. पुणे यांना खाते चौकशी अधिकारी म्हणून नियुक्तीबाबत पत्र देण्यात आले असून त्यात मानधन भत्ता वाढवून मिळणेबाबतची विनंती मान्यकरणेत येत असलेबाबत कळविले आहे.

डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे खाते चौकशी संस्थानचे श्री साईप्रसाद अतिथीगृह येथे सुरु आहे खाते चौकशी आत्तापर्यंत दोन साक्षीदारांचा जबाब झाला असून त्यातील संस्थान साक्षीदार ०१ यांची उलट तपासणी सुरु आहे. चौकशीकामी दि.१२.०६.२०१६ पर्यंत एकूण २४ तारखा झाल्या असून त्यातील १९ तारखांचे मानधन रु. १,४२,५००/- व प्रवास व खर्चापोटी रु. ८५,०००/- असे एकूण रु.२,२७,५००/- (अक्षरी रु. दोन लाख सत्तावीस हजार पाचशे मात्र) श्री. जे. एल. देशपांडे सो. पुणे यांना लेखाशाखेमार्फत अदा करणेत आले आहे

खाते चौकशी सुरु झाली त्यावेळी तत्कालीन वैद्यकीय संचालक डॉ. प्रभाकरराव हे सादरकर्ते अधिकारी होते. त्यांनी वेळोवेळी नोटीस देणे, कागदपत्रे दाखल करणे, निलंबन भत्ताबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणे या कारणास्तव बऱ्याच तारखांना मुदतवाढ घेतलेली आहे तसेच दोन्ही खाते चौकशी एकत्रीत (club) नसल्याने चौकशीकामी थोडा अधिक कालावधी लागू शकतो.

तरी मा. श्री. जे .एल. देशपांडे सो. सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश, पुणे यांनी त्यांचे दि. १२.०६.२०१६ रोजीचे अर्जान्वये मानधनाचे संदर्भात २०तारखा अथवा जास्तीत जास्त रु.२,००,०००/- (अक्षरी दोन लक्ष ) ही मर्यादा रद्द करणेत यावी. अथवा ती दुप्पट करणेत यावी. अशी विनंती केली असून त्यांचे विनंती अर्जावर निर्णय होणेस्तव सादर.

मा. अध्यक्ष महोदय यांनी व्यवस्थापन समितीसमोर उपरोक्त प्रमाणे सादर करण्यात आलेल्या विषयावर दिनांक १९.०७.२०१६ रोजी पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

Read office Note & opinion given by labour dept. By taking into consideration dupth of enquiry & its nature, request made by the enquiry officer needs to allowed. Furthermore enquiry officer is conducting two DE of dictors simultaneously. He is coming from pune & giving his valuable time. Hence the condition of 20 dates or maximum Rs 2,00,000/- is hurdle. It needs to be relaxed. Enquiry officer is now entitled to get Rs. 12,500/- per sitting (inclusive all) till decision of enquiry. Accordingly resolution needs to be passed.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशीची व्याप्ती मोठी आहे. चौकशीचे कामकाज क्लिष्ट असुन दोघांचे चौकशी वेगवेगळी करावी लागते मा.श्री.जे.एल. देशपांडे साहेब, पुण्याहून येऊन या चौकशी कामी बहुमुल्य वेळ देतात. त्यांना २० तारखेंचे रु. ५,०००/- + रु. ७,५००/- =१२,५००/- मानधन प्रति चौकशी तारखेकरीता देण्यात येतात. पूर्वी देण्यात आलेली २० तारखेंची मर्यादा रद्द करुन २० तारखांनंतर ते चौकशी अहवाल सादर करेपर्यंत प्रति चौकशी तारखेस रु.१२,५००/- मानधन देणेबाबत उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, खाते चौकशी अधिकारी श्री.जे.एल.देशपांडे, पुणे यांचे मानधनाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास तत्कालीन त्रिसदस्य समितीचे अध्यक्ष्य व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती. त्याची नोंद घेत असताना समितीने असे ठरविले की, मा.श्री.जे.एल. देशपांडे साहेब, निवृत्त प्रमुख जिल्हा न्यायाधिश, पुणे यांना डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशीकामी पुढील जास्तीत जास्त १० बैठकीमध्येच चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल सादर करावा, अशी विनंती करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.११** **श्री.बाळू विष्णू बनसोडे, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.बाळू विष्णू बनसोडे, मदतनिस, श्री साईप्रसादालय विभाग हे दि.०१.०७.२०१५ पासून दि०३.०९.२०१५ व दि.१०.०९.२०१५ ते ३०.०९.२०१५ अखेर ८५ दिवस या कालावधीत पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहीले आहे. या गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री बाळू बनसोडे यांचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांचा खातेचौकशी निष्कर्श अहवाल निर्णयार्थ मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०२.०४.२०१६ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री बाळू विष्णू बनसोडे, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना खातेचौकशी निष्कर्ष अहवालाचे प्रतिसह अंतिम करणे दाखवा नोटीस देवुन, त्यांचा लेखी खुलासा मागविण्यात यावा व त्यानंतर अंतिम निर्णयार्थ प्रस्ताव समितीसमोर सादर करणेय यावा, असे ठरले होते.

त्यानुसार श्री बाळू बनसोडे यांना जा. न. एसएसएस / वशी ७५५ /२०१६ दि. १९/५/२०१६ अन्वये खातेचौकशी अहवाल अंतिम कारणे दाखवा नोटीस काढण्यात आलेली होती. त्यावर श्री बनसोडे यांनी दिनांक २४/५/२०१६ रोजीचे पत्रान्वये खुलासा सादर केला आहे. त्यात त्यांना ''वरिल विषयास अनुसरुन कारणे विनंती अर्ज करतो की दि. ०१/०७/२०१५ ते दि. ०३/०९/२०१५ व दि. १०/९/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर ८५ दिवस या कालावधीत परवानगी शिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर होतो. कारण माझी मानसिक स्थिती बरोबर नसल्यामुळे मी कोणांसंगे ही बोलु शकत नव्हतो. कारण माझे असे काही नाजुक कारण आहे की कोणालाही सांगू शकत नव्हतो. किंवा माझी विचार करण्याची क्षमता नव्हती. कारण माझी मनस्थिती बरोबर नसल्यामुळे मला घरच्यांनी घरघुती उपचार केले. त्यानंतर मला थोडेसे बरे वाटले. त्यानंतर मी कामावर हजर झालो. तरी यापूढे चूक माझ्या कडून पुन्हा होणार नाही. अशी मी आपणास ग्वाही देतो. तरी मेहसीन साहेबांनी मला एक वेळ संधी द्यावी. ही नम्रतेची विनंती करतो. यापूढे माझ्या हातुन असे गैरवर्तन घडल्यास आपण द्याल ती शिक्षेस मी पात्र राहील.'' अशी विनंती केली आहे.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचा-यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनिमय, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय, किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे

(४) वेतनवाढ रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचा-याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे, सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचा-याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो. येथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचा-याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी, पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाजेष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाजेष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होईल यासंबधी पुढील निर्देश दिली जातील किंवा सेवाजेष्ठतेत कोणत्या अटीवर होईल यासंबधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षीस म्हणून कायदेशिर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचा-याने कोणतीही व्यक्तीकडून आर्थिक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमूद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरिल शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत- सबब, श्री बाळू विष्णू बनसोडे, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना देण्यात आलेला अंतिम कारणे दाखवा नोटीसीस अनुसरुन त्यांनी शेवटची संधी दयावी असा खुलासा दिला आहे. तरी श्री.बनसोडे यांनी दिलेल्या खुलाशाचा विचार करता त्यांना दयावयाचे शिक्षेबाबत निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.बाळू विष्णू बनसोडे, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना देण्यात आलेल्या अंतिम कारणे दाखवा नोटीसीस अनुसरुन त्यांनी शेवटची संधी दयावी असा खुलासा दिला आहे. सबब सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून श्री.बाळू विष्णू बनसोडे, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग यांना त्यांचे कामात सुधारणा होणेसाठी शेवटची संधी देण्यात यावी. परंतु त्यापुर्वी श्री.बाळू विष्णू बनसोडे, मदतनीस यांना मानसिक स्थिती ठिक असलेबाबत मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडून दाखला सादर करणेस कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२** **मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी अर्ज केलेल्या ॲडव्होकेटची मुलाखत घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२० नुसार संस्थान संबंधीत केसेस चालू असलेल्या विविध मा.न्यायालयांमध्ये पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने वेळोवेळी मंजूर केलेल्या ठरावांनुसार नेमणूक करण्यात आलेले ॲडव्होकेट्स संस्थानच्या पॅनलवर ठेवणेत येऊन, यापुढे आवश्यक त्या सर्व मा.न्यायालयामध्ये श्री साईबाबा संस्थानचे वतीने काम पहाणेसाठी संस्थान ॲडव्होकेट पॅनलवर, ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीमध्ये दुरुस्तीकरणेत येऊन, त्या नियमावलीस मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, येथे श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट नियुक्ती करणेकामी दि.२१/०१/२०१६ रोजीचे दै.सामाना मध्ये व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. व अर्ज करण्याची मुदत दि. १०/०२/२०१६ अखेर ठेवण्यता आली होती. त्यानुसार पाच ॲडव्होकेटचे अर्ज संस्थानला प्राप्त झाले आहे.

तसेच ॲडव्होकेट श्री शिवकुमार काशीनाथराव मथपती व ॲडव्होकेट श्री सुरेश पी. सालगर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, येथे श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी संदर्भीय अर्जाने विनंती केली आहे. ॲडव्होकेट श्री शिवकुमार काशीनाथराव मथपती व ॲडव्होकेट श्री सुरेश पी. सालगर यांचे अर्ज संस्थानने ठरवून दिलेल्या मुदतीच्या दि.१०/०२/२०१६ नंतर प्राप्त झालेले आहे त्यामुळे त्यांचे विनंती अर्जाचा विचार करावा किंवा कसे याबाबतचे निर्णया करीता व्यवस्थापन समितीचे सभेपुढील टिपणी तयार केली होती, सदरचे टिपणीवर मा. अध्यक्ष साहेब यांचेशी दि. २१/०५/२०१६ रोजी चर्चा केली असता त्यांनी सदर टिपणीवर "The applications received for panel Advocates after fixed date also be accepted & all applications be placed before the committee". असा शेरा नमुद केला आहे. तसेच पुढील मिटींगचे वेळी अर्जदारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे असे तोंडी सांगीतले आहे.

तरी सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या ७ ॲडव्होकेटची मुलाखत घेवून संस्थानचे औरंगाबाद येथील पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नेमणूक देणेसाठी सादर

**निर्णय क्र.५२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती होणेसाठी फारच कमी अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे सदरहूकामी जास्तीत जास्त व्यापक प्रमाणात फेर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, अर्जांची मागणी करणेत यावी.** (कार्यवाही-प्र.विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३** **ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे यांची श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबतचे सिव्हील ॲप्लीकेशनची वकील फी अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समितीचे दि. २६/०६/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं .४ अन्वये श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाबाबत. (सादरीकरण व चर्चा) विषय बांधकाम विभागा मार्फत सादर करण्यात आला होता, सध्या कमी पडत असलेली दर्शन रांगेची सुविधा व दि. ०१ ऑक्टोबर २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षास सुरुवात होणार असल्याने तत्पुर्वी भक्तांना दर्शन रांगेची सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केल्याप्रमाणे प्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

प्रस्तुतचे निर्णयास अनुसरुन दि. ०९/०८/२०१४ रोजी श्री आर.एन.धोर्डे यांना व इतर ॲडव्होकेट यांना पत्र देऊन प्रकरणी सिनिअर कौन्सील म्हणून काम पहाणे तसेच आकारणेत येणारे वकील फी बाबत कळविणेत यावे अशी विनंती केलेली होती. त्यानंतर दि. १२/०८/२०१४ रोजी सिव्हील अर्जाचा कच्चा मसुदा ॲडव्होकेट श्री आर.एन.

धोर्डे यांनी स्टेनोला डिक्टेट केला मात्र याकामी श्री होन ॲडव्होकेट, श्री धोर्डे ॲडव्होकेट, किंवा श्री शहा ॲडव्होकेट यांचे पैकी एकाची नेमणूक करणेकामी काही कालावधी गेलेनंतर दि. ०२/०९/२०१४ चे टिपणीस अनुसरुन ॲड. श्री आर.एन.धोर्डे, सिनिअर कौन्सील औरंगाबाद यांना जा.क्र. एसएसएस वशी- विधी/२८७४/२०१४ दि. १३/०९/२०१४ रोजीचे पत्राने सिव्हील ॲप्लीकेशन मसुदा तयार करुन देणेस विनंती करण्यात आली होती. त्यानुसार दि.२४/०९/२०१४ रोजी ॲड श्री आर.एन.धोर्डे यांनी सिव्हील अर्जाचा मसुदा तयार करुन ई मेलवर पाठविला तसेच दि.२२/०९/२०१४ रोजी प्रस्तुतचे सिव्हील ॲप्लीकेशनची वकील फी कामी रक्कम रु. १,५०,०००/- मात्रचे बिल पाठविले होते. (सदर पत्र दि. ०६/१०/२०१४ रोजी संस्थानला प्राप्त झाले आहे.)

मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथील ॲडव्होकेट यांना आता पावेतो रक्कम रुपये २०,०००/- मात्र प्रति केस प्रमाणे वकील फी अदा केलेली आहे. वकील फी बाबत मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील वकीलांना निश्चित किती वकील फी द्यावयाची याबाबत तसेच सिनिअर कौन्सिलची वकील फी अदा करणेबाबत निश्चित धोरण ठरलेले नाही.

प्रस्तूत सिव्हिल अर्जात ॲड. श्री आर.एन.धोर्डे, यांनी सिव्हील ॲप्लीकेशनचे वकील फीचे बील रक्कम रु. १,५०,०००/- मिळणेबाबत विनंती केली आहे. सदरचे बील ड्राफ्टींग, स्टेनो चार्जेस, क्लरीकल चार्जेस, कॉन्फरन्स चार्जेस, झेरॉक्स, टेलीफोन, फॅक्स, ट्रॅव्हलींग व ई-मेल या कामासाठी मागणी केले आहे. ॲड. श्री आर.एन. धोर्डे हे सिनिअर कौन्सील वकील असल्याने व सिव्हील ॲप्लीकेशनची रक्कम रु. ३४०.२० कोटी असल्याने ॲड. श्री आर.एन.धोर्डे यांना रक्कम रु.१,५०,०००/- वकील फी अदा करणेबाबचे निर्णयार्थ सदरचा विषय दि. ०९/१२/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांनी मागणी केलेल्या वकील फी मध्ये सवलत मिळावी, यासाठी साईबाबा संस्थान ही धर्मदाय संस्था असल्यामुळे सवलतीची फी कळवावी अशा आशयाचे विनंती पत्र त्यांना देण्यात यावे, असे ठरले."

प्रस्तुतचे निर्णयास अनुसरुन ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांना जा.क्र. एसएसएस वशी-विधी/५५४९/ २०१५ दि.०९/०२/२०१५ चे पत्राने सवलतीची वकील फी कळविण्याबाबत विनंती करण्यात आली होती. ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांनी दि. २२/०२/२०१५ रोजीचे पत्राने As per your letter, you are requested to send the fees as reasonable as you may deem fit असे नमुद केले आहे.

प्रस्तुतचे पत्रास अनुसरुन दि .०५/१२/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीने श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे खर्चास मान्यता मिळणेकामी बाबतचे सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२३४७/२०१४ चे वकील फी कामी ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांना रक्कम रु.१०,०००/- अदा करणेस मान्यता घेवून जा.क्र. एसएसएस/ वशी-विधी/ ६८६९/ २०१६ दि.१४/०३/२०१६ ने भारतीय स्टेट बॅंकेचा चेक क्र.१४८४३ दि. १२/०२/२०१६ ने रु. ९०००/- व टी.डी.एस. पावती रु. १०००/- देण्यात आली आहे.

आता ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांनी दि.१०/०४/२०१६ रोजीचे पत्राने (प्राप्त दि. ०६/०५/२०१६) सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२३४७/२०१४ मध्ये वकील फी पोटी रक्कम रु. ७५,०००/- ची मागणी केली आहे. तसेच वेळोवेळी त्यांनी रक्कम रु. १०,०००/- वकील फी अदा केल्याबाबत नाराजीही बोलून दाखवीली आहे, तसेच आता सिनिअर कौन्सील असल्याने त्याप्रमाणे वकील फी अदा करावी अशी तोंडी विनंतीही त्यांनी केली आहे.

तरी उपरोक्त सर्व परिस्थीतीचा विचार करता व मा. त्रिसदस्य समितीचे सभेत झालेल्या निर्णयास अनुसरुन श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचे सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२३४७/२०१४ मध्ये यापुर्वी दिलेली रक्कम रु. १०,०००/- वजा जाता रक्कम रु. ६५,०००/- वकील फी कामी ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांना चेक/ डी.डी. अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांनी दि.१०/०४/२०१६ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली रु.७५,०००/- मात्र वकील फी देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच त्यांना यापुर्वी दिलेली रक्कम रु.१०,०००/- मात्र वजा जाता उर्वरित रक्कम रु.६५,०००/- मात्र वकील फी अदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-प्र.विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४** **शिर्डी येथील श्री साईबाबा मंदिरास राष्ट्रीय एकात्मता मंदिर म्हणून घोषित करण्याबाबत महाराष्ट्र शासन यांचे दि.२१/१२/२०१५ रोजीचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये– केंद्र शासनाच्या दि. ०४/०९/२०१५ रोजीच्या प्राप्त झालेल्या श्री दिगंबर नाईक, संयोजक, राष्ट्रहित मंच, पणजी गोवा यांचे शिर्डी येथील श्री साईबाबा मंदिरास राष्ट्रीय एकात्मता मंदिर म्हणून घेषित करण्याचे पत्राबाबत अभिप्राय मागिवण्यात आलेला आहे.

श्री दिगंबर बी.नाईक, संयोजक, राष्ट्रहित मंच, पणजी, गोवा यांनी मा. महामहिम राष्ट्रपती यांना शिर्डीचे श्री साईबाबांचे मंदिरास "राष्ट्रीय एकात्मता" मंदिर म्हणून घोषित करणेबाबत विनंती केलेली आहे. श्री नाईक यांनी आपल्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, सन १९४७ चे भारताच्या सवातंत्र्यानंतर सन १९५० मध्ये भारतीय संविधान हे धर्मनिरपेक्षता व एकात्मता या आधारावर तयार करुन अंमलात आणले आहे. शिर्डी मध्ये श्री साईबाबांनी सन १८५८ ते १९१८ चे महानिर्वाणापर्यंत अवघे ६० वर्ष धर्मनिरपेक्षतेची व राष्ट्रीय एकात्मतेचीच शिकवण दिलेली

आहे. याबाबत पुट्टपुर्तीचे श्रीसत्यसाईबाबा यांनीही असे माणले आहे की, धर्मनिरपेक्षतेची सुरुवात भारतात सर्वप्रथम शिर्डीचे श्री साईबाबा यांनीच शिकविली व पुढे याच आधारावर भारतीय संविधानाचे लिखान झाले आहे. श्री साईबाबांचे वेगळेपणाबाबत ऐकूण त्याकाळामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे देखील शिर्डी येथे श्री साईबाबांची भेट घेण्याकरीता आले होते. त्याच प्रमाणे माजी पंतप्रधान मा.श्री. पी.व्ही. नरसिंहराव व इतर अनेक ख्यातनाम भारतातील व परराष्ट्राचे व्यक्ती व करोडो साईभक्त शिर्डी येथे येऊन श्री साईबाबांचे दर्शन घेऊन गेलेले असून नियमीतपणे येत आहेत. चेन्नई (तमीळनाडू) येथील साईभक्त श्री के.व्ही. रमणी यांचे रुपये ११२ कोटींचे देणगीतून शिर्डी येथे भक्तांचे राहण्याकरीता साई आश्रम इमारत बांधुन साकारण्यात आलेली आहे. श्री साईबाबांनी आपल्या साईभक्तांचे जिवणामध्ये अनेक असे चमत्कार घडवून आणलेले आहेत, त्याबाबतचे उत्तर आपल्या आधुनिक विज्ञानाकडे नाही.

सर्व धर्माचे व पंथाचे लोकांनी शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनघेतल्यामुळे खऱ्या अर्थाने श्री साईबाबांचे मंदिर हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक बनले आहे. ज्यावेळी एखादा व्यक्ती श्री साईबाबांवरील श्रध्देने साईभक्त होतो त्यावेळी तो खरा माणूस, अहिंसा व शांती प्रिय होते.

भारतामध्ये काही लोक धर्माचा आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी गैरवापर करत आहेत असा निश्कर्ष आहे. आता आपल्या धर्मनिरपेक्ष भारत देशाची प्रतिमा जगाला दाखविण्यासाठी धर्मनिरपेक्ष विचारसरणी व धर्मनिरपेक्ष चळवळीची गरज आहे. शिर्डी येथील श्री साईबाबांचे मंदिराला "राष्ट्रीय एकात्मता" मंदिर जाहिर करणे म्हणजे त्या दिशेने पहिली पायरी आहे. मराठी भाषेमध्ये नैसर्गिक रित्या "साई" या शब्दाचे रुप "सार्वजनिक ईश्वर" असे आहे. याचा अर्थ सर्वांचा ईश्वर, शिर्डीचे श्री साईबाबा हे खऱ्या अर्थाने सर्वांचे दैवत आहे. देवाची व्याख्या म्हणजे जे आपल्या भक्तांच्या हाकेला धावून येतात या व्याख्येत शिर्डीचे श्री साईबाबा हे खरे उतरले आहेत.

वरील सर्व दृष्टीकोणातून विचार करता मा. महामहिम राष्ट्रपती यांनी शिर्डी येथील श्री साईबाबांचे मंदिराला राष्ट्रीय एकात्मता मंदिर जाहिर करावे अशी विनंती केलेली आहे.

श्री साईबाबांचे मंदिराला राष्ट्रीय एकात्मता मंदिर जाहिर व्हावे याकामी संस्थानचे मंदिर विभाग, प्रकाशने विभाग, जनसंपर्क विभागाकडे माहिती मागविण्यात आली होती. जनसंपर्क विभागाने माहिती निरंक कळविली आहे.

तसेच मंदिर विभागाने दि. ४/४/२०१६ रोजीचे पत्राने मंदिरात साजरे होणारे सन / उत्सवाची माहिती पुढील प्रमाणे दिली आहे. गुढीपाडवा, श्री रामनवमी उत्सव, कै. भाऊमहाराज कुंभार पुण्यतिथी, आषाढी एकादशी, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री संत नामदेव महाराज पुण्यतिथी, श्री संत सावता महाराज पुण्यतिथी, श्री कृष्ण जन्म गोकुळ अष्टमी, गोपालकाला, श्री गणेश चतुर्थी, श्री पुण्यतिथी उत्सव, कोजागीरी पौर्णीमा, लक्ष्मी पुजन, कार्तिक एकादशी, तुलसी विवाह, श्री संतकवी दासगणू महाराज पुण्यतिथी, श्री दत्त जयंती, श्री संत नरहरी महाराज पुण्यतिथी, श्री संत समर्थ रामदास नवमी, श्री संत तुकाराम बीज, श्री संत एकानाथ महाराज षष्ठी, महाशिवरात्र, होळी पौर्णीमा, रंगपंचमी हे सन / उत्सव साजरे करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

प्रकाशने विभागाने – श्री साईबाबा त्यांच्या अवतारकाळात, शिर्डी येथील त्यांच्या वास्तव्यात, "फाटकें-तुटकें नेसतो रे, मन मानेल तेथें बसतो रे; परि ब्रम्हांड गिळूनि असतो रे !" असे म्हणत असत, त्यांच्या या उक्तीची प्रत्यक्षानुभूती त्यांच्या प्रथम अवतरणदर्शनापासूनच येऊ लागली होती. श्री साईबाबांच्या प्रत्यक्ष आशीर्वादाने कै. श्री गोविंद रघुनाथ दाभोलकर उर्फ हेमाडपंत व्दारा लिखित श्री साईसच्चरिताच्या ४थ्या अध्यायात याचे प्रत्यक्षदर्शी वर्णन वाचावयास मिळते, तेव्हापासून महासमाधी घेईपर्यंत श्री साईबाबांनी आपल्या जन्माचा, जातीधर्माचा, माता-पिता आप्त सखाबंधू गणगोत अशींचा कोणालाही मागमूस लागू दिला नाही कारण त्यांचा अवतार हा सकल जनांच्या कल्याणासाठी होता.

श्री साईबाबांच्या या अवताराविषयी लिहितांना श्री साईबाबांच्या गळयातील ताईत म्हणून ओळखले गेलेले श्री साईबाबांचे निस्सीम भक्त सॉलिसिटर श्री हरि सिताराम उर्फ काकासाहेब दिक्षीत म्हणतात, ".. महाराज मुळचे कोण, हे निश्चयात्मक सांगता येत नाही. किंबहुना त्यांच्या कित्येक भक्तांच्या मानण्याप्रमाणे ते 'अयोनिज' होते की काय, हेही सांगता येत नाही. महाराजांना अयोनिज मानणे हे भक्तेतरांच्या दृष्टीला अशक्य वाटेल; पण हे प्रस्तुत लेखकाला वाटत नाही..." या आपल्या मताव्दारे काकासाहेब दीक्षीतांना हेच सुचवायचे आहे की, श्री साईबाबा हे कोणा एका विशिष्ट जातीधर्मापुरते, प्रांतापुरते मर्यादित नवहेते, तर त्यांचे अवतारकार्य हे सकलजनांच्या कल्याणासाठी होते.

श्री साईबाबांची शिकवण ही मी-तूंपणाची भेदरुत्ती नष्ट करुन अभेद्य स्थीती निर्माण करणारी आहे. म्हणूनच श्री साईबाबा म्हणत, "...तुम्हा आम्हामधील भिंत ! पाडूणीटाका पहा समस्त ! मग जाण्या येण्याचा मार्ग प्रशस्त! अतिनिर्धास्त होईल !!.." येवढेच नव्हे, तर त्यांनी सांगून ठेवले आहे, " माझा माणूस देशावर! असो कां हजारों कोस दूर! आणीन जैसे चिंडीयांचे पोर! बांधून दोन पायांस!!.. कुठेंही असा कांहीही करा ! एवढें पुर्ण सदैव स्मरा ! कीं तुमच्या इत्थंभूत कृतीच्या खबरा ! मज निरंतरा लागती !!" बाबांच्या या वचनोक्तींची अनुभूती साता समुद्रापारही येत असल्यानेच देशोदेशीचे लोक धर्म जात पंथ-प्रांत बाजूला ठेवून श्री साईबाबांच्यादर्शनार्थ शिर्डीत येत आहेत, त्यांच्या चरणी नतमस्तक होवून, म्हणत आहे, " भू-खेचर व्यापूणी अवघे हुत्कमली राहासी ! तोंची दत्त देव तु शिर्डी राहूणी पावसी ! राहूणी येथे अन्यत्रही तु भक्तांस्तव पावसी ! निरसूणीया संकटा दासा अनुभव दावीसी! ..." म्हणूनच श्री साईबाबा हे सकलांचा देव असल्याची नितांत भावणा साई अवतारकालीन लोकमान्य टिळकांचे सहकारी दादासाहेब खापर्डे, तात्यासाहेब नुलकर, बापुसाहेब बुट्टी, नानासाहेब चांदोरकर, डॉ.पंडित, डॉ.पिल्ले, बाळाराम धुरंधर, सपटणेकर

वकील आदी उच्च विद्याविभूषित, श्रीमंत व आपापल्या कार्यक्षेत्रात उच्चपदस्थ असलेल्या साईभक्तांची होती; तीच भावना नंतरच्या काळातील साईभक्तांची निरंतर राहीली असल्याचे कळविले आहे.

तरी श्री साईबाबांचे सन २०१७-२०१८ चे समाधी शताब्दीच्या पार्श्वभुमीवर श्री साईबाबांचे समाधी मंदिर हे राष्ट्रीय एकात्मता मंदिर म्हणून घोषीत होणेकामी शासनास प्रस्ताव सादर करणेचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबांचे समाधी मंदिर हे राष्ट्रीय एकात्मता मंदिर म्हणून घोषीत केल्यास रुढी- परंपरेनुसार मंदिरामध्ये होणाऱ्या पुजाविधीवर बंधने तयार होतील, यामुळे भक्तांच्या भावना दुखावल्या जातील, याचा विचार करता, श्री साईबाबांचे समाधी मंदिर हे राष्ट्रीय एकात्मता मंदिर म्हणून घोषीत न करता या मंदिरास आय.एस.ओ. दर्जा प्राप्त करणेसाठी कार्यवाही करणेत यावी.**

(कार्यवाही-प्र.विधी अधिकारी/ मंदिर विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१५** **मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रा.लि., हैद्राबाद या कंपनी विरुध्द तसेच कंपनीचे डायरेक्टर्स असे एकुण ९ लोकांविरुध्द मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दावा दाखल करणे तसेच त्याकामी येणारे स्टॅम्प व प्रोसेस फी, वकील फी अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९४५ अन्वये संस्थानचे नियोजीत साईगार्डन प्रकल्पांतर्गत सिव्हील वर्क कामाचे ठेकेदार मे. के.आर.आर. इंन्फ्रा प्रा. लि. हैद्राबाद यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम वसुल करणेकामी लवाद दाखल करणेत यावे असे ठरले प्रस्तुत ठरावा नुसार ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांना मे. के.आर.आर. इंन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि यांचेशी झालेला पत्रव्यवहार व करारनामा व इतर कागदपत्र दाखवले त्यावर ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांनी दि १३/०२/२०१५ रोजीचे पत्राने लेखी कायदेशीर मत खालील प्रमाणे दिले आहे.

"मी यापुर्वी अनेकवेळा अरबिट्रेशन क्लॉज कोणत्याही करारात ठेवू नका असे संस्थानला व संस्थानच्या अधिका-यांना सांगीतले आहे, माझ्या मते अरबिट्रेशन क्लॉजचा करारभंग करणा-या कॉन्ट्रॅक्टरला फायदा होते. अरबिट्रेटर पुढे चौकशी चालू असतांना मोठे प्रमाणात खर्च होतो अरबिट्रेटरची फी पण भरपूर असते, अरबिट्रेशन क्लॉज मुळे विनाकारण त्रास होते, अरबिट्रेटरचे निर्णयानंतर सुध्दा सिव्हील कोर्टात रेफरन्स अरबिट्रेशन क्लॉज नुसार होवू शकतो.

माझे स्पष्ट मत आहे की, अरबिट्रेशन क्लॉज कोणत्याही करारात ठेवणे संस्थानच्या हिताचे नाही. वादाचे निराकरण संस्थानचे मुख्यकार्यालय येथे आहे, त्याकोर्टात होणे जास्त सोईचे व हिताचे आहे. प्रस्तुतचे प्रकरणात संबंधीत ठेकेदार आता बराच कालावधी लोटलेनंतर अरबिट्रेटरची मागणी करत आहे ठेकेदाराची मागणी क्लॉज नं. १२.४ नुसार आता मुदतीत नाही मी के.आर.आर. यांचे दि ०५/०१/२०१५ चे पत्र पाहिले त्या पत्रात ज्या गोष्टी त्यांनी कथीत केल्या आहेत त्यावरुन त्यांना संबंधीत प्रकरण प्रलंबीत करावयाचे आहे संबंधीत ठेकेदारांनी ज्या तक्रारी खुप मोठ्या विलंबानंतर केलेल्या आहेत. त्या मुदतीत नाही म्हणून के.आर.आर. यांना स्पष्ट नोटीस देवून सिव्हील कोर्टात जाणे योग्य होईल, अर्थात संबंधीत ठेकेदार अरबिट्रेशन क्लॉजचा गैरवापर करुन प्रकरण प्रलंबीत करणेचा प्रयत्न करील संबंधीत तारीख ०५/०१/२०१५ चे पत्र अत्यंत चानाक्षपणे ठेकेदाराने दिले आहे. त्यास सुस्पष्ट उत्तर संस्थानने द्यावे.

मी संबंधीत खुलासा माझे समोर आलेल्या कागदपत्रानुसार तसेच झालेल्या कराराचे अवलोकन करुन दिलेला आहे. यापुर्वी नोटीसा पण संस्थानमार्फत संबंधीतांना पाठविलेल्या आहेत."

ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांचे लेखी मार्गदर्शनावर दि १०/१२/२०१५ रोजी फेर टिपणी सादर करुन मे. के.आर.आर. यांचे विरुध्द लवाद दाखल न करता सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेस मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.क्र. एसएसएस वशी-विधी/५७२४/२०१५ दि.१५/०१/२०१६ अन्वये ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांना दावा तयार करुन देणेबाबत विनंती केली होती त्यांनी दि. २२/०४/२०१६ रोजीचे पत्राने दावा तयार करुन दिला आहे. ॲडव्होकेट श्री एस.डी. कुलकर्णी यांनी दिलेल्या पत्रात खालील प्रमाणे नमुद केले आहे

"प्रस्तुतचे दाव्यात सर्व संचालकांना सामील करणे आवश्यक आहे, संबंधीत कंपनी कशा आवस्थेत आहे, त्यांचेकडे काय प्रॉपर्टी आहे, याची माहिती मिळत नाही. मुळ करार ३०,९५,२७,६६६/- या रक्कमेचा आहे आर्किटेक्ट माथून कापरे या कंपनीने आरबीट्रेशन क्लॉज नुसार व त्यांना असलेल्या अधिकारानुसार रु.२,११,०५,७४८/- एवढी रक्कम नुकसान भरपाईची दाखवीलेली आहे, करारानुसार व परिस्थीती नुसार रु.०८,७१,२५,७४८/- एवढी रक्कम दाव्यात मागीतलेली आहे. कायद्यानुसार जास्तीत जास्त स्टॅम्प रु.३,००,०००/- चा दाव्या लागतो, दाव्याचे कामी स्टॅम्पची रक्कम रु.३,००,०००/- तसेच एकुण ९ प्रतिवादी यांचे प्रोसेसचा खर्च, टायपींग, झेरॉक्स हा वेगळा असेल या केसचे कामी शेड्युल प्रमाणे वकील फी सुमारे रु ५,००,०००/- चे आसपास होते तरी संबंधीत नोट प्रमाणे पुढील कारवाई करवाई व्हावी" अशी विनंती ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांनी केली आहे.

**तरी खालील मुद्यावर निर्णय होणेसाठी सादर.**

१) मे. के.आर.आर. इंन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. या कंपनी विरुध्द तसेच कंपनीचे डायरेक्टर्स असे एकुण ९ लोकां विरुध्द लवाद दाखल करणे ऐवजी मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात सिव्हील दावा दाखल करणेस मान्यता.

२) दावा दाखल करणेकामी मा. कोर्टात जमा करावयाची स्टॅम्प ड्युटीची रक्कम रु. ३,००,०००/- चे खर्चास मान्यता.

३) सदर दाव्यास प्रोसेस फी रक्कम रुपये १०,०००/- रोखीने खर्च करणेस मान्यता.

४) सदर दाव्याचे कामकाज पहाणे कामी ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांची वकील फी सुमारे रु. ५,००,०००/- चे आसपास अदा करणेस मान्यता.

**निर्णय क्र.५२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रा.लि., हैद्राबाद या कंपनी विरुध्द तसेच कंपनीचे डायरेक्टर्स असे एकूण ९ लोकांविरुध्द मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दावा दाखल करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावावर मा.ॲड तथा सॉलिसिटर मोहन जयकर, सदस्य यांचा अभिप्राय घेण्यात येऊन, त्यांच्या अभिप्रायासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-प्र.विधी अधिकारी)

---

**विषय नं.१६** **श्री साईबाबा संस्थानचे वॉटर ऑडिट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

प्रस्तावना:- सद्यस्थितीत संस्थानकरीता शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्तपाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेत आलेली आहे या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यांची साठवण क्षमता ३३२ एम.एल. इतकी आहे.

सदर साठवण तलावात जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडून गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे

सदरहू योजनेतून मौजे कनकुरी, पिंपळवाडी या गावांसह संस्थान परिसर, श्री साईप्रसादालय, विविध भक्तनिवासस्थाने, शैक्षणिक संकुले यासह कर्मचारी वसाहती, नव्याने झालेले साईआश्रम प्रकल्प भाग ०१ व भाग ०२ तसेच ०३ कर्मचारी हौसिंग सोसायटी, शिर्डी पोलीस स्टेशन या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत संस्थानचा दैनंदिन पाणी वापर हा अंदाजे सरासरी३५ लाख लिटर्स ते ४० लाख लिटर्स इतका झालेला आहे. गर्दीचे कालावधी सदरचा पाणी वापर हा यापेक्षाही जास्त होत आहे. संस्थानचा वाढता व्याप लक्षात घेता, कनकुरी साठवण तलाव येथुन होणारा पाणी पुरवठा कमी पडत आहे. मागील दोन ते तीन वर्षापासून पर्जन्यमान कमी होत असलेने धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध होत नसल्याने जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडून रोटेशन कालावधीत वाढ करण्यात आलेली आहे. जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडून अडीच ते तीन महिन्यातुन रोटेशन (आवर्तन) देणेत येत असल्याने संस्थान साठवण तलावातील पाणी कमी पडत आहे. याकरीता भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी उपलब्ध करुन घ्यावे लागत आहे.

संस्थानचा वाढता पाणी वापर लक्षात घेता, जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन आवर्तन (रोटेशन) कालावधीत पुरविण्यात येणारे पाणी जास्तीत-जास्त दिवस पुरविणे गरजेचे आहे. याकरीता उपलब्ध पाणीसाठयाचे योग्य नियोजन होवून पाणी वापर काटकसरीने करणे गरजेचे आहे.

प्रस्ताव:- श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१६ करीता मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे उपस्थितीत आयोजित मिटींगमध्ये मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संस्थानचा वाढता पाणी वापर लक्षात घेता याबाबत संस्थानचे वॉटर ऑडिट करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र शासनाची धरणे, साठवण तलाव, नदया इ. ठिकाणच्या पाण्याचे ऑडिट करणारी शासकिय संस्था वाल्मी यांचेकडे मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी दुरध्वनीवरुन चौकशी केली असता, त्यांनी संस्थानचे वॉटर ऑडिट करणेची तयारी दर्शविलेली आहे.

विभागाचे स्पष्ट मत:- सद्यस्थितीतील पाणी टंचाई, संस्थानचा वाढता पाणी वापर लक्षात घेता, जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन आवर्तन (रोटेशन) कालावधीत पुरविण्यात येणारे पाणी जास्तीत-जास्त दिवस पुरविणे गरजेचे आहे. याकरीता उपलब्ध पाणीसाठयाचे योग्य नियोजन होवून पाणी वापर काटकसरीने करणे गरजेचे आहे. याकरीता पाण्याचे ऑडिट करणारी शासकिय संस्था वाल्मी यांचेकडुन संस्थानचे वॉटर ऑडिट करता येईल.

तरी यासाठी मुख्य लेखापरिक्षक, जल व सिंचन, महाराष्ट्र राज्य वाल्मी परिसर, वाल्मी, औरंगाबाद यांचेकडुन वॉटर ऑडिट करुन घेणेसाठी पत्रव्यवहार करणेस, संस्थानचे वॉटर ऑडिट करणेस व यासाठी आवश्यक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे वॉटर ऑडिट करणे अत्यावश्यक आहे, असे समितीचे एकमत झाले. याकरीता मुख्य लेखापरिक्षक, जल व सिंचन, महाराष्ट्र राज्य वाल्मी परिसर, वाल्मी, औरंगाबाद यांचेकडुन संस्थानचे वॉटर ऑडिट करुन घेण्यात यावे तसेच खराब पाण्याचा पुन:र्वापर, जलसंधारण, रेन वॉटर हार्वेस्टींग याबाबतही मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले व यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **शासकीय व्ही.आय.पी.विश्रामगृह, शिर्डी येथे संस्थानकडून पाण्याचे नळ कनेक्शन उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी, भाग शिर्डी यांचे कार्यालयाकडील दि.१९/०५/२०१६ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात त्यांनी विश्रामगृहात येणा-या अति महत्वाचे अतिथी/ मा.मंत्री/ मा.खासदार/ मा.आमदार/ लोकप्रतिनीधी/ शासकिय व कर्मचारी यांची पाणी नसल्यामुळे गैरसोय होत असलेने संस्थानकडुन १" पाण्याचे नळ कनेक्शन जोडून देणेबाबतची कार्यवाही करणेत यावी असे कळविलेले आहे.

सदरचे पत्रावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी विश्रामगृहाच्यापहिल्या मजल्याच्या बांधकामाबाबतीत Agreement झालेले आहे काय? यापुर्वी संस्थानने पाणी पुरवठा केलेला आहे काय? यासह सविस्तर टिपणी मा.व्यवस्थापन समितीसमोर चक्रिय पध्दतीने सादर करावी असे निर्देश दिलेले आहेत.

**प्रस्ताव:-** शासकिय विश्रामगृहाच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामाचे Agreement ची माहिती मिळणेसाठी इकडील विभागाकडुन जा.नं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/१८३/२०१६, दि.२१ मे, २०१६ अन्वये पत्र देण्यात आलेले होते. याबाबत बांधकाम विभाग जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/५९/२०१६, दि.३०/०५/२०१६ नुसार पत्र प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रानुसार शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या विश्वस्त निधीतुन अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी विश्रामगृह बांधण्याबाबत वरील संदर्भिय क्रं.०२ महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग– शासन निर्णय क्रमांक सासंवि/२००६/५७९/८७८/का.सोळा, मंत्रालय मुंबई-४०००३२, दि.२२ जानेवारी, २००७ नुसार शिर्डी येथे सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकिय विश्रामगृहाच्या पहिल्या मजल्यावर सर्व सोयींनी युक्त असे अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी अतिरिक्त आठ कक्ष बांधण्याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या विश्वस्त निधीतून रु.२.३५ कोटी (रु.दोन कोटी पस्तीस लाख) इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने अदयाप करारनामा करुन दिलेला नाही. बांधकाम विभागाकडुन करारनामा करणेसाठी तगादा करणेत येत आहे असे कळविलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०-२१/०४/२००२ रोजीचे सभेतील विषय नं.२०, निर्णय क्रं.२२२ अन्वये शिर्डी येथील शासकिय विश्रामगृहास १/२" कनेक्शनव्दारे दररोज तीन तास पाणी पुरवठा करणेत यावा असा निर्णय झालेला आहे. शासकिय विश्रामगृहाकडुन अंतर जास्त असल्याने १" पाईपलाईन टाकण्यात आली. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२००३ रोजीचे सभेतील विषय नं.१८, निर्णय क्रं.६२ अन्वये दररोज दोन तास याप्रमाणे पाणी पुरविण्यात येवून त्यापोटी वार्षिक रु.८,६४०/- पाणीपट्टी रक्कम आकारण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी पिंपळवाडी व कनकुरी संयुक्त पाणी पुरवठा योजनेतून मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयास अनुसरुन, शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांना जानेवारी, २००३ ते मार्च, २००८ या कालावधीत पाणी पुरवठा जोडुन देण्यात आलेला होता. त्यानुसार शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांचेकडे एकुण रु.३४,५५८/- मात्रची पाणीपट्टी रक्कम थकित होती. त्यांपैकी त्यांचेकडुन रु.२२,८८०/- मात्रचे रकमेचा भरणा करण्यात आलेला आहे. उर्वरीत थकित रक्कम रु.११,६७८/- मात्र शासकिय विश्रामगृह शिर्डी यांचेकडुन सन २००८ पासून येणे बाकी आहे शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांना थकित रक्कम भरणेबाबत वेळोवेळी पत्र देण्यात आलेले

होते परंतू त्यांचेकडुन थकित रकमेचा भरणा अदयापपर्यंत करण्यात आलेला नाही. माहे एप्रिल २००८ पासून शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांचा पाणी पुरवठा बंद असलेने त्यांना त्यापुढील कालावधीची पाणीपट्टी रक्कम कळविणेत आलेली नाही.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** सद्यस्थितीत संस्थानकरीता शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्तपाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेत आलेली आहे या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यांची साठवण क्षमता ३३२ एम.एल. इतकी आहे.

सदर साठवण तलावात जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडून गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे

सदरचे योजनतून मौजे कनकुरी, पिंपळवाडी या गावांसह संस्थान परिसर, श्री साईप्रसादालय, विविध भक्तनिवासस्थाने, शैक्षणिक संकुले यासह कर्मचारी वसाहती, नव्याने झालेले साईआश्रम प्रकल्प भाग ०१ व भाग ०२ तसेच ०३ कर्मचारी हौसिंग सोसायटी, शिर्डी पोलीस स्टेशन, या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत संस्थानचा दैनंदिन पाणी वापर हा अंदाजे सरासरी ४५ लाख लिटर्स ते ५० लाख लिटर्स इतका झालेला आहे. गर्दीचे कालावधी सदरचा पाणी वापर हा यापेक्षाही जास्त होत आहे. संस्थानचा वाढता व्याप लक्षात घेता, कनकुरी साठवण तलाव येथुन होणारा पाणी पुरवठा कमी पडत आहे तसेच कनकुरी साठवण तलाव ते ओव्हर हेड टॅ क्५०० रुम, व्दारावती, श्री साईप्रसादालय, श्री साईप्रसाद इमारत व रुग्णालय या ठिकाणी पाणी पुरवठा करणारी मेन पाईपलाईन कालबाहय झालेली आहे. सदर पाईपलाईनव्दारे पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास ती ठिकठिकाणी लिकेज होते. सदर पाईपलाईनव्दारे पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करणे शक्यहोत नसल्याने संस्थान परिसर व इतर ठिकाणी कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. मागील दोन ते तीन वर्षापासून पर्जन्यमान कमी होत असलेने धरणात पुरेसा पाणी साठा उपलब्ध नसल्याने जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडून रोटेशन कालावधीत वाढ करण्यात आलेली आहे. जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडून अडीच ते तीन महिन्यातुन रोटेशन (आवर्तन) देणेत येत असल्याने संस्थान साठवण तलावातील पाणी कमी पडत आहे. याकरीता २५ डिसेंबर २०१५ ते १४ जानेवारी २०१६, २१ मार्च २०१६ ते ०५ एप्रिल, २०१६ या कालावधीत भाडोत्री टॅकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेत आलेला आहे. तसेच दि.०१/०६/२०१६ पासून संस्थान साठवण तलावात मर्यादित पाणीसाठा शिल्लक राहिल्याने टप्प्या-टप्प्याने भाडोत्री टॅकरव्दारे पाणी उपलब्ध करुन घेणेस सुरुवात करणेत आलेली आहे.

पाणी टंचाई कालावधीत साईभक्तांसाठी पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने, भाडोत्री टॅंकर लावणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१ कोटी ९० लाख मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेस सादर करण्यात आलेला होता. मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार सदरचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सादर करणेत आलेला होता. मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे दि ०५/०५/२०१६ रोजीचे आदेशान्वये दैनंदिन रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचे आदेशान्वये या कालावधीत घेण्यात येणारे विकतचे पाणी प्रायव्हेट पार्टीजसाठी (Privates Parties) न वापरणेबाबत, तसेच पाण्याचा उपयोग काटकसरीने करणेबाबत आदेश दिलेले आहेत. मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे दि ०५/०५/२०१६ रोजीचे आदेशाची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे.

उपविभागीय अधिकारी, शिर्डी, भाग शिर्डी यांचेकडील दि.१९/०५/२०१६ रोजीचे पत्रातील मागणीनुसार, शासकिय विश्रामगृह, शिर्डी यांना संस्थानकडुन पाण्याचे नळ कनेक्शन उपलब्ध करुन देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थान समितीचे निर्णयार्थ सादर करणे योग्य राहील, असे पाणीपुरवठा विभागाचे नम्र मत आहे.

तरी शासकिय विश्रामगृह, शिर्डी येथे संस्थानकडुन पाण्याचे नळ कनेक्शन उपलब्ध करुन देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निणयार्थ सादर.

**निर्णय क्र.५२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासकीय व्ही.आय.पी.विश्रामगृह, शिर्डी यांचेकडे पुर्वीची रु.११,६७८/- मात्र पाणीपट्टी बाकी असल्याचे उपरोक्त प्रस्तावावरुन निदर्शनास येत आहे. बाकी असलेल्या पुर्ण रकमेचा भरणा करणेबाबत त्यांना कळविणेत यावे व सदरहू रकमेचा भरणा केल्यानंतर शासकीय व्ही.आय.पी. विश्रामगृह, शिर्डी यांना अर्धा इंच पाण्याचे नळ कनेक्शन उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थान हया नावाचा इतरांकडून गैरवापर होऊ नये याकरीता डोमेन नावांचे रजिस्ट्रेशनबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतुद : कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. : मा. व्यवस्थापन सतिमीचे दि. 14/01/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 116.

प्रास्ताविक: श्री साईबाबांचे जिवनकार्य व संस्थानमार्फत साईभक्तांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधा यांची माहिती जगभरातील साईभक्तांना व्हावी या हेतुने संस्थानची अधिकृत वेबसाईट www.shrisaibabasansthan.org ही सन 1999 मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदरच्या वेबसाईटवर

इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थान प्रकाशीत विविध भाषेतील सर्व साईचरित्र, सन- 1923 पासुनच्या श्रीसाईलीला वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. संस्थनच्या वेबसाईटला दररोज साधारण सुमारे 7 ते 8 हजार श्री साईभक्त भेट देतात. सदर वेबसाईटवर साधारणपणे 11000 पाने व 1000 फोटो अशा रितीने साडेचार जीबी एवढा डाटा अपलोड करण्यात आलेला आहे.

श्री साईबाबांच्या जीवनावरील संस्थानच्या अधिकृत वेबसाईट व्यतिरिक्त खाजगी मंदिरे व खाजगी व्यक्तींकडुन साधारणत: दीड ते दोन हजार वेबसाईट कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. यातील काही वेबसाईटचे संस्थानच्या नावाशी साधर्म्य असल्याने, भक्तांचा गैरसमज होत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आलेले आहे. सबब, संस्थानच्या नावाशी साधार्म्य असलेल्या नावांचा उपयोग करुन इतर कोणी वेबसाईट कार्यान्वीत करु नये याकरीता अशाप्रकारच्या वेगवेगळ्या नावाने वेबसाईट डोमेनचे पाच वर्षासाठीचे रजिस्ट्रेशन इकडील विभागाकडून करण्यात आलेले होते. सदर रजिस्ट्रे रशन केलेल्या नावांची यादी पुढीलप्रमाणे आहे-

| Sr. no. | Service | Domain name | Exp Date | Rate | Tax | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 11900 | shrisai.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 2 | 11901 | shreesai.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 3 | 11904 | shirdiwalesai.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 4 | 11905 | saibabakishirdi.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 5 | 11906 | shirdiwalesaibaba.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 6 | 11907 | jaisaibaba.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 7 | 11908 | shirdisaibabaki.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 8 | 11909 | gurusthan.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 9 | 11910 | sainaam.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 10 | 11911 | saidarbaar.org | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 11 | 13041 | sabkasai.org | 11-Dec-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 12 | 13037 | shirdi.org.in | 11-Dec-16 | 1935.15 | 290.27 | 2225.42 |
| 13 | 13038 | shirdisaibaba.org.in | 11-Dec-16 | 1935.15 | 290.27 | 2225.42 |
| 14 | 13039 | sai.org.in | 11-Dec-16 | 1935.15 | 290.27 | 2225.42 |
| 15 | 13040 | saiparivar.org.in | 11-Dec-16 | 1935.15 | 290.27 | 2225.42 |
| 16 | 13150 | shrisaibaba.org.in | 18-Dec-16 | 1935.15 | 290.27 | 2225.42 |
| 17 | 13174 | shrisaibabasansthan.org.in | 19-Dec-16 | 1935.15 | 290.27 | 2225.42 |
| 18 | 14008 | saidevotee.org.in | 20-Feb-17 | 1935.15 | 290.27 | 2225.42 |
| 19 | 49471 | shirdisai.org.in | 20-Mar-17 | 1935.15 | 290.27 | 2225.42 |
| 20 | 13044 | saiparivar.net | 11-Dec-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 21 | 11902 | shrisaibabasansthan.net | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 22 | 11903 | saibabasansthan.net | 09-Sep-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 23 | 13042 | shrisaibaba.in | 11-Dec-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 24 | 13043 | shreesaibaba.in | 11-Dec-16 | 3875.15 | 581.27 | 4456.42 |
| 25 | 23416 | shrisaibabasansthantrust.org | 09-Jan-19 | | | |
| 26 | 23417 | shrisaibabasansthantrustshirdi .org | 09-Jan-19 | | | |
| | | | | **77483.6** | | **89106.08** |

उपरोक्त नमुद डोमेन नावांचे रजिस्ट्रेशनची मुदत संपुष्टात येत असल्याने रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण करणेबाबत, याकामी संस्थानला विनामुल्य सेवा देत असलेल्या Hostindia.net, Pune यांचेकडे विचारणा करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन त्यांनी दि 16/07/2016 रोजीचे ई-मेलद्वारे प्रत्येक डोमेन नावांचे रजिस्ट्रेशन करणेसाठी वेगवेगळे दर कळविलेले असून त्याची एकत्रित अंदाजे रक्कम रु 89,106/- इतका आहे. डोमेन नावांचे रजिस्ट्रेशनची मुदत संपुष्टात आलेपासून पुढील पुढील 5 वर्ष कालावधीसाठी सदरच्या डोमेन नेमचे रजिस्ट्रेशन Hostindia.net, pune यांचेमार्फत करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. 90,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

मागणी: उपरोक्तप्रमाणे डोमेन नावांचे रजिस्ट्रेशनची मुदत संपुष्टात आलेपासून पुढील पुढील 5 वर्ष कालावधीसाठी सदरच्या डोमेन नेमचे रजिस्ट्रेशन Hostindia.net, pune यांचेमार्फत करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.90,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे समोर सादर करणेस मान्यता असावी हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान : तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: उपरोक्तप्रमाणे डोमेन नावांचे रजिस्ट्रेशनची मुदत संपुष्टात आलेपासून पुढील 5 वर्ष कालावधीसाठी सदरच्या डोमेन नेमचे रजिस्ट्रेशन Hostindia.net, pune यांचेमार्फत करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.90,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे समोर सविनय सादर.

**निर्णय क्र.५२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या डोमेन नावांच्या रजिस्ट्रेशनची मुदत संपुष्टात येत असलेल्या तारखेपासून पुढील ५ वर्ष कालावधीसाठी सदरच्या डोमेन नावांचे रजिस्ट्रेशन Hostindia.net, pune यांचेमार्फत करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.९०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थानच्या नावाशी साधर्म्य असलेल्या नावांचा उपयोग करत असलेल्या इतर वेबसाईटची माहिती संकलीत करुन पुढील कायदेशीर कारवाई करणेसाठी सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **माहिती तंत्रज्ञान विभागातील तांत्रिक प्रकल्पासाठी तांत्रिक सल्ला देणाऱ्या कंपनीचे पुढील दोन वर्षाकरीता तांत्रिक सल्लागार एजन्सीचे पॅनल बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानची www.shrisaibabasansthan.org ही अधिकृत वेबसाईट माहे 1999 पासून कार्यान्वीत करण्यात आली आहे. वेबसाईटमध्ये वेळोवळी बदल करुन ती सध्या इंग्रजी, मराठी व हिंदी अशा मुख्य तीन भाषेमधून प्रसारित करण्यात येत आहे. संस्थान प्रकाशीत सर्व भाषेतील पुस्तकांचे डिजीटलायझेशन करुन ते वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात आले आहेत. संस्थानचे प्रकाशीत होणारे सर्व साईलीला अंक वेबसाईटवर अपलोड केले जातात. त्याचप्रमाणे संस्थानचे माहे-जून, सन 1923 पासूनचे साईलीला अंक वेबसाईटवर अपलोड केली आहे. संस्थानच्या विविध उपक्रमांची अद्यावत माहिती वेबसाईटवर देण्यात येते श्रींचे मुळ छायाचित्रांसहीत विविध प्रासंगीक छायाचित्रे प्रसारित करण्यात येत आहेत. तसेच संस्थानचे विविध विभागांच्या निविदा सांख्याकी माहितीही वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेली आहे. यापुर्वी श्री अमोल कुमार सुपे यांना वेबसाईट अद्यायावत करणेसाठी सल्लागार असे बोधुन त्यांचे मार्फत कार्यवाही चालु करण्यात आलेली होती परंतु त्यांचे कार्यकालात लाईव्ह दर्शनमध्ये थेट जाहिरात दिसत होत्या यामुळे संस्थानला लागणारे सल्लागार व्यक्तीच्या ऐवजी सल्लागार एजन्सी यांचेकडुन करुन घेणे प्रस्तावित आहे.

सद्यस्थितील वेबसाईट कक्षाचे वेबमास्टर पद हे रिक्त आहे. त्यांची शैक्षणीक अहर्ता मंजुर आकृतीबंधानुसार खालीलप्रमाणे.

| **Designation** | **Qualification** |
|---|---|
| Web Administrator Cum Programmer | 1) Age not more than 22 years;<br>2) B.E. Electronics/IT/ Computer/MCM/MCS and Microsoft/ Java/ Oracle international level certification;<br>3) C-DAC website design diploma must;<br>4) Experience minimum 3 years in software development at large scale. |

सदरचे पद तातडीने भरावे लागणार आहे. सध्या कंत्राटी कर्मचारी काम पाहत आहे. त्याऐवजी एक पुर्ण वेळ शासनाचे मंजुर आकृतीबंधानुसार तांत्रिक कर्मचारी घेतल्यासPassword व इतर माहिती संस्थानचे जबाबदार कर्मचारी यांचेवर राहील असे स्पष्ट मत आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागासाठी खालील तज्ञ सल्लागार एजन्सीची आवश्यकता आहे.

| **Sr. No.** | **Consultant Area** | **Skill Set** |
|---|---|---|
| 1 | Server Management | AD Management/Domain Network |
| 2 | Data based management | Oracle &MS SQL/ Backup/Golden Gate |
| 3 | Network Management | Cisco Certification |
| 4 | Programming | Java, Dot Net Technology |
| 5 | Website Management | Java, Dot Net Technology |
| 6 | Security Management | Knowledge of Security Management & network |
| 7 | Live Darshan Management | Tendering Management of live Darshan |
| 8 | Technical Audit | CISM, CISS |
| 9 | Mobile Application & Security | Smart phone Application Technology & Security |

तांत्रिक गोष्टीसाठी सल्लागाराची आवश्यकता असुन माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील होणारे बदल त्यानुसार अद्यायावत संगणक प्रणाली भक्तांसाठी विकसीत करणेकामी यापैकी विविध तांत्रिक क्षेत्रातील विविध प्रकारातील सल्लागारांची आवश्यकता असते. सहाजिकच या सर्व तांत्रिक विषयांची इत्यंभुत सर्वांगीन माहिती एका व्यक्तीस माहिती असणे अवघड आहे. त्यात उणीवा राहणे सहाजिकच आहे. संदर्भ क्रं. 01 चे ई-मेल नुसार नुकत्याच झालेल्या घटनेनुसार यासंदर्भात विषयात एकाच व्यक्तीस माहिती उपलब्ध करुन देणे धोक्याचे आहे यामुळे संस्थानचे नावलौकीकास बाधा पोहचु शकते.

भविष्यात अनुचित प्रकार घडु नये यासाठी तांत्रिक सल्लगारांसाठी एजन्सीचे पॅनल बनविता येईल, तसेच सदरचे पॅनल तांत्रिक सल्लागार एजन्सी नेमणेसाठी (वरील टेबलप्रमाणे) नेमण्यासाठी ई-टेडरींग प्रक्रियेव्दारे विविध सल्लागार सेवा देणाऱ्या कंपनीकडुन प्रस्ताव मागवुन (संस्थानचे अटी-शर्तीनुसार) निविदाधारकांचा पुढील दोन वर्षाकरीता पॅनल बनविता यईल. सदर पॅनल कालावधी दोन वर्षासाठी असेल सदरचे दोन वर्षाच्या कालावधीसाठी विविध कंपन्याचे पॅनल प्रकल्पाचे मागणीनुसार संबधीत पॅनलमध्ये कंपनीकडुन आवश्यकतेनुसार तांत्रि सल्लागारांसाठी कोटेशन मागवुन सदरची कोटेशन मा. कार्यकारी अधिकारी सो., अथवा मा.उप-समितीचे समक्ष उघडुन त्यातील निम्मत्तम निविदाधारकामार्फत सदर प्रकल्पासाठी तांत्रिक सल्लागार नेमता येईल, असे नम्र मत आहे.

तरी, वेळो-वेळी तंत्रज्ञानात होणारे बदल तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाचे दैनंदिन कामांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविणेसाठी उपरोक्त तांत्रिक सल्लागार देण्याऱ्या कंपनीचे पुढील दोन वर्षाकरीता तांत्रिक सल्लागार एजन्सीचे पॅनल तयार करणेच्या मान्यतेस्तव व शासन मान्य आकृतीबंधानुसार Web Master पद तातडीने भरणेसाठी सदरचा, पस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागातील तांत्रिक प्रकल्पासाठी तांत्रिक सल्ला देणाऱ्या कंपन्यांचे पुढील दोन वर्षाकरीता पॅनल बनविणेस व शासन मान्य आकृतीबंधानुसार** Web Master **पद तातडीने भरणेस मान्यता देण्यात आली. परंतु वेब मास्टर पदासाठीची वयोमर्यादा शिथील करणेत यावी.**

**तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाचे कामकाज तत्परतेने होणेकामी मा.डॉ.राजेंद्र सिंग यांचे अध्यक्षतेखाली मा.डॉ.प्रताप भोसले व मा.श्री.सचिन तांबे या सदस्यांची आय.टी.उपसमिती स्थापन करणेत आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२०** **साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेले संगणके व संगणकीय साहित्याचे Functional Support व OEM-AMC नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतुद 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र.799.

प्रास्ताविक: मा. व्यवस्थापन समितीचे दि. 07/11/2009 रोजचे सभेतील निर्णय क्र. 799 अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. प्रकल्प उभारणीसाठी करण्यात आलेल्या करारनाम्यातील मुद्दा क्रं. 3.02-08 नुसार प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व संगणके व संगणकीय साहित्यांची 60 महिने दुरुस्ती व देखभाल हि कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी पाहणे अपेक्षित आहे. त्यानुसार सदरचा कालावधी 31 जुलै 2016 रोजी संपुष्टात येत आहे.

दि. 08/07/2016 रोजीचे पत्रान्वये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहित्यांची दुरुस्ती व देखभालीचा त्यांचा कालावधी 31-जुलै-2016 रोजी संपुष्टात येत असल्याने, संस्थानने याबाबत पर्यायी व्यवस्था करावी असे कळविलेले आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहीत्यांचा आवाका पाहता इतक्या अल्पशा कालावधीमध्ये सदरकामी नविन निविदाधारक नेमणे अशक्य आहे. करारनाम्यानुसार कार्यान्वीत करावयाच्या सर्व कार्यप्रणाली (दर्शन पास-2 व इंटीग्रेशन वुईथ एचएमएस व्यतिरिक्त) कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संबधीत विभागात कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत. सदर कार्यप्रणालींमध्ये देणगी कार्यालय, रुम रिझर्वेशन, पुस्तक विक्री, प्रसादालय कुपन विक्री, ऑनलाईन सर्व्हिसेस सारख्या साईभक्तांना द्यावयाच्या सुविधांशी निगडीत व पगारबील, इनवर्ड-आऊटवर्ड, वैद्यकिय अनुदान सारख्या प्रशासनाशी संबधीत कार्यप्रणालींचा समावेश आहे. भविष्यात संगणके अथवा संगणकीय साहित्यासंदर्भात काही अडचणी निर्माण झाल्यास त्याचा परिणाम प्रशासन तसेच साईभक्तांना देण्यात येणाऱ्या सेवा व सुविधांवर होऊ शकतो.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधी श्री मिलींद अर्जुन व श्री सतिष सतावणे हे दि. 14/07/2016 रोजी शिर्डी येथे आले असता, प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींवर उपरोक्त बाबींचा परिणाम होऊ नये यासाठी पर्यायी व्यवस्था करणेसंदर्भात आयटी विभागामध्ये श्री राहुल गलांडे, प्र. विभागप्रमुख, श्री रमेश पुजारी व श्री साईप्रसाद जोरी, तांत्रिक सहाय्यक, यांनी संयुक्त चर्चा केलेली आहे. सदर बैठकीमध्ये सविस्तर चर्चेअंती श्रीसाईभक्तांची गैरसोय होऊ नये या दृष्टीने कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना, त्यांचे मार्फत पुढील 09 महिन्यांकरिता प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहीत्याची देखभाल करण्यासाठीचा प्रस्ताव देण्यास सुचित केलेले होते.

त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दि 15/07/2016 रोजीच्या ई-मेल/पत्राव्दारे प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहीत्यासाठी Functional Support करिता प्रतिमाह रक्कम रु. 3,62,000/- (अधिक कर) इतका खर्च कळविलेला आहे. तसेच सदरचा Functional Support हा 09 महिन्यासाठीच उपलब्ध असणार आहे असेही त्यांनी पत्राद्वारे कळविलेले आहे. तसेच प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहीत्य यांचे OEM-AMC कार्यकालही संपलेला असल्याने सदरचे OEM-AMC चे नुतनीकरण करणेही अंत्यत्त आवश्यक आहे OEM-AMC चे पुढील एक वर्षासाठी नुतनीकरणासाठी अपेक्षीत खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Particular | Brand Name (OEM) | Cost (INR) |
|---|---|---|---|
| 01. | Desktop, Server & Laptops | Dell | 17,00,000 |
| 02. | Network (Cisco devices) | IBM | 11,00,000 |
| 03. | Network (Other Cisco devices-End of Support) | IBM | 14,00,000 |
| 04. | Network (Juniper devices) | IBM | 5,00,000 |
| 05. | BACKUP License | Symantec | 3,00,000 |
| 06. | Existing Fiber Network Mentainance | S Cube | 5,00,000 |
| 07. | Solar wind | Minitek | 1,00,000 |
| 08. | UPS AMC renewal | Emerson | 6,00,000 |
| 09. | UPS Batteries replacement | Emerson | 4,00,000 |
| 10. | Insurance | ICICI | 30,000 |
| 11. | Antivirus | | 2,00,000 |
| 12. | Total | | **68,30,000** |
| 13. | OEM - Taxes (15%) | | 10,24,500 |
| 14. | Service Charges (10% on Total+OEM Taxes) | | 6,83,000 |
| **Grand Total :** | | | **85,37,500** |

उपरोक्त प्रमाणे OEM-AMC चे बीले थेट उत्पादीत कंपन्यांना अदा करता येतील.

मागणी: प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालू राहाव्यात व साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरिता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे यांचेमार्फत पुढील9 महिन्यांकरीता संगणके व संगणकीय साहीत्य यांचा Functional Support चालु ठेवणेकामी, त्यांनी कळविल्याप्रमाणे प्रतिमाह रक्कम रु. 3,62,000/- (अधिक कर) मात्रचे खर्चास तसेच OEM-AMC चे पुढील 1 वर्षासाठी नुतनीकरण करणेकामी एकत्रित रक्कम रु 85,37,500/- मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ छाननी करुन अनुमान: तांत्रिक.

विभागाचा अभिप्राय: उपरोक्तप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालू राहाव्यात व साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरिता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे यांचेमार्फत पुढील9 महिन्यांकरीता संगणके व संगणकीय साहीत्य यांचा Functional Support चालु ठेवणेकामी, त्यांनी कळविल्याप्रमाणे प्रतिमाह रक्कम रु.3,62,000/- (अधिक कर) मात्रचे खर्चास तसेच OEM-AMC चे पुढील 1 वर्षासाठी नुतनीकरण करणेकामी एकत्रित रक्कम रु 85,37,500/- मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालू राहाव्यात व साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरिता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे यांचेमार्फत संगणके व संगणकीय साहीत्याच्या Functional Support चे पुढील ६ महिन्यांकरीता नुतनीकरण करणेत यावे. त्यासाठी त्यांनी मागणी केलेल्या प्रतिमाह रक्कम रु.3,62,000/- (अधिक कर) मात्र रकमेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहीत्य यांचा OEM-AMC कार्यकालही संपलेला असल्याने त्यांची OEM-AMC करणेसाठी उपरोक्त निर्णय क्र.५२८ अन्वये स्थापन करणेत आलेल्या आय.टी. उपसमितीचे मार्गदर्शन घेण्यात येऊन, ई-निविदा मागविणेबाबत अंतीम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानने श्री साईभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अद्यावत स्वरुपाची सीसीटीव्ही यंत्रणा मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांचेमार्फत विकसीत केली आहे. त्यामध्ये संस्थान परिसरात मंदिराचे आतील व

बाहेरील बाजुस नविन कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे असे एकुण १०१ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तसेच मंदिर परिसर व दर्शन रांगेतील श्री साईभक्तांकडे असलेल्या बॅगा, पर्स चेक करण्यासाठी ०२ बॅगेजेस स्कॅनर मशिन, डिएफएमडी, एचएचएमडी, टर्न स्टाईल, इत्यादी तांत्रिक साहित्य बसविण्यात आलेले आहे.

उपरोक्त साहित्याची CAMC सन २०१४-२०१५ करीता मे. व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०६, निर्णय क्र.१७६ अन्वये "सुरक्षा साहित्यांचे Comphrehensive AMC कॉन्ट्रॅक्ट एकुण प्रोजेक्ट किंमतीच्या ५% + Tax तसेच दोन इंजिनीअरसाठी वार्षिक रु. ७,००,००० + Tax" यादराने यापुर्वी देण्यात आलेली होती. परंतु त्यांचा CAMC चा कालावधी माहे एप्रिल-२०१५ मध्ये संपुष्टात आल्याने, पुढील एक वर्षाचे कालावधीकरीता सदर साहित्याची CAMC देणे आवश्यक असल्याने, सदर CAMC चा प्रस्ताव उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये दि. ०८/१०/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवुन, "मंदिर व परिसरातील सुरक्षा साहित्यांचे CAMC कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना देणेऐवजी याकामी नवीन ई-निवीदांची मागणी करणेत यावी. त्यासाठी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढीलकार्यवाही करणेत यावी" असे ठरले. त्यास अनुसरुन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत येवुन त्यास उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये सिव्हील ॲप्लीकेशन नं.१६०८८/२०१५ दि.१८/१२/२०१५ रोजीचे आदेशान्वये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील कालावधीकरीता सदर साहित्याची CAMC देणेकरीता ई-निवीदा मागविणेकामी जाहिरात प्रसिद्ध करणेकरीता प्रस्ताव मान्यतेकरीता सादर करणेत आलेला होता. परंतु सदर जाहिरात प्रसिद्ध होवुन निवीदा अंतिम होण्यास किमान दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे. परंतु सद्यस्थितीत मंदिर परिसरातील ५०% सुरक्षा यंत्रणा देखभाली अभावी बंद पडली आहे तसेच दि.०८/१०/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.३३२ अन्वये नविन ई-निवीदा प्रसिद्ध करणेचा निर्णय झाल्याने Nov-२०१५ पासुन मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांनी सदर साहित्याचे दुरुस्ती व देखभालीची कामे बंद केल्याने मंदिर सुरक्षा व्यवस्थेला धोका निर्माण झालेला आहे. सदर सुरक्षा साहित्याची दुरुस्ती व देखभालीबाबत मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना विचारणा करण्यात आली होती, परंतु मे. व्हेन्टेज यांना April-२०१५ ते October-२०१५ पर्यंतचे दुरुस्ती व देखभालीचा आदेश व पेमेंट न दिल्याने त्यांनी दुरुस्ती व देखभालीस नकार दिला आहे तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लिकेशन नं.९२१९/२०१४, दि.२६/०९/२०१४ नुसार मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने "d" मध्ये " In case the matter is with regard to renewal of Agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant/ sansthan shall seek renewal of the agreement on the same terms and conditions " असे आदेश दिलेले आहेत. त्यास अनसरुन मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना सदर साहित्याची CAMC देणेकामी व April-२०१५ ते October-२०१५ अखेरचे बीलाची रक्कम अदा करणेच्या निर्णयार्थ दि. १४/०६/२०१६ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवुन दि. ०८/१०/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन कार्यवाही करणेत यावी असे ठरले. परंतु सदर जाहिरात प्रसिद्ध होवुन निवीदा अंतिम होण्यास किमान दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे सुरक्षितेतच्या दृष्टीने सदर यंत्रणा तातडीने दुरुस्त करणेबाबत दि. १७/०६/२०१६ रोजीचे पत्रान्वये मा. पोलिस निरीक्षक, मंदिर सुरक्षा पोलिस विभाग, शिर्डी यांनी कळविलेले असुन सदर पत्रावर मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी "श्री.कोते बंद सीसीटीव्ही कॅमेरे चालु करणेबाबत तात्काळ कार्यवाही करावी" असे निर्देशित केलेले आहेत. त्यास अनुसरुन सद्यस्थितीत मंदिर सुरक्षा यंत्रणेतील खालीलप्रमाणे साहित्य तातडीने दुरुस्त, खरेदी करणे आवश्यक आहे.

1. POE Switch (मॉडेल नं. DGS-3100-24P) – ०२ नग.
2. Antivirus – १० नग.
3. RSM Software - ०२ नग.
4. LED TV 42 इंच – नादुरुस्तआहे.
5. License Microsoft Windows -7 Software - ०७ नग.
6. License Microsoft Windows -XP Software - ०४ नग.
7. Monitor – नादुरुस्तआहे.
8. Baggage's Scanner (Software व अनुषंगीक साहित्य)
9. Adaptor 12v - 4Amp - ०६ नग.
10. Server – ०२ नग.
11. Other consumable material, etc.

उपरोक्त प्रमाणे साहित्य/ Software तातडीने आजचे बाजारभावाने दुरुस्ती, खरेदी करावे लागणार आहे. सदरचे साहित्य/ Software दुरुस्ती, खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,८०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच

सदर खर्च हा रक्कम रु.१० लाखापेक्षा कमी असल्याने सदर खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

तरी, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंदिर परिसरातील सुरक्षा यंत्रणा तातडीने दुरुस्तीकामी येणारे अंदाजे रक्कम रु.२,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने दुरुस्ती करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास तत्कालीन त्रिसदस्य समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही चालू करणेत आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाचे आदेशास अनुसरुन सीसीटीव्ही संदर्भातील कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीत होणा-या साईभक्तांच्या गर्दीस अनुसरुन सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन सद्यस्थितीत मंदिर परिसरात कार्यान्वित असलेली सीसीटीव्ही यंत्रणा अपग्रेड करणेकरीता तसेच द्वारावती भक्तनिवास, साईप्रसादालय, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम-१, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ हॉस्पिटल इ. विभागांकरीता सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेकामी दि२०/११/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.१०१९ अन्वये सुचना करण्यात आलेल्या आहेत व दि ३०/०१/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१५,१६ अन्वये सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु १४.५० कोटी मात्रचे खर्चास व सदरचे खर्चास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी संस्थानमार्फत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस मान्यता घेण्यात आली आहे. त्यास अनुसरुन उपरोक्त ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु १४.५० कोटी मात्रचे खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३५०३/२०१५ दाखल करण्यात येवुन, त्यावर दि.१०/०४/२०१५ रोजीचे आदेशान्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन संस्थानचे विविध विभागांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणेकामी ई-निवीदा प्रक्रीया करण्यात आली होती. परंतु दि२२/०६/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील चर्चेअंती व दि.२४/०६/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१६० अन्वये "सदर निवीदा प्रक्रीया रद्द करणेत यावी" असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर निवीदा प्रक्रीया रद्द करण्यात आलेली आहे.

सदरचे दि.२२/०६/२०१५ रोजीचे व दि.२४/०६/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निवीदा प्रक्रीया रद्द करणेच्या निर्णयाबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मेव्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स प्रा.लि., नॉईडा यांनी रिट पिटीशन नं.७९३८/२०१५ व श्री संभाजी चौगुले यांनी पीआय.एल.नं. ११३/२०१५ दाखल करण्यात आलेले होते. सदरचे प्रस्तुत रिट पिटीशन व पी.आय.एल. मध्ये दि. २०/०६/२०१६ रोजीचे आदेशान्वये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठानेनिकाली काढले आहे. प्रस्तुत रिट पिटीशन व पी.आय.एल. मधील आदेश मा. उच्च न्यायालयाने संस्थानचे वतीने दि. १९/१०/२०१५ व दि.१६/०६/२०१६ रोजी दाखल केलेल्या शपथपत्राच्या आधारे दिलेले आहेत. सदर आदेशामध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे-

1. Shirdi sansthan states, on instructions, that the sansthan will appoint a consultant for studying, surveying and preparing tender document and finalization of the bidding process by inviting applications on publication of an advertisement in the newspapers having wide circulation and after observing transparent procedure in respect of appointment of the consultant, the further tender process for upgradation of existing integrated security system and new installation of HD IP CCTV surveillance system would be undertaken.

2. According to us, the petitioner has no legal entitlement to pray and demand finalization of the earlier tender process. It is always open for the employer / the respondent to take a call as to whether to pursue the tender process or not.

3. In the instant matter, for the reasons recorded on the reply, the earlier tender process has been abandoned and as such the challenge raised in that regard does not sustain. Apart from this, a statement is made in respect of observance of transparent procedure for appointment of consultant for pursuing the tender process and in view of the statement made, we do not deem it necessary to interfere in the writ petition.

4. The writ petition stands disposed of accordingly.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे दि२०/०६/२०१६ रोजीचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशास अनुसरुन,

**अ)** सध्याची मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणेचे up-gradation व श्री साईबाबा संस्थानचे द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम-१, साईधर्मशाळा, साईप्रसादालय, श्री साईबाबा रुग्णालय, श्री साईनाथ रुग्णालय व संस्थानचे सर्व शैक्षणिक संकुल परिसरात सीसीटीव्ही व security surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकामी अनुभवी consultant नेमणुक करणेस मान्यता असावी.

**ब)** सदर consultant यांचेकडुन "अ" मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी सीसीटीव्ही व security surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकामी प्रकल्प/ प्रस्तावाकामी ई-निवीदा तयार करुन अंतिम करणे, टेंडर डॉक्युमेंन्ट तयार करणे, वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाचा निवीदा मसुदा तयार करणे, ई-निवीदेमधील टेक्नीकल बीड तपासणे, गरजेनुसार शुद्धीपत्रक काढणे, विविध पुरवठा धारकांच्या प्री-बीड मिटींगमधील तक्रारीचे निरसन करणे, प्राप्त निवीदेचे टेक्नीकल इव्हयुलेशन करणे, कर्मशिअल बीड तपासणी करणे तसेच अंतिम पुरवठाधारकास देण्यात येणाऱ्या कार्यादेशातील अटी/ शर्ती तपासुन संबंधीत पुरवठाधारकाशी करावयाचा करारनामा तयार करणे, सीसीटीव्ही व security surveillance यंत्रणेतील साहित्याची तपासणी करणे तसेच सर्व ठिकाणी सीसीटीव्ही व security surveillance यंत्रणा कार्यान्वित करुन घेणे इ. प्रकारची कामे करुन घेणेस मान्यता असावी.

तरी, उपरोक्त प्रस्तावातील **"अ"** व **"ब"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील अ मध्ये नमुद केलेप्रमाणे सध्याची मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणेचे up-gradation व श्री साईबाबा संस्थानचे द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम-१, साईधर्मशाळा, साईप्रसादालय, श्री साईबाबा रुग्णालय, श्री साईनाथ रुग्णालय व संस्थानचे सर्व शैक्षणिक संकुल परिसरात सीसीटीव्ही व security surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकामी अनुभवी consultant ची विहीत पध्दतीने नेमणुक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू कन्सल्टंटची नेमणूक झाल्यानंतर त्यांचेकडून प्रस्तावातील ब मध्ये नमुद केलेली कामे करुन घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **श्री सदगुरु नारायणगीरीजी गुरुकुल, बाभळेश्वर ता.राहाता, जि.अहमदनगर येथील विद्यार्थ्यास मोफत भोजन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुल, बाभळेश्वर यांनी त्याचे दिनांक नसलेले पत्र सादर करुन विघार्थ्याना मोफत भोजन देणेबाबत विनंती केलेली आहे. सदर पत्र दिनांक ०६.०१.२०१६ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्यावर मा.ना.राधाकृष्ण विखे साहेब यांनी सुध्दात्याबाबत शिफारस केलेली आहे.

अधिनियम २००४ मधी तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधीनीयम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भकतांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

प्रस्ताविक:- व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार शिर्डी परिसरातील अंध, अंपग, मुकबधीर, अनाथ व धार्मिक (वारकरी) शिक्षण संस्था, शाळा व वृध्दाश्रमातील वृध्द व्यक्तीना मोफत व सवलतीचे दरात प्रसादभोजन खालीलप्रमाणे पुरविणेत येत आहेत.

| अ.नं. | संस्थेचे /शाळेचे नाव | मंजुर संख्य | भोजन सुविधेचा प्रकार |
|---|---|---|---|
| ०१ | ह.भ.प.काशिनाथ महाराज सेवाभावी टस्ट्र निमगांव संचलित श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, नीमगाव-शिर्डी, नगर मनमाड रोड | ४२ | मोफत |
| ०२ | आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ नांदूर दुमाल ता.संगमनेर संचलित श्री साई सेवा मतीमंद मुला-मुलीची शाळा, शिर्डी साकुरी शिव ,शिरडी. | ६० | मोफत |
| ०३ | द्वारकामाई सेवा ट्रस्ट, वृध्दाश्रम, कनकुरी रोड,शिरडी. | ७० | मोफत |
| ०४ | पद्मश्री डॉ.वि.ए.विखे पाटील विद्यालय, बाभळेश्वर (अंध व कर्णबधीर विद्यालय) | १०० सकाळी<br>५० सायंकाळ | मोफत |
| ०५ | संत विचारधार वारकरी शिक्षण संस्था,भोजडे,ता.कोपरगाव | ५० | मोफत |
| ०६ | माऊली मेडीकल रिसर्च फाउडेशन, गणेशनगर वाकडी माऊली मतिमंद मुलांची निवासी कार्यशाळा वाकर्ड. | २० | मोफत |
| ०७ | सबका मालिक एक प्रतिष्ठाण संचलित अनाथालय, शिरडी. | ३२ | मोफत |
| ०८ | श्री साईश्रध्दा ग्रामीण मुक बधीर विद्यालय, पिपळवाडी रोड, शिरडी. | १०७ | रु.२२५/- या सवलतीचे दरात |

उपरोक्तप्रमाणे अं.नं. १ ते ७ यांना संदर्भिय अनं.१ व ३चे मा.व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार मोफत भोजन देण्यात येत आहेत व अ.नं.८ श्री साईश्रध्दा ग्रामीण मुक बधीर विद्यालय ,पिपळवाडी रोड,शिरडी.यांना संदर्भिय अं.नं.२चे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सवलतीचे दरात भोजन देण्यात येत आहेत

उपरोक्तप्रमाणे अ.नं. १ ते ८ यांना भोजन श्री साई प्रसादालयातुन स्वखर्चाने घेऊन जाणेस व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कळविणेत आलेले असून त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे.

श्री सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुलबाभळेश्वर यांनी "परिसरातील विद्यार्थ्यांना अध्यात्मीक शिक्षण मिळावे या उद्देशाने निवासी सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुल स्थापन केले आहे. ज्या मध्ये विद्यार्थ्यांना मृदंग, भजन, गायन, किर्तन, योगासणे यांचे प्रशिक्षण दिले जात असून त्यामध्ये परिसरातील सर्वसामान्य कुटूंबातील १५० विद्यार्थी शिक्षण घेतात, ते शालेय शिक्षण घेण्यासाठी परीसरातील शाळेत जातात. शिर्डी संस्थान द्वारे परिसरातील अपंग, मुकबधीर, वारकरी शिक्षण संस्था यांना मोफत भोजन दिले जाते त्या प्रमाणे आपले सहकार्याने शिर्डी संस्थान भोजनालयातुन दोन वेळचे भोजन सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुलास प्राप्तव्हावे" विनंती केलेली आहे.

मागणी:- सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुलबाभळेश्वर येथे परिसरातील सर्वसामान्य कुटूंबातील १५० विद्यार्थ्यांना अध्यात्मीक शिक्षण घेणा-या निवासी विद्यार्थी शालेय शिक्षण घेणेसाठी परिसरातील इतर शाळेत जातात. त्याचेसाठी दोन वेळचे मोफत भोजन मिळावे अशी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :- दिनांक ०८.१०.२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८५७ नुसार अहमदनगर, नाशिक जिल्हयातील अंध, अंपग, मतिमंद, मुकबधिर, तसेच धार्मिक शिक्षण संस्था/ शाळा वृध्दाश्रम, अनाथाश्रम अशा नोंदणीकृत असलेल्या संस्थानी संस्थानकडे भोजन प्रसाद मागणी केल्यास व संस्थानचे श्री साई प्रसादालयातून स्वत भोजन प्रसाद घेऊन जाणेचे योजल्यास त्यांना प्रसादालय विभागाचे अन्नदान कक्षामार्फत मोफत भोजन देण्यात यावे असा झालेला आहे.

तसेच शिर्डी परिसरातील अंध, अपंग, मुकबधीर, अनाथ बालके, कर्णबधिर, धार्मिक वारकरी शिक्षण संस्थेतील मुला, मुलीना, व वृध्दश्रमातील वृध्द व्यक्तीना तसेच वारकरी शिक्षण संस्था यांना मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मोफत व अनुदानित शाळांना सवलतीचे दरात भोजन पुरविणेत येत आहे.

सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुल बाभळेश्वर यांचेकडून इकडील जा.न.एसएसएस/ वशी/ प्रसादा/ ५९५४/ २०१६ चे पत्रानुसार तपशिलवार माहिती मागविणेत आलेली होती त्यानुसार त्यांचेकडून दि.०१/०१/२०१६ अन्वये प्राप्त झालेल्या माहितिनुसार सदर शाळेची प्रत्यक्ष पहाणी करणेची आवशकता वाटत नाही असे वाटते.

सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुल बाभळेश्वर यांचेकडून लेखीत स्वरुपात प्राप्त झालेल्या माहितीपत्रकातील माहितीचे अवलोकन करता संस्थेच्या मालकी हक्काची इमारत असून अध्यात्मीक शिक्षण घेणा-या विद्यार्थीचे पालक वर्गाकडून रु.२५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार मात्र) देणगी स्वरुपात घेत असल्याचे नमुद केलेले आहे. त्याव्यितिरीक्त देणगीदाराकडून देणगी, सभासद फी,वर्गणी,स्विकारणेत येत असल्यामुळे एकंदरीत संस्थेची आर्थिक स्थीती अतिशय उत्तम आहे असे वाटते. तसेच सदरहू विद्यार्थी हे शिक्षणासाठी आवश्यक साहित्य विद्यार्थीच खरेदी करतात (उदा.हार्मोनियम, मृदंग, तबला, ताल इ.)

तसेच माहितीपुस्तकामध्ये संस्थेतील निवासी विद्यार्थ्यांना भोजन पुरविणेकामी संस्थेचे मालकीची पाकशाळा असून त्याकामी आवश्यक त्या कर्मचारी वर्गाची नेमणूक असल्याचे दिसून येते. त्याशिवाय त्यांचा दैनंदिन आहार नाष्टा, जेवण, रात्रीचे जेवण याबाबता निश्चितीचे खालील वेळाप्रत्रकानुसार विद्यार्थ्यांना जेवण दिले जाते.

| अ.नं. | वार | नाष्टा | शाळेचा डबा | संध्याकाळ जेवण |
|---|---|---|---|---|
| ०१ | सोमवार | पोहे | बटाटा चटणी, चपाती | मसाला भात, चपाती |
| ०२ | मंगळवार | उपमा | भेडी,कोबी, चपाती | चपाती (मोसमी फळे) |
| ०३ | बुधवार | लाप्सी | टॉमेटो चटनी, फलॉवर, चपाती | आमटी भाकरी |
| ०४ | गुरुवार | पुलाव | सिमला मिरची, वांगे चपाती | दाळभात, पुरी भाजी, स्वीट |
| ०५ | शुक्रवार | उपमा | हरबरा घुगरी, वटाणा, चपाती | चपाती |
| ०६ | शनिवार | पोहे (पापड ) | आमटी, बाजरी भाकरी | खिचडी भात, चपाती |
| ०७ | रविवार | पुलाव | दाळ बटटी, साधा भात | भेळ, चपाती |

टिप:- प्रत्येक रविवारी भेळ, व गुरुवारी गोड पदार्थ दिला जाईल यांचबरोबर मंगळवारी मोसमी फळे दिले जाईल.

गोड पदार्थ:- खिर, श्रीखंड, गुलाबजामुन, सोनपापडी, म्हैसूर, जिलेबी, मालची, शिरा, बांसुदी, लाडू, गुडीशेव, खुर्मा, गाजर हलवा.

संध्याकाळच्या भाज्या:- काळी मटकी, दुधी भोपळा, काळी आमटी, काळा शेवगा, वांगे बटाटे भाजी, राजमा, सोयाबीन, सिमला मिर्ची, कढी, वटाणा, बेसन, पालख, मेथी, मिक्स भाजी, शेव भाजी, भजे आमटी.

शिर्डी व परिसरातील अंध, अंपग, मतिमंद, मुकबधीर, तसेच धार्मिक शिक्षण संस्था/ शाळा, वृध्दाश्रम, अनाथश्रम, अशा नोंदनीकृत असलेल्या गरजू सेवाभावी संस्थेला भोजन पुरविणेत येत असल्यामुळे सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुल, बाभळेश्वर यांची एकंदरीत संस्थेची आर्थिक स्थीती चांगली असल्यामुळे येथे अध्यात्मीक शिक्षण घेणा-या १५० निवासी विद्यार्थीना दोन वेळचे मोफत भोजन दिल्यास परिसरातील इतर शैक्षणिक संस्था मोफत प्रसादभोजनाची मागणी करतील असे वाटते

सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुल बाभळेश्वर येथे शिक्षण घेणा-या १५० निवासी विद्यार्थीना दोन वेळचे भोजन प्रचलित दराप्रमाणे प्रतीदिन एक वेळ जेवणासाठी प्रती व्यक्तीस रु.१०/- प्रमाणे तीन महिन्याची आगाऊ रक्कम

भरुन भोजन घेऊन जाणेची तयारी दर्शिविलेस त्यांना प्रचलित दराप्रमाणे सशुल्क प्रसादभोजन घेऊन जाणेची परवानगी देता येईल असे वाटते

तरी सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुल बाभळेश्वर ही संस्था विद्यार्थ्याकडून रु.२५०००/- (अक्षरी रु पंचवीस हजार मात्र) देणगी घेत असल्यामुळे त्यांचे मागणीनुसार त्यांना मोफत भोजन सुविधा पुरविणे अथवा प्रचलित दराप्रमाणे सशुल्क भोजन पुरविणेत यावे. याबाबतचा धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदगुरु नारायणगिरीजी गुरुकुल, बाभळेश्वर ही संस्था विद्यार्थ्याकडून प्रत्येकी रु.२५०००/- मात्र देणगी घेत असल्यामुळे त्यांना प्रचलित दराने श्री साईप्रसादालयामार्फत सशुल्क भोजन पुरविणेत यावे. तसेच सदरहू भोजन घेऊन जाणेची जबाबदारी त्यांचेवर राहील, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **साईधर्मशाळा विभागातील खोल्यांसाठी ऑनलाईन बुकींग सुविधा सुरु करणे व सेवा आकार बाबत**

**प्रस्ताव-** अधिनियमातील विनियम १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, अशी तरतुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव :-

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०८/२०१२ रोजीचे सभेतील विषय नं ४७ व निर्णय क्र ७०२ नुसार

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६४ नुसार

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र १४२ नुसार.

प्रस्ताविक:- साई धर्मशाळा हा विभाग दिनांक १८/०७/२०१३ पासुन सुरु करण्यात आलेला आहे साई धर्मशाळेमध्ये पालखी, पदयात्री यातील सहभागी साईभक्तांची तसेच सहली, ग्रुपने येणारे साईभक्तांची, अंध/अपंग तसेच हॉस्पीटलमधील रुग्णांचे नातेवाईक, साईप्रसादालय परिसरातील साईभक्त इत्यादींची निवासव्यवस्था करण्यात येत आहे. येथे एकुण ६ इमारती असुन १ इमारत साईबाबा संचलित कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आली आहे. प्रत्येक इमारतीमध्ये एका मजल्यावर ८ हॉल असे तळमजला व ३ मजले मिळुन एकुण ३२ हॉल आहेत. असे ५ इमारतीमध्ये एकुण १६० हॉल आहेत.

साई धर्मशाळा हा विभाग सुरु करण्याचा उद्देश हा जास्तीत जास्त पालखी पदयात्री, सहल, ग्रुपने (समुहाने) येणारे साईभक्तांची तसेच अंध/ अंपग साई भक्तांची जास्तीत जास्त संख्येने निवासव्यवस्था करणे हा आहे.

दि.२५/०३/२०१६ रोजीचे पत्रात श्री के.व्ही.रमणी सो. यांनी साई आश्रम धर्मशाळा बांधण्यासाठी साधारणपणे ४० ते ५० कोटी खर्च झालेला आहे. परंतु गेल्या ३ वर्षापासुन सदर इमारतीचा पुर्णपणे वापर झालेला दिसत नाही. पुर्णपणे वापर होत नसल्याने संस्थानचे या निवासव्यवस्थेपोटी दर वर्षी जवळ जवळ रु. ६५ लाख ते १ कोटी रुपये नुकसान होत आहे. साई भक्तांना कमीत कमी सेवाआकारमध्ये चांगली निवासव्यवस्था मिळण्याची आशा असते परंतु ती उपलब्ध होत नाही. पाणी टंचाई मुळे संस्थान इमारतीचा वापर करत नाही हे मी जाणतो. सोबत दिलेल्या पत्रात काही सुचना केल्या आहेत त्याचा विचार व्हावा.

कॉट बेसीसवर ऑन लाईन बुंकीग करीता साईटेक मार्फत स्वाफ्टवेअर तयार केलेले असुन ती प्रायोगीक तत्वावर सुरु करण्यास तयार आहे. तसेच कृपया प्रति बेड व प्रति माणसी व प्रति दिनी (२४ तासासाठी) रु.१०/- ऐवजी रु.२०/- प्रमाणे वाढ करुन कमीत कमी ३ दिवस निवासव्यवस्था करता येईल याची मंजुरी घ्यावी व इकडेस कळवावे, असे कळविले आहे. तरी उपरोक्त प्रस्तावाचा विचार केल्यास साई धर्मशाळेतील कमी दराच्या निवासव्यवस्थेचा फायदा साईभक्तांना होईल, असे श्री के.व्ही. रमनी यांनी सुचविले आहे

साई धर्मशाळा या विभागामध्ये एकुण पाच इमारतीमध्ये SD-HALL प्रमाणे हॉलची बुकिंग करण्यात येते. वर्षभरातील उत्सव काळात पालखी पदयात्रींची संख्या जास्त असते. प्रत्येक पालखीमध्ये साधारणपणे ५०० ते १००० साईभक्त येत असतात.

उत्सव काळामध्ये प्रत्येक हॉलमध्ये कमीत कमी ४० ते ५० भक्तांची निवासाची सोय करावी लागते. उत्सव काळामध्ये तसेच गर्दीचे कालावधीत (उन्हाळा सुट्टी, नाताळ, सलग सुट्या) सर्व हॉल पुर्णपणे नेहमी निवासाकरता वापरात असतात. उर्वरीत साईभक्तांची मंडपामध्ये तसेच प्रशासकीय इमारतीचे वरील बाजुस असलेल्या प्रसादालय हॉलमध्ये निवासव्यवस्था करण्यात येते.

साई धर्मशाळा या विभागामध्ये साईटेक प्रकल्पांतर्गत संगणक प्रणालीमध्ये कॉट बेसीसवर ऑनलाईन बुकींग सुरु केल्यास खालील प्रमाणे अडचणी येण्याची शक्यता आहे.

साई धर्मशाळा येथे प्रत्येक हॉलमध्ये एकुण १८ कॉट टाकलेले असुन प्रत्येक कॉटवर बेडशिट, उशि-कव्हर, चादर इ. संस्थान मार्फत पुरविण्यात येत आहेत. साईभक्तांचे सामान ठेवणेसाठी स्वंतत्र लॉकरची सुविधा उपलब्ध नाही. साई धर्मशाळा येथील प्रत्येक हॉलमध्ये लॉकर सुविधा खरेदी बाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फतचालु आहे.

साईधर्मशाळा येथे ऑनलाईन कॉटबेसीसवर एक इमारत सुरु केलेस लागणाऱ्या जादा मदतनिस व स्वच्छता कर्मचारी व वेतन खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ.न. | पद | कामाचे स्वरुप | मजला | शिफ्ट | वाढीव कर्मचारी संख्या | वेतन | एका दिवसाचे वेतन | एका वर्षाचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मदतनिस | प्रत्येक हॉलमधील कॉटवर बेडशिट, उशी, उशीकव्हर, चादर इ.टाकणे, हॉलमधील साफसफाई करुन घेणे, आलेल्या भक्तांची रजिस्टरला नोद घेणे. हॉल खाली झाल्यावर हॉल चेक करणे. हॉल खाली झाल्यावर हॉलची पावती कांऊटरवर जमा करणे. इ. कामे. तसेच हॉल सोडल्यावर हॉल तपासुन त्यात असलेल्या कमी जास्त वस्तुची नोंद करुन वस्तु कमी असल्यास त्याची नुकसान भरपाई घेण्यासाठी कांऊटरवर पाठवुन त्याची रितसर पावती करावी लागते. | ४ | ३ | ९+२ आठवडा सुट्टी सोडविणे ११ कर्मचारी | रु.२८२.८४ | रु. ३,१११.२५ | रु. ११,३५,६०२.६० |
| २ | स्वच्छता कर्मचारी | प्रत्येक हॉल मधील साफसफाई करुन फिनेल मारुन पोचा मारणे, तसेच जिना, ग्रील, पॅसेज इ. साफ करणे, प्रत्येक मजल्यावरील संडास, बाथरुम, इ. साफसफाई करणे. हॉल, पॅसेज व इतर ठिकाणचे जाळे जळमटे काढणे. | ४ | ३ | ३ (सध्या ३ कर्मचारी कार्यरत आहे फक्त १ कर्मचारी वाढेल) | रु.२८२.८४ | रु. ८४८.५२ | रु. ३,०९,७०९.८० |
| ३ | सुरक्षा कर्मचारी | सामान चोरीस जावु नये यासाठी व इतर ठिकाणी लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक | ४ | ३ | ३ (सध्या १ कर्मचारी कार्यरत आहे फक्त ३ कर्मचारी वाढेल | रु.२८२.८४ | रु. २,५४५.५६ | रु.९,२९,१२९.४० |

सध्या लॉकर सुविधा नसल्याने हॉल मधील १८ कॉटसाठी विविध भागातुन एका कॉटसाठी एक साईभक्त ऑनलाईन बुकींग करतील. त्यामुळे त्याच हॉलमधील १८ साईभक्त हे एकमेकास अनोळखी असतील. हॉलमध्ये लॉकर नसलेने त्यांचे सामानाची व्यवस्था त्यांनाच त्यांच्या जबाबदारीवर करावी लागणार आहे. कॉट नुसार हॉल दिल्यास त्या हॉलमधील सर्व साईभक्त जाईपर्यंत हॉल उघडा ठेवावा लागेल. त्यामुळे हॉल मधील बेडशिट, उशी, उशीकव्हर, चादर इ. वस्तुंची चोरी होण्याची शक्यता आहे, तसेच तक्रारी ही होतील त्यामुळे संस्थानची बदनामी होईल असे नम्र मत आहे.

उत्सव, नाताळ सुट्टी व गर्दीचे कालावधीमध्ये ऑन लाईन बुकींग सेवा तात्पुरती किंवा त्या कालावधीसाठी बंद करावी लागेल तसेच तत्पुर्वी माहिती व तंत्रज्ञान विभागास SD-HALL प्रमाणे हॉलची बुकिंग सेवा परत सुरु करणेबाबत पत्राव्दारे कळवावे लागेल म्हणजे हॉल बुकींग सुविधा नेहमीप्रमाणे सुरु होईल, असे नम्र मत आहे.

साईधर्मशाळा विभागासाठी सन २०१४ ते २०१५ या सालासाठी खालील प्रमाणे जमा रक्कम व खर्च रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.नं | साल | भक्त संख्या | जमा रक्कम | खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१४ | ४९३५८८ | ३२,९३,९५३.०० | ३,१४,८१,०६५.८८ |
| २ | सन २०१५ | ५६१०१५ | ५५,७५,६३२.०० | ४,०५,९५,७३८.४० |
|  | एकुण- | १०५४६०३ | ८८,६९,५८५.०० | ७,२०,७६,८०४.२८ |

मागणी- १) ऑनलाईन कॉट बेसीसवर एका इमारतीसाठी बुकींग सुरु करण्यात आली तर एका इमारतीसाठी प्रत्येक शिफ्ट साठी ४ मदतनिस असे ३ शिफ्टसाठी १२ मदतनिस तसेच ४ स्वच्छता कर्मचारी रोज लागतील. (सध्या एका इमारतीस १ मदतनिस व ३ स्वच्छता कामगारांची मंजुरी आहे)

२) प्रत्येक हॉल मध्ये ३२ लॉकर्स याप्रमाणे एका इमारतीसाठी ५७६ लॉकर्स बांधकाम विभागामार्फत तातडीने खरेदीची कार्यवाही करावी लागेल.

३) प्रत्येक मजल्यावर ८ हॉलमध्ये १८ कॉट असे एकुण १४४ कॉटसाठी १४४ लॉकर्स् ठेवलेस लॉकर्सच्या चाव्यांसाठी हॉलनुसार प्रत्येक मजल्यावर चाव्या ठेवण्यासाठी ८ कप्याचे ४ लोखंडी टेबल लॉकर्स खरेदी करावे लागणार आहे. साधारणपणे ८ कप्याचे एका लोखंडी टेबलास रु. ८,०००/- प्रमाणे एकुण ४ लोखंडी टेबलास अंदाजे रु. ३२,०००/- मात्र खर्च येण्याची शक्यता आहे.

४) हॉलमध्ये प्रत्येक कॉट जवळ कॉट नंबर टाकावा लागेल त्यामुळे साईभक्तांस कॉट सापडणे सोपे जाईल.

५) भक्तांचे सामान सांभाळणेबाबत व चोरापासुन सावध रहाणे बाबत सुचना फलक तयार करणे

६) इमारतीमध्ये जादा सुरक्षा रक्षक लावावे लागतील जेणेकरुन चोरीस आळा बसेल सदरची कार्यवाही संरक्षण विभागामार्फत करता येईल.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रीक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय छाननी करुन अनुमान:- मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः- मा.के.व्ही.रमणी यांनी पत्रात सुचविल्याप्रमाणे कार्यवाही होणेसाठी खालील प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

१) सध्या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार पालखी पदयात्री यांची निवासव्यवस्था मोफत करण्यात येत आहे. त्याऐवजी त्यांचेकडुन सेवाआकार घेतलेस उत्पन्नात वाढ होवून आर्थिक नुकसान कमी होईल

२) संस्थान वेब साईटवर आयटी विभागा मार्फत प्रायोगीक तत्वावर एक इमारत ऑनलाईन कॉट बेसीसची बुकींग सुरु करणे

३) मा.के.व्ही.रमणी सो. यांचे सुचने नुसार सेवा आकार रु.१०/- ऐवजी रु.२०/- (२४ तासासाठी) आकारणे बाबत तसेच कमीत कमी ३ दिवस निवासव्यवस्था करणे बाबत.

४) सदर कामी जादा आऊटसोर्सिंग कर्मचारी (११ मदतनिस व ३ सफाई कामगार) व ०३ सुरक्षा रक्षक संरक्षण विभागामार्फत लावणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता असावी.

५) प्रत्येक मजल्यावर लॉकर्सच्या चाव्या ठेवण्यासाठी ८ कप्याचे ४ लोखंडी टेबल खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.३२,०००/- (अक्षरी रु. बत्तीस हजार मात्र) येणा-या खर्चास मान्यता असावी.

सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा विभागातील खोल्यांसाठी ऑनलाईन बुकींग सुविधा सुरु करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच साईधर्मशाळा विभागाकडील लॉकर्ससाठी प्रति दिन (२४ तासांकरिता) रु.२०/- मात्र सेवाआकार आकारणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **साईधर्मशाळा येथे प्रशिक्षण, शिबीर, स्पर्धा इ. साठी पार्किंगचे (काँक्रीट असलेले) मैदान उपलब्धतेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- अधिनियामातील विनियम १७,२ (१) (ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव :- निरंक

प्रस्ताविक- साई धर्मशाळा विभागामध्ये निवासासाठी तसेच पार्कीगचे जागेत जिल्हास्तरीय, आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा आयोजित करणेसाठी विविध संघटना मागणी करीत असतात. आतापर्यंत विविध संघटनांनी/ आयोजकांनी १० ते ११ वेळा विविध स्पर्धेसाठी निवास व पार्कीगचे मैदान खेळासाठी उपलब्धहोणेबाबत मागणी केलेली आहे. त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने संबंधितांना साई धर्मशाळा परिसरातील पाने,फुले, झाडे, यांची काळजी घेतली जाईल व साईभक्तांना त्रास होणार नाही या अटीवर आयोजकांना खेळाडुंसाठी निवासव्यवस्था व खेळासाठी पार्कीगचे मैदान मोफत उपलब्धकरुन देण्यात आले होते.

साई धर्मशाळा येथे पार्कीगचे जागेमध्येक्रिडा स्पर्धा आयोजित करणेसाठी व खेळांडुसाठी निवासव्यवस्था करणेकामी सतत मागणी वाढत चालली आहे. अहमदनगर जिल्हा फुटबॉल टेनिस असोसिएशन, अहमदनगर यांनी दि. २१/०४/२०१६ रोजीचे पत्रात दि. २४ एप्रिल ते २६ एप्रिल २०१६ या कालावधीत शिर्डी येथे महाराष्ट्र राज्यस्तरीय फुटबॉल टेनिस प्रशिक्षण शिबीर व स्पर्धेचे आयोजन केले आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील सुमारे ३०० खेळाडु व ५० शिक्षक सहभागी होणार आहेत, तरी आपण या खेळाडु व शिक्षकांची निवासाची व्यवस्था साई आश्रम -२ या ठिकाणी करावी व पार्कीगची जागा मैदानसाठी उपलब्धकरुन द्यावी अशी विनंती केली होती.

मा.कार्यकारी अधिकारी यांचे दि.२३/०४/२०१६ रोजीचे मंजुर टिपणी नुसार जानं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/ ३५६/२०१६ दि.२५/०४/२०१६ रोजीचे पत्रानुसार पार्कींगचे मैदान खेळाचे स्पर्धेसाठी, तसेच दि. २३/०४/२०१६ रोजी ए इमारतीमध्ये ०८ हॉल देण्यात आले होते.

दि.२५/०४/२०१६ रोजी त्यांना दिलेल्या ए इमारतीमधील हॉल नं. २१ मध्ये धुम्रपान/मद्यपान केल्याचे आढळले, तसेच पिलो, अंथरुणे, कॉट इ. अस्ताव्यस्त केलेले आढळले. त्याबाबत श्री गणेश म्हस्के आयोजक यांना कार्यालयामध्ये बोलावुन तोंडी समज देण्यात आलेली आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- खेळाचे स्पर्धामध्ये विविध राज्यामधुन खेळाडु येत असतात, त्यांचे मैदानामध्ये काही वाद निर्माण होऊ शकतात. या वादाचे भांडणामध्ये रुपांतर होऊन मारामारी होऊ शकते. अशा गैरवर्तनामुळे शिर्डी हे धार्मिक क्षेत्र असल्याने संस्थानची बदनामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे खेळासाठी पार्की गचे कॉक्रींट मैदान देण्यात येवु नये असे नम्र मत आहे.

सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती समोर मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, साईधर्मशाळा येथे प्रशिक्षण, शिबीर, स्पर्धा इ. साठी पार्किंगची जागा (कॉंक्रीट असलेली) उपलब्ध करुन देण्यात येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.२६** **साई मंदिर सुरक्षाकामी नियुक्त केलेल्या पोलीसांकरीता निवासव्यवस्था विनामुल्य होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- अधिनियम कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करणे" अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव - निरंक

प्रस्ताविक:- साई धर्मशाळा विभाग हा दिनांक १८/०७/२०१३ रोजी सुरु झालेला आहे. सदर दिवसापासुन पालखीधारक, पदयात्री, सहली, मेळावे, इतर ग्रुपने येणारे साईभक्तांची निवासासाठी व्यवस्था करण्यात येत आहे.

शिर्डी साई मंदिर व परीसरात बॉम्ब स्फोट घडवून आणणार या पत्राच्या अनुषंगानेतसेच उपरोक्त संदर्भाकिंत पत्रानुसार व वरीष्ठांचे आदेशानुसार बॉम्बस्फोटचे बंदोबस्तासाठी आलेले पोलीस कर्मचारी यांना साई धर्मशाळा येथील ए इमारती मध्ये ३ हॉल देण्यात आलेले आहेत. सदर पोलीस हे बंदोबस्तासाठी धुळे, नाशिक, नंदुरबार, जळगाव ईत्यादी वेगवेगळया ठिकाणाहून मुक्कामास आलेले असतात.

संरक्षण विभागाचे मंजुर टिपणीनुसार खालीलप्रमाणे पोलिस कर्मचारी यांची निवासव्यवस्था मोफत करण्यात येत आहे. व त्यांना सेवाआकार बाबतचा तपशिल.

| अ.नं. | मंजुर टिपणी | कर्मचारी संख्या | दिलेले हॉल |
|---|---|---|---|
| १ | दि.१७/१०/२०१३ रोजीची मंजुर टिपणी(पुढील आदेश होईपर्यंत) | २८ | ०२ |
| २ | दि.२९/०४/२०१४ रोजीची मंजुर टिपणी(पुढील आदेश होईपर्यंत) | १२ | ०१ |
| ३ | दि.२९/१०/२०१४ रोजीची मंजुर टिपणी | ४५ | ०३ |
| | **एकुण संख्या-** | **८५** | **०६** |

सध्या ए इमारतीत ०३ हॉलमध्ये ४५ पोलीस कर्मचारींची निवासव्यवस्था मोफत करण्यात येत आहे.

मागणी- सदरचा निवासव्यवस्थे विनामुल्य उपलब्ध करुन देत असलेमुळे आज पर्यंत प्रशासकीय मान्यते नुसार त्यांची निवासव्यवस्था करण्यात आलेली आहे. सदरील निवासव्यवस्थेसाठी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी असे नम्र मत आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- संरक्षण विभागाचे मंजुर टिपणीनुसार शिर्डी पोलीस स्टेशन शिर्डी यांचे मार्फत आलेले मंदिर सुरक्षा पोलीस कर्मचारी यांना साई धर्मशाळा येथे देण्यात आलेल्या ०३ हॉलमध्ये साधारणपणे ४५ ते ५० पोलीसांना निवासासाठी कायमस्वरुपी विनामुल्य व्यवस्था करण्यात येत आहे.

मंदिर सुरक्षा पोलीस कर्मचारी यांची ३ हॉलमध्ये मोफत निवासव्यवस्था करणेसाठी प्रस्तावित सेवा आकाराप्रमाणेस १ वर्षासाठी रु.१,६४,२००/- (अक्षरी रु. एक लाख चौसष्ठ हजार दोनशे मात्र) खर्च येतो.

यापुढील कालावधीसाठी मंदीर व मंदीर परीसराचे संरक्षणार्थ आलेल्यापोलीस कर्मचा-यांची ३ हॉलमध्ये कायमस्वरुपी मोफत निवासव्यवस्था करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई मंदिर सुरक्षाकामी नियुक्त केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची मंदिराचे जवळ असलेल्या साईउद्यान या इमारतीमध्ये यापुढे कायमस्वरुपी मोफत निवासव्यवस्था करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **ऑनलाईन देणगी सुविधेद्वारे साईभक्ताकडून नजरचुकीने संस्थानला जमा झालेली देणगी रक्कम परत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांना देणगी देणे अधिक सोयीचे व्हावे याकरीता संस्थानने ऑनलाईन देणगीची सुविधा विविध बँकांद्वारे उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामध्ये नेट बँकींग, पेमेंट गेट-वे, एनईएफटी, आरटीजीएस, ए.टी.एम, क्रेडीट-डेबीट कार्ड इत्यादी सुविधा विविध बँका मार्फत संस्थानने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. जमा झालेल्या देणगी रक्कमेचे

रिपोर्ट बॅंका मार्फत संस्थानला प्राप्त होत असतात. सदर रक्कमेची पडताळणी करून त्याव्दारे साईभक्तांना देणगी पावती दिली जाते.

परंतु बऱ्याच वेळा वरील नमुद सुविधांचा वापरकरीत असतांना नजरचुकीने किंवा तांत्रीक अडचणीमुळे रक्कम संस्थान खाती जमा झाली असुन सदर रक्कम मला परत मिळावी म्हणून पत्र/ ई-मेल संस्थानकडे प्राप्त झाले आहेत. तसेच पत्र/ ई-मेल व्दारे त्यांनी रक्कम परत मिळावी म्हणुन संस्थानला वेळोवेळी कळवुन विनंती केलेली आहे नजरचुकीने जमा झालेल्या रकमेचा तपशिल पुढीप्रमाणे–

| अ.नं. | साईभक्ताचे नांव / ठिकाण | रक्कम जमा दिनांक | जमा झालेली रक्कम | प्राप्त झालेल्या पत्र /ई-मेल दिनांक | परत मागणी केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मोहम्मद अबु हुसेन, हैद्राबाद | २४/१२/२०१४ | २०,०००/- | १९/०१/२०१५ | २०,०००/- |
| २ | डी राधा कुमारी, श्रीकाकुलम | १३/१०/२०१५ | १०,०००/- | ०७/११/२०१५ | १०,०००/- |
| ३ | सजंय कुमार, पल्लावरम | १५/१२/२०१५ | २५,०००/- | ०३/०१/२०१६<br>२१/०१/२०१६ | २५,०००/- |
| ४ | आंकीत उपाध्ये, पुणे | २५/०५/२०१६ | ५०,०००/- | २५/०५/२०१६ | ४५,०००/- |
| | | | | एकुण- | १,००,०००/- |

वरील प्रमाणे ४ साईभक्तांनी त्यांचेकडुन ए.टी.एम हाताळतांना व नेटबॅंकीग द्वारे नजरचुकीने जादा जमा झालेली एकुण रक्कम रू.१,००,००/-(एक लाख मात्र) परत मिळावी म्हणुन विनंती केलेली असुन संबधित साईभक्तांनी ज्या बॅंक खात्युन रक्कम संस्थानला जता केलेली आहे, त्याच बॅंक खात्या रक्कम आरटीजीएस, एनईएफटी द्वारे परत करता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त ४ साईभक्तांची रक्कम परत करणेस व यापुढे साईभक्तांकडुन ऑनलाईनद्वारे नजरचुकीने संस्थान बॅंक खात्यामध्ये रक्कम जमा झाल्यास व तसे भक्तांने लेखी कळविल्यास जमा झालेल्या रक्कमेची खात्री करून ज्या बॅंक खात्युन रक्कम संस्थान खाती जमा होईल त्याच बॅंक खात्या आरटीजीएस, किंवा एनईएफटी व्दारे मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने परत करण्यास स्थायी मान्यतेसाठी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑनलाईन देणगी सुविधेद्वारे प्रस्तावात नमुद केलेल्या साईभक्तांकडून नजरचुकीने संस्थानला जमा झालेली देणगी रक्कम परत करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुढेही अशा प्रकारे नजरचुकीने रक्कम जमा झाल्यास व भक्तांनी त्या रकमेची परत मागणी केल्यास कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अधिकारात याची सत्यता पडताळून सदरहू रक्कम परत करावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२८** **जलसिंचनाचे कामासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५३७** सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवणेत आला. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२९** **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत नागरी तिर्थक्षेत्राचा सुनियोजीत विकास कार्यक्रमातंर्गत शिर्डीतील रस्त्यांना पथदिवे बसविणेकामी शिर्डी नगरपंचायतीस अनुदान देणेबाबतची माहिती शासनास सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे जानं.न.पं./ट.क्रं.८/९८७/२०१४, दि.२१.३.२०१४ चे पत्रान्वये, "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत नागरी तिर्थक्षेत्राचा सुनियोजित विकास करणेकामी शिर्डीतील २७ रस्त्यांची कामे प्रस्तावीत केलेली आहे.

शिर्डीमध्ये साईभक्तांचा ओघ साईंच्यादर्शनासाठी सारखा सुरू असतो व शिर्डी हे अ-वर्ग तिर्थक्षेत्र असल्याने नगरपंचायतीने २७ रस्त्यांची कामे प्रस्तावीत केलेली आहे. शिर्डी नगरपंचायतीची आर्थिक स्थिती बिकट असल्याने प्रस्तावित एकूण खर्च रुपये २५.२५ कोटी पैकी शिर्डी नगरपंचायतीचा १५% कर्जाचा हिस्सा रू.३,७८,७५,०००/- व मंदीर ट्रस्टचा १० % हिस्सा रू.२,५२,५०,०००/- अशी एकूण दोन्ही हिस्याची २५ % रक्कम रु.६,३१,२५,०००/- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खर्च करावा, अशी मागणी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:- मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०५.०६.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४३६, "प्रस्तावित कामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी," असे, ठरले.

मा.खंडपीठाचा आदेश:- मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद सिव्हील ॲप्लीकेशन नं.५०६८/२०१५, दि.०७.०८.२०१५ मध्ये We have heard Mr.Choukidar and Mr.Nagarkar, the learned counsel for respective parties. Considering the fact that, the amount that would be paid, the same would be for betterment and development of the city, we allow the applicant to contribute an amount of Rs. 3,54,50,000/- that is its own countribution of 10% and contribution of Municipal Council Shirdi of its own and by way of loan. However, this would not be a regular feature,

but is being permitted as one time contribution only. The civil application accordingly is allowed in terms of prayer clause "B" The civil application is disposed of. असे आदेश दिलेले आहेत.

इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०३ (आर्थिक अनुदान)/२०१५/२८६०, दि.१९.०८.२०१५ चे पत्र मंजुरीसाठी शासनास पाठवलेले होते सदरच्या पत्रामध्ये, मंदिर ट्रस्टचा हिस्सा १०% व शिर्डी नगरपंचायतीचा कर्जाचा १५% हिस्सा या दोन्हीचा एकुण रक्कम रु.३,५४,५०,०००/- शिर्डी नगरपंचायतीस अनुदान म्हणुन मंजुर करावी, असे नमुद केलेले आहे त्यास अनुसरुन शासन निर्णय क्र.सासंकि-१०१५/६२३/प्र.क्र.१२५/का.१६, दि.१७ मार्च २०१६ चे शासन निर्णयान्वये, शिर्डी नगरपंचायतीस मंदिर ट्रस्टचा हिस्सा १०% व शिर्डी नगरपंचायतीचा कर्जाचा १५% हिस्सा या दोन्हीची एकुण रक्कम रु.३,५४,५०,०००/- शिर्डी नगरपंचायतीस अनुदान म्हणुन देणेस मंजुरी दिलेली आहे

मात्र मा.खंडपीठाचे आदेशामध्ये मंदीर ट्रस्टचा हिस्सा १० % नुसार रू.१,४१,८०,०००/- एवढी रक्कम अनुदान म्हणुन द्यावे व शिर्डी नगरपंचायतीचा कर्जाचा हिस्सा १५ % रक्कम रू.२,१२,७०,०००/- कर्ज म्हणुन देणेबाबत नमुद केलेले आहे. मा.खंडपीठाचे आदेशाप्रमाणे मध्ये मंदीर ट्रस्टचा हिस्सा १० % नुसार रू.१,४१,८०,०००/- एवढी रक्कम अनुदान म्हणुन द्यावे व शिर्डी नगरपंचायतीचा कर्जाचा हिस्सा १५ % रक्कम रू.२,१२,७०,०००/- कर्ज म्हणुन मंजुर करणेबाबत इकडीलजा.नं.एसएसएस/लेखाशाखा-अनुदान/६६८०/२०१६, दि.१४.०३.२०१६ चे दुरुस्तीपत्रान्वये शासनास विनंती केलेली आहे.

इकडील जा.नं.एसएसएस/लेखाशाखा-अनुदान/६६८०/२०१६, दि.१४.०३.२०१६.चे दुरुस्ती पत्रान्वये मागणी केल्यानुसार शासन निर्णय क्र.सासंवि-१०१५/६२३/प्र.क्र.१२५/का.१६, दि.२९ मार्च २०१६ अन्वये शासनाने, खालीलप्रमाणे माहीती शासनास तात्काळ सादर करण्याचे कळविले आहे. १) शिर्डी नगरपंचायतीच्या कर्जाच्या १५% हिस्स्याची रक्कम रू.२,१२,७०,०००/- मात्र संस्थानास परत करण्याबाबत शिर्डी नगरपंचायतीद्वारे हमीपत्र देण्यात आले आहे अथवा कसे? (२) तसेच शिर्डी नगरपंचायत सदरची रक्कम कशा प्रकारे आणि किती कालावधीमध्ये संस्थानास परत करणार आहे. याबाबतचा आपला स्वयंस्पष्ट अहवाल शासनास तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा.

याबाबत शिर्डी नगपंचायतीस इकडील जा.नं.एसएसएस/लेखाशाखा-अनुदान/११२३/२०१६ दि. ९ जून २०१६ चे पत्रास अनुसरून, त्यांनी उलट टपाली मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे जा.नं.न.पं./ ट.क्रं.८/ १५६६/ २०१६,दि.१४.६.२०१६ अन्वये पत्र पाठवून दि. २१.३.२०१४ रोजी संस्थानकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावात कर्जाच्या हिस्स्याची १५ टक्के रक्कम (रु.२,१२,७०,०००/-) ही अनुदानाच्या स्वरुपात मागणी केलेली आहे. कर्जाच्या स्वरुपात मागणी केलेली नसल्याने परत फेडीचा प्रश्नच उद्भवत नाही. नगरपंचायतीच्या प्रस्तावानुसार कर्जाचा हिस्सा नगरपंचायतीस अनुदान म्हणून मिळावे असे नमुद केलेले आहे. मात्र खंडपीठाच्या आदेशात कर्जाच्या हिस्साची रक्कम contribution of Municipal Council Shirdi of its own and by way of loan असे नमूद केलेले आहे त्यानुसार सदर प्रस्ताव शासनाकडे पाठवितांना नगरपंचायतीस कर्जाच्या हिस्साची रक्कम कर्ज म्हणून देणेस मान्यता असावी असे नमुद केले होते. तथापि मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत यांनी कर्जाच्या हिस्स्याची रक्कम लोन म्हणून मागणी केलेली नसुन सदरची रक्कम अनुदान म्हणून मागणी केलेली आहे असे कळविलेले असल्याने सदर प्रस्तावावर फेरनिर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत नागरी तिर्थक्षेत्राचा सुनियोजीत विकास कार्यक्रमातंर्गत शिर्डीतील रस्त्यांना पथदिवे बसविणेकामी शिर्डी नगरपंचायतीचा १५% हिस्सा रु.२,१२,७०,०००/- मात्र त्यांना अनुदान म्हणून देण्यात यावी असे ठरले.**

**तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेमध्ये सौर दिव्यांचा समावेश आहे का, याचीही चौकशी करावी, त्यामुळे खर्चही कमी येईल व विजेची बचत झाल्यामुळे विज बील भरण्याची आवश्यकता राहणार नाही.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३०** **भांडार विभागात पडून असलेल्या कपडयांच्या गाठीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानकरीता देणगी आलेले एक ट्रक तयार कपडे (८१ गाठी) लेखाशाखेचे तत्कालीन वरिष्ठ लिपीक श्री पी.व्ही. निर्मळ यांचेमार्फत रविवार दि.०४.०८.२०१३ रोजी भांडार विभागाचे गोडावून मध्ये उतरविण्यात आले. सदरचे तयार कपड्यांमध्ये पॅन्ट-शर्ट, जिन्स पॅन्ट, हाफ पॅन्ट, टी-शर्ट, जॉकेट, नाईट पॅन्ट, महिला व लहान मुलांचे कपडे यांसह इतर अंतस्वस्त्रांचाही समावेश आहे. यात जुने व वापरलेले कपडेही मोठ्या प्रमाणात आहेत.

सदर कपडे उतरवितांना श्री निर्मळ यांना भांडारचे गोडावून मध्येजागा उपलब्ध नाही, तसेच उपरोक्त मालाची देणगी पावती करणेपुर्वी माल गोडावूनमध्येसाठविणे अडचणीचे असलेबाबत सांगण्यात आले होते, त्यावर त्यांनी उपरोक्त कपडे उतरविणेसाठी मा. अध्यक्ष महोदयांनी तसेच मा. मुख्य लेखाधिकारी यांनी सांगितले आहे तसेच कपडे भांडारमध्ये तात्पुरते कालावधीकरीता ठेवण्यात येणार असून लवकरच देणगी काऊंटर मार्फत कपड्यांची विक्री करण्यात येणार आहे, असे सांगितले होते. तथापि, सदर कापडे कोणी, किती व काय किंमतीचे दिले याबाबत माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांची देणगी पावती केली गेली नाही.

तदनंतर लेखाशाखा विभागाने तात्पुरत्या कालावधीसाठी भांडारमध्ये ठेवलेले कपडे उचलून घेणेबाबत त्यांना वेळोवेळी दुरध्वनीद्वारे कळविणेत आले होते. परंतु तरीही लेखाशाखा विभागाने सदर कपड्यांची पुढील कार्यवाही न करता उपरोक्त कपडे तसेच भांडारमध्ये ठेवले. तसेच या कपड्यांचे देणगीदार, कपड्यांची संख्या व किंमत याबाबत माहिती विचारली असता, उपरोक्तबाबत माहिती उपलब्ध नसल्याचे लेखाशाखेने पुन्हा दि.१२.०३.२०१४ रोजीचे पत्रान्वये भांडार विभागास कळविले आहे.

भांडार विभागाकडील दि.२६.०३.२०१४ रोजीचे मंजूर टिप्पणी अन्वये संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण विभागाचे कर्मचारी,प्रि-ऑडीटर व खरेदी/ भांडार विभाग यांचे प्रतिनिधी यांनी एकत्र येउन सदर कपड्यांच्याकिमती ठरवून त्या यादीस मा. कार्यकारी अधिकारी महोदयांची मान्यता घेऊन, त्याची देणगी पावती करुन उपरोक्त माल कापडकोठी मार्फत विक्री करणेस मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मान्यतेन्वये आज अखेर २६ कपड्यांच्या गाठी उघडण्यात आल्या असून त्यातुन एकूण रु ६,५८,०३२.०० (रुपये सहा लाख अठ्ठावन्न हजार बत्तीस मात्र) इतक्या रकमेच्या कपड्यांची संस्थानचे कापडकोठी विभागामार्फत विक्री करणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रचलित पद्धतीनुसार दि.१६.०५.२०१६ ते दि.२५.०५.२०१६ या कालावधीत कपड्यांच्या एकूण सतरा गाठी उघडण्यात आल्या व त्यातील रु.३,३९,८६३.०० किमतीचे विक्री योग्य कपडे विक्रीसाठी लेखाशाखेचे कापडकोठी विभागाकडे पाठविणेकामी मान्यता मिळणेस्तव टिप्पणी सादर केली असता, त्यावर मा. कार्यकारी अधिकारी महोदयांनी "सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीसमोर सादर करावा" असे निर्देश दिलेले आहेत.

तरी निर्देशाप्रमाणे भांडार विभागातील उर्वरीत ३८ कपड्यांच्या गाठी उघडून त्यातील विक्री योग्य कपडे तसेच यापुर्वी उघडलेल्या १७ कपड्यांच्या गाठीतील कपडे लेखाशाखेचे कापडकोठी विभागामार्फत प्रचलित पद्धतीने विक्री करीता देणेस तथा विक्रीसाठी अयोग्य, जीर्ण व फाटलेले कपडे संस्थानचे वाहन, फरशा पुसणेकामी संबंधीत विभागांना देणेस मान्यता मिळणेस्तव, सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.५३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भांडार विभागात पडून असलेल्या कपडयांच्या गाठीमधील चांगले, विक्री योग्य कपडयांची लेखाशाखेकडील कापडकोठी विभागामार्फत प्रचलित पद्धतीने विक्री करणेत यावी. तसेच विक्रीसाठी अयोग्य, जीर्ण व फाटलेल्या कपडयांचा प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इतरत्र वापर करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, भांडार विभाग/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३१** **मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार यांचे मानधन वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद- कलम (3) पोटकलम (2) - नियत दिवशी, पुर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची स्थावर किंवा जंगम अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता, हक्क, दायित्वे व बंधने यांसह) या अधिनियमान्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरीत व निहीत होईल आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिकाऱ्यास, त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल.

कलम (4) पोटकलम (3) - कार्यकारी अधिकारी, कलम 3 अन्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेत विहीत केलेल्या संपूर्ण स्थावर व जंगम मालमत्तेची, प्रत्येकी मालमत्तेचे तपशिलवार वर्णन व अदमासे किंमत दर्शविणारी सूची तयार करील आणि तिची प्रत, नियत दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत धर्मादाय आयुक्त आणि प्रधान सचिव व विधी व न्याय विभाग यांच्याकडे सादर करील. मालमत्तांची मूळ सूची संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यालयामध्ये कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यात येईल.

कलम 17 चा खंड (झ) - सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

प्रस्तावना- संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.९८६ नुसार व दि.१९/११/२०१४ रोजीचे आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेत आलेला आहे

प्रस्ताव- मालमत्ता विभाग नव्याने सुरु करणेपुर्वी या संबंधीचे कामकाज बांधकाम विभागातंर्गत असणाऱ्या भूसंपादन कक्ष येथे सुरु होते. सदर विभागाचे कामकाज हे महसुल विभागाशी निगडीत असल्याने श्री.चंद्रकांत जयवंत रणशूर (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पध्दतीने 'सल्लागार' म्हणून दरमहा रु.१५,०००/- एकत्रित मानधनावर नियुक्ती करणेत आलेली होती. परंतु ते आजारी असल्याने कामावर येत नाहीत.

सध्या मालमत्ता विभागाकडे खालीलप्रमाणे कामकाज सुरु आहे.

१) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भूसंपादनाबाबतची प्रकरणे

२) संस्थानला जमीन देणगी म्हणून स्विकारणेबाबतची प्रकरणे.

३) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमिनी खरेदी करणे.

४) खरेदी केलेल्या जमीनींच्या नोंदी महसूल दप्तरी अद्ययावत करुन घेणे.

५) विविध न्यायालयात सुरु असलेल्या केसेस बाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

६) संस्थानचे मालमत्तेबाबतचे स्थानिक शासकिय कर भरणे.

७) संस्थानच्या जमीनींची मोजणी करुन घेऊन हद्दी निश्चित करणे.

८) संस्थानने भाडेतत्वावर दिलेल्या मिळकतीचे करारनामे करुन घेणे.

९) संस्थानचे स्थावर मालमत्तेबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे, त्याबाबत असलेल्या अडचणी दूर करणे

सदर कामकाजासाठी सल्लागार म्हणून श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पध्दतीने मासिक रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर दि.२६/१०/२०१५ पासून नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे काम समाधानकारक आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे यांनी दि.१८/५/२०१६ रोजीचे अर्जान्वये सदरचे मानधन हे अत्यल्प असल्याने व वाढती महागाई विचारात घेऊन मासिक मानधन रु.१८,०००/- पर्यंत करण्यात यावे,अशी विनंती केली आहे.

तथापि श्री.चंद्रकांत रणशूर(सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना दरमहा रु.१५,०००/- देण्यात येत होते. त्याचप्रमाणे श्री.कृष्णा वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनाही रु.१५,०००/- दरमहा मानधन देता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मालमत्ता विभागाचा अभिप्राय, व वाढत्या महागाईचा तसेच श्री.कृष्णा वालझाडे हे करत असलेल्या कामाचा विचार करता, श्री.कृष्णा वालझाडे, सल्लागार, मालमत्ता विभाग (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना रु.१५,०००/- मात्र दरमहा एकत्रित मानधन देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३२** **मौजे शिर्डी येथील सर्वे नं.171/12 मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्यासाठी मुद्रांकशुल्काबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव–** मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाच्या विकसन कराराचे मुद्रांक शुल्करु.५५,८२,४६०/- इतके व बांधीव क्षेत्राचा भाडेपट्टा करारनाम्याचे मुद्रांक शुल्करु.१६,०९,०२०/- इतके असे विकसन व भाडेपट्टा करारनाम्याचे एकूण मुद्रांक शुल्करु.७१,९१,४८०/- व नोंदणी शुल्काची होणा-या रकमेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावना - मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्यामध्ये भविष्यात कुठलाही एकतर्फी निर्णय होवू नये याकरीता मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी यांचे नावाचा त्यामध्ये समावेश असावा तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी ठरवून दिलेले रु१/- मात्र प्रति चौ.मी.प्रती वर्ष (एकूण क्षेत्रासाठी रु.२५५४/- मात्र) हे निश्चित करणेत यावे. त्यामध्ये करारनाम्याची मुदत संपेपर्यंत वाढ करता येणार नाही याचा उल्लेख करावा असेबाबतचा निर्णय क्रं.३०६ अन्वये दि.२३/०५/२०१४ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये संमत करणेत आलेला आहे

त्याचप्रमाणे उक्त नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकामापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेकामी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेबरोबर २९ वर्षे कालावधीचा भाडेपट्टा करार करणेस तसेच त्याकामी मुद्रांक शुल्कापोटी येणा-या अंदाजे रु.१५,६१,३९९/- मात्रचे व नियमाप्रमाणे होणारी नोंदणी फी तसेच इतर अनुषंगिक खर्चास निर्णय क्रं८० अन्वये दि.१२/०३/२०१५ रोजीच्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त ठरावानुसार २९ वर्षे कालावधीचा भाडेपट्टा करार करणेसाठी मुद्रांक शुल्काची रक्कम तपासून निश्चित रक्कम कळविणेकामी मा.सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हधिकारी,अहमदनगर यांना दि.२४/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. त्यास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील दि.२०/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये २९ वर्षांचे भाडेकराराचे प्रारुप मागविले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाच्या करारनाम्याचे प्रारुप मुद्रांक शुल्कआकारणीकामी मा.सहजिल्हा

निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हधिकारी,अहमदनगर यांचेकडेस इकडील पत्र क्रं.एसएसएस/ मालमत्ता/ ५२९८/२०१५ दि.१६/१२/२०१५ अन्वये पाठविणेत आले व त्याची प्रत मा.विभाग नियंत्रक,राज्य परिवहन, अहमदनगर,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,अहमदनगर यांचेकडेस माहीतीसाठी पाठविणेत आलेला आहे.

उपरोक्त कराराचे प्रारुपच्या अनुषंगाने मासहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचेकडील अभिनिर्णय जा.क्रं.कक्ष-३/अभि.प्र.क्र.९२/१५/ १६६४/१६ दि.२५/०५/२०१६ अन्वये निर्गमित केलेला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे आदेश केलेले आहेत. "सादर केलेल्या करारनामा दस्तात नमूद

मिळकतीचा विकसन कराराचे सन २०१५ चे मुल्यांकन रु.१३,९५,६१,५००/- यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे अनुसूची१ मध्ये (अनुच्छेद ५(जी)-ए) अन्वये ४ टक्के प्रमाणे मुद्रांक शुल्क रु.५५,८२,४६०/- व दस्तात नमूद मिळकतीवरील बांधीव क्षेत्राचा भाडेपट्टा करारनाम्याचे सन २०१५ चे मुल्यांकन रु.८,०४,५१,०००/- यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे अनुसूची१ मधील अनुच्छेद ३६(३) नुसार ५० टक्के दराने मुल्यांकन रु.४,०२,२५,५००/- यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे अनुसूची१ मधील अनुच्छेद ३६ च्या अंतर्गत अनुच्छेद २५ नुसार मुद्रांक शुल्क रु.१६,०९,०२०/- असे विकसन व भाडेपट्टा करारनाम्याचे एकूण मुद्रांक शुल्क रु.७१,९१,४८०/- इतके शुल्क शासन जमा करावे. त्यानंतर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमचे कलम ३२ नुसार प्रमाणित करण्यात येईल. देय मुद्रांक शुल्क आदेशापासून ६० दिवसांचे आत शासनास जमा करावे. अन्यथा नस्ती बंद केली जाईल. " असेबाबत नमूद केलेले आहे.

सदर आदेशावर संस्थानचे पॅनलवरील वकील ॲड.ए.आर.गाडेकर,जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेमार्फत पुनर्विलोकन अर्ज क्रं९२/२०१५ चा दि.३१/०५/२०१६ रोजी सादर करणेत आला व ॲड.गाडेकर यांनी संस्थानचे वतीने उक्त अतिरिक्त मुद्रांक शुल्काबाबत आवश्यक ते लेखी युक्तिवाद, उच्च न्यायालयाचे निवाडे, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार एकाच व्यवहारात एकाच मिळकतीबाबत निर्माण झालेले दोन करारनाम्यावरील आवश्यक मुद्रांक कमी करण्यासाठी आवश्यक ती बाजू मांडलेली आहे तथापि मा.जिल्हा मुद्रांक अधिकारी यांनी उक्त पुनर्विलोकन अर्जावर त्यांचेकडील Misc.Case No.1/2016 मध्ये दि.२४/०६/२०१६ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

1) Application dated 31/05/2016 submitted to this office is not accepted.
2) The order dated 25/05/2016 is final order and is binding on all concerned.
3) The applicant is directed to pay the necessary Stamp Duty as per order dated 25/05/2016
4) The Registering Authority, Rahata is directed to register the document only if it is properly stamped.

सदर आदेशाच्या अनुषंगाने संस्थान पॅनलवरील वकील ॲड.ए.आर.गाडेकर यांनी सदर अभिनिर्णयाविरुध्द उपनिरीक्षक,जनरल नोंदणी आणि उपजिल्हाधिकारी मुद्रांक,पुणे यांचेकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे, असेबाबत त्यांचेकडील दि.०२/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये इकडेस कळविलेले आहे.

त्या अनुषंगाने त्यांना सदर अपीलाच्या निर्णयास साधारणत: किती दिवस लागतील याबाबत दूरध्वनीवरुन विचारणा केली असता त्यांनी त्यांचेकडील दि.१९/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये खुलासा केला आहे की, "सदर हुकूमाविरुध्द मुख्य नियंत्रक, महसुल अधिकारी, पुणे (Chief Controlling Authority of Revenue, Pune) यांचेकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे. परंतु अपील निर्णयास बराचसा कालावधी लागून अपीलासाठी स्वतंत्र मुद्रांक शुल्कदेखील भरावे लागणार आहे. दरम्यान आज रोजी विकसन करारनाम्यानुसार नवीन बसस्थानक व भक्तनिवास इमारत पूर्ण झालेली असल्याने ताबा देणेबाबत उभयतांमधील दोन्हीही करारनामे तातडीने नोंदणी करणे अनिवार्य झालेले आहे. सदर वस्तुस्थितीचा विचार करता मा.मुद्रांक जिल्हाधिकारी, यांनी मुद्रांक शुल्काबाबत पारीत केलेल्या अभिनिर्णयानुसार भाडेपट्टा करारनामा नोंदणीसाठी निश्चित केलेले मुद्रांक शुल्क रु.१६,०९,०२०/- एवढे सदर दस्त नोंदणी समयी परताव्याचा हक्क अबाधित ठेवून (अंडर प्रोटेस्ट) भरण्यात यावेत म्हणजे संस्थानला मुद्रांक शुल्काची रक्कम महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ चे कलम ४४ (२) नुसार मा.मुख्य नियंत्रक,महसुल अधिकारी,पुणे यांचेकडे अधिक (Exceses) भरलेले मुद्रांक शुल्क परतावा मागणी अर्ज (Refund Claim Application) दाखल करुन मागणी करता येईल " असेबाबत खुलासा केलेला आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी करारनाम्याचे प्रारुप तयार करणारे संस्थानचे पॅनलवरील वकील ॲड.एस.डी. कुलकर्णी, कोपरगाव यांचे अभिप्राय घेणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील दि.२८/०७/२०१६ रोजीच्या पत्राप्रमाणे अभिप्राय सादर केले. त्यात त्यांनी "यापूर्वी विकसन करार व भाडेपट्टा याबाबत अभिप्राय देलेले असून त्याप्रमाणे संस्थानने विकसन करार तपासून मान्यता केलेला आहे. तसेच राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी यांनी सुध्दा संबंधित करारास मान्यता दिलेली आहे. मुद्रांक शुल्काबाबत जो निर्णय जॉईंट डिस्ट्रीक्ट रजिस्ट्रार,अहमदनगर यांनी दिलेला आहे. त्यावर अपील करुन विनाकारण कालावधी व्यथित करणे योग्य होणार नाही,मुद्रांक शुल्क अधिकारी यांनी त्यांचे तारीख २४/०६/२०१६ चे निर्णयानुसार स्टॅम्पबाबत जे निश्चित केले आहे. त्यावर वाद करुन विनाकारण कालक्षय करणे योग्य होणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी विकसन करार व भाडेपट्टा हे दोन वेगवेगळे दस्त असल्याचे विचारात घेवून स्टॅम्प डयूटी भरण्याचे कळविले आहे. तांत्रिकदृष्ट्या विचार केल्यास संबंधित बाब निश्चितपणे विचार करण्यासारखी आहे. हक्कास बाध न येता स्टॅम्प डयूटी भरुन दस्त नोंदणे योग्य होईल. बांधकाम जवळ-जवळ पूर्ण झालेले आहे. स्टॅम्प डयूटीचे आकारणीवर अपील करुन त्यात किती काळ जाईल,हे निश्चित सांगता येत नाही. तरी योग्य तो निर्णय घ्यावा," असेबाबत नमूद करुन त्यांनी भाडे करारनाम्याचा मसुदा तयार करुन प्रस्तुत पत्रासोबत पाठविलेला आहे.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त ॲड.ए.आर.गाडेकर व ॲड.एस.डी.कुलकर्णी यांचे अभिप्रायानुसार उक्त अपील निर्णयास बराचसा कालावधी लागणार असल्याने व आज रोजी विकसन करारनाम्यानुसार नवीन बसस्थानक व भक्तनिवास इमारत पूर्ण झालेली असल्याने ताबा देणे-घेणेबाबतची कार्यवाही व उभयतांमधील दोन्हीही करारनामे

तातडीने नोंदणी करणे अनिवार्य झालेले असलेने भाडेपट्टा करारनामा नोंदणीसाठी निश्चित केलेले मुद्रांक शुल्क रु.१६,०९,०२०/- एवढे सदर दस्त नोंदणी समयी परताव्याचा हक्क अबाधित ठेवून (अंडर प्रोटेस्ट) भरणे उचित होईल व दोन्हीही दस्त तातडीने नोंदणी करुन घेता येईल.

तेंव्हा मा.सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हधिकारी, अहमदनगर यांचेकडील दि.२५/०५/२०१६ रोजीच्या अभिनिर्णयातील आदेशाप्रमाणे उक्त मिळकतीचे

विकसन कराराचे मुद्रांक शुल्करु.५५,८२,४६०/- इतके व दस्तात नमूद मिळकतीवरील बांधीव क्षेत्राचा भाडेपट्टा करारनाम्याचे मुद्रांक शुल्करु,१६,०९,०२०/- इतके (अंडर प्रोटेस्ट) असे विकसन व भाडेपट्टा करारनाम्याचे एकूण मुद्रांक शुल्करु,७१,९१,४८०/- इतके तसेच सदर दस्तांचे होणारे नोंदणी शुल्क देखील सरकारजमा करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मौजे शिर्डी येथील सर्वे नं.171/12 मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने घेणेबाबत, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचा करारनामा, या क्षेत्रातील तज्ञ ॲड तथा सॉलिसीटर मोहन जयकर, समिती सदस्य यांचेकडून तपासून घ्यावा व त्यांचे अभिप्रायासह सदरहू प्रस्ताव समितीसमोर फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३३** **श्री साईबाबा मंदिर परिसर शिर्डी येथे लाडू विक्री केंद्राशेजारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगाऊ आरक्षण केंद्र सुरु करण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांची परवानगी मिळणेबाबत मा.विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, अहमदनगर व आगार व्यवस्थापक, रा.प.कोपरगाव यांचे विनंती अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमूद आहे

प्रस्तावना– मा.विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, अहमदनगर व आगार व्यवस्थापक, रा.प.कोपरगाव यांनी त्यांचेकडील उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये श्री साईबाबा मंदिर परिसरात जास्तीत जास्त भाविकांना संगणकीय आगावू आरक्षण प्रणालीचा लाभ घेता यावा व त्या अन्वये रा.प.महामंडळाच्या बसेस सेवांचा जास्तीत जास्त भाविक/ प्रवाशांना लाभ घेता यावा व तिकीट आरक्षण इ.संबंधी त्यांची गैरसोय टाळणेचे दृष्टीने रा.प.कोपरगाव आगारास श्री साई संस्थान शिर्डी मंदीर परिसरामध्ये प्रसाद लाडू विक्री केंद्राजवळ संगणकीय आगावू आरक्षण व तिकीट विक्री केंद्र सुरु करणेकरीता जागा उपलब्धकरुन मिळावी म्हणून विनंती केलेली आहे.

तथापि मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी "सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ पी.आय. एल. नं.१८/ २०११ मध्ये दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहे.

(6) We direct that, without prior permission of this court, the committee-

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2-trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2-trust:

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;"

मात्र राज्य परिवहन महामंडळाची सेवा ही सार्वजनिक स्वरूपात मोडत असलेने व जनहितार्थ असलेने यात धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे म्हणून सदरचा प्रस्ताव विचारार्थ घेणे उचित आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- राज्य परिवहन महामंडळाने साई संस्थान मंदिर परिसरामध्ये लाडू प्रसाद विक्री केंद्राजवळ जागा उपलब्ध करुन देणेकामी विनंती केलेली आहे. तथापि सदर ठिकाणी दर्शन रांगेचे काम प्रस्तावित आहे. त्यामुळे त्यांनी मागणी केलेल्या ठिकाणची जागा उपलब्ध करुन देता येणार नाही. मात्र सध्यस्थितीत सेवाधाम इमारत किंवा साईनाथछाया इमारतीच्या तळमजल्यातील एक रुम अथवा साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) किंवा साईआश्रम नं.१ येथे ११ महीन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर जागा देण्याच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, अहमदनगर व आगार व्यवस्थापक, रा.प.कोपरगाव यांचे विनंतीनुसार त्यांना संगणकीय आगाऊ तिकीट आरक्षण केंद्र सुरु करणेसाठी सध्यस्थितीत सेवाधाम इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच रेल्वेनेही तिकीट आरक्षणासाठी जागेची मागणी केल्यास त्यांनाही सेवाधाम इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३४** **शांतीनिवास दर्शन हॉलमधील गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्लायडींग गेट तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संरक्षण विभागाचे जा.नं. एसएसएस/वशी-संरक्षण विभाग/262/2015 दिनांक 29/06/2015 चे मान्य टिपणीनुसार मंदिर परिसरातील सुरक्षिततेच्यादृष्टीने शांतीनिवास व भक्तनिवास तळमाळा येथील एमर्जन्सी गेटमधून आपत्कालीन

परिस्थिती उदभवल्यास साईभक्तांना सुरक्षित बाहेर काढण्यास अडचण येऊ नये म्हणून समोरील आडव्या रेलींगला मुव्हेबल व उघडणारे गेट तयार करुन मिळणेबाबत कळविले आहे.

उपरोक्त दोन्ही हॉलची प्रत्यक्ष पाहणी केली असता, आपत्कालीन गेट समोरील प्रत्येक रांगेतील दोन स्टेनलेस स्टीलची रेलींग काढून त्या ठिकाणी रेलींगला मॅच होईल असे स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट बसविता येईल. सदरील गेट जादा लांबीचे तयार होणार असल्याने तुर्त प्रायोगिक तत्वावर शांतीनिवास इमारतीचे हॉलचे रेलींगला स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट तयार करुन घेता येईल. सदरचे गेट बाहेरील वर्कशॉपधारक / फॅब्रिकेटर्स यांचेकडून तयार करुन, नियोजित ठिकाणी बसविता येईल. याकामी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे:

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | SS304 - 2" Dia Round Pipe 2 mm | 350 Ft. | 300/- | 1,05,000/- |
| 2. | SS304 – 1" Dia Round Pipe 1.6 mm | 750 Ft. | 135/- | 1,01,250/ |
| 3. | SS304 – Track Plate 25 x 5 mm | 300 Ft. | 160/- | 48,000/- |
| 4. | SS304 – Flat 25 x 10 mm | 108 Ft. | 320/- | 34,560/- |
| 5. | SS304 – Bend 2" | 18 Nos. | 250/- | 4,500/- |
| 6. | Wheel | 18 Nos. | 100/- | 1,800/- |
| 7. | Locking Arrangement (9 Set) | 1 Nos. | 2,000/- | 2,000/- |
| | | | एकूण : | 2,97,110/- |

उपरोक्तप्रमाणे शांतीनिवास इमारतीचे हॉल समोरील रेलींगला आपत्कालीन गेट तयार करुन बसविणेकामी अंदाजे रुपये 2,97,110/- खर्च अपेक्षित आहे.

तरी शांतीनिवास दर्शन हॉलमध्ये गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 2,97,110/- (अक्षरी रुपये दोन लाख, सत्यानों हजार, एकशे दहा) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतीनिवास दर्शन हॉलमध्ये गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,९७,११०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५** **श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पास केंद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून मिळालेल्या पुरस्काराबाबत.**

**प्रस्ताव-** केंद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी देशातील सोलर उर्जा स्त्रोतांना प्रोत्साहन मिळणेकरीता Concentrated Solar Thermal (CST) Technology Excellence Awards 2016 ही स्पर्धा आयोजित केलेली होती. सदर स्पर्धेमध्ये संस्थानचे श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाची माहीती पाठविणेत आली होती. संपुर्ण देशातुन संकलीत झालेल्यामाहीतीनुसार अपारंपारीक उर्जा मंत्रालय स्पर्धा कमिटीने पुरस्कार विजेत्या स्पर्धकांची घोषणा केलेली असून त्यात संस्थानचे सोलर स्टीम कुकींग प्रकल्पास सोलर कॉन्सट्रेटेड थर्मल सिस्टिमचा कुकींगकरीता प्रभावीपणे वापर करीत असलेली संस्थायांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर झालेबाबत तसेच दिनांक 29 एप्रिल 2016 रोजी नवी दिल्ली येथे केंद्रींय अपारंपारीक उर्जा मंत्री मा श्री पियुष गोयल यांचे हस्ते होणा-या पारीतोषिक वितरण कार्यक्रमास हजर राहणेकामी अपारंपारीक उर्जा मंत्रालयाचे सहसचिव श्री तरुण कपूर यांनी कळविले होते.

त्यानुसार सदरचा पुरस्कार स्विकारणेसाठी संस्थानचे वतीने मा. कार्यकारी अधिकारी व मेकॅनिकल विभाग प्रमुख श्री अतुल वाघ हे नवी दिल्लीयेथे गेले होते. दिनांक 29.4.2016 रोजी हॅाटेल अशोका येथे केंद्रींय अपारंपारीक उर्जा मंत्री मा. श्री पियुष गोयल यांचे हस्तेकार्यकारी अधिकारी यांनी हा पुरस्कार स्विकारला. तसेच इतर क्षेत्रातील संस्थांना अपारंपारीक सौर उर्जचा वापर करणेस प्रेरणा मिळणेकरीता संस्थानचे सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाची माहीती पुस्तिका केंद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालयाने प्रकाशित केली होती

श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पास केंद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालय भारत सरकार यांचेकडून राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करणेत आलेबाबत माहीती मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.५४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पास केंद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालय भारत सरकार यांचेकडून मिळालेल्या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराची नोंद घेण्यात आली. तसेच हा प्रकल्प चालविणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे समितीने अभिनंदन केले व सदरहू कर्मचाऱ्यांना अभिनंदनपर पत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६** **साईनगर सबस्टेशन परीसरातील १०१० के.व्ही.ए. जनसेट दुरुस्तीचे खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे साईनगर परीसरातील श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, स्टॉफ क्वार्टर, व्यायाम शाळा, मध्यवर्ती भांडार इत्यादि ठिकाणच्या वीजपुरवठयाकरीता ११ के.व्ही.सबस्टेशन उभारुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा विद्युतपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर अंखडीत वीजपुरवठयासाठी १०१० के.व्ही.ए.क्षमतेचा एक जनसेट तसेच ५०० के.व्ही.ए.क्षमतेचा एक जनसेट असे ०२ जनरेटर सेट बसविण्यात आलेले आहेत. या दोन जनरेटर सेटपैकी जनसेट क्र.०१ हा जनरेटर सेट दि.१०-०२-२००६ रोजी बसविण्यात आलेला असून जनसेट क्र.०२ हा जनरेटर सेट दि.२४-०७-२०१२ रोजी बसविण्यात आलेला आहे.

दिनांक २७-०७-२०१६ रोजी सकाळी साधारण १०.१५ मिनिटांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर अखंडीत वीज पुरवठयाकरीता १०१० के.व्ही.ए.चा जनरेटर सेट सुरु झालेला होता. सदरचा जनरेटर सेट चालू झाल्यानंतर नेहमीप्रमाणे इंजिनचे वॉटर पंप व तापमान चेक करणेसाठी सदर ठिकाणी ०४/१२ या शिफ्टकरीता असलेले कर्मचारी श्री.सुनिल वाघ हे गेले होते. त्यावेळी श्री.सुनिल वाघ यांनी जनरेटरच्या कॅनोपीचा दरवाजा उघडला असता कॅनोपीच्या वरील बाजूने अचानक एक मुंगूस कॅनोपीच्या दरवाज्यावर धडकून कॅनोपीच्या आत पडून सदरचे मुंगूस रेडीएरटरकडे पळाले व क्षणार्धात रेडीएटरच्या फॅनमध्ये अडकले. सदरचे मुंगूस रेडीएटरच्या फॅनमध्ये अडकल्याने तातडीने जनरेटर बंद करणेकरीता असलेले जनरेटरचे इर्मजन्सी स्वीच प्रेस करुन सदरचा जनरेटर सेट बंद करण्यात आला. परंतू या काही क्षणात मुंगूस रेडीएटरच्या फॅनमध्ये अडकल्याने रेडीएटरचे फॅन ब्लेड तुटून ते रेडीएटरमध्ये घुसल्याने रेडीएटरला छिद्रे पडली. त्यामुळे रेडीएटर लिक होऊन त्यामधील कुलंटयुक्त पाणी लिक झाले. त्यामुळे याबाबत जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स यांचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी यांना तातडीने त्याठिकाणी बोलावून सदरचा जनरेटर सेट दाखविण्यात आला. तसेच झालेल्या घटनेबाबत मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधून त्यांना झालेल्या घटनेबाबत सविस्तर माहिती दिली. त्यावर मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी तातडीने पुढील योग्य ती कार्यवाही सुरु करणेबाबत सांगितले. या झालेल्या घटनेबाबत साईनगर झोन करीता असलेले विद्युत पर्यवेक्षक-श्री.जाधव तसेच ०४/१२ या शिफ्टकरीता असलेले कर्मचारी श्री.सुनिल वाघ यांनी रिपोर्ट सादर केलेले आहेत.

तसेच सदरचा १०१० के.व्ही.ए.क्षमतेचा जनरेटर सेट बंद पडलेला असल्याने तसेच तातडीने श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकरीता वीजपुरवठा करणे गरजेचे असल्याने पर्यायी वीजपुरवठयाकरीता स्टॅण्डबाय असलेले ५०० के.व्ही.ए.क्षमतेचा जनरेटर सेट चालु करुन श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा वीजपुरवठा तातडीने सुरु करण्यात आला. परंतु या ५०० के.व्ही.ए.जनरेटरमार्फत करण्यात येणारा वीजपुरवठा हा अपुरा पडत असल्याने तसेच श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल हे खुप संवेदनशील असल्याने याठिकाणच्या वीज पुरवठयात कोणतीही अडचण येऊ नये याकरीता स्टॉफ क्वार्टरमधील विविध इमारतींचा वीज पुरवठा गरजेनुसार बंद करण्यात येऊन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा आल्यानंतर पुन्हा सर्व ठिकाणचा वीजपुरवठा सुरु करण्यात येतो.

०१). संस्थानमार्फत सर्व ठिकाणच्या मशिनरींचा मे.युनाइटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, शिर्डी यांचेमार्फत विमा उतरविण्यात आलेला आहे. त्यामुळे मा.प्रशासकीय अधिकारी श्री.औटी यांचेशी दिनांक २७-०७-२०१६ रोजी झालेल्या चर्चेनुसार तसेच त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार साईनगरकडील १०१० के.व्ही.ए.क्षमतेच्या जनरेटर सेटचे रेडीएटर व फॅन असेंब्लीचे अपघाताने झालेल्या नुकसानीबाबत व इन्शुरन्स क्लेम करणेकरीता मे.युनाइटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, शिर्डीचे शाखा व्यवस्थापक श्री.विजय थोरात यांना दुरध्वनी वरुन सांगण्यात आले. त्यानुसार मे.युनाइटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, शिर्डीचे शाखा व्यवस्थापक श्री.विजय थोरात यांनी त्यांचे सर्व्हेयर श्री.बाळासाहेब घाटे यांना प्रत्यक्ष झालेल्या घटनेचा अहवाल घेणेकरीता पाठविलेले होते. त्यानुसार श्री.बाळासाहेब घाटे यांचे समवेत उप कार्यकारी अभियंता (विद्युत), विद्युत पर्यवेक्षक-श्री.जाधव, श्री.खाडगीर, श्री.सावंत यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी करुन झालेल्या घटनेबाबतची पाहणी करुन त्याबाबतचा पंचनामा करण्यात आलेला आहे. तसेच झालेल्या घटनेचे फोटो काढण्यात आलेले आहे. तसेच इन्शुरन्स क्लेम करणेकरीता सर्व्हेयर श्री.बाळासाहेब घाटे यांनी सांगितल्याप्रमाणे फोटो प्रिंट, सर्व्हीस रिपोर्ट, मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गासेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांनी सादर केलेले कोटेशन पत्र तसेच करण्यात आलेल्या पंचनाम्याची प्रत मे.युनाइटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, शिर्डी यांचेकडे दि.२९-०७-२०१६ रोजी पोहोच करण्यात आलेले असून इन्शुरन्स क्लेमची रक्कम लवकरात लवकर मंजुर होऊन त्याची रक्कम संस्थानला तातडीने मिळणेकरीता विनंती करण्यात आलेली आहे.

०२). मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांना संस्थानमार्फत देण्यात आलेल्या वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये जनरेटर सेटच्या फक्त इंजिनचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांना संस्थानमार्फत देण्यात आलेल्या वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमधील स्पेअर पार्ट लिस्टमध्ये रेडीएटर तसेच फॅन असेंब्लीचा समावेश केलेला नाही. श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल हे खुप संवदेनशील असल्याने याठिकाणचा वीजेचा पुरवठा अखंडीत राहावा याकरीता सदरचे १०१० के.व्ही.ए.क्षमतेचे जनरेटर सेट तातडीने सुरु करणे गरजेचे होते. त्यामुळे सदरचे १०१० के.व्ही.ए.क्षमतेचे जनरेटर सेट तातडीने मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचेकडुन दुरुस्त करुन घेणे गरजेचे होते.

तरी मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस् औरंगाबाद यांनी सादर केलेल्या कोटेशननुसार रेडीएटरचा फॅन, रेडीएटर असेंबली, बेल्ट, इनहायबीटर (करोजन), सेन्सॉर, प्रेस्सर इत्यादि मटेरीयकरीता रक्कम रु.५,३५,२५७/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख पस्तीस हजार दोनशे सत्तावन्न मात्र) तसेच ट्रान्सपोर्टी ग् ट्रान्झिट इन्शुरन्स, कॅनोपी डिसप्लेसमेंट व रिफीटींग, सायलेंसर पाईप रिमुव्हल व रिफीटींग इत्यादि करीता रक्कम रु.६९,०००/- (अक्षरी रक्कम रु.एकोणसत्तर हजार मात्र) याप्रमाणे एकत्रित रक्कम रुपये ६,०४,२५७/- (अक्षरी रक्कम रु.सहा लाख चार हजार दोनशे सत्तावन्न मात्र) इतका खर्च कळविलेला होता. परंतु मेट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस् औरंगाबाद यांनी सादर केलेल्या कोटेशनमध्ये इनहायबीटर (करोजन) हे मटेरीयल त्यांना देण्यात आलेल्या वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये असल्याने त्या मटेरीयलची असलेली रक्कम रु.२२,६६६/- त्यांना आदा करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी सादर केलेल्या कोटेशनमधून रु२२,६६६/- ही रक्कम वजा करावी लागणार असल्याने उर्वरीत मटेरीयलची रक्कम रु.५,१२,५९१/- (अक्षरी रक्कम रु.पाच लाख बारा हजार पाचशे एक्यान्नव मात्र) तसेच लेबर चार्जेसकरीता रक्कम रु.६९,०००/- (अक्षरी रक्कम रु.एकोणसत्तार हजार मात्र) याप्रमाणे एकत्रित रक्कम रु.५,८१,५९१/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख एक्याऐंशी हजार पाचशे एक्यान्नव मात्र) इतक्या आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर सबस्टेशन परीसरातील १०१० के.व्ही.ए. जनसेटरच्या दुरुस्तीस व त्याकामी आलेल्या एकत्रित रु.५,८१,५९१/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३७** **धर्मशाळा परिसरातील व्दारावती इमारत समोरील बागेतील चिल्ड्रेन पार्क मध्ये नविन खेळणी बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागा मार्फत धर्मशाळा परिसरात द्वारावती इमारती समोर बाग तयार करण्यात आलेली आहे. या बागेत वेगवेगळया प्रकारची शोभेची रोपे/ झाडे, लॉन, चिल्ड्रन पार्क, पाथ-वे, कारंजा तयार करणेत आलेला आहे. त्यामुळे या बागेत दररोज सकाळ-संध्याकाळ श्री साईनाथ रुग्णालयात येणाऱ्या रुग्णाचे नातेवाईक, द्वारावती निवासस्थान निवासासाठी थांबलेले साईभक्त, शिर्डी शहरातील नागरीक, संस्थान कर्मचारी यांची नेहमी वर्दळ असते

द्वारावती इमारत समोरील बागेत लहान मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकारची खेळणी असलेला चिल्ड्रे पार्क तयार करण्यात आलेला आहे. सदर चिल्ड्रेन पार्क मधील दर्शनी भागात लहान मुलांसाठी खेळणी असलेबाबतचे फलक लावण्यात आलेले आहे. तसेच सदर बागेत संरक्षण विभागामार्फत पहारेकऱ्याची नेमणुक करण्यात आलेली आहे. परंतु ड्युटीवरील पाहरेकरी बागेत ड्युटीच्या ठिकाणीथांबत नसल्याने पार्कमधील झोपाळयावर व अन्य खेळणींवर महिला, माणसे व मोठी मुले बसत असतात. त्यामुळे तेथील झोपाळे व इतर खेळणी तुटुन पुर्णत खराब झालेल्या आहेत. यापुर्वी मॅकेनिकल विभागामार्फत सदर ठिकाणच्या खेळणी दुरुस्त करण्यात आलेल्या होत्या परंतु वारंवार खेळणी तुटत असल्याने तेथील खेळणींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेलेआहे.

द्वारावती इमारत समोरील बागेतील चिल्ड्रेन पार्क मधील खेळणी तुटुन खराब झालेली असल्याने या ठिकाणी नव्याने खेळणी खरेदी करुन बसविणे आवश्यक आहे. सदर बागेत 1. Four Seater arc Swing, 2. Four Seater mgr, 3. Combination set 3 in 1, 4. Wide slide, 5. A to B PGKD 04 इ. खेळणी खरेदी करुन बसविता येईल. सदर खेळणी खरेदी करणे, वाहतुक करणे, फिटींग करुन देणेकामी अंदाजे रु. 2,95,000/- (दोन लाख पंच्यान्नव हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन घेऊन न्युनत्तम दराने खेळणी खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती इमारती समोरील बागेतील चिल्ड्रेन पार्क मधील खेळणी तुटुन खराब झालेली असल्याने या ठिकाणी नव्याने खेळणी खरेदी करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८** **कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने परफ्युजनिस्ट घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर आकृतीबंधात परफ्युजनिस्ट्चे तीन पदे मंजुर असुन आणखी एका पदास शासनाने मा उच्च न्यायालयाच्या मान्यतेस अधिन राहुन मंजुरी दिलेली आहे सध्या कायमस्वरुपी दोन परफ्युजनिस्ट कार्यरत आहेत.

दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. ३८४ अ नुसार दि. ०२/०९/२०१५ पासून ११ महिने कालावधीसाठी किंवा जाहिरातीमार्फत स्थायी पदावर उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत प्रतिमहा रु. २१,०००/- याप्रमाणे जय भवानी कंत्राटदारांमार्फत कंत्राटी पद्धतीने कामावर हजर करुन घेतलेल्या एक परफ्युजनिस्ट्ची कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३८४ ब नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ११ महिने कालावधीसाठी किंवा जाहिरातीमार्फत स्थायी पदावर उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर

घडेल तोपर्यंत एक परफ्युजनिस्ट संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत घेणेस व त्यास प्रतिमहा रु. २१,०००/- मात्र एकत्रित मानधन देण्यास मान्यता देण्यास आली होती.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन रुग्णालयाचे एच आर विभागाकडील दि. १७/१२/२०१५ चे मंजुर प्रशासकीय टिपणीनुसार कामगार विभाग यांनी जा.नं.एसएसएस/वशी७ए/३७७१/२०१५ दि. ०४ जानेवारी २०१६ अन्वये मे. जय भवानी एंटरप्रायजेस इंडिया प्रा लि., कॅम्प शिर्डी यांचेकडून दि ०२/०९/२०१५ पासून ०१ व दि. २७/१०/२०१५ पासून ११ महिने कालावधी किंवा सदर पदावर स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत १ असे एकुण ०२ कुशल कंत्राटी परफ्युजनिस्ट पुरविले होते. सदर नेमणूक कालावधी अनुक्रमे दि०१/०८/२०१६ व दि. २६/०९/२०१६ अखेर संपुष्टात येत आहेत.

सदर कंत्राटी कर्मचा-यांव्यतिरिक्त सध्या फक्त दोनच स्थायी स्वरुपात परफ्युजनिस्ट कार्यरत असल्याने ह्दयरोग रुग्णांची संख्या विचारात घेता उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे पुढील कालावधीसाठी दोन परफ्युजनिस्ची आवश्यकता आहे.

तरी, दि. ०१/०८/२०१६ व दि. २६/०९/२०१६ पासून ११ महिने कालावधीसाठी किंवा जाहिरातीमार्फत स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या कंत्राटदारामार्फत दोन कंत्राटी परफ्युजनिस्ट घेणेस व त्यांना दि. २०/११/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. १०१६ ला अनुसरुन स्थायी स्वरुपात काम करणा-या परफ्युजनिस्टचे (वेतनश्रेणी– ९३००– ३४८००, ग्रेड पे ४४००) सुरुवातीचे वेतनाइतकी रक्कम रु. ३०,०००/- (खालील कोष्टकात दर्शविलेप्रमाणे) एकत्रित मानधन देणेकामी मान्यता असावी.

| | |
|---|---|
| बेसिक | ९३०० |
| ग्रेड पे | ४४०० |
| डीए ११९ % (माहे जुलै २०१६) | १६३०३ |
| एकूण वेतन | ३०००३ |

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.५४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ११ महिने कालावधीसाठी अथवा जाहिरातीमार्फत स्थायी पदावर उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत दोन परफ्युजनिस्ट, संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत घेणेस व त्यांना प्रतिमहा रु.३०,०००/- मात्र एकत्रित मानधन देण्यास मान्यता देण्यास आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३९** **डॉ.राम महाजन यांची सोनोलॉजिस्ट पदावर Adhoc Basis पध्दतीने नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.राम शंकर महाजन सोनोलॉजीस्ट (कंत्राटी), श्री साईनाथ रुग्णालय यांचा दि. १९/०५/२०१६ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन अर्जामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे

"मी मेडीकल ऑफीसर (सोनोग्राफी) या पदावरुन दि. ३१ ऑगष्ट २०१२ रोजी निवृत्त झालो असुन, सध्या वरील पदावर कॉन्ट्रॅक्टवर काम करीत आहे. सध्याच्या नेमणूकीची मुदत दि १९/०७/२०१६ रोजी संपत असून त्यानंतर संस्थानला आवश्यकता असल्यास मी काम करण्यास तयार आहे. माझ्या वेतनाबद्दल खालील अपेक्षा आहेत. सध्या मला महिन्याला रु. ५४,०००/- एवढे वेतन दिले जाते. परंतु सर्व सुट्या या बिनपगारी असल्याने, प्रत्यक्षात तुटपुंजी रक्कमहातात पडते. तरी महिन्याला किमान रु. ९०,०००/- मिळावेत अथवा अन्य कर्मचा-यांप्रमाणे सर्व रजा पगारी मिळाव्यात."

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. २८७/२०१५ दाखल करणेत आले होते त्यावरील मा.न्यायालयाचे दि. १२ जानेवारी २०१५ चे आदेशानुसार न्युरोसर्जन– २, सोनोलॉजिस्ट– १, आरएमओ– १५, बीटीओ– १ Adhoc Basis पद्धतीने घेणेबाबत मान्यता दिलेली आहे.

दि. २७/०७/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. २३१ नुसार श्री साईनाथ रुग्णालयात सोनोलॉजिस्ट पदावर एक कुशल कंत्राटी कर्मचारी घेणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री साईबाबा संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या जय भवानी एंटरप्रायजेस, चिंचवड, पुणे, कॅम्प– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत रु. ५४,०००/- मासिक एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधीसाठी अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत डॉ. राम शंकर महाजन यांना सोनोलॉजिस्ट पदावर श्री साईनाथ रुग्णालयात दि. २०/०८/२०१५ पासून घेणेत आले होते. सदर कालावधी दि. १९/०७/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे .

डॉ. महाजन हे मेडीकल ऑफिसर (सोनोग्राफी), श्री साईनाथ रुग्णालय या पदावरुन दि. ३१ ऑगष्ट २०१२ रोजी निवृत्त झाले होते. सेवानिवृत्तीचे वेळी त्यांना खालीलप्रमाणे वेतन अदा केले जात होते.

| सेवानिवृत्त वेळचे वेतन | |
|---|---|
| बेसिक | २६,८७० |
| ग्रेड पे | ६,००० |
| डीए | २३,६६६ |
| एचआरए | ३,२८७ |
| टीए | ८०० |
| एकूण वेतन | ६०,६२३ |

श्री साईनाथ रुग्णालयात गरीब व गरजु रुग्णांवर कमी दरात उपचार केले जातात. सध्या संस्थानचे दोन्ही रुग्णालयात स्थायी स्वरुपात सोनोलॉजिस्ट पदावर एकही वैद्यकीय अधिकारी कार्यरत नाही. मात्र श्री साईनाथ रुग्णालयात कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने फक्त एकच डॉ. महाजन कार्यरत आहेत. परंतु त्यांचा नेमणुक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांना आता मा. न्यायालयाचे आदेशानुसार Adhoc basis पद्धतीने दि. २०/०७/२०१६ पासून ०१ वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत सेवानिवृत्तीचे वेळचे बेसिक – ग्रेड पे व सध्याचा डीए (खालील कोष्टकात दर्शविलेप्रमाणे) विचारात घेऊन रु.७०,०००/- एकत्रित मानधन देऊन नेमणूक देता येईल, असे नम्र मत आहे.

| | |
|---|---|
| बेसिक (सेवानिवृत्तीवेळचे) | २६,८७० |
| ग्रेड पे | ६,००० |
| डीए ११९% (माहे जुन२०१६) | ३९,११५ |
| एकूण वेतन | ७१,९८५ |

तरी, डॉ.महाजन यांना मा.न्यायालयाचे आदेशानुसार Adhoc basis पद्धतीने नेमणूक व रु७०,०००/- एकत्रित मासिक मानधन देणेकामी निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५४८** **डॉ.राम शंकर महाजन, सोनोलॉजीस्ट (कंत्राटी) हे मध्यंतरीच्या कालावधीमध्ये मयत झाले असलेबाबतची माहिती सभेस मिळाली, यामुळे सदरहू विषय रद्द करणेत आला.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४०** **श्री साईबाबा रुग्णालयातील Adhoc basic पध्दतीने नेमणूक करावयाच्या कार्डीओलॉजीस्टचे मानधन ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्टचे २ पदे व नॉनइंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्टचे १ पद मंजूर असुन डॉ.बजाज व डॉ.गौरव वर्मा यांची इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे तथापि डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांना त्यांनी केलेल्या गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत खातेचौकशी पूर्ण होईपर्यंत दि ०८/११/२०१४ पासून संस्थान सेवेतून तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे.

उपरोक्त दोन्ही डॉक्टर्सना निलंबित केल्याने रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी व व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरती नेमणूक करणेकरिता सिव्हील ॲप्लीकेशन नं. २७९७/२०१४ वरील मा. उच्च न्यायालयाचा दि. १९/०३/२०१४ रोजीचे आदेशानुसार ०२ कंत्राटी व ०५ व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक देणेकामी मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन हॉस्पिटलकडे उपलब्ध असलेल्या कार्डीओलॉजीस्ट अर्जदारांच्या दि. २३/०३/२०१४ रोजी मुलाखती घेऊन डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांना अनुक्रमे रु ३,००,०००/- (रुपये तीन लाख मात्र) व रु. १,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) एकत्रित मासिक मानधन देऊन कंत्राटी पद्धतीने तर डॉ. बजाज, डॉ. ठेंगे, डॉ. काळे, डॉ. हिरण व डॉ. विजन यांना प्रोत्साहन भत्ता (Incentive) देऊन व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरते सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यापैकी डॉ. शितलकुमार हिरण व डॉ. विनोद विजन हे हजर झालेले नव्हते. सदर नेमणूकांस मा त्रिसदस्य समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७५ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त ०६ महिन्यांसाठीची नेमणूक संपुष्टात आल्याने मा. त्रिसदस्य समितीचे दि. ११/०९/२०१४चे सभेतील निर्णय क्र. ७८५ नुसार पुन्हा मुदतवाढ देणेकामी मा. न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये ०१ वर्ष कालावधीसाठी किंवा डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांची चौकशी पुर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्याकालावधीपर्यंत पुर्वीच्याच अटीशर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयाच्या मंजुरीनुसार तात्पुरत्या स्वरुपात Adhoc बेसिसवर डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांना नेमणूक देण्यात येऊन त्यांना अनुक्रमे मासिक एकत्रित मानधन रुपये तीन लाख व दीड लाख देण्यात येत होते. त्यानंतर डॉ. प्रशांत पवार यांना व्हिजीटींग पद्धतीने काम करावयाचे असल्याने त्यांनी कंत्राटी पद्धतीच्या कामाचा राजीनामा दिल्याने त्यांचा सदर पदाचा राजीनामा मंजूर करुन व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक देण्यात आली व त्यांचे जागेवर डॉ. भारत जैन यांना दि. ०३/०३/२०१५ रोजी पासून कंत्राटी पद्धतीने नेमणूक देण्यात आली होती व त्यांना डॉ. प्रशांत पवार यांचेप्रमाणेच रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार मानधन देण्यात आले मात्र त्यांनीही दि. ३१ मे २०१६ रोजी एक महिना लेखी पूर्व राजीनामा नोटीस सादर केली आहे तथापि त्यांचा राजीनामा अद्यापपर्यंत मंजूर झालेला नाही व ते दि ०१/०७/२०१६ पासून अनधिकृत गैरहजर आहेत.

मा. व्यवस्थापन समिती दि. ९/१२/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. १०३५ नुसार ह्दयरोग रुग्णांची संख्या विचारात घेता आणखी चार कार्डीओलॉजीस्टसाठी कार्योत्तर मान्यता आहे. उपरोक्त दोन्ही डॉक्टर्सना (डॉ. बजाज व डॉ. वर्मा) निलंबित केल्याने रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी Ad hoc बेसिसवर तात्पुरत्या स्वरुपात नविन कार्डीओलॉजिस्टची नेमणूक करणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३९३७/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर मा. न्यायालयाचे दि. १०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार चार कार्डीओलॉजिस्ट वैद्यकीय अधिका-यांना Ad hoc बेसिस वर नेमणूक करणेस मान्यता दिलेली आहे.

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार एक कार्डीओलॉस्ट्वी (डॉ. धिरज मोरे) नेमणूक करणेत आलेली आहे. दि.०६/०५/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे निर्णय क्र. २७३ नुसार डॉ. धिरज मोरे यांना एकत्रित मासिक रु.१,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार मात्र) देणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

सबब, मा. त्रिसदस्य समितीत कंत्राटी अथवा Adhoc Basis पद्धतीने नेमण्यात आलेल्या कार्डीओलॉजीस्ट यांना (डॉ. मनोहर शिंदे, कंत्राटी कार्डीओलॉजीस्ट यांचे व्यतिरिक्त) देण्यात आलेले मानधनाबाबतचे यापुर्वी झालेले निर्णय हे वैयक्तिक नावाने (डॉ. प्रशांत पवार, डॉ. भारत जैन, डॉ.धिरज मोरे) झालेले असुन कंत्राटी अथवा Adhoc basis पद्धतीने नेमणूक करावयाच्या कार्डीओलॉजीस्ट या पदासाठी किती मानधन द्यावे याबाबत मात्र निर्णय झालेला नाही. सबब, आता येथुन पुढे कंत्राटी अथवा Adhoc Basis पद्धतीने नव्याने नेमणूक करावयाच्या कार्डीओलॉजीस्टना एकत्रित मासिक मानधन रु. १,५०,०००/- (दीड लाख रु.मात्र) देणेबाबतचा विषय धोरणात्मक बाब असल्याने मा. त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोग रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरिता Adhoc basic पध्दतीने नेमणूक करावयाच्या कार्डीओलॉजीस्ट यांना यापुढे रु.१,५०,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४१** **शिर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं.६४/२०१६ भा.द.वि.क.४०८, ४०९ या गुन्हयाबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचेमार्फत सुरु असलेल्या तपासाकामी संस्थानचे वतीने माहिती व कायदेशीर कागदपत्रे पुरविणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान रुग्णालयातील निलंबित डॉक्टर्स डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा यांचे वर संस्थानच्या वतीने शिर्डी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६४/२०१६ प्रमाणे गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचेमार्फत सध्या सुरु आहे. सदर गुन्ह्याचे तपासाकामी स्थानिक गुन्हे शाखा संस्थानकडे पुराव्याची माहिती गोळा करण्यासाठी विविध कागदपत्रे, माहिती घेणेकामी व साक्षीदार म्हणुन रुग्णालयातील डॉक्टर्स व इतर कर्मचा-यांना समक्ष बोलवित आहेत.

सदरचे तपासाकामी स्थानिक गुन्हे शाखा यांना संस्थानकडे मागणी नुसार उपलब्ध कागदपत्रे, माहिती, साक्षीदार इत्यादी कायदेशीर कामांसाठी संस्थानच्या वतीने बाजु मांडण्यासाठी ॲडव्होकेट ची नेमणुक केल्यास सदर कामांत संस्थानला योग्य रितीने व कायदेशीर बाबींची पुर्तता करता येईल.

संस्थानचे कामगार विभागामार्फत दोन्ही डॉक्टरांच्या गैरवर्तनाबाबत खाते चौकशी अधिकारी श्री जे.एल.देशपांडे साहेब, सेवा निवृत्त न्यायाधिश, यांचेतर्फे खाते चौकशी चालु आहे सदर चौकशीकामी संस्थानच्या वतीने सादरकर्ते अधिकारी म्हणुन विधी व्यावसायिक ॲड.सी.जे.बोरुडे, अहमदनगर यांची मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.१२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार नेमणुक करण्यात आलेली असून त्यांना दि.१९.०५.२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रत्येक तारखेस मानधन, प्रवासखर्च व इतर सर्व समावेशक खर्चापोटी रु.५०००/- इतके मानधन अदा करण्यात येत आहे.

तरी ॲड.बोरुडे याच केस संदर्भातील कामकाज पाहत असल्याने, स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचेमार्फत चालू असलेल्या तपासकामी संस्थानच्या वतीने कायदेशीर बाब, माहिती व इतर तपासाचे दृष्टीने पुर्तता करणे व संस्थानची बाजू मांडणकामी ॲडश्री.सी.जे.बोरुडे, अहमदनगर यांची सदरकामी नेमणुक करणेस व ॲडश्री बोरुडे, हे अहमदनगर येथेच राहत असल्याने त्यांना सदरचे कामकाजासाठी प्रत्येक तारखेला रु.३५००/- मानधन अदा करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं.६४/२०१६ भा.द.वि.क.४०८, ४०९ या गुन्हयाबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचेमार्फत सुरु असलेल्या तपासाकामी संस्थानचे वतीने माहिती व कायदेशीर कागदपत्रे पुरविणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास तत्कालीन त्रीसदस्य समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु तरीही सदरहू प्रस्ताव फेर-विचारार्थ हॉस्पिटल उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४२** **तज्ञ सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनाविषयक तसेच बिंदुनामावलीकामासाठी व्हिजीटींग पध्दतीने नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे आस्थापनाविषयक कामकाजात वरीष्ठ अधिका-यांचे निर्देशानुसार वेळोवेळी तज्ञ अनुभवी शासकिय अधिका-यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे व आताही घेण्यात येत आहे. तसेच संस्थानचे सेवा विनियम बनविणेसाठी तज्ञ शासकिय अधिका-यांचे मार्गदर्शन घेण्यात आले होते.

संस्थान रुग्णालयाचे बिंदु नामावली बनविणेसाठी मंत्रालयातील संबंधित विषयातील तज्ञाचे मार्गदर्शन घेणेकामी दि. १४/०५/२०१५ रोजी टिपणी सादर करणेत आली होती सदर टिपणीवर "जिल्हा / विभागीय स्तरावरील मागासवर्ग कक्षातील अधिकारी यांचे मार्गदर्शन घेण्याच्या पर्यायाचा प्रथम विचार व्हावा" असे तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी निर्देश दिले होते.

मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे वरील निर्देशानुसार संस्थानचे रुग्णालयातील रिक्त पदे भरणेसाठी आरक्षण ठरविणेकामी श्री.त्र्यं.अ. खैरे, माजी लेखाधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून मार्गदर्शन घेण्यात आले होते. शासनाचे सेवेत असतांना त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि आर्थिक तरतुदी याविषयीची संकलन पुस्तिका तसेच सरळसेवा भरती प्रक्रिया आणि बिंदुनामवली नोंदवही या संबंधीची संकलन पुस्तिका तयार करुन प्रकाशित केली आहे आता श्री त्र्य अ खैरे सेवानिवृत्त झाले असून सध्या ते प्रशासकिय अधिकारीपदावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक येथे कार्यरत आहेत.

श्री खैरे यांना संस्थानकडील आस्थापना विषयक व बिंदुनामावली कामकाजा संदर्भात मार्गदर्शन करणेकामी विचारणा केली असता त्यांनी महिन्याचे पहिला व तिसरा शनिवार व प्रत्येक रविवार या दिवशी शिर्डी येथे येऊन कामकाज पाहण्यास सहमती दर्शविली आहे. सदर कामकाजासाठी मानधनाबाबत विचारणा केली असता त्यांनी महाराष्ट्र शासनाचे यशदा संस्थेत लेक्चरर्सना देण्यात येणारे मानधनाप्रमाणे मानधन मिळावे अशी समक्ष विनंती केली आहे.याकामी संबंधितांकडे विचारणा केली असता यशदामध्ये लेक्चसर्सना प्रति तासिका (९० मिनिटे) रु.१,५००/- याप्रामाणे एका दिवशी जास्तीत जास्त चार तासिकेसाठी रु.६,०००/- अदा केले जातात.

तरी, संस्थानचे आस्थापना विषयक व बिंदुनामावली कामकाजासाठी श्री त्र्यं अ खैरे यांची नेमणूक करणेचे ठरल्यास त्यांना प्रति दिवस जास्तीत जास्त रु.३,०००/- पर्यंत मानधन तसेच नाशिक– शिर्डी– नाशिक या प्रवासाचे प्रवासभाडे, संस्थान प्रसादालयात प्रसाद भोजन (मोफत) तसेच प्रसंगी संस्थान कामासाठी मुक्कामाची गरज भासल्यास निवासस्थान (मोफत) देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे आस्थापना विषयक व बिंदुनामावली कामकाजासाठी श्रीत्र्यं.अ. खैरे, माजी लेखाधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांची नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

**प्रस्तावित केलेप्रमाणे त्यांना प्रति दिवस रु.३,०००/- मात्र मानधन व शिर्डी भेटी दरम्यान नाशिक- शिर्डी- नाशिक प्रवासभाडे देण्यात यावे. तसेच शिर्डी येथे त्यांची निवास व भोजन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी. परंतु सदरहू काम पुर्ण करणेसाठी त्यांना जास्तीतजास्त दोन महिने (६० दिवस) मुदत देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ प्र.अधिक्षक, मागासवर्ग कक्ष)

---

**विषय नं.४३** **विशेष लेखा परिक्षण अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.५५२** सदरहू विषय नव्याने गठीत करणेत आलेल्या रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४४** **संस्थान कर्मचारी उपचारार्थ बाहेरील हॉस्पिटल संस्थानच्या मान्य यादीतील रुग्णालयात समाविष्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे कर्मचारी हे दोन्ही रुग्णालयात (साईनाथ व साईबाबा हॉस्पिटलमध्ये) उपचार होत नसेल तर अशा रुग्णास संस्थानच्या रेफर लेटरव्दारे संस्थान मान्य बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यास पाठविण्यात येते. तसेच संस्थानच्या मान्य यादीत एकुण २४ रुग्णालये असून तेथे रुग्णास वेगवेगळ्या प्रकारचे उपचार करण्यात येतात. त्यामध्ये काही रुग्णालये हे दुरचे असून सदरच्यारुग्णालयात विशिष्ट प्रकारचे सर्जरी होत नसल्यामुळे कर्मचा-यास बील परतावा मिळत नाही.

संस्थानच्या मान्य यादीतील एकुण २४ रुग्णालयापैकी Vitro Retinal Cornea हे डोळयाचे ऑपरेशन फक्त Bombay Hospital, Mumbai येथेच होते. परंतू सदर हॉस्पीटल लांबचे व खर्चिक असल्यामुळेसदर ऑपरेशनसाठी कर्मचारी तेथे न जाता खाजगी रुग्णालयात जातात व बीलाची मागणी करतात. सदर शस्त्रक्रिया संस्थानच्या रुग्णालयात होत नसल्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे डॉ.सोनटक्के यांनी सदर ऑपरेशनबाबत वैद्यकीय संचालक यांच्याकडे संस्थानच्या मान्य यादीत जवळचे हॉस्पिटल समाविष्ट करण्यात येणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदर रुग्णालय हे जवळचे व कमी दरात उपचार होतील. त्याकरीता खालील रुग्णालयाची नावे सुचविले आहे

१) श्री गणपती नेत्रालय, जालना (चॅरिटेबल हॉस्पीटल)

२) तुलसी आय हॉस्पीटल, नाशिक (चॅरिटेबल हॉस्पीटल)

३) दृष्टी आय इन्स्टीट्युट, औरंगाबाद (खाजगी हॉस्पिटल)

हे दोन्ही रुग्णालय समाविष्ट करण्यात यावी. सदर रुग्णालय चॅरिटेबल व चांगल्या प्रकारची उपचार करणेत येतात असा अभिप्राय त्यांनी दिलेला आहे.

तसेच संस्थानच्या मान्य यादीत Endoscopy, Gastroenterology, Advance Laparoscopic Bariatric metabolic Surgery, Oncology with therapeutic endoscopy अशा सर्जरीसाठी बाहेरील हॉस्पिटलमध्ये पाठविता येतात. परंतू वरील पोटाचे आजार हे एकाच हॉस्पिटलमध्येहोत असल्याने आजाराचे निदान करण्यास सोपे जाते. M/s. Bhagwati Superspeciality Endoscopy Hospital, Nashik (खाजगी रुग्णालय) यांनी दि.२४.०६.२०१५ च्या अर्जान्वये संस्थान रुग्णालयात उपचारार्थ समाविष्ट करावे असे कळविले आहे.

संस्थानच्या मान्य यादीतील कॅन्सर हॉस्पिटल-

१) नामको हॉस्पिटल, नाशिक (चॅरिटेबल हॉस्पीटल)

२) टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई (चॅरिटेबल हॉस्पीटल)

३) बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई (चॅरिटेबल हॉस्पीटल)

४) प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी (चॅरिटेबल हॉस्पीटल)

उपरोक्त रुग्णालये समाविष्ट आहे. Curie Manvata Cancer Centre, Nashik यांच्या दि.३०.०७.२०१५ अर्जाव्दारे संस्थानच्या मान्य यादीत समाविष्ट करण्यात यावे यासाठी मागणी केलेली आहे. सदर रुग्णालयात वेगवेगळ्या कॅन्सरचे उपचार एकाच ठिकाणी होतात, असा त्यांनी अभिप्राय दिलेले आहे. टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे संस्थानचे कर्मचारी अथवा त्यावर अवलंबीतांना पाठविणेत येत असते परंतू टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे रुग्णास जास्त प्रमाणात विलंब होत असल्याने रुग्णांना तातडीचे उपचार घेणे गरजेचे असल्याने तेथून पुन्हा रुग्णांस Curie Manvata Cancer Centre, Nashik मध्ये पाठविले जाते. तसेच Curie Manvata Cancer Centre, Nashik हे चॅरिटेबल असून इतर हॉस्पिटलच्या तुलनेत कमी दरात उचार होतात. तसेच तेथील मेडीकलमधील औषधे हे देखील ना नफा ना तोटा तत्वावर मिळतात.

तसेच मे. अपोलो हॉस्पिटल, नाशिक (खाजगी हॉस्पिटल) यांच्या दि. २९/०७/२०१५ च्या पत्राव्दारे अपोलो हॉस्पिटल नाशिक हे संस्थानच्या मान्य यादीत समाविष्ट करावे असे नमूद केले आहे तसेच एकाच हॉस्पिटलमध्ये वेगवेगळया आजाराचे उपचार एकाच ठिकाणी केले जातात असा अभिप्राय त्यांनी दिलेला आहे.

तरी खालील नमुद केलेले रुग्णालय संस्थानच्या मान्य यादीत समाविष्ट करणेबाबत सुचविले आहे

| अ.नं. | रुग्णालयाचे नांव | रुग्णालयाचा प्रकार | उपचाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | श्री गणपती नेत्रालय, जालना | चॅरिटेबल हॉस्पीटल | डोळ्याचे सर्व प्रकारचे ऑपरेशन व Vitro Retinal Cornea |
| २ | तुलसी आय हॉस्पीटल, नाशिक | चॅरिटेबल हॉस्पीटल | डोळ्याचे सर्व प्रकारचे ऑपरेशन व Vitro Retinal Cornea |
| ३ | दृष्टी आय इन्स्टीट्युट, औरंगाबाद | खाजगी हॉस्पिटल | डोळ्याचे सर्व प्रकारचे ऑपरेशन व Vitro Retinal Cornea |
| ४ | क्युरी मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक | चॅरिटेबल हॉस्पीटल | सर्व प्रकारचे कॅन्सरवर एकाच ठिकाणी उपचाराकरीता |
| ५ | भगवती सुपरस्पेशालिटी एन्डोस्कोपी हॉस्पिटल, नाशिक | खाजगी हॉस्पिटल | सर्व प्रकारच्या एन्डोस्कोपी व पोटाचे आजाराकरीता |
| ६ | अपोलो हॉस्पिटल, नाशिक | खाजगी हॉस्पिटल | जनरल हॉस्पिटल |

(तरी उपरोक्त सादर प्रस्तावामधुन अ.नं.१ व २ मधुन कुठल्याही एका रुग्णालयाचे व अ.नं.४ रुग्णालयाची आवश्यकता आहे. सदरचे रुग्णालये हे चॅरिटेबल आहे.)

तरी उपरोक्त हॉस्पिटल संस्थान मान्य यादीत समाविष्ट करणेबाबतचा प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ज्या आजारांवर संस्थानचे दोन्ही (साईनाथ व साईबाबा हॉस्पिटल) रुग्णालयात उपचार होत नसेल अशा आजारांच्या पुढील उपचारासाठी संस्थान कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबीतांना संस्थान मान्य यादीत समाविष्ट असलेल्या बाहेरील हॉस्पिटलमध्ये पाठविले जाते. या मान्य यादीत उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या श्री गणपती नेत्रालय, जालना, तुलसी आय हॉस्पीटल, नाशिक व क्युरी मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक या धर्मदाय रुग्णालयांचा समावेश करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री गुरुजी रुगणालय, नाशिक व डॉ.हेगडेवार रुग्णालय, औरंगाबाद या धर्मदाय रुग्णालयांचाही संस्थानचे मान्य यादीमध्येसमावेश करणेत यावा, अशा सूचना करण्यात आल्या.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४५** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकीय बिलात देण्यात येणाऱ्या सवलतींची सुधारीत नियमावलीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय अशी दोन रुग्णालये चालविली जात असुन, या दोन्ही रुग्णालयात रुग्णांना त्यांचे बिलामध्ये देण्यात येणारी सवलत मा.व्यवस्थापन मंडळाने वेळोवेळी घेण्या आलेल्या निर्णयांनुसार देण्यात येत आहे. रुग्णांना देणा-या सवलतीत सुसुत्रता असावी, दोन्ही रुग्णालयांसाठी एकच नियमावली असावी, त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन व्हावे, मा.धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयाकडुन येत असलेल्या या बाबतच्या विविध सुचनांचा अंतर्भाव व्हावा, या हेतुने रुग्णालयातील संबंधित विभागांकडुन अभिप्राय मागवुन वित्तविभागामार्फत सुधारीत नियमांची नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर सवलत नियमावली पुढीलप्रमाणे-

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकीय बिलात देण्यात येणाऱ्या सवलतींची सुधारीत नियमावली

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांमध्ये उपचार घेत असतांना/घेतल्यानंतर रुग्णांना रुग्णालयाचे झालेल्या एकुण बिलांमध्ये सवलत देणेसाठी खालीलप्रमाणे नियमावली बनविणेत येत आहे. या नियमावलीचे सर्व

संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे. नियमबाह्य दिल्या गेलेल्या सवलतीस संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

1. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना द्यावयाच्या सवलतीसाठी हॉस्पिटलचे मेडीकल सोशल वर्कर यांनी रुग्णांची आर्थिक परीस्थिती जाणुन घेणेसाठी रुग्णांकडुन सवलतीस पात्र असलेले सर्व कागदपत्रे प्राप्त करुन त्याची माहिती विहीत नमुन्यात भरुन सदर फॉर्मवर स्वाक्षरी करुन मान्यतेसाठी मा.वैद्यकीय संचालक व उप वैद्यकीय संचालक यांचेकडे पाठवावेत. मंजुरी देण्यात आलेल्या रुग्णांनाच वैद्यकीय बिलात सवलत देण्यात यावी. तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सवलत घेणा-या रुग्णांच्या कागदपत्रांची तपासणी करण्याचे अधिकार मेडीकल सोशल वर्कर व कार्यालय अधिक्षक यांचे राहील, तसेच रु.५०००/- पर्यंतचे अधिकार तेथील वैद्यकीय अधिक्षक व त्यापुढील अधिकार प्रचलित पध्दतीनुसार वैद्यकीय संचालक यांना राहतील.

2. मा.वैद्यकीय संचालक/उप वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक यांचे रजा सुट्टीचे दिवशी त्यांचा चार्ज ज्या अधिका-यांकडे सोपविणेत आला असेल, त्यांना तेवढ्या काळासाठी रुग्णांच्या बिलांमध्ये नियमाप्रमाणे सवलत देण्याचे अधिकार राहतील.

3. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या आस्थापनावर असलेल्या कायम कर्मचा-यांबाबत वैद्यकीय देखभाल नियम १९९९ नुसार सवलत यापुढेही लागु राहतील.

4. संस्थानचे आस्थापनेवर काम करत असलेल्या कायम अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांचे वेतनश्रेणीनुसार मा.व्य.स. निर्णय क्र.५२५/दि.२१.०६.२००९ अन्वये, पुढीलप्रमाणे हॉस्पिटलची रुमसेवा लागु राहतील, तसेच वेतनश्रेणीप्रमाणे लागु असलेल्या वार्डमध्ये ॲडमिट केल्यास त्या दोन्ही वार्डमधील सेवाकारातील असलेली तफावत कर्मचा-यांकडुन भरुन घेतली जाईल.

वेतनश्रेणी रुग्णालयात देण्यात येणारी रुमसेवा-

| अ.नं. | ६ व्या वेतन आयोगा-प्रमाणे वेतनश्रेणी (वेतनबँड) | ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे ग्रेड पे | रुमसेवा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | वेतनश्रेणी ९३००-३४८०० | ग्रेड पे ५००० पासुन पुढे | डिलक्स रुम |
| २ | वेतनश्रेणी ९३००-३४८०० | ग्रेड पे ४३०० ते ४९०० | स्पेशल एसी रुम |
| ३ | वेतनश्रेणी ९३००-३४८००<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० | ग्रेड पे ४२००<br>ग्रेड पे १८०० ते ३५०० | व्टीन शेअरींग रुम |
| ४ | वेतनश्रेणी ४४४०-७४४० | ग्रेड पे १३०० ते १७०० | सेमी प्रायव्हेट/जनरल वार्ड |

5. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणा-या मोफत वैद्यकीय सेवेसंबंधित नियमावली २०१२ जा.क्र.एसएसएसटी/एसएसबीएच/वित्त-२८६/२०१२, दि.३१.०१.२०१२ प्रमाणे वैद्यकीय सवलती लागु राहतील. यामध्ये ज्या कंत्राटी कर्मचा-यांची सेवा ०१ ते ०५ वर्षापर्यंत झालेली असेल त्यांना वैद्यकीय बिलामध्ये जास्तीत जास्त रु.३०,०००/- पर्यंत *(सदर कर्मचारी किंवा त्यांचे कुटूंबिंय दुर्बल/निर्धन वर्गातील असतील तर त्यांना मा.उच्च न्यायालयाचे पीआयएल क्र.३१३२/२००४ प्रमाणे सवलत देण्यात यावी.)* व ज्या कंत्राटी कर्मचा-यांची संस्थानमधील सेवा ०५ वर्षाच्या पुढे झालेली असेल त्यांना दोन्ही रुग्णालयांत संपुर्णपणे मोफत वैद्यकीय सेवा देण्यात येईल, तसेच कंत्राटी कर्मचारी व त्यांचेवर अवलंबित असणा-या व्यक्तींना केवळ जनरल वार्डमध्येच भरती करण्यात येईल. त्याव्यतिरीक्त इतर वार्डमध्ये भरती करावयाचे झाल्यास रुमसेवाकार यांचा फरक संबंधित कर्मचाऱ्यांना भरावा लागेल. *(कंत्राटी पध्दतीने घेतलेले डॉक्टर्स नर्सेस स्टाफ यांना त्यांचे ग्रेड नुसार वार्डमध्ये भरती करण्यात येईल)*

6. संस्थान सेवेत मानधन/नियमवेतन (Fix Pay) तत्त्वावर असणा-या कर्मचा-यांना ते संस्थान सेवेत असेपर्यंत दोन्हीरुग्णालयांमध्ये कायम कर्मचा-यांप्रमाणे केवळ मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ देणेत यावा. त्याव्यतिरीक्त इतर कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

7. संस्थान कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर ते हयात असेपर्यंत संस्थानमधील कायम कर्मचा-यांप्रमाणे स्वतः,त्यांची पत्नी/पती व आई-वडील यांना श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुर्णपणे मोफत औषधोपचार देण्यात यावेत, तसेच संस्थान रुग्णालयांतील डॉक्टरांचे शिफारशीनुसार बाहेरुन घेतलेल्या/केलेल्याऔषधोपचाराचा खर्च संस्थान सेवेतील कायम कर्मचा-यांप्रमाणेच देण्यात येईल.

8. संस्थान सेवेत असतांना कायम कर्मचाऱ्यांचा मृत्यु झाल्यास, त्यांचेवर अवलंबित कुटूबियांनाश्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये पुर्णपणे मोफत उपचार व इतर रुग्णालयात घेतलेले उपचार संस्थान कायम कर्मचा-यांप्रमाणेच देण्यात यावेत. (अवलंबित कुटुंबियांना सदर मयत *अधिकारी/कर्मचारी संस्थान सेवानिवत्तीच्या तारखेपर्यंत व तद्नंतर मयत कर्मचा-याची पत्नी/पती व आई-वडील यांनाच केवळ ही सवलत लागु राहील)*

9. संस्थान कर्मचा-यांना संस्थानचे रुग्णालयात औषधे उपलब्ध न झाल्यास ती औषधे बाहेरुन विकत आणावी लागतात. याकामी कर्मचा-यांना दरवर्षी वैद्यकीय बिलाचा परतावा रु.२०,०००/- पर्यंत देण्यात यावा. त्यापुढील वैद्यकीय बिलाचा परतावा देणेसाठी रितसर मा.व्यवस्थापन समितीची मंजुरी घेण्यात यावी.

10. संस्थानचे शैक्षणिक संकुलात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे वेळेत अचानक आकस्मात गंभीर आजार उद्भवल्यास, अपघात, मारहाण वगैरे प्रसंगी दोन्ही रुग्णालयात औषधांसह संपुर्णमोफत उपचार देण्यात यावेत. तसेच इन्टर्नी डॉक्टर्स (BAMS/BHMS/MBBS) हे रुग्णांना मोफत सेवा देत असतात, त्यामुळे त्यांनाही दोन्ही रुग्णालयांत त्यांचे सेवाकाळात मोफत उपचार देणेत यावेत.

11. वृध्दाश्रमातील वृध्द, उपासणी महाराज देवस्थान, साकुरी येथील कन्या, संवत्सर येथील आश्रम, मतीमंद, अंध,पुर्णतः अपंग माजी सैनिक, अनाथ/बालसुधारगृहातील मुले यांना दोन्हीरुग्णालयांत संपुर्णपणे मोफत उपचार देणेत यावेत. परंतु सदर रुग्णहा संबंधित वर्ग/आश्रम/बालसुधारगृहातील असलेबाबतचा पुरावा जमा करणे आवश्यक राहील, तसेच रुग्णालयात काही अनोळखी रुग्ण (बेवारस) भरती झाल्यास त्यांची योग्यती माहिती घेऊन त्यानुसार अहवाल तयार करावा व सदर रुग्णांचे बिलात पुर्णपणे सवलत देणे आवश्यक राहील.

12. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे आजी मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त यांना दोन्ही रुग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा देणेत यावी.

13. मा.उच्च न्यायालय, मुबंई यांचे रिट याचीका(पीआयएल) क्र.३१३२/२००४ मधील दि.१७.०८.२००६ व दि.१५.०४.२००९ च्या आदेशाचे पालन करावे. त्यात निर्धन व दुर्बल घटकांसाठी देण्यात येणा-या सवलती त्यांचेकडुन उपलब्ध करुन घ्यावयाची कागदपत्रे यांचे पुर्णतः तंतोतंत पालन करण्यात यावेत. *(पिवळ्या/केशरी रंगाची शिधापत्रिका, तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला व ओळखपत्र इ.ग्राह्य धरणेत येईल.)*

14. प्राणीदंश, सर्पदंश, कुत्रा चावणे, Unknown Bite, अचानक उद्भवलेली नैसर्गिक आपत्ती, डायलेसीस रुग्ण, थॅलेसिमिया, उस तोडणी कामगार *(उस तोडणी कामगार यांचेकरीता कारखान्याचे पत्र आवश्यक राहील)* यांना दोन्हीही रुग्णालयांत पुर्णतः मोफत वैद्यकीय सेवा/औषधोपचार देण्यात यावेत.

15. दोन्ही रुग्णालयात औषधोपचार चालु असतांना रुग्णांचा मृत्यु झाल्यास त्या रुग्णाचे नातेवाईकांकडुन रक्कम भरुन घेण्याचे प्रयत्न करावेत, परंतू त्यांचेवर सक्ती करु नये. अथवा उर्वारीत रक्कम सवलतीचा अर्ज रुग्णाचे नातेवाईकांकडुन भरुन घेऊन सवलत देण्यात यावी. तसेच मयत रुग्णांचा मृतदेह झाकुन देणेसाठी नविन सफेद कापड५ मिटर रुग्णालय व्यवस्थापनाकडुन मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे. *(सदर सवलत देणेसाठी पिवळ्या/केशरी रंगाची शिधापत्रिका व ओळखपत्र उपलब्ध असल्यास घेणे आवश्यक राहील)*

16. रुग्णांस कोणतेही कागदपत्रे उपलब्ध होऊ शकत नसल्यास *(उदा.दुरवरुन येणारे साईभक्त उत्पन्नाचे, दारीद्र रेषेचे दाखले, रेशनकार्ड इ. कागदपत्रे सोबत घेऊन येत नाहीत)* अनोळखी किंवा बेवारस रुग्ण, भटके/विमुक्त *(उपजिविका/उदनिर्वाहार्थ कायम स्थलांतर करणारे त्यांना रेशनकार्डच नसल्याने उत्पन्नाचा दाखला मिळत नाही, दारिद्र रेषेच्या यादीत नावच समाविष्ट नाही असे रुग्ण)* इ. रुग्ण किंवा नातेवाईक यांचा सवलत मागणीचा अर्ज ग्राह्य धरुन मेडीकल सोशल वर्कर यांनी त्या रुग्णांची समक्ष शहानिशा करुन वैद्यकीय संचालक, उप वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षक यांचेमार्फत त्यांना योग्य ती नियमाप्रमाणे सवलत देण्यात यावी.

17. मा.अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ विश्वस्त यांनी सवलत देणेसाठी लेखी शिफारस केल्यास सदर रुग्णांकडुन संस्थान नियमाप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे घेऊन सवलत देण्यात यावी. *(या सवलतीत संबंधित शिफारस करणाऱ्यांच्या नावे नोंदविण्याची आवश्यकता नाही)* परंतु लेखी शिफारस येऊन संबंधित रुग्णांकडे आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध नसल्यास किंवा शिफारशीप्रमाणे देण्यात येणारी सवलत संस्थान नियमांपेक्षा जास्त असल्यास शिफारस करणा-यांचे नाव नोंदविणेत येऊन त्यांना तशी सवलत देण्यात येत असलेबद्दलची कल्पना देऊन त्यांचे नाव सवलतीसाठी शिफारस म्हणुन नोंदविणेत यावे.

18. स्पेशल रुम व डिलक्स रुममध्ये ॲडमिट असलेल्या रुग्णांना त्यांचे बिलामध्ये कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही.

19. रुग्णाने किंवा रुग्णाचे नातेवाईकाने Implant वापरण्याची मागणी केल्यास, त्या रुग्णाला Implant चे बिलामध्ये सवलत दिली जाणार नाही, तसेच उच्च प्रतीचे Implant वापरावयाचे झाल्यास Implant व हॉस्पिटलचे बिल यामध्ये कोणतीही सवलत लागु राहणार नाही.

20. सदरचे सर्व नियमांनुसार गरीब व गरजू रुग्णांना रक्तपेढीमार्फत मोफत रक्तपिशवी व गरजेनुसार रुग्णवाहीकाही मोफत करता येईल.

21. कंत्राटी आणि कायम कर्मचारी यांची यादी प्रत्येक वर्षी कामगार/आस्थापना विभागामार्फत अपडेट करुन दोन्ही रुग्णालयांमध्ये पाठविणेत यावीत.

22. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची नोंदणी व अमंलबजावणी करणेबाबत मा.त्रिसदस्यीय समिती सभा निर्णय क्र.८२१/दि.०८.१०.२०१२ अन्वये, मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य व MD India Healthcare Services, (TPA) Pvt. Ltd, Pune, National Insurance Company Ltd., Mumbai यांच्या वरीष्ठ प्रतिनिधींनी सदर योजनेअंतर्गत करावयाच्या रुग्णाला ती औषधे Memorandum of Understanding (MOU) करारातील अटी-शर्ती यावर सविस्तर चर्चा करणेत येऊन मंजुरी देण्यात आलेल्या महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे –

- मोफत केस पेपर्स् व मोफत ओपीडी तपासण्या करणे.
- प्रत्येक विभागात किमान २५ टक्के खाटा राखीव ठेवणे.
- प्रोसिजर्स्/सर्जरीज उपलब्ध् सोयी सुविधांनुसार करणे.
- रुग्णांस प्रवासासाठी परतीचे भाडे देणे.
- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णांलयांसाठी समान दर राहतील.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेणा-या रुग्णांना केवळ जनरल वार्डमध्येच भरती करावे.

- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकडुन पॅकेजच्या रकमेपेक्षा कमी रक्कम मंजुर झाल्यास उर्वरीत रक्कम रुग्णांकडुन भरुन घेण्यात येईल.
- ज्या रुग्णाला राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये उपचाराची रक्कम मिळणार असेल, अशा रुग्णाला राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये उपचारार्थ भरती करावेत.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत रुग्णांचे बिल पॅकेजच्या रकमेपेक्षा जास्त (रु.५,०००/-पर्यंत) झाल्यास ॲटो चॅरीटी बिलींग विभागामार्फत करावी.
- एखाद्या रुग्णांचे बाबतीत केस रद्द (Reject) झाल्यास किंवा त्यांचे Approval येणाच्या आतमध्ये रुग्ण दगावल्यास (Death) त्या रुग्णांचे बिल रु.५०००/- चे आत झाल्यास त्याची ॲटो चॅरीटी (Auto Charity) करणेत यावी.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये रुग्णांवर संपुर्ण उपचार केल्यानंतर बिल सादर केल्यास व राजीव गांधी आरोग्य योजनेकडुन सदर उपचाराची रक्कम प्राप्त होत नसेल किंवा संबंधित पॅकेज रद्द झाल्यास तर सदर बिलांवर सवलत देणे गरजेचे राहील.

उपरोक्तप्रमाणे नियमावलीमधील अ.नं.३ व ५ मध्ये प्रस्तावित सुधारणा ग्राह्य धरुन इतर नियमांबाबत पुर्वीची कासम व कंत्राटी कर्मचा-यांबाबतची नियमावली ग्राह्य धरणेत यावी, तसेच यापुर्वी वेळोवेळी करण्यात आलेले सवलतीविषयीचे सर्व नियम रद्द करण्यात येत असुन उपरोक्तप्रमाणे करण्यात येत असलेल्या नियमावलीनुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय या दोन्ही रुग्णालयांमध्ये रुग्णांना त्यांच्या वैद्यकीय बिलात सवलत देण्यात यावी.

तरी उपरोक्तप्रमाणे सवलतीचे नियमावलीस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकीय बिलात देण्यात येणाऱ्या सवलतींची प्रस्तावात नमुद केलेल्या सुधारीत नियमावलीस मान्यता देण्यात येऊन, सदरहू नियमावली त्वरीत अमलात आणणेत यावी.**

**तसेच नव्याने गठीत करणेत आलेल्या रुग्णालय उपसमितीसमोर सदरहू नियमावली अवलोकनार्थ सादर करावी व उपसमितीच्या सुचनाचीही अंमलबजावणी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४६** **इतर राज्यातील साईभक्त रुग्णांस साधी रुग्णवाहीका व शववाहिनी देणे आणि Embalming Machine खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे दोन्ही रुग्णालय मिळून ०१ कार्डीयाक रुग्णवाहिका, ०१ शववाहिनी व ०२ साध्या रुग्णवाहिका कार्यरत आहेत. तसेच ०१ रुग्णवाहिका मंदिर परीसरात असते या व्यतिरिक्त वाहन विभागातही काही रुग्णवाहिका आहेत. दोन्ही रुग्णालयात महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील इतर राज्यातील रुग्ण उपचारासाठी येत असतात. तसेच शिर्डीत येणारे साईभक्ताचेही अपघात झाल्याने अथवा आजारी पडल्याने वैद्यकिय उपचार घेण्यासाठी संस्थान रुग्णालयात येत असतात. यात अपघात झालेले अत्यवस्थ रुग्णही असतात. यात काही साईभक्त इतर राज्यातील असतात. ते त्यांचे भागात सोईच्या दृष्टीने म्हणून उपचार करण्यासाठी रुग्णास घेऊन जाणेसाठी संस्थान रुग्णवाहिकेची मागणी करत असतात. तसेच Death झालेले रुग्णाचे नातेवाईक इतर राज्यात जाणेसाठी संस्थानचे शववाहिनीची मागणी करत असतात. फार अंतर दुर असलेल्यारुग्णास रुग्णवाहिका देण्यात येत नाही. मात्र दूरवरचे काही साईभक्त व रुग्ण यांचे नातेवाईक रुग्णवाहिका/ शववाहिनी देणेबाबत रुग्णालय प्रशासनाकडे तगादा करत असतात.

यासाठी येणा-या साईभक्त किंवा इतर राज्यातील रुग्णास साधी रुग्णवाहिका उपलब्ध असल्यास देण्यात यावी असे मत आहे.

तसेच दूरवरचे अंतरावर राहत असलेल्यारुग्णाचा मृत्यू झाल्यास Embalming Machine द्वारे रुग्णालयात Embalming प्रक्रिया करुन मृतदेह जास्त काळ व्यवस्थीत ठेवता येईल व त्यामुळे दूरच्याDeath झालेले मृतदेह त्यांचे भागात व्यवस्थित पोहचता येईल.

सदर Embalming Machine खरेदीकामी M/s. Span Surgical Co., Coimbatore यांचे दर पत्रकानुसार एकूण रक्कम रु. २८७७००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- रुग्णालयात मृत झालेले रुग्णाचे मृतदेह बाहेरच्या राज्यात नेणेसाठी फार वेळ लागतो. सदर काळात मृतदेह खराब होऊन वास येण्याची शक्यता असते. Embalming Machine रुग्णालयात खरेदी केल्यास मृतदेह जास्त काळ चांगला राहील त्यामुळे Embalming Machine खरेदी केल्याने फायदा होऊ शकतो असे मत आहे.

तरी साईभक्त किंवा इतर राज्यातील रुग्णास साधी रुग्णवाहिका व शववाहिनी उपलब्ध असल्यास देण्यास तसेच मृतदेह जास्त काळ चांगला राहण्यासाठी Embalming Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास तसेच याकामी येणा-या एकूण रक्कम रु.२,८७,७००/- इतक्या खर्चास मान्यता असावी हि विनंती.

**निर्णय क्र.५५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, इतर राज्यातील साईभक्त रुग्णांस साधी रुग्णवाहीका/ शववाहिनी उपलब्ध करुन देणेस तसेच मृतदेह जास्त काळ चांगला राहण्यासाठी विहित पध्दतीने कोटेशन मागवून Embalming Machine खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,८७,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४७** **श्री साईबाबा हॉस्पिटलचे नवीन मशिनचे सन २०१६-१७ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकुण 52 कंपन्यांचे एकुण रु. 54,08,74,640.79/- इतक्या रकमेचे अंदाजे 859 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी, उपकरणे, इक्वीपमेंटस तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी 276 मशिन्सचे संबंधीत 24 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता यापूर्वीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या ठरावानुसार आणि यावर्षीच्या मा.व्य. समितीच्या दि. 02/04/2016 रोजीच्या सभेतील विषय क्र. 15 निर्णय क्र. 216 व मा. व्य. समितीच्या दि.23/06/2016 रोजीच्या सभेतील विषय क्र. 17 अन्वये वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे नुतनीकरण करण्यात आले आहे

सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत.

सध्या नवीन खरेदी केलेल्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन काही मशिन्सचे स्पेअर पार्टस बदलून दुरूस्तीकरणे आवश्यक असते त्यासाठी सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे.

सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. 1 ते 3 अन्वये विविध विभागातील एकुण 2 कंपन्यांच्या 6 नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. सदर AMC/CMC करणेकरीता एकुण रू 94,902/- इतका खर्च अपेक्षीत आहे. ज्या मशिन्सची वॉरंटी/ फ्री सर्व्हिस संपत आहे त्यांचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर पुरवठा आदेशातील अटी, शर्तीनुसार घेण्यात आलेले आहेत.

सदर AMC/CMC चा खर्च हा नियमीत दुरूस्ती व देखभालीचा खर्च असल्यामूळे त्यास शासनाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही. तसेच मा. व्यवस्थापन समितीच्या दि.28/11/2015, निर्णय क्र. 584 नुसार आणि सदर खर्च हा 10 लाखापेक्षा कमी असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण 2 कंपन्यांच्या 6 नग मशीन्सचे सोबत जोडलेल्या तक्तातील कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यानुसार येणाज्या अंदाजे एकुण रू.94,902/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील नवीन ६ नग मशीन्सचे सन २०१६-१७ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९४,९०२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४८** **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागातील जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करुन नवीन कॅथलॅब मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद- १७ (२)

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक:- श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि.०६/०१/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये नविन कॅथलॅब मशिनची मागणी केलेली आहे. सध्या कॅथलॅब विभागात सिमेन्स कंपनीचे मॉडेल AXIOM Artis dFC हे एक कॅथलॅब मशिन असून सदर मशिन सन २००५ मध्ये मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून रक्कम रु.२,९७,५७,००६/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले आहे. सदर मशिनवर सध्या कॅथलॅब प्रोसीजर चालु आहेत, परंतु सध्या मशिनचे ब्रेकडाऊन वाढलेले आहेत, तसेच मशिन दुरुस्तीकामी येणारा वार्षिक खर्च हा घसारा किंमतीच्या दुप्पट होत आहे. त्यामुळे बायोमेडीकल विभागाने जुने मशिन बायबॅक करुन नविन अदयावत तंत्रज्ञान असलेले मशिन खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे, कारण बाजारात सध्या जुन्या मॉडेलच्या मशिनपेक्षा अधिक उच्च प्रकारच्या तपासणीच्या सुविधा असलेले मशिन उपलब्ध झालेले आहे, त्यामुळे अधिक अचुक निदान होते. तसेच मे.सिमेन्स लि., मुंबई यांनी देखील पत्राव्दारे कळविले आहे की, सन २०१७ पर्यंत सदर मशिनचे स्पेअर पार्टस पुरवठा व सर्व्हीस बंद होत आहे. जुन्या कॅथलॅब मशिनची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.१४,६६,२५६/- इतकी होत आहे.

मागणी– कॅथलॅब विभागाने उपरोक्त कॅथलॅब मशिनची दि.०६/०१/२०१६ रोजीचे मागणी पत्रकान्वये अन्वये मागणी केलेली आहे (औषध भांडार विभाग मागणीपत्रक प्राप्त दि.१८/०१/२०१६) कॅथलॅब विभागाकरीता नविन कॅथलॅब मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते,

त्यांचे दि.१३/०१/२०१६ रोजीचे दरपत्रकानुसार रक्कम रु.४,७०,००,०००/- (अक्षरी रु. चार कोटी सत्तर लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

०१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ – २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

०२) उपरोक्त कॅथलॅब मशिनची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.१४,६६,२५६/- इतकी होत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे. तेंव्हा सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेऊन शासनास प्रस्ताव सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- सध्या कॅथलॅब विभागात सिमेन्स कंपनीचे मॉडेल AXIOM Artis dFC हे एक कॅथलॅब मशिन असून सदर मशिन सन २००५ मध्ये खरेदी करण्यात आले होते. सदर मशिनवर सध्या कॅथलॅब प्रोसीजर चालु आहेत, परंतु मशिनचे ब्रेकडाऊन वाढलेले आहेत, तसेच मशिन दुरुस्तीकामी येणारा वार्षिक खर्च हा घसारा किंमतीच्या दुप्पट होत आहे.

त्यामुळे बायोमेडीकल विभागाने जुने मशिन बायबॅक करुन नविन अदयावत तंत्रज्ञान असलेले मशिन खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे, कारण बाजारात सध्या जुन्या मॉडेलच्या मशिनपेक्षा अधिक उच्च प्रकारच्या तपासणीच्या सुविधा असलेले मशिन उपलब्ध झालेले आहे, त्यामुळे रुग्णांचे अधिक अचुक निदान होते तसेच मे.सिमेन्स लि., मुंबई यांनी देखील पत्राव्दारे कळविले आहे की, सन २०१७ पर्यंत सदर मशिनचे स्पेअर पार्टस पुरवठा व सर्व्हीस बंद होत आहे. त्यामुळे जुने मशिन बायबॅक करुन नविन कॅथलॅब मशिन विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करण्यास हरकत नाही, असे नम्र मत आहे. तसेच जुन्या मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे मशिन बायबॅक करणेकामी शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करुन नविन कॅथलॅब मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४,७०,००,०००/- (अक्षरी रु. चार कोटी सत्तर लाख मात्र) चे खर्चास, तसेच जुन्या मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणेकामीचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागातील जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करुन नवीन कॅथलॅब मशिन खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस** मान्यता **देण्यात आली. परंतु ई-निविदेची मागणी करतेवेळेस अंदाजे खर्चाचा उल्लेख करणेत येऊ नये.**

**तसेच जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करणेसाठी विधी व न्याय विभाग,** महाराष्ट्र **शासन यांची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४९** **श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरीता नविन 3 Tesla MRI Machine खरेदी करुन जुने मशिन परत (Buyback) करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक– श्री साईबाबा रुग्णालयात रेडीओलॉजी विभागात सध्या असलेले Siemens कंपनीचे MRI मशिन मॉडेल Magnetom Avanto हे मशिन सन २००६ मध्ये रक्कम रु.५,०५,००,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. सदरचे मशिन सध्या काम करत आहे. परंतू सदर मशिन हे जुने झाल्यामुळे सध्या वारंवार बंद पडत असून त्यामुळे त्याचा बंद पडण्याचा कालावधी हा देखील वाढत आहे, पर्यायाने दैनंदिन कामाची व रुग्णांची गैरसोय होते. सदर मशिनवर मे-२०१६ पर्यंत ७९४६६ इतक्या रुग्णांचे MRI करण्यात आलेले आहे. सदर मशिन वारंवार बंद पडत असल्यामुळे त्यावरील वार्षिक दूरुस्तीव देखभालीचा खर्च देखील वाढत आहे, मे-२०१६ पर्यंत सदर मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी रु.१,८१,६९,४३३/- इतका खर्च झालेला आहे. दि.३१/०३/२०१६ अखेर सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.२८,४३,८३२/- इतकी आहे. सध्या सन २०१६-१७ करीता कंपनीने रक्कम रु.३२,३६,३३२/- इतक्या रक्कमेचे CMC करीता कोटेशन दिलेले आहे, म्हणजेच सदर मशिनवर मशिनचे घसारा वजा जाता येणा-या किंमतीपेक्षा सध्याचा दूरुस्ती व देखभालीचा खर्च जास्त होत आहे. त्यामुळे रेडीओलॉजी विभागाने व बायोमेडीकल विभागाने नविन उच्च तंत्रज्ञान असलेले 3 Tesla MRI Machine घेण्याची शिफारस केलेली आहे.

मागणी – श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाने दि.२४/०३/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०२/०६/२०१६).

नविन मशिन खरेदीकामी मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दरपत्रकानुसार खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate per in Rs. | App. Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | 3 Tesla MRI Machine with Accessories | 01 | 8,50,00,000.00 | 8,50,00,000.00 |
| | Total Amt. in Rs. | | | 8,50,00,000.00 |

उपरोक्त प्रमाणे नविन ०१ नग MRI Machine (3 Tesla) खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.८,५०,००,०००/- (अक्षरी रु. – आठ कोटी पन्नास लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२) सदर मशिनची घसारा वजा जाता दिनांक ३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.२८,४३,८३२/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(४) अन्वये सदरचे मशीन Buyback करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत – सदर मशिन हे जुने झाल्यामुळे वारंवार बंद पडत असल्यामुळे त्यावरील वार्षिक दूरुस्ती व देखभालीचा खर्च देखील वाढत आहे. मे-२०१६ पर्यंत सदर मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी रु.१,८१,६९,४३३/- इतका खर्च झालेला आहे. सदर मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा वजा जाता येणारी किंमत रु.२८,४३,८३२/- पेक्षा सध्याचा दूरुस्ती व देखभालीचा खर्च जास्त होत आहे. सध्याची सन २०१६-१७ करीता कंपनीने रक्कम रु.३२,३६,३३२/- इतक्या रक्कमेचे कोटेशन पाठविलेले आहे. त्यामुळे सदर मशिन परत (Buyback) करुन नविन उच्च तंत्रज्ञान असलेले 3 Tesla MRI मशिन खरेदी करण्यास हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तसेच मशिनची दिनांक ३१/०३/२०१६ अखेर घसारा वजा जाता किंमत रु.२८,४३,८३२/- इतकी आहे, सदर रक्कम ही रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(४) अन्वये सदरचे मशीन Buyback करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रेडीओलॉजी विभागाकरीता ०१ नग नविन उच्च तंत्रज्ञान असलेले 3 Tesla MRI Machine विहित पध्दतीने ई- निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.८,५०,००,०००/- (अक्षरी रु. – आठ कोटी पन्नास लाख मात्र) चे खर्चास तसेच Siemens कंपनीचे जुने MRI मशिन मॉडेल Magnetom Avanto without UPS परत (Buyback) करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घेणेकामीचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागातील जुने ०१ नग MRI Machine मशिन दुरुस्त करणेत येऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वापरणेत यावे, असे ठरले व श्री साईबाबा रुग्णालयामध्ये नवीन ०१ नग 3Tesla MRI Machine मशिन खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरीता 128 Slice असलेले नविन C.T.Scan Machine खरेदी करुन जुने मशिन परत (buyback) करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक – श्री साईबाबा रुग्णालयात रेडीओलॉजी विभागात सध्या असलेले C.T. Scan मशिन मॉडेल Somaton Sensation 64 Cardiac हे मशिन सन २००५ मध्ये रक्कम रु.३,९८,३७,८३५/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. सदरचे मशिन सध्या काम करत आहे. परंतू सदर मशिन हे जुने झाल्यामुळे सध्या वारंवार बंद पडत असून त्यामुळे त्याचा बंद पडण्याचा कालावधी हा देखील वाढत आहे, पर्यायाने दैनंदिन कामाची व रुग्णांची गैरसोय होते. सदर मशिनवर जूलै २०१५ पर्यंत ७७३४९ इतक्या रुग्णांचे C.T.Scan केलेले आहे. सदर मशिन वारंवार बंद पडत असल्यामुळे त्यावरील वार्षिक दूरुस्ती व देखभालीचा खर्च देखील वाढत आहे, जूलै २००६ ते जूलै २०१६ या कालावधीत सदर मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी रु.३,६८,१४,०२४/- इतका खर्च झालेला आहे. दि.३१/०३/२०१६ अखेर सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.१२,६१,९१७/- इतकी आहे, सध्या सन २०१६-१७ करीता कंपनीने CMC करीता रु.५५,२६,४९८/- इतक्या रक्कमेचे कोटेशन दिलेले आहे, म्हणजेच सदर मशिनवर मशिनचे घसारा वजा जाता येणा-या किंमतीपेक्षा सध्याचा दूरुस्ती व देखभालीचा खर्च जास्त होत आहे. त्यामुळे रेडीओलॉजी विभागाने व बायोमेडीकल विभागाने नविन उच्च तंत्रज्ञान असलेले 128 Slice असलेले नविन C. T. Scan Machine घेण्याची शिफारस केलेली आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाने दि.२४/०३/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये नविन C. T. Scan Machine ची मागणी केलेली आहे (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०२/०६/२०१६).

नविन मशिन खरेदीकामी मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दर मागविण्यात आले होते, त्यांचे दरपत्रकानुसार खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate per in Rs. | App. Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | C. T. Scan Machine with Latest Technology 128 Slice | 01 | 5,60,00,000/- | 5,60,00,000.00 |
| | Total Amt. in Rs. | | | 5,60,00,000.00 |

उपरोक्तप्रमाणे नविन ०१ नग C.T. Scan Machine (128 Slice) खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५,६०,००,०००/- (अक्षरी रु. – पाच कोटी साठ लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

2) सदर मशिनची घसारा वजा जाता दिनांक ३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.१२,६१,९१७/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(४) अन्वये सदरचे मशीन Buyback करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– सदर मशिन हे जुने झाल्यामुळे वारंवार बंद पडत असल्यामुळे त्यावरील वार्षिक दूरुस्तीव देखभालीचा खर्च देखील वाढत आहे. जूलै २००६ ते जूलै २०१६ या कालावधीत सदर मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी रु.३,६८,१४,०२४/- इतका खर्च झालेला आहे. सध्या सन २०१६-१७ या वर्षाकरीता कंपनीने CMC करीता रु.५५,२६,४९८/- इतक्या रक्कमेचे कोटेशन दिलेले आहे. सदर मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा वजा जाता येणारी किंमत रु.१२,६१,९१७/- पेक्षा सध्याचा दूरुस्तीव देखभालीचा खर्च जास्त होत आहे. त्यामुळे सदर मशिन परत (Buyback) करुन नविन उच्च तंत्रज्ञान असलेले सि.टी.स्कॅन मशिन (C. T. Scan Machine with Latest Technology 128 Slice) खरेदी करण्यास हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तसेच मशिनची दिनांक ३१/०३/२०१६ अखेर घसारा वजा जाता किंमत रु.१२,६१,९१७/- इतकी आहे, सदर रक्कम ही रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(४) अन्वये सदरचे मशीन Buyback करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रेडीओलॉजी विभागाकरीता ०१ नग नविन उच्च तंत्रज्ञान असलेले सि.टी.स्कॅन मशिन (C. T. Scan Machine with Latest Technology 128 Slice) विहित पध्दतीने ई - निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.५,६०,००,०००/- (अक्षरी रु. – पाच कोटी साठ लाख मात्र) चे खर्चास तसेच जुने सिटी.स्कॅन मशिन मॉडेल Somaton Sensation 64 Cardiac Without UPS परत (Buyback) करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घेणेकामीचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयामधील रेडीओलॉजी विभागातील ०१ नग जुने सि.टी.स्कॅन मॉडेल Somaton Sensation 64 Cardiac Without UPS मशिन दुरुस्त करणेत येऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वापरणेत यावे, असे ठरले व श्री साईबाबा रुग्णालयामध्ये ०१ नग नवीन उच्च तंत्रज्ञान असलेले सि.टी.स्कॅन (C. T. Scan Machine with Latest Technology 128 Slice) मशिन खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५१** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद: अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ८५ खालील प्रमाणे झालेला आहे.

"‥ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांमध्ये दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत असल्याने रुग्णालयाची इमारत कमी पडत आहे. याकरिता श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांच्या आवश्यक सुविधामध्ये व बेडचे संख्येत वाढ करणेस मान्यता देण्यात आली. तसेच, मा. अध्यक्ष महोदय हे शिर्डी भेटी दरम्यान श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलची व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी जागेची पाहणी करतील, असे ठरले."

२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक २९८ खालील प्रमाणे झालेला आहे.

"‥ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत असल्याने, कॅन्टीनची इमारत रुग्णालयाच्या वाढीव सोयी-सुविधेसाठी उपलब्ध करुन देणेस व त्याच परिसरात असलेले जनरेटर कक्षा समोरील मोकळया जागेत उपहारगृह व कॅन्टीनची व्यवस्था करणेकामी येणा-या अंदाजे रुपये१८.९० लाख मात्र येणा-या खर्चास संस्थानच्या वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी. मा. खंडपीठाच्या आदेशास अधीन राहुन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली."

३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९/१२/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १०३३ खालील प्रमाणे झालेला आहे.

"‥ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामधील आय. सी. सी. यू. (अतिदक्षता विभागाचे) बेडच्या संख्येमध्ये वाढ करणेस व अतिदक्षता विभाग इतरत्र हलवणेस प्रशासकिय मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना : उपरोक्त कामांसाठी वेळोवेळी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय झाले असून, अ. नं. ०१ चे कामापैकी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील तळमज्यावरील Ortho O.T. Recovery Room ICCU मध्ये Convert करून दि.०६/०४/२०१५ रोजी नविन १० बेडचा ICCU हॉल उपलब्ध करुन देणेत आलेला आहे.

दि.०९/१२/२०१४ रोजीचे श्री साईनाथ रुग्णालय यांचेकडील ठरावाने, कॅन्टीन इमारत ताब्यात मिळालेनंतर श्री साईनाथ रुग्णालय इमारत क्र.०१ मधील पहिल्या मजल्यावरील प्रशासकिय कार्यालय नर्सेस स्टेशन व इतर विभाग स्थलांतरीत केलेनंतर या ठिकाणी साधारणपणे २० ते २५ बेडचे अतिदक्षता विभाग (सर्व अद्यावत सुविधांनी युक्त) तसेच परिचारीकांसाठी चेंजिग रुम तसेच वैद्यकिय अधिका-यांसाठी रेस्ट रुम / चेंजिग रुम करण्याचे ठरले आहे.

यापैकी चेंजिग रुमसाठी अॅल्युमिनियम केबिनचे काम करून देण्यात आले आहे. या परिसरातील कॅन्टीनची इमारत रुग्णालयाचे वाढीव सोयी सुविधेसाठी उपलब्ध करुन देणेचे दृष्टीने, कॅन्टीनसाठी स्वतंत्र शेडचे बांधकाम करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे निर्णयान्वये अंदाजे रु.१८.९० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

दरम्यानचे काळात उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी, श्री साईनाथ हॉस्पिटल तसेच व्दारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबीकल, इलेक्ट्रीक पॅनल व केबल खरेदी करणेबाबतचे प्रस्तावामधील रु.२,५०,८६,८१४/- मात्रचे खर्चामधून रु४० लक्ष मात्र अंदाजे खर्च धरुन प्रस्तावित कॅन्टीन शेडचे जागेवर जनरेटर शेडचे बांधकाम करणेबाबत कळविले.

या कामांबाबत दि.२३/११/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी, वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा रुग्णालये, वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, उपकार्यकारी अभियंता (विद्युत), उपअभियंता बांधकाम व श्री साईप्रसादालय विभाग यांचे प्रतिनीधीं समवेत पहाणी करणेत आली. त्यानुसार कॅन्टीन शेडचे जागेवर जनरेटर रुमचे बांधकाम करुन घेणे व आर्कीटेक्ट नियुक्तीबाबत स्वतंत्र प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत आला आहे. तसेच सदरहु पाहणीचे वेळी खालीलप्रमाणे चर्चा झाली.

'‥ श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दाखल होणा-या रुग्णांसाठी प्रसादालय विभागामार्फत भोजनाची व्यवस्था करणेत येत असते. साईनाथ रुग्णालयाचे पूर्वेने असलेले रिंग रस्त्याने श्री साई प्रसादालय इमारत जवळच्या अंतरात येत असल्याने, रुग्णालयामध्ये येणा-या रुग्णांचे नातेवाईक मोठ्या प्रमाणात श्री साईप्रसादालयाचा वापर करतात. त्यामुळे सध्याची कॅन्टीन रुग्णालयाचे केसपेपर इमारतीत स्थलांतरीत करुन तेथे प्रसादालय / कॅन्टीन विभागामार्फत चहा, कॉफी, दुध बिस्कीट, नाष्टा पाकिटे इ. सोयी- सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत प्रसादालय व कॅन्टीन विभाग प्रमुख यांनी उपकार्यकारी अभियंता(बांधकाम) यांचेशी चर्चा करुन प्रस्ताव सादर करावा. '

उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने अहवाल पाठविणेबाबत प्रअधिक्षक प्रसादालये यांना कळविण्यात आले होते. दरम्यान वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा संस्थान रुग्णालये, यांचे पत्र जा. क्र.२७५/२०१६ दि.१८/०३/२०१६ व त्यासोबतचे दि.११/०३/२०१६ रोजीची मंजूर टिपणी अन्वये प्र.अधिक्षक प्रसादालये यांचेसमवेत झालेल्या पाहणीचे वेळी द्वारावती भक्तनिवास इमारतीचे पार्कीगमधील पश्चिमेकडील भागात कॅन्टीनसाठी व्यवस्था करणेबाबत सूचित करण्यात आले असल्याचे कळविले आहे. त्यानंतर प्र. अधिक्षक प्रसादालये यांनी कॅन्टीनबाबत प्रस्ताव (Requirement) बांधकाम विभागाकडे पाठविल्या आहेत.

प्रस्ताव : दि.१३/०५/२०१६ रोजीचे मा. उपसमिती सभेत मा. कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा रुग्णालये, उपकार्यकारी अभियंता व उपअभियंता बांधकाम व प्र अधिक्षक श्री साईप्रसादालय विभाग यांचेसमवेत याबाबत प्रामुख्याने खालील बाबींवर चर्चा करण्यात आली.

"‥ संस्थानचे दोन्हीही रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या जास्त प्रमाणात आहे. येथिल रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता बेड्सची संख्याही वाढविणे आवश्यक झाले आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता कॅन्टीन स्थलांतरीत करणेसाठी द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावर पार्कीगमध्येतात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्था होवू शकेल. परंतु कायमस्वरूपी बांधकाम करणेस नगरपंचायत मान्यता, अन्न व औषध विभागाची परवानगी आदिंबाबत अडचण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्र. अधिक्षक प्रसादालये यांच्या आवश्यकता विचारात (Requirement) घेता व कॅन्टीनची इमारत कॅन्टीनसाठीच तयार करणेत आलेली असल्याने रुग्ण व नातेवाईकांची गैरसोय होवू नये यासाठी कॅन्टीन नुतनीकरण करणेऐवजी श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळया जागेत रुग्णालयांच्या गरजा विचारात घेवून नविन इमारत बांधकाम करणे योग्य होईल. त्याबाबत F.S.I. ची तपासणी करून घेण्यात यावी अशी चर्चा झाली.

श्री साईबाबा हॉस्पीटलकडील प्रशासकीय कार्यालय (एचआर विभाग, कामगार विभाग, ईडीपी विभाग), फायनान्स विभाग, मध्यवर्ती औषधभांडार (औषधभांडार, बायोमेडिकल विभाग, लिनन विभाग) व आरएमओ हॉस्टेल हे विभाग व श्री साईनाथ रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक व प्रशासकीय कार्यालय, अनुदान विभाग व रेकॉर्ड रुम, एम.आर.डी. विभाग (केसपेपर विभागातील) हे विभाग व अधिसेविका कार्यालय तसेच आर.एम.ओ. होस्टेल व कॉन्फरन्स हॉलची व्यवस्था उपरोक्त इमारतीत करता येईल.

वैद्यकीय संचालक यांनी उपरोक्त विभागांचे स्थलांतर झालेनंतर मोकळ्या होणा-या जागेचा वापर कशासाठी प्रस्तावित आहे याबाबत माहिती बांधकाम विभागास सादर केल्यास आर्किटेक्ट यांचे सल्ल्याने प्रस्तावित विभागांचे/ वॉर्डचे नियोजन तसेच प्रस्तावीत इमारतीचे आराखडे तयार करुन घेणे सोयीचे होईल. "

श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेकामी नविन इमारत बांधणेबाबतचे प्रस्तावाबाबत रुग्णालय कामाचे आर्कीटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी दि.२२/०१/२०१४ चे इ-मेलअन्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिला होता.

*".. The earlier old building of Sainath hospital was constructed about 40 years back and during renovation, it was observed that, some of the R.C.C. Structural members were deteriorated and needed strengthening. Therefore, it was impossible to add any more floors on it.*

*We could strengthen the existing building and renovated the same for better use. It is not practical to add columns from outside and construct a new floor, on existing old building. It shall disturb the functioning of the existing hospital use.*

*We have added two new wings, one on the south side and one on the west side. Which are of Basement +3 floors, we have studied the design and found that we can add one more floor on the existing new building. However, the lifts provided for the existing building are upto 2nd floor level only. We shall have to provide new lifts for the proposed third floor.*

*My opinion is that: Instead of disturbing the existing hospital building we can construct a new building in existing Open space on the south side of the building which is in use for the parking of hospital staff. The existing hospital can be interconnected by a covered passage in between.*

*F.S.I. is balance for the new building or for additional floors. "*

विभागाचा अभिप्राय :- आर्कीटेक्ट यांचे उपरोक्त अभिप्रायामध्ये नमूद केल्यानुसार, श्री साईबाबा हॉस्पीटलचे पश्चिम व दक्षिण बाजुकडील (बेसमेंट असलेल्या इमारत क्र. A व B) या इमारतींवर एका वाढीव मजल्याचे काम हाती घेता येईल. परंतु, बांधकामाचे कालावधीमध्ये रुग्णालयाचे कामकाजावर परीणाम होवून कामकाजात अडचण निर्माण होण्याची शक्यता असल्याने आर्कीटेक्ट यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलचे दक्षिण बाजुकडील सर्व्हे नं.१२५ मधील मोकळया जागेत नविन इमारत बांधकाम करणे योग्य होईल असे मत दिलेले आहे.

तथापि भविष्यात रुग्णालय विस्तारीकरणास अडचण होवु नये यासाठी सदर इमारत बांधकाम सर्व्हेनं.१२५ ऐवजी सर्व्हे नं.१४८ मधील श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळया जागेत करणे योग्य होईल तसेच श्री साईनाथ रुग्णालय पीरसरातील कॅन्टीन स्थलांतरीत करणेसाठी पर्यायी व्यवस्था करणेस वेळ लागेल. त्यामुळे साईभक्त व रुग्णांची गैरसोय टाळण्याचे दृष्टीने वेगवेगळया ठिकाणी नुतनीकरण/ बांधकामे करणेऐवजी सध्याची कॅन्टीन आहे तेथेच सुरु ठेवून श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळया जागेत रुग्णालयांच्या गरजा विचारात घेवून आर्किटेक्ट यांचे सल्ल्याने सर्वसमावेशक नविन इमारत बांधकाम करणे योग्य होईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.५२** **शिर्डी विकास योजना, प्रादेशिक विकास योजना (सुधारीत) बाबत.**

**निर्णय क्र.५६१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.५३ शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातंर्गत भूसंपादनासाठीवाढीव रक्कम देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद अधिनियम कलम २१ (२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुदआहे.

"...*पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल* :-

(दोन) *स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी.*"

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१. नि. क्र. २६३ दि. २४/०४/२००६

२. नि. क्र. ६७८ दि. १९/०८/२००६

३. नि. क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०

मा. शासन निर्णय : १. क्र. सासंवि-२००६/८७६(१३१)/का.सोळा दि.१९/०९/२००८

२. क्र. सासंवि-२००६/८७६(१३१)/का.सोळा दि.०४/०९/२०१४

प्रस्तावना : शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरून विषयाकिंत कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णयानुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्ते संस्थान निधीतुन विकसित करणेचे कामासाठी (भूसंपादन व विकसन) येणारे रु.८८ कोटी मात्रचे खर्चास दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे.

सदर प्रकल्पातील पाच रस्ते विकसित करणेचे उपलब्ध भागातील काम महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळ, पुणे यांचेमार्फत जुन२०१२ अखेर करणेत आले आहे. तसेच सदर योजनेतील एकूण ७.४९ कि.मी. लांबीचे सहा रस्ते संस्थान निधीतुन विकसित करणेचे रु.३३,८३,२६,१९९/- मात्र रकमेचे काम ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबईयांना इकडील दि.०६/०८/२०१० रोजीचे कार्यादेशान्वये देणेत आले आहे. सदरहु कामाची १५ महिने मुदत दि.०६/११/२०११ अखेर होती. नगरपंचायतीने उपलब्ध करून दिलेल्या भागातील ४.७९ कि. मी. भागातील काम पुर्णत्वाकर आहे. तथापि शिर्डी नगरपंचायतीकडून भूसंपादन कार्यवाही पूर्ण न झाल्याने अद्यापही सुमारे १.८० कि.मी. वळण रस्त्याचे काम सुरु करता आलेले नाही.

ठेकेदार यांना जुन२०१४ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. या प्रकल्पातील वळणरस्ता क्र.५ (शिव नाला रस्ता ते आरक्षण क्र.३१ पोहच) या १८ मीटर रुंदीच्या व १८०० मीटर लांबीच्या वळण रस्त्याचे कामास लगतचे मालमत्ता धारक यांनी हरकत घेतल्यामुळे माहे जुन २०१४ ते माहे एप्रिल, २०१५ या कालावधीत ठेकेदार यांना सदरचे काम पूर्ण करता आले नाही कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत रहदारीचे नियोजनासाठी या रस्त्यांची आवश्यकता असलेने, नगरपंचायतीने उपलब्ध करुन दिलेल्या ९०० मीटर अंतरातील काम पूर्ण असून उर्वरीत डांबरीकरण कामांसाठीठेकेदार यांनी दि.३०/०५/२०१५ रोजीचे पत्रान्वये त्यांचे निविदेतील दरावर २०% दरवाढ व निविदेनुसार देयPrice variation बिलाची मागणी केली आहे. त्यामुळेठेकेदार यांनी ऑगस्ट २०१५ पासून पुढील काम बंदठेवलेले आहे.

महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळ शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे दरम्यान दि.१६/१०/२००६ रोजी झालेल्या त्रिपक्षीय करारातील Article –III - 1. मध्ये The Sansthan shall make provision in the budjet and bear the total xpenditure of the project. असे नमूद केलेले आहे त्यानुसार सदरहु प्रकल्पावर आज अखेर खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

(अ) प्रथम प्राधान्य गटातील एकुण ०९ रस्ते भूसंपादनासाठी अदा केलेली रक्कम.

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर | एकूण ०९ रस्त्यांसाठी अंदाजित मोबदला रकमेच्या २/३ रक्कम व ३% आस्थापना खर्चाची रक्कम | २८ मार्च, २००७ | १८,२३,६०,८२०/- |
| | | मूळ प्रस्तावातील रस्ता क्र.०६ व ०७ चे भूसंपादनाचे अंतिम निवाड्यापोटी आदा केलेली रक्कम. | ०५ मे, २०१० | ०१,६६,८७,७६१/- |
| ०१. | उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर | मूळ प्रस्तावातील रस्ता क्र.०३, ०५, ०८ व ०९ चे भूसंपादनाचे अंतिम निवाड्यापोटी आदा केलेली रक्कम. | ०७ जून,२०१० | ०५,५१,६५,८५९/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शिर्डी मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.३१ च्या कोपऱ्यापासून ते स.नं.०९ मधिल नियोजित १८ मीटर रुंदीच्या रस्त्यापर्यंत १८ मीटर रुंदीचा रस्ता विकसीत करणेकामी. | १८ एप्रिल, २०११ | ०९,६०,६४,६३९/- |
| | | | एकुण रुपये (अ) .. | ३५,०२,७९,०७९/- |

(ब) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांना पाच रस्तेविकसीत करणेसाठी अदा केलेली रक्कम.

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे | पूर्व प्राथमिक कामकाजासाठी | २९ ऑक्टोबर, २००६ | ५०,००,०००/- |
| | | प्रथम प्राधान्य गटातील ०५ रस्त्यांचे काम सुरु करणेसाठी आगाऊ रक्कम | २८ जानेवारी, २०१० | ३,००,००,०००/- |
| | | प्रथम प्राधान्य गटातील ०५ रस्त्यांचे काम सुरु असतांना कामाची देयके देणेसाठी. | १६ ऑगस्ट, २०११ | ४,००,००,०००/- |
| | | प्रथम प्राधान्य गटातील ०५ रस्त्यांचे काम सुरु असतांना कामाची देयके देणेसाठी. (चौथा टप्पा) | २६ एप्रिल, २०१२ | १,८०,००,०००/- |
| | | | एकुण रक्कम रुपये (ब). | ९,३०,००,०००/- |

(क) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा केलेली रक्कम.

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | संयुक्त मोजणी शुल्क, सर्व्हेअर यांचे मानधन इत्यादीसाठी | १५ मार्च, २००७ | ४,७३,७१६/- |
| | | जलवाहिन्या, विद्युत वाहिन्या इत्यादी स्थलांतरीत करणेसाठी. | २८ जानेवारी, २०१० | ३६,२९,००८/- |
| एकुण रक्कम रुपये (क). | | | | ४१,०२,७२४/- |

(ड) प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसीत करणेसाठी अदा केलेली रक्कम.

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई | प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते विकसीत करणे कामापोटी रनिंग बिल क्र.१० पर्यंत अदा केलेली रक्कम. | जून, २०१६ अखेर | १९,६८,३४,३०६/- |
| | | सदर कामाचे भावफरक बिल क्र.०९ पर्यंत अदा केलेली रक्कम | जून, २०१६ अखेर | ४,३५,८१,४०७/- |
| ०२. | मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे | सदर कामासाठीची सल्लागार फी. | जून,२०१६ अखेर | १,२९,८६,९८४/- |
| | | | एकुण रक्कम रुपये (ड). | २५,३४,०२,९६६/- |
| | | | आज अखेर सदरहू प्रकल्पासाठी झालेला खर्च रुपये (अ+ब+क+ड). | ७०,०७,८४,४९९/- |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातंर्गत सुरु असलेले ११ रस्त्यांचे कामासाठी वरीलप्रमाणे आजपावेतो एकुण रक्कम रु.७०,०७,८४,४९९/- मात्र खर्च झालेला आहे. सदरहु प्रकल्पातील एकूण नऊ रस्त्यांचे भूसंपादनासाठी उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना एकुण रु.३५,०२,७९,०७९/- मात्र निधी उपलब्ध करुन देणेत आलेला असून सदरचे नऊ रस्त्यांपैकी रस्ता क्र.०९ अ या रस्त्याची भूसंपादन प्रक्रीया पूर्ण झालेली नसल्याने, सदर रस्ता कामासाठी उपलब्ध झालेला नाही.

प्रस्ताव: आता, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.२७/०४/२०१६ पत्रान्वये मंजुर विकास योजनेतील हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील निमगाव शिव ते जुना पिंपळवाडी रोड रस्ता या रस्त्याची भूसंपादन कार्यवाही उपविभागिय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत पुर्णकरण्यात आली असुन त्याबाबत निवाडा एलक्यु/एसआर/ ०३/२००७ दि.०४/११/२०१० अन्वये झालेला आहे. त्या अनुषंगाने भूसंपादन कायदा१८९४ च्या कलम

१८ नुसार मे. कोर्टाकडुन निकाल झालेल्या दाव्यांमधे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करून घेण्यासाठी उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना पत्र दिलेले आहे.

याबाबत उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि.२९/०४/२०१६ रोजीचे पत्रान्वये, प्रस्तुत प्रकरणी रक्कम रु.८,१२,९८,१८०/- मात्र भरणेबाबत कळविले आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१. | निवाड्याप्रमाणे देय मोबदला | ४,९८,११,३४१/- |
| ०२. | ३% आस्थापना खर्च | १४,९४,३४०/- |
| ०३. | भूसंदर्भानुसार वाढीव मोबदला व त्यावरील कलम २८ व कलम ३४ नुसार दि.३०/०६/२०१६ पर्यंत हिशोबीत केलेली रक्कम | ६,३७,५८,६७५/- |
| | एकुण रक्कम | **११,५०,६४,३५६/-** |
| ०४. | या भूसंपादन प्रकरणात यापुर्वी एकुण जमा करणेत आलेली रक्कम | ३,३७,६६,१७६/- |
| | जमा करावयाची एकुण रक्कम (अ. नं.०१ ते ०३-०४)= | **८,१२,९८,१८०/-** |

दि.३०/०६/२०१६ पुर्वी वरीलप्रमाणे जमा करावयाची एकुण रक्कम रु.८,१२,९८,१८०/- जमा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम दि.३०/०६/२०१६ पुर्वी जमा करण्यात आली नाहीतर न्यायालयाचे आदेशाप्रमाणे वाढीव मोबदला रक्कम रु.२,१९,०४,१६२/- या रकमेवर १५% प्रमाणे व्याजात वाढ होत राहील. तरी वरीलप्रमाणे हिशोबीत केलेली जमा करावयाची एकुण रक्कम सत्वर या कार्यालयाकडे जमा करणेबाबत कार्यवाही करावी असे नमूद केले आहे.

तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी दि०९/०५/२०१५ रोजीचे पत्रान्वये "मंजूर शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.३१च्या पश्चिम कोप-यापासून ते स.न.९ पर्यंत १८ मी. रुंद रस्त्यासाठी संपादित क्षेत्राचे मुल्यांकन नविन भूसंपादन कायदा सन २०१३ चे कलम २४ व २६ ते ३० आणि शासन परिपत्रक दि.२६/०५/२०१५ यातील तरतुदीनुसार केले आहे प्रस्तुत प्रकरणात अधिसुचना प्रसिद्धीनुसार मुल्यांकन दि.२३/०२/२०१२ धरून संपादित होणारे स.नं., त्यांचे क्षेत्र, रेडीरेकनर दर, जमिनीचे मुल्यांकन, फळझाडे, रायवळझाडे, बांधकाम इत्यादिचे मुल्यांकन उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे दि.०२/०५/२०१६ रोजीचे पत्रात नमुद केले आहे. त्यानुसार एकूण संभाव्यदेय मोबदला रक्कम रु.३७,७८,४८,७३९/-, आस्थापना खर्च रु. १,१३,३५,४६२/- अशी एकूण रक्कम रु.३८,९१,८४,२०१/- होत असुन यापुर्वी रु९,६०,६४,६३९/- जमा केली असुन उर्वरीत रक्कम रु.२९,३१,१९,५६२/- उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडे जमा करणेबाबत कळविले आहे. "

उपरोक्त तपशील विचारात घेता सदरहु प्रकल्पाचे खर्चाबाबत सुधारीत तपशील खालीप्रमाणे आहे

| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१. | सदर प्रकल्पासाठी आजपावेतो झालेला खर्च | ७०,०७,८४,४९९/- |
| ०२. | उर्वरीत रस्ता क्र.९ अ साठी अपेक्षित भूसंपादन खर्च (रु.३८,९१,८४,२०१.०० – रु.९,६०,६४,६३९/- = २९,३१,१९,५६२/-) | २९,३१,१९,५६२/- |
| ०३. | उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि.२९/०४/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेली रस्ता क्र.८ साठी मा. कोर्टाकडुन निकाल झालेल्या दाव्यांमधे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम (रु.११,५०,६४,३५६.००-३,३७,६६,१७६/- = **८,१२,९८,१८०/- +** रु.२,१९,०४,१६२/- या रकमेवर १५% प्रमाणे होणारी व्याजाची रक्कम.) | ८,१२,९८,१८०/- |
| ०४. | रस्ता क्र.०९ अ विकसन खर्च | ७,१७,७३,३६०/- |
| ०५. | रस्ता क्र.०५ उर्वरीत ९०० मी. काम पूर्ण करणेसाठी विकसन खर्च | ३,५०,००,०००/- |
| ०६. | सदर प्रकल्पातील एच. टी. व एल. टी. तसेच ट्रान्सफार्मर शिफ्टींग करणे इ. कामांसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना निधी उपलब्ध करुन देणे. (रु.९१,८६,५५२/- वजा यापूर्वी अदा केलेले रु.३६,२९,००८/- = **५५,५७,५४४/-**) | ५५,५७,५४४/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रुपये.. | ११८,७५,३३,१४५/- |
| | वजा दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन मान्यतेनुसार मंजूर झालेली रक्कम | ८८,००,००,०००/- |
| | सदर प्रकल्पाचे कामासाठी वाढीव खर्चाची रक्कम | ३०,७५,३३,१४५/- |

वरील प्रमाणे प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसीत करणेसाठी एकुण अंदाजे रु११८,७५,३३,१४५/- मात्र खर्च येणार आहे. सदर प्रकल्पासाठी मा. शासनाने यापूर्वी रु.८८ कोटी खर्चास मान्यता मिळालेली असल्याने, सदरहू रस्त्यांचे वाढीव भूसंपादन खर्चाचा मुळ रकमेत समावेश नसलेने प्रकल्पाचे किमतीमध्ये एकुण रु.३०,७५,३३,१४५/- मात्र इतक्या रकमेची वाढ होत आहे.

तरी वरील प्रमाणे वाढीव रक्कम रु.३०,७५,३३,१४५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व याकामी संस्थान अधिनियम २००४ मधिल कलम २१ (२) पोटकलम (१) आणी (१क) मधिल तरतुदीनुसार याकामी शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस तसेच मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी सिव्हील अर्ज सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातंर्गत रस्त्यांच्या भूसंपादनाची सभेने माहिती घेतली व रस्ते तयार करणेसाठी उर्वरित भू-संपादन प्रक्रिया लवकरात-लवकर व्हावी, यावर चर्चा करणेसाठी पुढील सभेमध्ये मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग तसेच जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना आमंत्रित करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.५४** **श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमीत्त शासनामार्फत गठीत करण्यात आलेल्या कृती आराखडा उपसमितीच्या दि.२६/०५/२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि. १८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यामार्फत दि.०१ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) या कालावधीमध्ये श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. महासमाधी शतक महोत्सवी वर्षानिमित्त शिर्डीमध्ये येणा-या साईभक्तांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीला सादर करावयाचा प्रारुप कृती आराखडा अंतिम करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या उपसमितीची प्रथम बैठक दि. २६ मे, २०१६ रोजी दुपारी१२.०० वाजता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य सचिव समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली. सदरहु बैठकीचे इतिवृत्त महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ यांचेकडील पत्र क्रं. सांसवि-२०१६/ प्र.क्र.५/ का-१६,दि.०२/०६/२०१६ सोबत प्राप्त झाले असून सदर पत्र व त्यासोबतचे इतिवृत्त सोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१) श्री. स्वाधीन क्षत्रीय, मा. मुख्य सचिव
२) श्री. के. पी. बक्षी, अ. मु. स. (नियोजन (प्रभारी)
३) श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव (वित्त (व्यय)
४) डॉ. नितिन करीर, प्रधान सचिव (नगर विकास)
५) श्री. एन. जे. जमादार, सचिव व विधी परामर्शी (विधी व न्याय)
६) श्री. एकनाथ डवले, विभागीय आयुक्त, नाशिक
७) श्री. संतोषकुमार, सहसचिव, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण
८) श्री. अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर
९) श्री. बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
१०) श्री. सी. आर. गजभिये, मुख्य अभियंता तथा वि. कार्य. अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
११) श्री. भालचंद्र दाते, प्रकल्प सल्लागार, टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. मुंबई

२. बैठकीचे प्रास्ताविक श्री. एन. जे. जमादार, सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी केले सन २०१७-१८ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षाच्या तयारीकरीता संस्थानमार्फत तयार करण्यात आलेल्या प्रारुपकृती आराखडयाचे सादरीकरण टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड या सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी श्री. भालचंद्र दाते यांनी केले तसेच या प्रारुप कृती आराखडयाबाबत श्री एकनाथ डवले, विभागीय आयुक्त, नाशिक आणि श्री. अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी उपस्थितांना माहिती दिली सदर चर्चेमध्ये श्री. के. पी. बक्षी, अ. मु. स. नियोजन विभाग (प्रभारी), श्री. व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, वित्त विभाग आणि डॉ, नितिन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी मौलीक सूचना दिल्या. श्री. नितीन चंद्रकांत देसाईयांनी शताब्दी महोत्सवाच्या कालावधीत साजरे करावयाचे विविध कार्यक्रम व साईसृष्टी प्रकल्पाबाबत प्राथमिक संकल्पना सादर केली. संस्थानव्दारे सादर केलेल्या कृती आराखडयाबाबत झालेल्या चर्चेदरम्यान सदर बैठकीमध्ये सर्वंकष चर्चा झाली.

३. मा. मुख्य सचिव यांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.नं. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|
| १ | शिर्डीमध्ये होणा-या वाहनांच्या वर्दळींचे नियंत्रण करता यावे याकरीता बाह्यवळण रस्त्यांची आवश्यकता आहे. यास्तव सध्या अंतीम टप्प्यात असणा-या शिर्डी- राहाता संयुक्त बाह्यवळण रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे. | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ अहमदनगर. | तात्काळ |
| २ | शिर्डी परिसरात साईभक्तांच्या कायमस्वरुपी निवास स्थानांची पुरेशी व्यवस्था उपलब्ध आहे. शताब्दी कालावधीत येणा-या भक्तांच्या सोईसाठी तात्पुरत्या स्वरुपातील निवास व्यवस्था निर्माण करण्यात यावी आणि त्याकरीता सुयोग्य नियोजन करावे. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | शिर्डी परिसरामध्ये शेती महामंडळाची जमीन मोठया प्रमाणात उपलब्ध असल्याने महोत्सव कालावधीमध्ये वाहनतळे व इतर प्रयोजनाकरीता या जमिनींचा वापर करण्यात यावा. सदर कालावधीत ही जमीन उपलब्ध व्हावी, यासाठी शेती महामंडळास आगाऊ सूचना देण्यात यावी. आणि वाजवी दरात भाडे अदा करुन या जमीनीवर तात्पुरत्या स्वरुपात वाहनतळे निर्माण करण्यात यावीत. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| ४ | साईसिटी प्रकल्पाचे कामकाज शताब्दी महोत्सवाच्या कालावधीपुर्वी पूर्ण होणे शक्य नसल्याने सदर प्रकल्प दिर्घकालीन प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात यावा तसेच नाशिक कुंभमेळा -२०१५ मध्ये राबविण्यात आलेल्या साधुग्रामच्या धर्तीवर तात्पुरत्या स्वरुपातील प्रकल्प उभे करण्यात यावेत. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| ५ | शताब्दी महोत्सवाच्या कालावधीकरीता प्रस्तावित करण्यात आलेले सर्व प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरीता एक वर्षापेक्षा आधिक कालावधीची आवश्यकता असल्याने नियोजित प्रस्तावांची वर्गवारी अल्प मुदतीचे प्रस्ताव आणि दिर्घमुदतीचे प्रस्ताव अशा दोन घटकात करावी. शताब्दी महोत्सवासाठी अत्यावश्यक असणा-या प्रकल्पांचा सर्वंकष विकास व्हावा यासाठी नियोजित प्रकल्पांचा समावेश दिर्घ कालावधीच्या प्रस्तावांमध्ये करण्यात यावा. त्यानुसार कृती आराखड्यात सुधारणा करण्यात यावी. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| ६ | सीटी कमांड ॲन्ड कंट्रोल सेंटर ही संकल्पना आवश्यक असल्याने याअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या (सीसीटीव्ही यंत्रणेसह) सर्व प्रकल्पांची विभागणी तात्पुरती यंत्रणा आणि कायमस्वरुपी यंत्रणा अशा दोन भागात करण्यात यावी. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| ७ | निळवंडे धरणातून पाणी पुरवठा करण्यच्या योजनेस कालावधी लागणार असल्याने महोस्तव कालावधीत वाढीव पाणी पुरवठयासाठी संस्थानच्या पाणीपुरवठा योजनेतील साठवण तलाव, जलशुध्दीकरण यंत्रणा, पाण्याच्या टाक्या व वितरण व्यवस्था यांच्या क्षमतेमध्ये वाढ करण्यात यावी. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| ८ | कृती आराखडयामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी राज्य शासनाशी संबंधीत असणाऱ्या प्रस्तावांचे मानांकन संबंधीत प्रशासकिय विभागांनी करुन त्याबाबतचा तपशिलवार प्रस्ताव उपलब्ध करुन द्यावा तसेच संबंधित प्रशासकिय विभागांनी पुरवणी मागणीव्दारे अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. | १) पोलीस अधिक्षक,अ. नगर<br>२) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी<br>३) जिल्हा आरोग्य अधिकारी, अ. नगर<br>४) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, संगमनेर<br>५) कार्यकारीअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर<br>६) कार्यकारी<br>७) अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक<br>८) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहाता<br>९) प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ, नाशिक<br>१०) व्यवस्थापक, भारत दुरसंचार निगम (BSNL) अहमदनगर<br>१०) विभागीय रेल्वे व्यवस्थापक, सोलापूर | एक आठवडा |
| ९ | वित्त विभागाशी शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतूदींचा आढावा घेऊन शासनाच्या संबंधीत प्रशासकिय विभाग यांनी अंमलबजावणी करावयाच्या प्रकल्पासाठी अर्थ संकल्पीय तरतुद करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. | अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | शताब्दी महोत्सवाच्या तयारीकरीता अत्यावश्यक असणारे आणि अल्प कालावधीमध्ये पूर्ण होणारे प्रकल्प श्री साईबाबा संस्थानने त्यांच्या निधीतून पूर्ण करावेत आणि त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ मधील तरतुदी नुसार पुढील आवश्यक कार्यवाही पार पाडावी. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| ११ | साईगार्डन लेझर-शो प्रकल्पाची संकल्पना उपयुक्त असल्याने सदर प्रकल्प त्वरीत कार्यान्वित करणेसाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| १२ | श्री साईबाबांच्या दर्शनाकरीता येणा-या भक्तांना सुलभ रितीने दर्शन घेता यावे याकरीता संस्थानव्दारे नियोजित दर्शनरांग प्रकल्पाचे काम त्वरीत सुरु होण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| १३ | शताब्दी महोत्सवाच्या कालावधीमध्ये साईभक्तांना हवाईमार्गे शिर्डीमध्ये पोहचणे सहज शक्य व्हावे, यासाठी शिर्डी विमानतळाचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन विमानतळ कार्यान्वित करण्यात यावे. | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई | तात्काळ |
| १४ | श्री नितीन देसाई यांनी सादर केल्याप्रमाणे शताब्दी महोत्सवाच्या कालावधीत विविध कार्यक्रम भव्य स्वरुपात पार पाडण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तात्काळ |
| १५ | शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने अत्यावश्यक असणारे अल्पमुदतीचे प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि महाराष्ट्र शासनाव्दारे राबविण्यात यावेत. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि विधी व न्याय विभाग, मंत्रालय | तात्काळ |
| १६ | कायमस्वरुपी पायाभूत सुविधा निर्माण करणारे दिर्घकालीन प्रकल्प अंतर्भुत असलेला केंद्र शासनाला सादर करावयाचा परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्यात यावा. | विभागीय आयुक्त, नाशिक | तात्काळ |
| १७ | वरीलप्रमाणे केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या प्रस्ताव आणि महासमाधी शताब्दी महोत्सवासाठी संस्थान व महाराष्ट्र शासनाव्दारे अंमलबजावणी करावयाचा फेज-१ व फेज-२ या दोन टप्प्यात तयार करण्यात येणा-या कृती आराखडयास मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीची मान्यता घेण्यात यावी. | विधी व न्याय विभाग, मंत्रालय | तात्काळ |

उपरोक्त इतिवृत्तात अ.नं.०१ व ०८ मधील निर्णयाची कार्यवाही करणेसाठी सदरचे इतिवृत्त जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम-शताब्दी/१०६६/२०१६,दि.०६/०६/२०१६ अन्वये खालील शासकिय/निमशासकिय विभागांना पाठविले आहे.

१) पोलीस अधिक्षक, अहमदनगर
२) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर
३) जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर
४) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई
५) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, संगमनेर
६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर
७) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक
८) मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी
९) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहाता
१०) प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ, नाशिक
११) व्यवस्थापक, भारत दुरसंचार निगम(BSNL) अहमदनगर
१२) विभागीय रेल्वे व्यवस्थापक, सोलापूर

याशिवाय इतिवृत्तातील अ.नं.०६ व ०७ मधील संस्थान संबंधीत निर्णयाची कार्यवाही करणेसाठी सदरचे इतिवृत्त पाणीपुरवठा व सीसीटिव्ही या संबंधीत विभागांना पाठविले असून सुधारीत DPR बाबत तात्काळ कार्यवाही करणेसाठी टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री भालचंद्र दाते यांना ईमेलव्दारे कळविणेत आले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे कृती आराखडा उप-समितीच्या दि.२६/०५/२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त आपले माहितीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमीत्त शासनामार्फत गठीत करण्यात आलेल्या कृती आराखडा उपसमितीच्या दि.२६/०५/२०१६ रोजीचे बैठकीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.५५** **श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमीत्त शिर्डी व परिसरात उपलब्ध करावाच्या सोयी-सुविधांबाबतसुधारीत प्रकल्प अहवाल शासनास सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.५६४** वेळेअभावी सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम- 2004 मधील तरतूदीनुसार उपसमिती, छाननी समिती व सल्लागार परिषद सभांचे गठण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अधिनियम-२००४, (२००४, चा महा.१४) कलम ५, मधील पोटकलम (१) आणि त्यासोबत पोटकलम (२) अन्वये व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम-२०१३, मधील तरतूदीनुसार राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाचे, दि.२८ जुलै, २०१६, रोजीचे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती गठीत करणेत आलेली असून, या समितीने कार्यभार स्विकारुन कामकाजास सुरुवात केलेली आहे. आता-

**(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिनियम-२००४ मधील कलम १७, पोट-कलम (२), खंड (आय) आणि (जे) अन्वये व्यवस्थापन समिती, उपसमितीचे गठण करील, अशी तरतूद आहे.

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिनियम-२००४ मधील कलम १८, पोट-कलम (१) नुसार समितीला सल्ला देण्याकरिता पुढील पदसिध्द सदस्यांची बनलेली एक सल्लागार परिषद असेल, अशी तरतूद आहे.

(१) समितीचा अध्यक्ष,
(२) अहमदनगर जिल्हयाचा जिल्हाधिकारी,
(३) अहमदनगर जिल्हयाच्या शिर्डी क्षेत्रासाठीचा पोलिस अधिक्षक,
(४) जिल्हा सरकारी वकील, अहमदनगर
(५) विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अहमदनगर विभाग
(६) शिर्डी नगरपंचायतीवर अधिकारिता असलेला कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग
(७) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा कार्यकारी अभियंता, कार्यचालन व परिरक्षण विभाग, संगमनेर
(८) जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर, आणि
(९) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक प्रतिनिधी

**(क)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिनियम-२००४ मधील कलम २१, पोट-कलम (२) (दोन) मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य, अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल, अशी तरतुद आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावातील अ, ब व क मध्ये नमुद केलेल्या अधिनियम- २००४ मधील तरतूदींची अंमलबजावणी होणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम- २००४ मधील तरतूदीअन्वये खालीलप्रमाणे उपसमित्यांचे गठण करणेत आले. तसेच वेळोवेळी सभेमध्ये होणाऱ्या विषयांच्या अनुशंगानेवेगवेगळया उपसमितींचे गठण करण्यात येईल, असे ठरले.**

**रुग्णालय उपसमिती सभा-**

**(१)** मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, अध्यक्ष, रुग्णालय उपसमिती सभा
**(२)** मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य
**(३)** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
**(४)** मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
**(५)** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य

**स्थानिक उपसमिती सभा-**

**(१)** मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, अध्यक्ष, स्थानिक उपसमिती सभा
**(२)** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
**(३)** मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
**(४)** मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
**(५)** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य

तसेच सल्लागार परिषदेच्या तरतूदीचे अवलोकन करणेत आले व छाननी समिती गठीत करणेसाठी महाराष्ट्र शासनास पुढील दोन सदस्यांची नावे कळविणेत यावी, ठरले.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष, व्यवस्थापन समिती
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष, व्यवस्थापन समिती

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले ३३ सिव्हील अर्ज मागे (Withdraw) घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालयाने, जनहित याचीका क्र. १८/२०११ मध्ये दि. १३/०३/२०१२ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेकामी मा. त्रिसदस्य समितीची नियुक्ती केली होती, जनहित याचीका क्र. १८/२०११ मधील दि. १३/०३/२०१२ व सिव्हील अर्ज क्र. १२०५६/२०१२ मधील दि. १६/१०/२०१२ आदेशाने Shall not take any major financial decision of whatsoever nature; असे निर्देश दिलेले आहे.प्रस्तुतचे निर्देशासन अनुसरुन व मा.त्रिसदस्य समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार खर्चास/ कामास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी सोबतचे तक्त्यातील ३३ सिव्हील अर्ज (परिशिष्ट अ) संस्थान वकीलामार्फत मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत, सदरचे ३३ सिव्हील अर्ज मा. उच्च न्यायालयात पेंडींग आहेत.

शासनाने दि. २८/०७/२०१६ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेसाठी नव्याने मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांची नियुक्ती केली आहे, आता मा. उच्च न्यायालयाने दि. १३/०३/२०१२ रोजीच्या आदेशाने गठीत केलेली, मा.त्रिसदस्य समिती संपुष्टात आलेली असल्याने, मा.उच्च न्यायालयात खर्चास/ कामास परवानगी मिळणेकामी दाखल केलेले, परंतू, मा. कोर्टात पेंडींग असलेले ३३ सिव्हील अर्ज मा. उच्च न्यायालयातून मागे घेवून, सदरचे विषय संबंधीत विभागा मार्फत, पुन्हा, मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेर सादर करुन, मा.व्यवस्थापन समितीचा, त्यावर निर्णय घेवून, निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

तरी सोबतचे तक्त्यातील ३३ सिव्हील अर्ज (परिशिष्ट अ) मा.उच्च न्यायालयातून मागे घेणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तत्कालीन त्रीसदस्य समितीमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयांनुसार मा.उच्च न्यायालयाचे परवागनीसाठी दाखल केलेले ३३ सिव्हील अर्ज मागे (Withdraw) घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांचीपदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जावर कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२५ व ४२६ तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील आदेशास अनुसरून आस्थापना विभागाकडील दि.०८/०३/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांत्रिकी अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता, प्रसादालय व्यवस्थापक अशी एकूण-८ पदे सरळसेवेने भरणेकामी विविध वर्तमान पत्र तसेच संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन दि.३०/०४/२०१६ अखेर अर्ज मागविणेत आले आहेत.

यापुर्वी सन २०१४-२०१५ मध्ये कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांत्रिकी अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता, आय.टी.मॅनेजर, प्रसादालय व्यवस्थापक ही पदे सरळसेवेने भरणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आले होते. आलेल्या अर्जाचे तपशिलवार माहितीचे तक्ते तयार करुन अर्जदाराने जोडलेल्या शैक्षणिक, व्यवसायिक तसेच अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी करणे, पात्र उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा घेणे, लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मुलाखत घेणे इत्यादी सर्व कामकाज मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना देण्यात आले होते. परंतु अर्जांचे पडताळणीत पात्र उमेदवारांची संख्या अगदीच कमी असल्याने सदरची कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली होती.

आता, नव्याने दिलेल्या जाहीरातीनुसार आलेल्या अर्जांची माहिती खालीलप्रमाणे

| अ.नं. | पदनाम | दि.३०/०४/२०१६ अखेर मुदतीत आलेले अर्ज | मुदतीनंतर आलेले अर्ज | एकूण अर्ज |
|---|---|---|---|---|
| ०१ | कार्यकारी अभियंता | २७ | ०२ | २९ |
| ०२ | उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | २२ | -- | २२ |
| ०३ | यांत्रिकी अभियंता | ३८ | ०१ | ३९ |
| ०४ | इलेक्ट्रॉनिक्स अभियंता (ध्वनीक्षेपन व टेलीफोन) | ४२ | ०१ | ४३ |
| ०५ | प्रसादालय व्यवस्थापक | २८ | ०१ | २९ |
| ०६ | विधी अधिकारी | २५ | ०१ | २६ |
| ०७ | कामगार अधिकारी | ४० | -- | ४० |
| ०८ | कनिष्ठ कामगार अधिकारी | ४४ | ०२ | ४६ |
| | एकूण- | २६६ | ०८ | २७४ |

उपरोक्तप्रमाणे दि.३०/०४/२०१६ अखेर मुदतीत २६६ व मुदतीनंतर ०८ असे एकूण २७४ अर्ज संस्थानला प्राप्त झालेले आहेत. सदरचे अर्ज संगणकावर फिडींग करुन त्याचे तपशीलवार माहितीचे तक्ते तयार करणेत आले आहेत.

शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी मान्यता दिलेल्या आकृतीबंधात खालीलप्रमाणे अटी शर्ती नमुद करणेत आलेल्या आहेत.

अट-शर्त क्र.०३ सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

अट-शर्त क्र.१० तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

मंजुर आकृतीबंधातील उपरोक्त अटी-शर्तीस अनुसरून जाहीरातीनुसार आलेल्या सर्व अर्जांचे शैक्षणिक, व्यावसायिक तसेच अनुभव प्रमाणपत्रांची ज्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून पडताळणी करणे, पात्र-अपात्र उमेदवार निश्चित करणे तसेच पात्र उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा तसेच मुलाखत घेणेची कार्यवाही करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी मा.उच्च न्यायालयाचा काय आदेश आहे, त्या आदेशासह सदरहू प्रस्ताव सभेसमोर फेरसादर करणेत यावा.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **संस्थानचे दैनंदिन झेरॉक्स कामासाठी अद्ययावत झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सामान्य प्रशासन, कार्यासन वशी-१२ कडे दररोज संस्थानचे विविध विभागांकडील कागदपत्रे झेरॉक्स काढणेसाठी येतात. झेरॉक्स कामासाठी खालीलप्रमाणे तीन झेरॉक्स मशीन वापरात आहेत.

| अ. नं. | मशिनचा तपशिल | मशिनची किमंत | मशिन खरेदी केल्याची दिनांक | मशिनचे आयुष्य/कॉपीज मर्यादा | दि.३०.०४.२०१६ अखेर झालेल्या झेरॉक्स प्रती | मशिनची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन Work Center ७५५६ | रु.८,३९,०००/- (देणगी) | दि.२१.०२.२०१२ | १५ लाख प्रती किंवा ०५ वर्ष वापर | १४,१४,२९५ प्रती | मशिन चालु आहे. (FSMA कॉन्ट्रॅक्ट केलेले आहे.) |
| ०२. | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन Work Center ५७५५ | रु.६,५१,०००/- (खरेदी) | दि.११.१०.२०१२ | १० लाख प्रती किंवा ०५ वर्ष वापर | ७,१२,०९० प्रती | मशिन बंद पडलेले आहे. |
| ०३. | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन Work Center ५७७५ (Recondition) | रु.७६,६५०/- (खरेदी) | दि.०३.१२.२०१५ | १ लाख प्रती किंवा १ वर्ष वॉरंटी | ९०,३३३ प्रती | मशिन चालु आहे. |

संस्थानच्या सर्व विभागांच्या दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या झेरॉक्स, आदेश, परिपत्रके, तसचे माहिती अधिकार कायद्यान्वये मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स, कोर्ट कामासाठी लागणारे कागदपत्रांच्या झेरॉक्स, मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढील विषयांच्या टिपण्या, व कार्यवाहीच्या झेरॉक्स, कर्मचाऱ्यांचे वार्षिक १६ नं.फॉर्म, व इतर संस्थान कागदपत्रांच्या झेरॉक्सचे व प्रिंटींगचे कामवरील झेरॉक्स मशीनवर केले जाते. उपरोक्त कामासाठी वरील अ.क्र.१ व ३ मशीनचा वापर केला जात आहे.

**अ)** पैकी अ.क्र.१ चे मशिन चालु स्थितीत आहे. त्याचे वार्षिक सर्व्हीसचे (FSMA) कॉन्ट्रक्ट केलेले आहे. सदर मशिनची प्रती काढण्याची क्षमता/मर्यादा संपलेली आहे. तरीही सदरचे मशिन चालु आहे. मात्र ते केव्हांही बंद पडू शकते.

**ब)** अ.नं.०२ चे मशीन सतत बंद पडत आहे. सदरचे मशीन वेळोवेळी दुरुस्त करुनही ते नेहमीच बंद पडत आहे. दोन वेळेस दुरुस्त केलेले आहे. परंतु ते व्यवस्थित चालत नाही. झेरॉक्सचे कंपनीचे इंजिनियर (औरंगाबाद) यांनी दि.२३.०७.२०१५ रोजी येऊन सदर मशीनची पहाणी केली असून सदर मशीनचे Paper path assembly, Developer Gear and Module Gear, ADFS Feed Roller अशा प्रकारचे पार्ट गेलेले आहे. या मशिनवर खर्च करुन मशीन किती दिवस चांगले चालेल, याबाबत सांगता येत नाही. सदर मशीनवर त्याचे क्षमतेनुसार ७० % झेरॉक्स प्रती काढलेल्या आहेत.

**क)** अ.क्र.३ चे मशिन हे डिसेंबर-२०१५ मध्ये खरेदी केलेले आहे. मात्र सदरचे मशिन हे Recondition स्वरुपाचे आहे. सदर मशिनची वॉरंटी ही १ वर्ष आहे. तसेच त्याचे ड्रम कार्टेजची किमंत अंदाजे प्रती नग रु.२४,०००/- (अक्षरी रुपये चोवीस हजार) मात्र इतकी आहे. सदर ड्रम कार्टेजची प्रती काढण्याची सरासरी क्षमता ३०,००० प्रती इतकी आहे. त्यामुळे मनुष्यबळ, विद्युत पुरवठा, स्टेशनरी व इतर अनुषंगिक खर्च गृहीत धरता सदरचे मशिनवर काढण्यात येणाऱ्या झेरॉक्स प्रतींकरिता जादा खर्च येत आहे.

त्यामुळे उपरोक्त "अ" "ब" व "क" चे अवलोकन करता संस्थानचे दैनंदिन झेरॉक्सच्या कामासाठी खालील वर्णनाचे/क्षमतेचे एक नग अद्यावत नामांकित कंपनीचे झेरॉक्स मशीन खरेदी करणेची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | मशिनचा तपशिल | वर्णन/क्षमता | मागणी संख्या | अंदाजे दर प्रती नग (सर्व करांसह) |
|---|---|---|---|---|
| ०१. | Digital Multifunctional Copier- Machines | **55PPM,** Print – **1200 X 1200dpi**,<br>Copy/Print/Scan, DADF Duplex,<br>200 Sheet Single Pass Doc Handler,<br>100 Sheet bypass, 400 Sheet OCT,<br>3 X 500 Sheet Trays,<br>3600 Sheet tandem Tray,<br>Scan to Email/NW/USB, Text Searchable PDF/A, PS3, PCL6, Internet Fax, Standard Accounting,<br>**Hard Disk-** Minimum 250GB,<br>**Processor-** 1GHz-Dual Core,<br>**Memory -** 2GB,<br>High Speed USB 2.0 direct print, Optional Wi-Fi (with USB Wireless Adapter) | ०१ नग | रु.५,००,०००/- |

उपरोक्त नमुद केलेल्या वर्णनाचे नामांकित कंपनीचे एक नग झेरॉक्स मशिन विहित पद्धतीने निविदा / दरपत्रके मागवून खरेदी करता येईल. त्याकामी अंदाजे रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त नमुद केलेल्या वर्णनाचे, नामांकित कंपनीचे एक नग झेरॉक्स मशिन विहित पद्धतीने निविदा/दरपत्रके मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानचे दैनंदिन झेरॉक्स कामासाठी प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे ०१ नग अद्ययावत झेरॉक्स मशिन विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१६ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे सोमवार दि.१०/१०/२०१६ ते गुरुवार दि.१३/ १०/ २०१६ या चार दिवसात श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव साजरा होणार आहे. त्या कालावधीत खालीलप्रमाणे कामे व तयारी करावी लागणार आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम नं १७ (१) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थाच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे,मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्नकामी लावणे. ही समितीची कर्तव्य असतील.

२१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार,मंदिरातील धार्मिक विधी,पुजा-अर्चा,समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे अशी तरतूद आहे.

| अ.न | तपशिल | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| १. | उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद | संस्थान व्यवस्थापना मार्फत पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणे भक्तमंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठवावा लागतो.यंदाचे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,८०,००० निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील.<br>तसेच नेहमीप्रमाणे निमंत्रण पत्रिका व उत्सवासंबधीत माहिती प्रेस नोट म्हणून वर्तमान पत्रातून जनसंपर्क कार्यालया मार्फत प्रसिध्दी देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २. | उत्सव व्यवस्था | **अ) कलाकार कार्यक्रम** |
| | सोमवार, दि.१०/१०/२०१६ ( प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदानाचे स्टेजवर होईल. |
| | मंगळवार, दि.११/१०/२०१६ (मुख्य दिवस) | १.सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रममैदानाचे स्टेजवर होईल.<br>२.रात्रौ. ११.०० ते पहाटे ५.०० पर्यत कलाकारांची सेवा,हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | बुधवार, दि.१२/१०/२०१६ (तृतीय दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदानाचे स्टेजवर होईल. |
| | गुरुवार, दि.१३/१०/२०१६ (सांगता दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदानाचे स्टेजवर होईल. |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | सोमवार, दि.१०/१०/२०१६ ते गुरुवार, दि.१३/ १०/ २०१६ या कालावधीत नेहमीच्या वेळेप्रमाणे कीर्तन कार्यक्रम होतील. | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी चार दिवस कार्यक्रम ठेवावयाचा आहे.<br>निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल.<br>निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत अदा करण्यात येईल. कीर्तनकार निश्चिती करावयाची आहे. |
| | | **क) विविध पुजा व आराधना विधी** |
| | सोमवार, दि.१०/१०/२०१६ ते गुरुवार, दि.१३/१०/२०१६ | भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात सहभाग, पालख्या व रथ मिरवणूक आराधना विधी,विणा व पोथी त्यातील सदस्यांचा सहभाग, सिमोल्लंघन इ. कार्यक्रम नेहमीचे प्रथेप्रमाणे करण्यात येतील. |
| ३. | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात सोमवार,दि.१ ०/१०/२०१६ रोजी पहाटे ५.१५ वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवातहोईल.<br>दि.११/१०/२०१६ रोजी पहाटे ५.०० वा पारायण समाप्ती होईल. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य पहिले ०३ अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.०९/१०/२०१६ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदीर विभागातील कर्मचारी यांचेकडे नोंदवीले जातील त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तांस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा,प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपुजा या कार्यक्रमा करीता मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होतील. |
| ४. | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक.१०/१०/२०१६ रोजी श्रींचे पालखीचे गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक होईल. दि.११/१०/२०१६ रोजी रात्रौ. ९.१५ वा रथाची गावातून मिरवणूक होईल. |
| ५. | कार्यक्रम सांगता | काल्यांचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रीत कीर्तनकार करतील. |
| ६. | श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा | उत्सव काळात सोमवार, दि.१०/१०/२०१६ ते गुरुवार, दि.१३/१०/२०१६<br>अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा बंद राहतील. |
| ७. | विद्युत रोषणाई | समाधी मंदीर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदीर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री पुण्यतिथी उत्सवात व्दारकामाई मंडळ,मुंबई ,विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात.त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन,चहा व नाष्टयाची व्यवस्था संस्थान मार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ८. | गाव जेवण | उत्सवाच्या सांगतादिनी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. |
| ९ | प्रसाद- भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह रु.१०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे कुटंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्ती,निमंत्रीत कलाकार,पोलिस कर्मचारी, उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणारे व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकीटे,चहा,कॉफी, दूध व बिस्कीटे इ. कॅन्टीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवशी मिष्टान्न प्रथा नेहमीचे दराने देण्यात येईल. श्री पुण्यतिथी उत्सवांत येणाऱ्या पालखी धारकांना एकवेळचे जेवण संस्थान मार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सन -२०१६ मध्ये तीनही दिवसांचे मिष्टांन्न पदार्थ बुंदी ठेवण्यात आली होती. या उत्सवात तीनही दिवसात मिष्टान्न म्हणून बुंदी देता येईल. |
| १०. | संरक्षण विभाग | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपण परवानगीबाबत मा.पोलिस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ११. | लेखाशाखा | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर तीन शिफ्टमध्ये चालू ठेवण्यात येतील.<br>श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूची प्रसाद रुपाने विहीत पध्दतीने विक्री करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १२. | बांधकाम | उत्सव कालावधीत समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व्यवस्था करावयाची आहे. |
| १३. | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्वतयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकते नुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी कामगार अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १४. | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साई धर्मशाळा,व्दारावती, साईबाबा भक्त निवासस्थान इ. इमारतीमधून पालखी पदययात्री व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल |
| १५. | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत मंदीर परिसर,पिंपळवाडी रोड दर्शनरांग व श्री साई प्रसादालय याठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्य अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात येईल. |
| १६. | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात,उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था साईधर्मशाळा मध्ये करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर ०१ वेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येते. |
| १७ | पाणी पुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२०१५ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५२,४६,२००/- मात्र इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु. ३६,३४,५२८/- मात्र इतका खर्च झालेला आहे.<br>श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१६ करीता विविध विभागांची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३७,८९०००/- मात्रचा खर्च मंजुरीसाठी सादर केले आहे |

**आराधना विधी बाबत टिपणी- मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९४ नुसार**

"आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर आहे. त्याचठिकाणी करण्यात यावा.सदरहू आराधना विधीचे थेट (Live telecast) टिव्हीवर व इतर माध्यमांना करणेस यावे.यामुळे समाधी मंदीर परिसरातील दूरचित्रवाणीच्यासंचावर व संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. समाधी मंदिर ( बुटी वाडयास ) १०० वर्ष झाल्याने जुनी वास्तू झाली आहे. त्यामुळे गावकरी व इतर यांची वर्दळ वरती बंद करुन लाईव्हदर्शन देणेत यावे. आराधना विधीकरीता जे यजमान (पतिपत्नी) यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉल येथे करणेत यावी त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदीर हॉलवर प्रवेश नसावा. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीना दिले जाते.तेच शाहीभोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाई प्रसादालयाच्या व्ही.आय.पी हॉलच्या बाजूला असलेल्या दोन हॉलमध्ये ठरावीक वेळेत देणेत यावे. व्यवस्था करण्यात यावी. या दिवशी साईभक्त व गावक-यांसाठी श्री साई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थान तर्फे मोफत देण्यात यावे. "

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ करीता झालेला खर्च व श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ साठी अपेक्षितखर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.न | तपशिल | विभाग | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ | | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ |
|---|---|---|---|---|---|
| | | | **अंदाजे खर्च** | **प्रत्यक्ष खर्च** | अंदाजे खर्च |
| १. | मंडप, कमानी, स्टेज उभारणे खर्च | बांधकाम | ७,९७,५१५.०० | ४,१७,०२५.०० | ७,००,०००.०० |
| २. | कलाकार , कीर्तनकार बिदागी खर्च | मंदीर | २,२०,०००.०० | १४,७४६.०० | २,५०,०००.०० |
| ३. | मिष्टान्न खर्च-मजूरीसह, फनिचर भाडेसह खर्च | प्रसादालय | ९,५७,५८७.०० | ७,४०,५०८.०० | ९,००,०००.०० |
| ४. | विद्युत रोषणाई, जनरेटर भाडे, इंधन इ. खर्च | विद्युत | ९,९५,०००.०० | ९,०१,६०३.०० | १०,००,०००.०० |
| ५. | छपाई खर्च | वशी-५,८ | ५,००,०००.०० | ३,२३,५७५.०० | ५,००,०००.०० |
| ६ | पोस्टेज खर्च, | वशी-११ | ९,९६,०००.०० | ९,६४,२१७.०० | ९,८०,०००.०० |
| ७ | इतर खर्च – (बोर्ड बनविणे,पूजा-अर्चा, इ.) | जनसंपर्क, मंदीर, साईप्रसाद | ४८,४४२.०० | ३७,७१०.०० | ४५,०००.०० |
| ८ | जादा कंत्राटी कर्मचारी,स्वयंसेवक (विदयार्थी ) मानधन खर्च | संरक्षण, कॅन्टीन, साईप्रसाद, साईबाबा भक्तनिवास, मंदीर, प्रसादालय | ३,०७,६५६.०० | २,१४,९८२.०० | ३,००,०००.०० |
| ९. | पालख्यांचे पिण्याचे पाणी व्यवस्था खर्च | पाणीपुरवठा | २,२४,०००.०० | २०,१६२.०० | १,००,०००.०० |
| १० | मंदीर व मंदीर परिसर फुलांची सजावट खर्च | बगीचा | २,००,०००.०० | -- | २,००,०००.०० |
| | | **एकुण खर्च-** | **५२,४६,२००.००** | **३६,३४,५२८.००** | **४९,७५,०००.००** |

तरी उपरोक्त प्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव २०१६ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.४९,७५,०००.०० (अक्षरी रुपये एकोणपन्नास लाख पंच्याहत्तर हजार) मात्र चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री पुण्यतिथी उत्सव- २०१६ साजरा करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.४९,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **जुने गावकरी गेट पुर्ववत चालू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.09.08.2016 रोजी मंदिर व मंदिर परिसर सुरक्षा संदर्भात झालेल्या सभेमध्ये पुर्वीचे गावकरी गेट चालू करणे बाबत मा व्य. समितीचे समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात यावा.असे ठरले.

त्यानुषंगाने असे की, दि.18.09.2014 रोजी 11.00 वाजता तत्कालीन कार्यकारी अधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचे कार्यालयात उपकार्यकारी अधिकारी सो. तसेच शिर्डी येथील प्रतिष्ठीत गावकरी यांनी ग्रामस्थांना नंदी गेट येथून दर्शनास सोडणे बाबत तोंडी मागणी केली होती. सदर विषयावर चर्चा होऊन दि.18.09.2014 पासून अभिषेक गेट बंद करुन समाधी मंदिराचे नंदी गेटला गावकरी गेट म्हणून सुरु करुन तेथील कर्तव्यावरील पहारेकरी यांचे मार्फत ग्रामस्थांचे ओळखपत्र तपासून त्यांची रजिस्टरवर नोंद करुन दर्शनास सोडण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे सध्या पी.आर.ओ. कार्यालयामार्फत व्ही.आय.पी. साईभक्तांना पास देण्यात येऊन त्यावर सदर गेटमधून सोडणे बाबत शिक्का मारण्यात येतो. व्ही आय पी पास, आय टी विभागातील कर्मचारी यांचे मार्फत व्हेरिफाय करण्यात येऊन सदर पासधारक साईभक्तांची नोंद सुरक्षा रक्षकामार्फत घेऊन साईभक्तांना नंदी गेट (सध्याचे गावकरी गेट) येथून सोडण्यात येते.

सध्याचे गावकरी गेट (नंदी गेट) येथून शिर्डी गावातील ग्रामस्थ तसेच जनसंपर्क कार्यालयामार्फत व्ही. व्ही.आय.पी.साईभक्त जातात.पासधारक साईभक्त व ग्रामस्थ एकाच गेट मधून जात असतांना तेथे उपस्थित इतर साईभक्त देखील त्याच गेटमधून दर्शनास जाण्याचा आग्रह धरतात व तेथील सुरक्षारक्षकांबरोबर वाद घालतात.

तसेच गावकरी गेट (नंदी गेट) येथून श्रींचे समाधी मंदिरात जाते वेळी श्रींचे गाभाऱ्यामध्ये साईभक्तांची दर्शनरांग चालू असते. सदरची रांग थांबवून व्ही.आय.पी.पास धारक साईभक्त तसेच ग्रामस्थ श्रींचे समाधी पर्यंत दर्शनास जातात या दर्शन नियोजनामुळे दर्शनरांगेतील साईभक्तांचे मनात गैरसमज निर्माण होऊन ते गाभाऱ्यातील सुरक्षा रक्षकांना विचारणा करुन वाद घालतात.त्यानंतर श्रींचे समाधी समोरील दोन्ही खांबाच्या येथून दर्शनार्थी साईभक्तांची बाहेर जाण्याची मंदिर गाभाऱ्यातील रांगेतून गावकरी व व्ही व्ही आय पी साईभक्त समाधीकडे जात असल्याने मंदिरातुन बाहेर निघणारे साईभक्त व गावकरी/व्ही आय पी साईभक्त समोरा-समोर येऊन एकाच ठिकाणी गर्दी होते. त्यामुळे दर्शनार्थी साईभक्तांना बाहेर काढण्यास अडचणी निर्माण होतात.

तरी प्रस्तावातील उक्त अडचणी, जनरल दर्शनरांगेतील साईभक्तांच्या भावना, तसेच गर्दी नियोजन लक्षात घेता, पुर्वीचे गावकरी गेट पुर्ववत शिर्डी ग्रामस्थांसाठी चालू करणेबाबतचा विषय चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.५७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या अडचणी, जनरल दर्शनरांगेतील साईभक्तांच्या भावना, तसेच गर्दीचे नियोजन या बाबींचा विचार करता, शिर्डी ग्रामस्थांना श्रींचे दर्शनासाठी पुर्ववत गावकरी गेट चालू करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ मंदिर विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम कलम (३२) बाबत.**

**प्रस्ताव-** दि.०८/०८/२०१६ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात झालेल्या सभेमध्ये संस्थान कर्मचारी कर्तव्यावर असताना त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून तयार करण्यात आलेला श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे अधिनियमातील कलम (३२) विषयी चर्चा करण्यात आली होती. संस्थानचा कारभार हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ तरतुदी अंतर्गत चालतो. या अधिनियमामध्ये कलम ३१ व ३२ अंतर्गत खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे

1) **Clause- 31:-** The members and all officers and employees of the trust shall be deemed to be public servent within the meaning of section (21) of Indian Penal code and section 2 (c) of the Prevention of corruption act, 1988.

2) **Clause- 32**:- No suit, prosecution or other legal proceeding shall lie against that State Governmrnt, the committee or any member, officer or employee of the committee, for anything which is in good faith done or intended to be done under this act or the rules and regulations made thereunder.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मधील कायम व कंत्राटी कर्मचारी हे उपरोक्त अधिनियमानुसार शासकिय कर्मचारी/ लोकसेवक म्हणून संबोधला जातो म्हणून त्यांस कर्तव्य बजावत असताना कोणी व्यत्यय आणल्यास शासकिय कामात अडथळा आणला, असा त्याचा अर्थ होतो.

सदर कर्मचारी त्या अध्यादेशात नमुद केलेल्या निर्देशाप्रमाणे काम करीत असल्याने पोलिस विभागाने संबंधीत अधिनियमाबाबत माहीती घेऊन काम केल्यास सलोख्याचे संबंध राहतील मंदिर सुरक्षा विभागाचे पोलिस निरीक्षक यांनी मंदिर सुरक्षाकरीता नव्याने आलेल्या पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचा-यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ तरतुदी अंतर्गत कलम(३१) व (३२) ची माहिती द्यावी.

मंदिर सुरक्षा करीता नेमणूक केलेले कुणीही संस्थान कर्मचारी अथवा पोलिस कर्मचारी यांनी साईभक्तांशी कुठल्याही कारणावरुन वाद घालू नये. सर्वांनी साईभक्तांशी सौजन्याने वागावे. तसेच साईभक्तांना मंदिर दैनंदिन कार्यक्रम, लाडू काउंटर, प्रसादालय, निवासव्यवस्था, जनसंपर्क कार्यालय इत्यादीबाबत व्यवस्थित माहिती द्यावी. संस्थान कर्मचारी तसेच संबंधीत पर्यवेक्षक व पोलिस कर्मचारी यांना संबंधीत पोलिस निरीक्षक यांनी याबाबत योग्य त्या सुचना द्याव्यात.

सुरक्षा रक्षकांनी व पोलिस कर्मचारी यांनी कर्तव्यावर असतांना मंदिर परीसरात अथवा संस्थान परीसरामध्ये साईभक्तांच्या गहाळ झालेल्या वस्तु मिळून आल्यास त्वरीत संस्थानचे संरक्षण कार्यालयांत जमा करणेत याव्यात. कर्तव्यावर असतांना कुणीही संस्थान कर्मचारी अथवा पोलिस कर्मचारी धुम्रपान/ मद्यपान करणार नाही. तसे आढळून आल्यास संबंधीतावर कडक कारवाई करणेत येईल साईभक्तांचे सुरक्षेकरीता संस्थान कर्मचारी व पोलिस कर्मचारी यांनी कर्तव्यावर असतांना मंदिर परीसरात अथवा संस्थान परीसरामध्ये पाकीटमार, पॉलिसवाले, उपद्रवी इसम येणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी. उपद्रवी इसम/ पाकिटमार आढळून आल्यास त्यांना त्वरीत पकडून शिर्डी पोलिस स्टेशनला जमा करण्यात यावे.

असे नम्र मत आहे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम, २००४ कलम (३२) नुसार संस्थान कर्मचा-यांबाबत कर्तव्यावर असतांना कोणताही अनुचित प्रकार घडल्यास सदर कर्मचा-याने लोकसेवक म्हणून पोलिस स्टेशनला फिर्याद देऊन संस्थानमार्फत सदर कर्मचा-यांना लागणा-या विधी व कायदे विषयक सर्व मदत, सुविधा व पुर्तता ही संस्थानमार्फत करण्यात यावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मंदिर सुरक्षा विभागाचे पोलिस निरीक्षक यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ तरतुदी अंतर्गत कलम(३१) व (३२) ची माहिती मंदिर सुरक्षाकरीता नव्याने आलेल्या पोलिस अधिकारी/ पोलिस कर्मचारी यांना व संस्थान कर्मचाऱ्यांनाही द्यावी. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम, २००४ कलम (३२) नुसार संस्थान कर्मचाऱ्यांबाबत कर्तव्यावर असतांना कोणताही अनुचित प्रकार घडल्यास सदर कर्मचाऱ्याने लोकसेवक म्हणून पोलिस स्टेशनला फिर्याद दिल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांना आवश्यक असणारी विधी व कायदे विषयक सर्व मदत, सुविधा, पुर्तता ही संस्थानमार्फत करण्यात यावी.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया शासनाचे अधिकृत कंन्सल्टंसी कंपनीकडून अंतिम करणेकामी न्युनतम दरधारकांची नेमणुक व प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्फत साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल चालू ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतुद: कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधाउपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.: 1) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 912. 2) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 08/10/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 329.

प्रास्ताविक: साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेकामी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल२०१७ मध्ये संपुष्टातयेणार आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली व अनुषंगिक बाबींची पुढील काळासाठी दुरुस्तीव देखभाल करणेकामी नविन कंपनीची नेमणुक करण्यासाठीची प्रक्रिया संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार इकडील विभागाकडून सुरु करण्यात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३२९ नुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीकडुन अंतिम करणेस मान्यता देण्यात आलेली आहे

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे संदर्भ क्रं ०१ चे अध्यादेशातील अधिकृत कंन्सल्टंसी एजन्सीकडुन करणेकामी, मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी "शासन निर्णय दि. ०१/०७/२०१४ नुसार संबधीत एजन्सींना SOW कळवावा व त्यांना त्रिसदस्यीय समितीसमोर सादरीकरण करणेसाठी बोलवावे." असे निर्देश दिलेले होते.

मा. कार्यकारी अधिकारी सो यांनी दिलेल्या सुचनेनुसार विषयांकीत प्रकरणी M/s. Accenture, M/s. Ernst & Young, M/s. KPMG, M/s. PWC या इच्छुक कंन्सल्टंसी एजन्सींना संदर्भ क्रं ०४ चे मंजुर टिपणी

अन्वये आमंत्रित करण्यात आले होते. परंतु, त्यापैकी M/s. Ernst & Young, M/s. KPMG, M/s. PWC या इच्छुक कंन्सल्टंसी एजन्सींनी दि. २१/०४/२०१६ रोजी, सकाळी ११.०० वाजता, ठिकाण-श्रीसाईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे प्रात्यक्षिक/सादरीकरण मा कार्यकारी अधिकारी सो., मा. सर्व प्रशासकीय अधिकारी सो., माहिती तंत्रज्ञान विभाग कर्मचारी व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधींचे समक्ष व उपस्थितीत दाखविलेले आहे

प्रात्यक्षिकाअंती उपस्थित प्रतिनीधींनी साईटेक प्रकल्पाची व्याप्ती व उपलब्ध कालावधी लक्षात घेता, निविदा प्रक्रिया राबवुन नविन कपंनीची नेमणुक करणे व अनुषंगिक बाबी वेळेत पुर्ण होणेबाबत साशंकता असल्याने, प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून प्रकल्पाची दुरुस्तीव देखभालीचे काम सुरु ठेवावे, असे मत प्रकट केलेले आहे.

यावेळी उपस्थित प्रतिनींधींना सदरकामी त्यांचे एक वर्षाकरीताचे दर बंद पाकीटामध्ये संस्थानला सादर करणेस सुचित करण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन संबधीत एजन्सींनी त्यांचे दरपत्रक बंद पाकीटामध्ये संस्थानचे आवक विभागास सादर केलेले होते. प्राप्त झालेले दरपत्रके दि. १३/०५/२०१६ मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीसमोर उघडलेले असून, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

| अ.नं. | कंपनीचे नाव | आवक नंबर व दिनांक | दिलेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | M/s. PWC | १६००, २६/०४/२०१६ | ४७,२५,०००/- | |
| २ | M/s. Ernst & Young | १६०१, २६/०४/२०१६ | ९४,५०,०००/- | |
| ३ | M/s. KPMG | १६०२, २६/०४/२०१६ | ३८,४०,०००/- | न्युनतम दरधारक |

उपरोक्त निविधारकांपैकी M/s. KPMG या शासनाचे दि. ०१/०७/२०१४ रोजीचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीचे "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदा प्रक्रिया अंतिम करणेकामीचे, एक वर्षाकरीताचे दर रुपये ३८,४०,०००/- मात्र न्युनतम आहे.

सन २०१८ मध्ये साईबाबांचे समाधी शताब्धी महोत्सव असल्याने या काळामध्ये शिर्डी येथे येणा-या साईभक्तांच्या संख्येमध्ये लक्षणिय वाढ होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत साईटेक प्रकल्पाअंतर्गत साईभक्तांसाठी ऑनलाईन सर्व्हिसेस, देणगी कार्यालय, रुम बुकींग, कापडकोठी, पुस्तकविक्री, प्रसादालय, कॅन्टीन इ. सारख्या कार्यप्रणाली कार्यरत आहेत. दि. २१/०४/२०१६ सादरीकरणासाठी उपस्थित कन्सल्टींग कपंनीचे प्रतिनीधींनी सुचित केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाची व्याप्ती पाहता, "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदा प्रक्रिया राबवुन नविन पात्र कपंनीची नेमणुक करणे व त्यानंतर कॉग्नीझंट कंपनीकडून सदर कंपनीस प्रकल्पाची सर्व बाबींचे ज्ञान अवगत करुन घेणे इ. बाबी उपलब्ध कालावधीमध्ये पुर्ण होतील याबाबत साशंकता आहे सबब, संबधीतांचे अभिप्रायानुसार "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदा प्रक्रिया राबवुन नविन पात्र कपंनीची नेमणुक झालेनंतर सहा महिन्यांकरीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत साईटेक प्रकल्पदुरुस्तीदेखभाल चालू ठेवावे लागेल, असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे निविधारकांपैकी M/s. KPMG या शासनाचे दि. ०१/०७/२०१४ रोजीचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीचे "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदा प्रक्रिया अंतिम करणेकामीचे, एक वर्षाकरीताचे रुपये ३८,४०,०००/- मात्र चे न्युनतम दर मान्य होऊन त्यांची सदरकामी निवड होणेकामी व "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदा प्रक्रिया राबवुन नविन पात्र कपंनीची नेमणुक झालेनंतर पुढील सहा महिन्यांकरीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत साईटेक प्रकल्पदुरुस्तीदेखभाल चालू ठेवणेकामी त्यांना माहे मे-२०१७ पासून मुतदवाढ देण्यास मा.मुंबई उच्च न्यायलयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/०६/२०१६ रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं. ३२५ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले होते.

"प्रस्तावीतकामी संस्थानकामी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्चन्यायलयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यता देण्यात आली"

मागणी : मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ यांचे दिनांक २८ जुलै, २०१६ रोजीच्या अधिसुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम – २००४ नुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे गठण करण्यात आले आहे. सबब, "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदा प्रक्रिया शासनाचे अधिकृत कंन्सल्टंसी कंपनीकडुन अंतिम करणेकामी न्युनतम दरधारकाची नमेणुक व प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फतसाईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल चालू ठेवणेकामी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत इकडील विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ३२५ रद्द होणेसाठी व सदर विषयी नवीन निर्णय होणेसाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान: तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: उपरोक्त निविधारकांपैकी M/s. KPMG या शासनाचे दि. ०१/०७/२०१४ रोजीचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीचे "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदा प्रक्रिया अंतिम करणेकामीचे, एक वर्षाकरीताचे रुपये ३८,४०,०००/- मात्र चे न्युनतम दर मान्य होऊन त्यांची सदरकामी निवड

होणेकामी त्यांना कार्यादेश देण्यास व दरम्यानच्या काळात माहे एप्रिल २०१७ अखेर मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कार्यकाल संपत असल्याने, प्रकल्पासाठी नविन एजन्सीची नेमणुक होईपर्यंत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत साईटेक प्रकल्प दुरुस्तीदेखभाल चालू ठेवणेकामी त्यांना मुदतवाढ देण्यास मान्यता घेणेकामी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया राबविणेकरीता शासनाचे अधिकृत कंन्सल्टंसी M/s. KPMG यांचे एक वर्षासाठी रु.३८,४०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कार्यकाल माहे एप्रिल २०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांना आहे त्याच अटी/ शर्तीवर पुढील ६ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **साईटेक प्रकल्पाचे System Audit या प्रकल्पातंर्गत अकाऊंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ईआरपी कार्यप्रणाली Migration Audit करणेकामी पात्र निविदाधारकांच्या व्यावसायिक निवीदा उघडून त्यातील न्युनतम दरधारक निविदाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.५७३** सदरहू प्रस्ताव नव्याने गठीत करणेत आलेल्या स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **दरवर्षीप्रमाणे सन २०१७ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

प्रस्तावनाः- श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी तसेच श्री साई दिनदर्शिका छपाई करुन किफायातशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

प्रस्ताविकः- सन २०१६ चे श्री साई दिनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी मा. त्रिसदस्यीय समिती व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेनुसार वृत्तपत्रात जाहिरात देवून ई निविदा मागवून पात्र निविदाधारकांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून न्युनतम दरधारकांकडून छपाई करुन घेणेबाबत ठरल्यानुसार छपाई करण्यात आली होती. दि.१२.०३.२१६ अखेर शिल्लक साठयाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | मंजूर दर | विक्री दर | आदेशीत संख्या | जमा संख्या | ३१ डिसेंबर २०१५ ते मार्च अखेर पर्यंत विक्री संख्या | शिल्लक साठा दि.१२.०३.२०१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २०१६ | ६६.१५ | ७५/- | १,१०,००० | १,१०,००० | १,०२,५६३ | ७४३७ |
| ०२ | श्री साई दिनदर्शिका २०१५ चे ०१ पानी मोठे (१९"X२९") | १५.९० | २०/- | १,७०,००० | १,७०,००० | १,५४,७६९ | १५२३१ |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"X३५" | २३४.०० | २५०/- | १२५०० | १२५०० | ११९०० | ६०० |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७पेजेस) आकार १९.२५"X२७.२५" | २९३.०० | ३००/- | ५५०० | ५५०० | ५४६८ | ३२ |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज) आकार १९"X२७" | २७३.७० | ३००/- | १५०० | १५०० | १४८५ | १५ |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"X०७" | २३८.०५ | २५०/- | ५५०० | ५५०० | ५४६२ | ३८ |

उपरोक्त तक्त्यातील दैनंदिनी व दिनदर्शिक व डिलक्स दिनदर्शिकांचा छपाई कामाचा कार्यादेश माहे २० डिसेंबर २०१५ रोजी देण्यात आला होता व दैनंदिनी व दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका दि. ३१ डिसेंबर २०१५ पासून विक्रीसाठी उपलब्ध झाल्या. भक्तांचा जानेवारी व फेब्रुवारी माहिन्यात विक्रीचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद लक्षात घेता, सन २०१७ करीता प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल (सन २०१७) | प्रस्तावति छपाई संख्या | अंदाजे छपाई दर | आदेशीत संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी | ३,००,००० | ७०/- | २१०००,०००.०० |
| ०२ | श्री साई दिनदर्शिका २०१५ चे ०१ पानी मोठे (१९"X२९") | ५,००,००० | २५/- | १२५०००००.०० |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"X३५" | २५,००० | ३००/- | ७५००००००.०० |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट कॅलेंडर्स (७पेजेस) आकार १९.२५"X२७.२५" | १०,००० | ३००/- | ३००००००.०० |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज) आकार १९"X२७" | ३,००० | ३००/- | ९०००००.०० |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"X०७" | १५,००० | २५०/- | ३७५०००००.०० |
| | | | एकूण रुपये. | ४,८६,५०,०००.०० |

विभागाचा अभिप्राय/ स्पष्टः- उपरोक्त तक्त्यातील प्रस्तावित श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिक सन २०१७ ह्या सप्टेंबर-ऑक्टोंबर माहिन्यात छपाई होऊनउपलब्ध झाल्यास सदरचा स्टॉक हा जानेवारी अखेर विक्री होईल परंतु छपाईकामी उशीरा मान्यता मिळाल्यास उपरोक्त तक्त्यातील संख्या काही प्रमाणात कमी करुन छपाई आदेश देण्यात येईल. श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव सन २०१७ पासून चालू होत आहे त्यामुळे दैनंदिनी व दिनदर्शिकेत महासमाधी शताब्दीचे महोत्सवचे नियोजीत कार्यक्रमांचा उल्लेख करता येईल व दैनंदिनी/ दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका माहे ऑक्टोबर २०१६ पासून उपलब्ध झालेस त्याचा खप जास्त प्रमाणात होऊन श्री साईबाबा महासमाधी शताब्दीचा प्रचार प्रसार होणेस मदत होईल.

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निविदाधारकांना निम्नतम दराने छपाई कार्यादेश देणेत येतील. याकामी अंदाजे रु.४,८६,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्याता मिळालेनंतर, मा.मुंबई उच्चन्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पुस्तके/फोटो/ श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी केलेल्या रु.७,००,००,०००/- चे अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार उक्तकामासाठीचा छपाई खर्च करता येईल. सदर दैनंदिनी व दिनदर्शिकांची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब प्रस्तावित दैनंदिनी/ दिनदर्शिकांची २०१७ छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु. ४,८६,५०,०००/- खर्चास मान्यता असावी.

२) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

३) जनसंपर्क कार्यालयव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

४) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस मान्यता असावी.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका सन- २०१७ ची छपाई करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,८६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच संबंधीत विभागाने प्रस्तावित प्रकाशने श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होतील यादृष्टीने कार्यवाही करावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **कार्यालयासाठी जागा मिळणेबाबत मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम) यांचे पत्र क्र.मविविकंप./ 2016 शिर्डी ऑफिस/ 0587, दि.22.07.2016.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावन मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

प्रस्ताव– महाराष्ट्र विमानतळ विकास कं.मर्या.(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम) यांचे कार्यालयासाठी जागा देणेबाबत..

प्रस्तावना - शिर्डी विमानतळ नजीकच्या भविष्यकाळात विमान उड्डाणासाठी सुरु होणार असून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे कर्मचारी शिर्डीला विमानतळावर कामावर रुजू झाले असून शिर्डी विमानतळ शिर्डी गावापासून १४ किमी.दूर असल्यामुळे तहसिलदार ऑफीस,संस्थान विश्वस्तव्यवस्था, म.रा.वि.मं., बीएसएनएल, बॅंक पोलीस स्टेशन, शिर्डी नगरपंचायत इ.दैनंदिन संपर्काच्या कार्यालयांशी थेट संपर्क साधण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस अंदाजे २०' X २०' चे कार्यालय शिर्डीमध्ये संस्थानचे इमारतीमध्ये उपलब्ध करुन देणेकामी मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादीत (महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम) यांनी उपरोक्त विषयांकित अर्धशासकीय पत्रान्वये इकडेस कळविलेले आहे.

सदर कार्यालयाच्या इमारतीमध्ये वीज, पिण्याचे पाणी, दूरध्वनी आणि स्वच्छतागृहाची सोय असावी तसेच सदर कार्यालय शक्यतो तळमजला किंवा पहील्या मजल्यावर असावे. सदरचे कार्यालय हवाई प्रवाशांना विमान आगमन, प्रस्थानाची वेळ तसेच इतर संबंधित माहीती पुरविल तसेच हवाई प्रवाशांना प्राधान्याने श्री साईबाबांचे दर्शन करविण्यासाठी साई संस्थानशी समन्वय साधता येईल. विमानाचे तिकीट देण्याची व्यवस्था देखील भविष्यकाळात सदर कार्यालयातून करण्यात येईल. तरी तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, असेबाबत पत्रात नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त पत्रात नमूद प्रमाणेची जागा साईबाबा संस्थानच्या मालकीच्या साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील ए विंग इमारतीच्या दक्षिणेकडील असलेल्या रिकाम्या गाळयात ११ महीन्याचे करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून भाडयाच्या आकारणीची रक्कम ठरवून घेवून भाडेतत्वावर देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, महाराष्ट्र विमानतळ विकास कं.मर्या. (महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम) यांचे मागणीनुसार त्यांना कार्यालयासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील ए विंग इमारतीच्या दक्षिण बाजुस असलेल्या रिकामा गाळा ११ महीन्याच्या कराराने भाडेतत्वावर देण्यात यावा. त्यासाठी आकारावयाच्या भाडेपट्टयाची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून ठरवून घ्यावी तसेच महाराष्ट्र विमानतळ विकास कं.मर्या. (महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम) यांचेकडून प्रस्तावित विमानतळाच्या ठिकाणी संस्थानसाठी वाढीव जागेची मागणी करणेत यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **सन २०१६-१७ (सप्टेंबर व ऑक्टोबर- २०१६) दोन महिन्यासाठी पेपरकप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१६-१७ चे किराणामाल खरेदीमध्ये पेपरकप २,५१,००,००० नग खरेदीकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये पेपरकपसाठी तांत्रिक निविदेमध्ये ४ निविदाधारक पात्र ठरले होते. सदर ४ निविदाधारकांच्या ई-निविदांचे कमर्शियल बीड दि.२७.०५.२०१६ रोजी एकत्रित किराणा मालाच्या निविदामध्ये उघडण्यात आले होते. त्यानुसार सन २०१६-१७ सालासाठी वार्षिक पेपरकप पुरविणेकामी मेमहाराष्ट्र स्टेट को-ऑप. कंन्झुमर फेडरेशन, पुणे यांना प्रती नग ०.३२ पैसे दराने २,५१,००,००० नग पेपरकपांचा वार्षिक पुरवठा करणेकामी इकडील जा.नं.एसएसएसटी/ वशी-खरेदी/१२६९/२०१६ दि.११.०६.२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता. परंतु त्यांनी पेपरकप पुरविणेसाठी नकार दिल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर व्दितीय न्युनतम दरधारक यांचेकडून पेपरकप खरेदी करणे अगर फेर निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यावर, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.०६.२०१६ चे सभेत संस्थानने तातडीने खरेदी केलेले ४ लाख पेपरकप अधिक दोन महिन्यांकरीता (जुलै व ऑगस्ट-२०१६) आवश्यक ३१ लाख नग पेपरकप व्दितीय न्युनतम दरधारकांकडून खरेदी करणेस, न्युनतम दर व व्दितीय न्युनतम दर यामधील फरक ०.०५ पैसे प्रमाणे संस्थानला येणारे रक्कम रु.१,७५,०००/- चा जादा खर्च रक्कम मे.महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कंझुमर फेडरेशन लि, पुणे यांनी संस्थानला किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदीचे बयाणा रकमेपोटी भरलेली रक्कम रु.७,००,०००/- मधून वसूल करुन घेऊन संस्थान खाती जमा करणेस, मे.महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कंझुमर फेडरेशन लि, पुणे यांची निविदा अटी-शर्तीनुसार पेपरकपकरीता संस्थानकडे जमा असलेली बयाणा रक्कम रु.१,७५,०००/- मात्र जप्त करुन

त्यांना सदर मालासाठी तीन वर्षांकरीता काळ्या यादीत टाकणेस व पेपरकप खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असा निर्णय झालेला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयास अनुसरुन ३१ लाख नग पेपरकप व्दितीय न्युनतम दरधारक मे.सुयोग नेचर केअर, जयपुर व मे.चिंतामणी इंडस्ट्रिज, औरंगाबाद यांचेकडून जुलै व ऑगस्ट२०१६ या दोन महिन्यांकरीता समप्रमाणात विभागून ०.३७ पैसे प्रती नग दराने खरेदी करणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१४७१ व १४७२/२०१६ दिनांक २७.०६.२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात येऊन पेपरकप खरेदी करण्यात आलेले आहेत.

तसेच सन २०१६-१७ मधील उर्वरित कालावधीकरीता पेपरकप खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर दि.११.०७.२०१६ ते दि.२५.०७.२०१६ या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

यामध्ये तांत्रीक निविदा व नमुने (Technical Bid) स्विकारणेचा कालावधी दि.२५.०७.२०१६ ते दि.२६.०७.२०१६ असा ठेवण्यात आलेला होता व निविदा जाहिरातीमध्ये तांत्रिक निविदा उघडणेची तारीख दि.२८.०७.२०१६ अशी नमुद करण्यात आलेली होती.

तथापि पेपरकपसाठी मुदतीअंती दि२५.०७.२०१६ अखेर सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकच ई-निविदा प्राप्त झालेली होती. त्यामुळे खरेदी नियमावलीप्रमाणे पहिल्यांदा एक आठवडयाची मुदतवाढ म्हणजेच दि.०१.०८.२०१६ पर्यंत देण्यात आलेली होती. सदर मुदतीअंती पुन्हादोनच ई-निविदा प्राप्त झाल्याने खरेदी नियमावलीप्रमाणे दुस-यांदा दिनांक ०८.०८.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. दिनांक ०८.०८.२०१६ सायं.०५.०० वाजेपर्यंत मुदतीअंती याकामी दोनच ईनिविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यामुळे खरेदी विभागाकडील दि९/८/२०१६ चे टिपणीद्वारे याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर पुन्हा ई-निविदा प्रक्रिया करण्याचे निर्देश झाले आहेत. त्यामुळे सदर ई-निविदा प्रक्रियेसाठी पुन्हा अंदाजे दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

कॅन्टीन विभागाकडून अंदाजे दोन महिन्यांसाठी पेपरकपची मागणी विचारली असता ती त्यांनी दि.९/८/२०१६ रोजी लेखी पत्राने सरासरी ३५,००,००० कळविली आहे. तसेच ऑगस्ट-२०१६ मध्ये पेपरकपची मागणी २२ लाख होती. तथापि प्रत्यक्षात १५,५०,००० नग पेपरकप खरेदी करण्यात आलेले आहेत. कॅन्टीनची मागणी ३५ लाख अधिक ऑगस्ट-२०१६ ची उर्वरीत मागणी ६,५०,००० नग अशी एकुण ४१,५०,००० नग होत आहे. ऑक्टोबर-२०१६ चे दुस-या आठवड्यात श्रींचा पुण्यतिथी उत्सव आहे, त्यामुळे हि मागणी ४५ लाख करण्यात आली आहे, त्यास मान्यता मिळावी ही विनंती. ही एकुण ४५ लाखाची मागणी पेपर कपची फेर ई-निविदा मागविताना वजा करण्यात येईल.

तरी वरील वस्तुस्थिती विचारात घेता, साईभक्तांना कॅन्टीन सेवा देण्यात अडचण येऊ नये म्हणून दोन महिन्याच्या कालावधीसाठी वरीलप्रमाणे ४५ लाख नग पेपरकप सन २०१६-१७ चे ई-निविदा प्रक्रियेतील व्दितीय न्यूनतम दरधारक मे.सुयोग नेचर केअर, जयपुर व मे.श्री चिंतामणी इंडस्ट्रिज, औरंगाबाद यांचेकडून समप्रमाणात विभागून, रु.०.३७ पैसे प्रती नग या दराने एकूण रक्कम रु.१६,६५,०००/- (रु.सोळा लाख पासष्ट हजार) मात्रचे पेपरकप खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.५७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना कॅन्टीन सेवा देण्यात अडचण येऊ नये याकरिता दोन महिन्याच्या कालावधीसाठी आवश्यक असलेले ४५ लाख नग पेपरकप, सन २०१६-१७ चे ई-निविदा प्रक्रियेतील व्दितीय निम्नतम दरधारक मे.सुयोग नेचर केअर, जयपुर व मे.श्री चिंतामणी इंडस्ट्रिज, औरंगाबाद यांचेकडून रु०.३७ पैसे प्रती नग या दराने समप्रमाणात विभागून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या एकूण रु.१६,६५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **सन २०१६-१७ (एक महिन्यासाठी) बिस्किटे खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१६-१७ चे किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे Circulatory Agenda व्दारे सादर केलेले प्रस्तावात संस्थानला बिस्कीटे पुरविणेसाठी फक्त एका निविदाधारकाने प्रतिसाद दिला होता. परंतु तो तांत्रिकदृष्ट्याअपात्र ठरला होता. त्यामुळे याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया करण्याचे व तूर्त मागील निविदाधारकाकडून १ महिना आवश्यक असलेली बिस्कीटे खरेदी करण्याचे निर्देश दि.१०/६/२०१६ रोजी झाले होते. त्यास अनुसरुन ई-निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे व याकामीची कमर्शियल ई-निविदा मा.उपसमितीचे/खरेदी समितीचे सभेपुढे उघडावयाची आहे.

सन २०१५-१६ चे तिस-यांदा केलेले फेर ई-निविदा प्रक्रियेनुसार, मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी यांना जा.क्रं.एसएसएस/ वशी-खरेदी/६४९५/२०१६ दि.२५/२/२०१६ अन्वये मार्च महिन्यासाठी पुरवठा आदेश दिलेला होता. तथापि निविदा प्रक्रियेस मा.उच्च न्यायालयाची मान्यता दि.४/४/२०१६ रोजी मिळून नंतर ईनिविदा प्रक्रियेस वेळ लागणार असल्यामुळे, सदर माल जून २०१६ पर्यंत टप्प्याटप्प्याने घेतला होता व एकत्रित निविदेत बिस्कीटासाठीचे ई-निविदेला प्रतिसाद न मिळालेमुळे, वरील नमूद मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालील तपशीलात नमूद केलेप्रमाणे १ महिन्यासाठी आवश्यक असणारी बिस्कीटे खरेदी करण्यासाठी मागील निविदाधारक

मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/१२८४/२०१६ दि.१६/६/२०१६ पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

| अ.नं. | मालाचे नांव | कंपनी | मागणी | दर प्रती पुडा (रुपयांमध्ये) | एकूण रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बिस्किटे ग्लुकोज लहान | पारले | ५८,५०० पुडे | ३.७८ | २,२१,१३०.०० |
| २ | बिस्किटे ग्लुकोज मोठा | पारले | ५,००० पुडे | ७.५६ | ३७,८००.०० |
| ३ | बिस्किटे नमकिन लहान | पारले | २५,००० पुडे | ३.७० | ९२,५००.०० |
| ४ | बिस्किटे स्नॅक्स लहान | पारले | ४१,७०० पुडे | ३.७० | १,५४,२९०.०० |
| ५ | बिस्किटे मारी लहान | पारले | १६,७०० पुडे | ३.७० | ६१,७९०.०० |
| | **एकुण रक्कम रु.** | | | | **५,६७,५१०.००** |
| **रुपये पाच लाख सदुसष्ट हजार पाचशे दहा मात्र** | | | | | |

सदर पुरवठा आदेशाप्रमाणे मे.अग्रवाल एजन्सीज यांनी पुरवठा पूर्ण केलेला आहे व ही बिस्कीटे आतापर्यंत पुरली आहेत.

बिस्कीटांचे कमर्शियल बीड उघडून त्यावर अंतिम निर्णय होऊन पुरवठा आदेश देणे वगैरे कार्यवाही पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे तोपर्यंतचे अंदाजे १ महिन्याचे कालावधीसाठी कॅन्टीनमार्फत साईभक्तांना बिस्कीटे पुरविणेची सेवा देण्यात अडचण निर्माण होऊ नये म्हणून वरील नमूद तपशीलाप्रमाणेच एक महिन्याकरीता रक्कम रु.५,६७,५१०/- (रु.पाच लाख सदुसष्ट हजार पाचशे दहा) मात्रची बिस्किटे मागील पुरवठाधारक मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी यांचेकडून नमूद मंजुर ईनिविदा दराने खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.५७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागामार्फत विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या बिस्कीटांची खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत अंदाजे १ महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक असणारी बिस्कीटे मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी यांचेकडून मागील मंजुर दराने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,६७,५१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे योगगुरु रामदेवबाबा याचे पतंजली निर्मित बिस्कीटेही विक्रीसाठी ठेवण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलचे विविध विभागाकरीता ए.सी. खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद : (1) कलम 14(2)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे. (2) कलम 17(2)(झ) - सर्व साधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा गोष्टी करील.

प्रस्तावना: श्री साईबाबा हॉस्पीटल कडील दि. 06/06/2016 रोजीचे मा. कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नं. 2354 दिनांक 11/06/2016 चे मंजुर टिपणी अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये अपघात विभागातील इमरजन्सी रुममध्ये मॉनीटर्स, व्हेन्टीलेटर्स व इतर मशीनरी आहेत. या ठिकाणी अत्यावस्थ अवस्थेत येणा-या रुग्णांची संख्या जास्त असलेने या रुममध्ये 2 ए.सी. तसेच सहाय्यक अधिसेविका कार्यालय रूग्णालयाचे जिन्याखाली येत असल्यामुळे व या ठिकाणी खिडकी नसल्याने हवा येत नसुन त्यामुळे सदर कार्यालयात 1 ए.सी. तसेच हॉस्पीटलचे बीलींग विभागात 4 कॉम्पुटर्सवर सतत काम चालू असते. एअर व्हेंन्टीलेशन होत नसलेने या ठिकाणी 1 नग असे एकुण 4 नग ए.सी. मेकॅनिकल विभागामार्फत बसवुन मिळणेस मान्यता देणेत आलेली आहे.

तसेच श्री साईनाथ हॉस्पीटलकडील दिनांक 18/07/2016 रोजीचे मा. कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नं. 9054 दिनांक 26/07/2016 चे मंजूर टिपणी अन्वये श्री साईनाथ रक्तपेढीतील कोल्ड रुममध्ये 1 नग व डोनर रुममध्ये 1 नग असे एकूण 2 नग ए.सी. मेकॅनिकल विभागामार्फत बसवून मिळणेसाठी मान्यता देणेत आलेली आहे.

मागणी: श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पीटल यांनी मागणी केलल्या ठिकाणी इकडील विभागामार्फत प्रत्यक्ष पहाणी केली असता, मागणी केलेल्या ठिकाणांपैकी अपघात विभागात दोन टनाचे 2 नग ए.सी. ऐवजी तांत्रिकदृष्ट्या 3 नग ए.सी. ची आवश्यकता आहे. तसेच श्री साईनाथ हॉस्पीटलकडील श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये कोल्ड रुम व डोनर रुममध्ये ए.सी. बसविणेत आलेले आहेत. मात्र सदरचे ए.सी सन 2008 साली बसविणेत आलेले असून, ते सततचे वापराने नादुरुस्त होत असल्याने, सदरचे ठिकाणी नविन 2 नग स्प्लिट ए.सी. बसवावे लागणार आहे. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पीलट व श्री साईनाथ हॉस्पीटलचे विविध ठिकाणी एकूण 7 नग स्प्लिट ए.सी. बसविणे आवश्यक आहे. मात्र सदर ठिकाणी आवश्यक असणारे स्प्लिट ए.सी. मेकॅनिकल विभागाकडे उपलब्ध नसल्यामुळे विहीत पध्दतीने महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन पुरवठाधारकांकडून ईनिविदा मागवून खरेदी करावे लागणार आहेत. यासाठी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | स्प्लिट ए.सी. तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | Split Type Wall Mounted Air Conditioner Capacity – 2 Ton, Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, & Copper Piping With Outdoor Unit, Extra M.S. Stand<br>Company – LG | 7 नग | 48,000/- | 3,36,000/- |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय: श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पीटलचे विविध विभागांसाठी दोन टन क्षमतेचे 7 नग स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी अंदाजे रुपये 3,36,000/- खर्च अपेक्षित आहे. मेकॅनिकल विभागाचे सन 2016-17 चे अंदाजपत्रकात 'नविन मशिनरी खरेदी' या शिर्षाखाली रक्कम रु. 4,00,00,000/- मात्रची तरतुद करणेत आलेली असून, आज अखेर या शिर्षाखाली रक्कम रुपये 3,98,42,709/- मात्र शिल्लक असून, या रक्कमेतुन सदरचे ए.सी. ई निविदा प्रक्रियाद्वारे खरेदी करता येईल. याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलचे विविध विभागांसाठी दोन टन क्षमतेचे 7 नग स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन पुरवठादारांकडून ईनिविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 3,36,000/- मात्रच्या मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलचे विविध विभागांसाठी आवश्यक असलेले दोन टन क्षमतेचे ७ नग स्प्लिट ए.सी. विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,३६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद व उदी प्रसाद वाटप करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अधिनियम मधील 17(1) मधील कलमा नुसार भक्तांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशी तरतुद केलेली आहे

व्यवस्थापन समितीचा ठराव- मा.व्यवस्थापन समितीचे दि.26/07/2013 रोजी झालेले सभेत दर्शन रागेतील साईभक्तांना मोफत बुंदी प्रसादाचे वाटप करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

प्रस्ताविक- मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत बुंदी प्रसादाचे वाटप करण्यास मान्यता दिलेली आहे. सदरचे आदेशास अनुसरुन व व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णया प्रमाणे दि.15/08/2013 पासून दर्शन रांगेतील साईभक्तांना गेट नं.3 जवळील दर्शन रांगेच्या गॅलरीजवळ बुंदी प्रसादाचा साठा करुन दर्शन रांगेतील प्रत्येक साईभक्तांस १०० ग्रॅमचे प्रसाद बुंदी पाकीट मोफत वाटप करणेची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.परंतु मोफत बुंदी प्रसाद वाटपाचे ठिकाणी खालील प्रमाणे अडचणी येत आहेत.

1) मंदीर सुरक्षितेच्या कारणास्तव मोफत बुंदी प्रसादाचे वाटप मंदीर परिसराच्या बाहेर करावे अशी सूचनापोलीस अधिक्षक अ.नगर यांचेशी दि.25/10/2013 रोजी मा.कार्यकारी अधिका साहेब यांचे समवेत झालेल्या मिंटिग मध्ये झालेली असलेचे संरक्षण कार्यालयाकडून सागण्यात आले आहे.

2) मोफत बुंदी वाटपाचे जुन्याभक्तनिवास ईमारती मधील दर्शन हॉलचे आत मध्ये असलेने भरलेले बुंदी प्रसाद कॅरेटसची वाहना व्दारे वाहतुक गेट नं. 4 मधून ॅगेट नं.3 पर्यत करावी लागते या परिसरात साईभक्तांची मोठया प्रमाणात वर्दळ असते त्यामुळे वाहतुककरणे त्रासदायक आहे.

3) साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी असलेने वाहनामुळे भक्तांना इजा अपघात होणेची शक्यता आहे.

4) कॅरेटर्स भरलेले वाहन गेट नं.3 जवळ घ्यावे लागते व सर्व कॅरेटर्स तेथेच उतरवून घ्यावे लाॅगतात.त्याच ठिकाणी भक्तांची वर्दळ असते. त्यामुळे भक्तांना हा त्रास सहन करावा लागतो वाहने आंतमध्ये आणावी लागात असलेने भक्तांना येणे जाणेसाठी अडचण निर्माण होते.

5) बुंदी प्रसाद वाटपाचे ठिकाणी तळ मजल्यापासूण दर्शन लाईन मधून येणारे भक्त व पहिल्या मजल्यावरील दर्शन लाईन मधून येणारे भक्तांची बुंदी वाटपाचे ठिकाणी एकत्रित गर्दी होते.एकत्रित ॅगर्दी झाल्यामुळे प्रत्येक साईभक्तास बुंदी प्रसाद पाकीट देण्यास अतिशय त्रासदायक होत आहे.

6) साईभक्तांनी दर्शन रांगेत बुंदी प्रसाद घेतलेनंतर या ठिकाण एकत्रित गर्दी होत असलेने बुंदी प्रसादाचे पाकीट भक्तांकडून पडून पायदंळी तुडविले जातात काही भक्त त्याच ठिकाणी बुंदी प्रसाद पाकीटे फोडून खातात.त्यामुळे प्रसाद बुंदी खाली पडून फरशी चिकट होते.त्यामुळे भक्त फरशीवरून पाय घसरुनपडणेची शक्यता असते.

7) दर्शन रांगेजवळील गॅलरी लहान असलेमुळे जास्त प्रमाणात बुंदी प्रसाद कॅरेटची साठवण करता येत नाही.

8) बहिस्थ लोकाचा उपद्रव होईल या उद्देशाने तत्कालीन .अध्यक्ष सो.यांचे निर्देशानुसार गेट नं 3 जवळील दर्शन रागेत गॅलरीच्या आतमध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना बुंदी प्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.परन्तु मागील २ ते

३ वर्षाचा अनुभव पाहता बाहेरील व्यक्ती अथवा गावक-याना कधीही मोफत बुंदी प्रसादाची मागणी केली नाही.दर्शन रांगेतील भक्तां व्यतीरिक्त इतर कोणत्याही बाहेरील व्यक्तीना मोफत बुंदी प्रसाद देण्यात आलेला नाही.

9) मोफत बुंदी वाटपासाठी रात्री ज्याठिकाणी बुंदी प्रसादाची साठवण केली जाते तेथे खेळती हवा राहत नाहीत्यामुळे बुंदी प्रसाद पाकिटे खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

10) सध्याचे उदी वाटप कांऊन्टर मंदीर परीसरातील गेट नंबर २ जवळ असुन पाठीमागील बाजुस संरक्षण विभागाचे कार्यालय आहे.साईभक्तांना तक्रारी अथवा सुचना देणे साठी संरक्षण कार्यालय मध्येजाता येत नाही. त्यामुळे साईभक्तांना अडचणी येतात तरी सदर उदी वाटप कांऊन्टर गुरुस्थान मंदीराचे समोर ध्यान मंदीराचे मागील बाजुस असलेल्या जागेत स्थलांतर करण्यात यावे. उपरोक्त येणा-या अडचणी ऐवजी गुरुस्थान मंदीराच्या समोरील ध्यान मंदीर मागील मोकळया जागेत बुंदी प्रसाद पाकिट व उदी प्रसादाचे वाटप केल्यास खालील प्रमाणे अडचणी दुर होतील

11) गुरुस्थान मंदीरा समोर ध्यान मंदीराचे मागील जागेत साईभक्त दर्शन घेऊन आल्यानंतर मोफत बुंदी प्रसादाचे वाटप केल्यास साईभक्तांना टोकन देण्याची गरज भासणार नाही.

12) गेट नं.४ मधुन वाहनाव्दारे प्रसाद बुंदी पाकिटाची गुरुस्थान मंदीरा पर्यन्त वाहतुक करुन घेता येईल व तेथुनच सदरचे वाहन माघारी आणता येईल गर्दी मध्येवाहन नेण्याची गरज भासणार नाही.

13) गुरुस्थान मंदीरा समोरील ध्यान मंदीराचे मागील मोकळया जागेत प्रसाद बुंदी पाकिटाची कॅरेटसाठी बंदीस्त शेड बांधकाम विभागामार्फत करुन घेता येईल.तसेच तेथील मोकळया जागेत उदी वाटपासाठी बंदीस्त कांऊन्टर करुन घेण्याची कार्यवाही बांधकाम विभागाकडून करता येईल.

14) बुंदी प्रसाद पाकिटाचे वाटप फक्त दर्शन घेऊन आलेल्या साईभक्तांना त्याठिकाणी असलेल्या रिलिग मधुन करता येईल.

15) भरलेल्या कॅरेटची वाहन गेट नं.४ मधुन गुरुस्थान मंदीरापर्यन्त येईल पाकिटे खाली झाल्यावर परत सदरचे वाहन ४ नंबर गेटने बाहेर जाईल मदीर परीसरातील गर्दी मध्येवाहन जाणार नाही.

मागणी – प्रसाद बुंदी पाकिटे व उदी प्रसाद पाकिटाचे वाटप गुरुस्थान मंदीरासमोरील ध्यान मंदीराचे मागील मोकळया जागेत करण्यात यावे असे नम्र मत आहे.

संस्थन अधिनियम/ठराव – अंतर्गत/ धोरणात्मक

उपरोक्त प्रमाणे गुरुस्थान मंदीराचे समोरील ध्यान मंदीराचे मागील मोकळया जागेत मोफत बुंदी प्रसादाचे व उदी प्रसादाचे वाटप केल्यास येणा-या अडचणी दुर होतील असे नम्र मत आहे तरी प्रसाद बुंदी पाकिटे व उदी प्रसाद वाटप गुरुस्थान मंदीराचे समोरील ध्यान मंदीराचे मागील मोकळया जागेत करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अडचणींचा विचार करता, दर्शन रांगेमधील साईभक्तांना देण्यात येणाऱ्या मोफत बुंदीप्रसाद पाकिटाचे वितरण गुरुस्थान मंदीरासमोरील ध्यान मंदीराचे मागील मोकळया जागेत करणेत यावे. तसेच मोफत बुंदीप्रसाद पाकिटाबरोबरच दर्शन घेऊन बाहेर आलेल्या भक्तांना उदीप्रसाद पाकिटही देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग/ मंदिर विभागप्रमुख/ बांधकाम विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **साईभक्तांचे होणा-या गर्दीचे नियोजन करणे संदर्भात दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मे.त्रिलोक सेक्युरीटी सिस्टीम इंडीया लि. यांचे प्रतिनीधींमार्फत प्रात्यक्षिकाचे सादरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधीलतरतुद :**कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :**१) मा.व्यवस्थापन समितीचे दि. २०/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २८७. २) मा.व्यवस्थापन समितीचे दि. १५/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६००.

**प्रास्ताविक:** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाची दर्शन पास (Queue Management - II) कार्यप्रणाली, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी विकसीत केलेली आहे सदरच्या कार्यप्रणालीचा मुख्य उद्देश मंदिर परिसरात होणाऱ्या श्री साईभक्तांच्या गर्दीचे व्यवस्थापन व श्री साईभक्तांचे वेळेचा सदुपयोगव्हावा असा आहे. कार्यप्रणाली अंतर्गत शिर्डी येथे विविध ठिकाणी दर्शन पास वितरीत करण्याकरीता काऊंटर्स उपलब्ध करुन देणे प्रस्तावीत आहे. कार्यप्रणालीमध्ये दर्शनासाठी उपलब्ध वेळेची विविध भागांमध्ये विभागणी करण्यात येणार आहे. सदर वेळेमध्ये सद्यपरिस्थितीत दर्शन घेणाऱ्या श्री साईभक्तांच्या संख्येइतक्या साईभक्तांना पास वितरीत करण्यात येणार आहेत. वेळेचे व श्री साईभक्तांचे संख्येचे नियोजन परिस्थितीनुरुप बदलण्याची सुविधा कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आलेले श्री साईभक्त जवळच्या काऊंटरला भेट देऊन तथे संबधीत संस्थान कर्मचाऱ्यांकडून उपलब्ध वेळेचा दर्शन पास घेऊ शकतील. सदर पासवर दर्शनासाठीचा वेळ व प्रवेशद्वाराची माहिती प्रिंट केलेली असेल. श्री साईभक्त सदरचा पास घेऊन ठरवून दिलेल्या वेळी व प्रवेशद्वारावरती उपस्थित

राहतील. प्रवेशद्वारावर असलेले संस्थान कर्मचारी दर्शनपासची पडताळणी करुन श्री साईभक्तांना दर्शनासाठी प्रवेश देतील.

सदर कार्यप्रणालीबाबत मा.जिल्हाधिकारी सो. तथा तत्कालीन सदस्य यांचेबरोबर चर्चा झाली असता, मा.जिल्हाधिकारी सो. यांनी तिरुपती देवस्थान येथे दर्शन पास (Queue Management) प्रणाली कार्यान्वीत केलेल्या मे.त्रिलोक सिक्युरीटी स्स्टिीम इंडीया प्रा.लि., बैंगलोर यांना कार्यप्रणालीचे सादरीकरण करणेसाठी त्रीसदस्य समितीचे सभेसमोर बोलविणेबाबत निर्देश दिले होते.

उपरोक्त निर्देशानुसार संबधीत प्रतिनीधींना मा.त्रीसदस्यीय समितीचे दि. २०.०८.२०१५ रोजीचे सभेमध्ये कार्यप्रणालीचे सादरीकरण करणेसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार मे.त्रिलोक सिक्युरीटी स्स्टिीम इंडीया प्रा.लि., बैंगलोर यांचे प्रतिनीधी श्री.श्रीनिवास राव यांनी कार्यप्रणालीचे सादरीकरण दाखविलेले आहे. तसेच, कार्यप्रणाली कार्यन्वीत करण्याकरीता आवश्यक असणारे मनुष्यबळ तथा संगणके व इतर अनुषंगिक साहित्य ते विनामुल्य पुरविणार असल्याचे अवगत केले आहे. संस्थानमार्फत सदरकामी त्यांना फक्त जागा, विज, इंटरनेट कनेक्टीव्हीटी व कंपनीचे कर्मचारी यांना संस्थानमार्फत निवासाची व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी यावी असेही त्यांनी नमुद केले.

उपरोक्त सादरीकरणावर सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय क्रं. २८७ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

''दर्शनपास कार्यप्रणालीमध्ये साईभक्तांना मिळणा-या दर्शनपासवर दर्शनासाठी जाण्याची वेळ असणार आहे, त्यामुळे साईभक्त नेमुन दिलेल्या वेळेतच दर्शनासाठीच्या गेटवर जातील व अनावश्यक गर्दी होणार नाही, त्यामुळे साईभक्तांच्या वेळेची बचत होईल व गर्दीचेही व्यवस्थापन होऊ शकेल. याकरिता मे.त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम इंडीया प्रा.लि., बैंगलोर यांनी इतर देवस्थानच्या ठिकाणी बसविलेल्या दर्शन पास (Queue Management) कार्यप्रणालीची प्रत्यक्ष पाहणी करावी व त्या देवस्थानसोबत केलेल्या कराराचा अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव त्या करारासह सभेसमोर सादर करावा. तसेच दर्शन पास (Queue Management) कार्यप्रणाली राबविणेसाठी सदरहु कंपनीला संस्थान परिसरातील वेगवेगळया ठिकाणी जागा, वीज व कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन देणेबाबत व त्यांचे अधिकारी, कर्मचारी यांचेकरीता निवास, भोजनाची विनामुल्य व्यवस्था करणेचाही उललेख सदरहु प्रस्तावामध्ये करण्यात यावा''.

उपरोक्त निर्णयान्वये तिरुमाला येथे मे. त्रिलोक सिक्युरीटी सिस्टिम इंडीया लि. यांनी तिरुपती देवस्थान येथे कार्यान्वीत केलेल्या Queue Managementकार्यप्रणालीचे मा.कार्यकारी अधिकारी सो., उपकार्यकारी अभियंता, बांधकाम व प्र.अधिक्षक माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल सादर केलेला आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांचे कोर्टात श्री संदिप विजय कुलकर्णी यांनीसिव्हील ॲप्लीकेशन ४७६५/२०१६ दाखल केले होते. सदर ॲप्लीकेशन अर्जदाराने साईभक्तांना टोकन देवून दर्शनाची वेळ ठरवून द्यावी तसेच दर्शन रांगेत किती साईभक्त आहेत, किती साईभक्त दर्शन घेऊन बाहेर आले आहेत, हि सर्व माहिती डिस्प्ले बोर्डवर दिसेल अशी व्यवस्था करणेकामी संस्थानला निर्देश द्यावेत असे यासाठी दाखल केले होते. प्रस्तुत सिव्हील अर्जाबाबत मा.उच्च न्यायलयाने दि. ०२/०५/२०१६ रोजीचे आदेशात सदर बाबतीत संस्थानने तीन महिन्यात निर्णय घेणेबाबत सुचीत केलेले आहे.

उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन मा.अध्यक्ष साहेब यांनी अर्जदारास मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे निर्देश दिले होते. त्यानुसार अर्जदारास मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/०७/२०१६ रोजीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात आले होते. चर्चेदरम्यान सदरची कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्याची कार्यवाही संस्थानमार्फत सुरु असल्याचे अर्जदाराचे निदर्शनास आणुन दिलेले आहे. चर्चेअंती प्रस्तुत कार्यप्रणाली लवकरात लवकर कार्यान्वीत करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

मे.त्रिलोक सिक्युरीटी स्स्टिीम इंडीया प्रा.लि. यांनी मा.त्रीसदस्यीय समितीचे दि. २०.०८.२०१५ रोजीचे सभेमध्ये तिरुपती देवस्थान येथे कार्यान्वीत केलेली कार्यप्रणाली शिर्डी येथे कार्यान्वीत करण्यासंदर्भात सकरात्मक प्रतिसाद दिलेला असुन याकामी आवश्यक संगणक व सगणकीय साहित्य तसेच मनुष्यबळ ते विनामुल्य पुरविणार आहेत. सदर कंपनी भक्तांना द्यावयाच्या दर्शनपासच्या पृष्ठभागावर केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या जाहीराती प्रिंट असल्याने शासनाकडून त्यांना त्याबद्दल प्रत्येक पासपाठीमागे ठरावीक रक्कम मिळणार आहे.

मा.त्रिसदस्यीय समितीने दर्शन पास कार्यप्रणालीसंदर्भात दिलेले निर्देश व मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांनी सिव्हील ॲप्लीकेशन ४७६५/२०१६ संदर्भात दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने मेत्रिलोक सिक्युरीटी स्स्टिीम इंडीया प्रा.लि. यांनी तिरुपती देवस्थान येथे कार्यान्वीत केलेली Darshan Queue Management (Time Base) हि कार्यप्रणाली शिर्डी येथे कार्यान्वीत करता येईल. सदर कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेसाठी मे.त्रिलोक सिक्युरीटी स्स्टिीम इंडीया प्रा.लि. यांनी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात झालेल्या बैठकीदरम्यान कार्यप्रणालीसंदर्भात पुढीलप्रामणे मुद्दे मांडलेले आहेत

1. दर्शन पास वितरीत करणेकामी शिर्डी येथे विविध ठिकाणी एकुण ४० काऊंटर्स असतील, सदरचे काऊंटर्स २४ तास कार्यरत असतील. गर्दीप्रमाणे यात वेळोवेळी बदल करता येईल.
2. वितरीत केलेले पासेस तपासणीकामी नियोजीत प्रवेशद्वारावरती व्हेरीफीकेशन काऊंटर्स सुरु करावे लागतील.

3. उपरोक्त काऊंटर्ससाठी आवश्यक मनुष्यबळ, संगणक व संगणकीय साहित्य संबधीत कंपनी विनामुल्य पुरविणार आहे.
4. काऊंटर्स सुरु करणेकामी आवश्यक फर्निचर, विज जोडणी व इंटरनेट सेवा संस्थानला पुरवावी लागणार आहे.

उपरोक्त नमुद मुद्यांपैकी फर्निचर व वीज जोडणी संबधीत ठिकाणी पुरविता येईल परंतु इंटरनेट सेवा कंपनीने स्वत: उपलब्ध करावी असे नम्र मत आहे. तसेच, सदर कार्यप्रणाली कार्यान्वीत झालेंनतर, संस्थानचे नियंत्रण राहावे याकरीता पर्यवेक्षणाची जबाबदारी संरक्षण विभागाकडे सोपविता येईल.

**मागणी:** प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, Darshan Queue Management (Time Base) हि कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी, मे.त्रिलोक सिक्युरीटी स्स्टिीम इंडीया प्रा.लि. यांचेमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर कार्यप्रणालीचे प्रात्यक्षीक दाखविणेस व याकामी पुढील निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्तप्रमाणे Darshan Queue Management (Time Base) हि कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी,मे.त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम इंडीया प्रा.लि. यांचेमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर कार्यप्रणालीचे प्रात्यक्षीक दाखविणेस व याकामी पुढील निर्णयार्थ सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५८०** **साईभक्तांचे होणाऱ्या गर्दीचे नियोजन करणे संदर्भात दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामीच्या प्रात्यक्षिकाचे सादरीकरण करणेसाठी आजचे सभेत मे.त्रिलोक सेक्युरीटी सिस्टीम इंडीया लि. यांचे प्रतिनीधीं श्री.रविचंद्र हे उपस्थित होते. त्यांनी मे.त्रिलोक सेक्युरीटी सिस्टीम इंडीया लि. यांचेकडील दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणालीचे प्रात्यक्षित सभेस दाखविले व विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणालीचे काम मे.त्रिलोक सेक्युरीटी सिस्टीम इंडीया लि. यांना दिल्यास निश्चितच साईभक्तांचा दर्शनासाठी लागणारा वेळ वाचेल व त्यामुळे दर्शनरांगेमध्ये अनावश्यक गर्दीही होणार नाही. ते कार्यादेश दिल्यानंतर तीनच महिन्यामध्ये सदरहू सिस्टीम चालू करणार आहेत तसेच केंद्र शासनानेही त्यांना परवानगी दिलेली आहे व यामध्ये संस्थानला खर्च करावयाचीही आवश्यकता नाही, या सर्व बाबींचा विचार करता मे.त्रिलोक सेक्युरीटी सिस्टीम इंडीया लि. यांना पुढील ५ वर्षासाठी दर्शनरांगेचे व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामीचा कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच सदरहू दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीवर संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभाग व संरक्षण विभाग यांनी संयुक्तीकरित्या नियंत्रण ठेवावे अशी सूचना करणेत आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत**

**निर्णय क्र.५८१** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**(१)** संस्थानचे शैक्षणिक संकुलामध्ये सध्या इ१२ वी पर्यंतच शिक्षणाची सुविधा उपलब्ध असून त्यापुढील शिक्षणासाठी शिर्डी व परिसरातील विद्यार्थ्यांना इतरत्र जावे लागते. याकरिता पदवी शिक्षण संस्थानमार्फत सुरु करणेची कार्यवाही करावी. तसेच याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, बाबांच्या महासमाधी शताब्दी वर्षापर्यंत संस्थानमार्फत साई शताब्दी मेडिकल कॉलेज सुरु करणेत यावे, यामध्ये पदवी, मेडिकल, नर्सिंग, बी-फार्मसी, पॅरामेडिकल इ. सर्व शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच साई नॉलेज सिटी बनविणेसाठीचाही सविस्तर प्रस्ताव तात्काळ मंजुरीसाठी व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(२)** संस्थानचे दोन रुग्णालये सुरु असून या रुग्णालयांमध्ये सध्या डॉक्टर्सची कमतरता असल्यामुळे जगभरातील साईभक्त डॉक्टर्सना विनामोबदला व्हिजीटींग पध्दतीने कमीत-कमी एक आठवडा संस्थान रुग्णालयांमध्ये सेवा देणेसाठी, संस्थानचे अधिकृत संकेस्थळावरुन आवाहन करणेत यावे. या व्हिजीटींग डॉक्टरांची शिर्डी येथे दर्शन, भोजन व निवास व्यवस्था विनामुल्य करणेत यावी. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(३)** शेगावच्या धर्तीवर श्री साईबाबा संस्थानमध्ये सेवेकऱ्यांची सेवा घेणेसाठी आवाहन करणेत यावे. यासाठी आसपासच्या गावांना कळविणेत यावे व संस्थानचे अधिकृत संकेस्थळावरही प्रसिध्दी देण्यात यावी. मात्र येणाऱ्या सेवेकऱ्याची पार्श्वभूमी तपासून घ्यावी तसेच संस्थान सोपवील ते काम करणेस तयार असायला हवे, असे कळविणेत यावे. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**(४)** संस्थानला किराणा माल/ औषधे/ साहित्य/ कामगार इ. पुरविणारे ठेकेदार साईभक्त असावा, याचा उल्लेख जाहिरात/ निविदा प्रसिध्दीमध्ये करणेत यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(५)** मंदिर व मंदिर परिसरामध्ये मध्यंतरीच्या कालावधीमध्ये सिव्हील ड्रेसवर सिक्युरिटी गार्ड कार्यरत होते, त्यामुळे पाकिटमारांवर आळा बसलेला होता. परंतु दरम्यान सदरहू सिव्हील सुरक्षा गार्ड बऱ्यांचवेळा व्हीआय.पी. गेटवर साईभक्तांना दर्शनासाठी सोडत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांची नियुक्तीइतरत्र करण्यात आलेली आहे. आता, मंदिर व मंदिर परिसरामध्ये पाकिटमारीचे प्रमाण वाढलेले आहे, याकरीता मंदिर व मंदिर परिसरामध्ये संस्थानमार्फत सुरक्षा गार्ड तसेच पोलिस विभागार्फत काही पोलिस कर्मचारी यांची सिव्हील ड्रेसवर नियुक्ती करणेत यावी. या दोन्ही विभागांनी सामंजस्याने काम करावे. मात्र यामध्ये पुर्वी सिव्हीलमध्ये काम केलेल्या कर्मचाऱ्यांना नेमण्यात येऊ नये.
(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**(६)** संस्थानचे श्री साईप्रसादालयामार्फत ज्या-ज्या संस्थांना मोफत/ सशुल्क प्रसादभोजन पुरविणेत येते त्यान्त्या संस्थांची वार्षिक पहाणी करणेत यावी व प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार प्रसादभोजन पुरविणेत यावे.
(कार्यवाही- साईप्रसादालय विभागप्रमुख)

---

**(७)** संस्थानचे रुग्णालयामध्ये रुग्णांवरील उपचार/ शस्त्रक्रियेकरीता मुळ खर्च किती येतो व आपण फी किती आकारतो याचा तौलानिक तक्ता तयार करुन, समितीसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.५१० ते ५८१ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर व्यवस्थापन समितीची पुढील सभा दि.३१.०८.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता शिर्डी कार्यालयात होईल, असे मा.अध्यक्ष महोदय यांनी जाहीर केले व सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (बाजीराव शिंदे) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**